IRBK-0100210

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय चरित्र
दा क्र २१०

IRBK-0100210

IRBK-0100210

दा. क्र. 290 चरित्र
११७०१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

2 SEP 1972

# विनंति.

पुस्तकांस लागणाऱ्या कागद वगैरे वस्तु एकसारख्या महाग होत असून हीं तर मिळेनातशाहि झाल्या आहेत. अशा स्थितींत आठ आठ आण्यांस तक देणें पत्करेनासें झालें आहे; तथापि त्यासाठीं किंमत वाढविण्याची आमची ळींच इच्छा नाहीं. आहे या किंमतींतच ग्रंथमालेचें थोडें नुकसान भरून नेघावें म्हणून आह्मी एक निराळी योजना केली आहे, व ती सर्व आश्रयदात्यांना पसंत पडेल, असा आम्हांस भरंवसा आहे. बिस्मार्क यांचें चरित्र पुरें होईपर्यंत म्हणजे दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या भागाबरोबर एकेक सुंदर कादंबरीहि पाठविण्याचें आम्ही योजिलें आहे. दोन्ही पुस्तकें स्वतंत्र बांधलेलीं पण एकाच व्ही. पी. नें पाठविलीं जातील. एक पुस्तक दहा आण्यांच्या व्ही. पी. नें पाठविलें जातें त्याऐवजीं हीं दोन पुस्तकें सव्वा रुपयाच्या व्ही. पी. नें पाठविलीं जातील. म्हणजे पैशाच्या दृष्टीनें आश्रयदात्यांचें नुकसान न होतां ग्रंथमालेचा मात्र प्रत्येक पुस्तकामागें अर्धा आण्यानें फायदा होईल. तरी सहृदय आश्रयदाते ही योजना पसंत करून ग्रंथमालेस अशा वेळीं सहाय्य करतील अशी आशा आहे. ज्यांना ही योजना पसंत नसेल त्यांनीं तसें कळवावें म्हणजे त्यांना प्रत्येक पुस्तक थोड्या दिवसांच्या अंतरानें निरनिराळ्या व्ही. पी. नें पाठविलें जाईल.

**भारत-गौरव-ग्रंथमाला,**

गिरगांव—मुंबई.

हिंद पब्लिशी... ठाकुरद्वार नाका, मुंबई नं. २.

वा. च. १६२

# प्रिन्स बिस्मार्क.

( प्रथमखंड )

वा. क्र. 290 नों. दि.
चरित्र.



IRBK-0100210

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

भगवान् श्रीकृष्ण.

१९१७

साधीप्रत दहा आणे. ] सर्व हक्क स्वाधीन. [ कापडी एक रुपया.

PUBLISHER:
P. S. BHASE,
*Manager*,
**BHARAT GOURAV GRANTHA MALA,**
GIRGAON, BOMBAY.

Printed by
G. N. Kulkarni,
at the Karnatak Press,
434 Thakurdwar,
Bombay.

९५८
य. ८५/१

# प्रकाशकाचे दोन शब्द.

भारत-गौरव-ग्रंथमालेनें चालविलेला हा साहित्यसेवेचा प्रयत्न भगवान् श्रीकृष्ण कृपेनें यशस्वी होऊन आज ही ग्रंथमाला आपलें बाविसावें पुष्प तिच्या आश्रयदात्यांच्या हातीं मोठया आनंदानें देत आहे. आजवर प्रसिद्ध झालेल्या पुष्पांहून या पुष्पाचा सुवास कांहीं निराळा असल्यामुळें या पुष्पापासून आश्रयदात्यांनाहि आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं, असा आम्हास भरंवसा वाटतो. एकसारख्या कादंबऱ्याच प्रसिद्ध कराव्या हा या ग्रंथमालेचा केव्हांहि उद्देश नाहीं व तसें तिनें वेळोवेळीं आपल्या विनंतिपत्रांतून ध्वनितहि केलें आहे. मधून मधून चांगल्या प्रकारचीं चरित्रें व प्रवासवर्णनें प्रसिद्ध करून त्या दृष्टीनेंहि मराठी वाङ्मयांत उत्कृष्ट पुस्तकांची भर घालावयाची, हा आमचा प्रथमपासूनच मनोदय होता; परंतु ग्रंथमालेला बाल्यावस्थेमुळें चरित्रात्मक पुस्तकांच्या प्रकाशनाकडे वळतांच आलें नाहीं. हळूहळू तिचे आश्रयदाते वाढून त्यांच्याकडून या बाबतींत जोराचा तगादा सुरू झाल्यामुळें व त्यांच्याच प्रोत्साहनामुळें ग्रंथमालेची स्थितीहि हळूहळू सुधारत चालल्यामुळें ही आश्रयदात्यांची इच्छा आज अल्पस्वल्प प्रमाणानें ग्रंथमालेस पुरी करतां आली आहे. ज्या कांहीं थोर व्यक्तींच्या चारित्र्याच्या मननाचा हक्क सगळें जग सांगत असतें, अशाच थोर पुरुषांपैकीं, बिस्मार्क हे एक होत, असें युरोपांतला प्रत्येक इतिहासकार प्रतिपादतांना आढळतो. शिवाय युरोपांतल्या चाललेल्या महायुद्धामुळें बिस्मार्क यांच्या चरित्राकडे साहजिकच साऱ्या जगाचे डोळे लागले आहेत. इतक्यांतल्या इतक्यांत इंग्रजी भाषेंत बिस्मार्क यांचीं किती तरी चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. हें चरित्रहि त्यांतल्याच एका चांगल्या पुस्तकावरून लिहिलें असून या पुस्तकाच्या वाचनानें उत्कृष्ट करमणूक होऊन अनेक ऐतिहासिक तत्वेंहि सहज ओघानें वाचकांना समजतील असें आम्हांस वाटतें.

युरोपांत चाललेल्या युद्धामुळें ग्रंथप्रकाशनास लागणारी प्रत्येक वस्तु कल्पनेच्या बाहेर महाग झाली आहे आणि त्यामुळें हा व्यवसाय फारच बिकट झाला आहे. ही

ग्रंथमाला पूर्वीपासूनच शक्य तितक्या स्वस्त किंमतीनें पुस्तकें प्रसिद्ध करीत असल्यामुळें तिला ही महागाई चांगलीच जाणवली व अगदीं नाइलाज झाल्यावरच भारत-गौरव-ग्रंथमालेनें आपल्या पुस्तकाची किंमत दोन आण्यांनीं वाढविली आहे. या वाढविलेल्या ह्मणजे आठ आणे किंमतीच्या मानानें पाहिलें असतां अजूनहि आमचीं पुस्तकें स्वस्त अशींच आश्रयदात्यांना वाटतात हें आमच्या आश्रयदात्यांच्या उत्साहजनक पत्रांवरून उघड दिसून येतें. आश्रयदात्यांचेंच कशाला, पण हा व्यवसाय करणाऱ्या अनेक व्यापारी मित्रांनींहि अशा स्थितींत भारत-गौरव-ग्रंथमालेला आठ आणे किंमतीनें पुस्तकें देण्यास कशीं परवडतात, असें आश्चर्य प्रगट केलें आहे. शिवाय आह्मी आमच्या पुस्तकांत इतरांच्या जाहिराती घेत नसल्यामुळें हें त्यांचें आश्चर्य अधिकच दुणावतें. वास्तविक हें सर्व आमच्या आश्रयदात्यांच्या कृपेचें व प्रोत्साहनाचें फळ होय. असल्या बिकट परिस्थितींत आमच्या आश्रयदात्यांकडून आह्मास अनेक प्रकारची मदत झाल्यामुळेंच या संकटांशीं टक्कर देऊन ही ग्रंथमाला वाढीस लागली आहे. दिवसें दिवस तिच्या सौंदर्यांत जी भर पडत चालली आहे, त्यांचें कारण केवळ वाढता लोकाश्रय हें होय. आमचे थोडे प्रतिस्पर्धी मित्र व साहित्यासंबंधानें उगीच पोकळ बढाई मारणारे घमंडानंदन साहित्याचार्य यांच्या प्रतिरोधास न जुमानतांहि ग्रंथमालेची एकसारखी उन्नति होत आहे, याबद्दल कोणाहि महाराष्ट्र साहित्याच्या खऱ्या भक्तास आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. गेल्या खेपेस नवीन आश्रयदाते मिळवून देण्यासंबंधानें जी विनंति केली होती ती बहुतेकांनीं मान्य केल्यामुळें ग्रंथमालेचे आश्रयदाते बरेच वाढले आहेत, हें आह्मी आमच्या आश्रयदात्यांना आनंदानें कळवितों. आमच्या आश्रयदात्यांनीं अशीच खटपट केल्यास ग्रंथमालेवर फार उपकार होतील. मुद्रणसामग्रीचा बाजार कडक असून जरी अनिश्चित अशा स्थितींत आहे, तरी अशा वेळींहि ग्रंथमालेंत अनेक सुधारणा करण्याची आमची फार इच्छा आहे. मागें कबूल केल्याप्रमाणें या पुस्तकांत चार चित्रें दिलीं आहेत. आणि आतां यापुढें प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकांत चार चित्रें देण्यांत येतील असें आह्मी आश्रयदात्यांना आश्वासन देतों. तसेंच थोडीं पृष्ठें वाढवून मजकूरहि अधिक देण्याचा प्रयत्न करणार आहों. हल्लीं ग्रंथमालेच्या पुस्तकाची पृष्ठ संख्या २००।२२५ सुमारानें असते व वजन १७।१८ तोळे असतें. हें वजन २० तोळ्यांवर नेण्याचा ह्मणजे २५० पृष्ठें मजकूर आहे याच किंमतींत

देण्याचा आमचा विचार आहे. आमच्या प्रत्येक आश्रयदात्याकडून एकेक नवीन आश्रयदात्याची जोड जर ग्रंथमालेस मिळेल, तर इतकीं पृष्ठें आठ आण्यांत देणें अशक्य आहे, असें नाहीं. कापडी पुस्तकांच्या बांधणींत व कागद वगैरे बाबतींत, तर प्रिन्स बिस्मार्क या पुस्तकापासूनच सुधारणा करण्यास आह्मी सुरवात केली आहे. कागद उत्कृष्ट व जाड अँटिक वापरल्यामुळें साध्या बांधणीच्या पुस्तकापेक्षां कापडी बांधणीचें पुस्तक अडीचपट जाड झालें आहे. व पुस्तकावर सोनेरी अक्षरांत नांव घातलें आहे. यामुळें कापडी बांधणीचीं पुस्तकें सुशोभित व मजबूत झालीं असून खाजगी व व सार्वजनिक वाचनालयें अलंकृत करण्यास तीं सर्वथा योग्य झालीं आहेत, हें कोणासहि स्पष्ट दिसून येण्यासारखें आहे. ज्यांना शक्ति आहे, असे आश्रयदाते या कापडीबांधणीच्या पुस्तकांचा संग्रह करतील असा आह्मांस भरंवसा आहे. बिस्मार्क यांच्या चरित्राचे चार भाग होतील व ते शक्य तितक्या लवकर लवकर प्रसिद्ध करून नंतर एका उत्कृष्ट सामाजिक कादंबरीचा लाभ आह्मी आमच्या आश्रयदात्यांना करून देणार आहों.

युद्ध संपून बाजार पूर्वस्थितीवर आल्यानंतर ग्रंथमालेंत कोणत्या सुधारणा व्हाव्या यासंबंधानें पुष्कळ आश्रयदात्यांकडून आम्हास अनेक प्रकारचीं पत्रें आलीं आहेत. हल्लीं जी आठ आणे किंमत केली आहे, त्याच किंमतींत पुढें कापडी बांधणीचीं पुस्तकें द्यावींत, ही सूचना पुष्कळांनीं केली आहे. वास्तविक या बाबींत आजच निश्चित असें अभिवचन देणें मोठया धोक्याचें आहे. एक तर युद्ध संपल्याबरोबर बाजार पूर्वस्थितीवर येईल असें कांहीं नाहीं; आणि कदाचित् आला, असें जरी मानलें, तरी कापडी बांधणीचें दोन अडीचशें पानांचें व सचित्र पुस्तक आठ आणे किंमतींत देणें शक्य नाहीं, असें आम्हास वाटतें. इंग्रजी पुस्तकें बहुतेक कापडी बांधणीची असून इतकीं स्वस्त असतात, हें खरें, पण त्या पुस्तकांचा खपहि तसाच दांडगा होतो, हें विसरून चालावयाचें नाहीं. भारत-गौरव-ग्रंथमालेचे जर दहा हजार आश्रयदाते होतील तर आठ आणे किंमतींतच आह्मी कापडी पुस्तकें देखील देऊं. तेव्हां या किंमतींत कापडी पुस्तकें तयार होणें न होणें हें अर्थातच आमच्या आश्रयदात्यांच्या स्वाधीन आहे. आमचे आश्रयदाते जर नेटाचा प्रयत्न करून ग्रंथमालेचे वर्गणीदार वर्षभराच्या मुदतींत इतके वाढवितील, तर उत्कृष्ट कापडी बांधणीचीं सुवर्णाक्षरांनीं अलंकृत झालेलीं व सचित्र पुस्तकेंहि आम्ही याच किंमतींत देऊं शकूं.

हें आम्ही आमच्या आश्रयदात्यांना कळवून ठेवतों. वाढत्या लोकाश्रयाचा उपयोग ग्रंथमालेंतच सुधारणा करण्याकडे करावयाचा, हीच आमचीहि इच्छा आहे, व तसा ग्रंथमालेच्या आश्रयदात्यांना आजवर अनुभवहि आला आहे. आमचे आश्रयदाते जर मन:पूर्वक प्रयत्न करतील, तर त्यांना या प्रयत्नांत यश आल्यावांचून राहणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. नवीन वर्गणीदारांचें नांव भरून पाठविण्यासाठीं प्रत्येक पुस्तकासोबत एकेक छापील कार्ड पाठविण्याची आमची आजपर्यंतची वहिवाट होती; परंतु या कार्डाला पाव आण्याचें तिकीट लावावयाचें किंवा पाव आण्याचें कार्ड घेऊन त्यावर नवीन आश्रयदात्यांचें नांव लिहून पाठवावयाचें सारखेंच असल्यामुळें या पुस्तकासोबत छापील कार्ड पाठविलें नाहीं. तरी आमच्या आश्रयदात्यांनीं नवीन आश्रयदात्यांचीं नांवें पोस्टाच्या कार्डांवर कळविण्याची कृपा करावी.

कित्येक सद्गृहस्थ ग्रंथमालेच्या आश्रयदात्यांतून आपलें नांव काढून टाकावयाचें झाल्यास एका अगदीं निंद्य उपायाचें अवलंबन करतात. 'आमचें नांव ग्रंथमालेंतून काढून टाकावें' असें अगाऊ पत्र पाठवून कळविणें हा सभ्यपणा होय; परंतु आश्चर्य हें कीं, जे आपणास सुशिक्षित समजतात, असे पंडित देखील एवढी तसदी न घेतां व्ही. पी परत करून आपलें नांव आश्रयदात्यांतून कमी करून घेतात. थोडा विचार करून पाहिलें असतां हें कृत्य किती निंद्य व असभ्यपणाचें आहे, हें कोणासहि समजण्यासारखें आहे. अशा रीतीनें एक व्ही. पी. परत झाली ह्मणजे ग्रंथमालेचें दोन आण्यांचें नुकसान होऊन शिवाय पुस्तकहि खराब होऊन विक्रीस अयोग्य असें होतें. कांहीं एक कारण नसतां ग्रंथमालेचें अशारीतीनें नुकसान करणाऱ्या सत्पुरुषांना या कृत्यानें जर मोठेपणा वाटत असेल, तर तो त्यांचा मोठेपणा अधमवृत्तीचा आहे, हें कोणासहि कळण्यासारखें आहे. ग्रंथमालेचा प्रयत्न न आवडल्यास ही नापसंती खुशाल वाटेल तितक्या कडक शब्दांनीं पावआण्याच्या कार्डांवर कळवून आपलें नांव आश्रयदात्यांतून कमी करून घ्यावें; परंतु व्ही. पी. परत करण्याचा निंद्य मार्ग कोणीहि स्वीकारूं नये अशी आमची सर्वांना प्रार्थना आहे.

शेवटीं नवीन आश्रयदाते मिळवून देण्यासंबंधीं आमच्या सहृदय आश्रयदात्यांना एकवार कळकळीची विनंति करून हे प्रास्ताविक दोन शब्द पुरे करतों.

मुंबई,
गिरगांव, ता. २५।६।१७

सर्वांचा नम्र साहित्य सेवक,
**प्रभाकर श्रीपत भसे.**



प्रिन्स विस्मार्क.

# जर्मनीचे वज्रबाहु प्रधान

# प्रिन्स बिस्मार्क.

३
२२४
वा.च.२५५
२

## प्रकरण पहिलें.

## बिस्मार्क घराणें.

बिस्मार्क घराण्याचा विश्वसनीय इतिहास तेराव्या शतकापासून उपलब्ध आहे. या वेळीं हें घराणें विशापसूमार्क अथवा बिस्कॉपसूमार्क या नांवानें चालत असे. प्राचीन ब्रँडनबर्ग संस्थानांतील स्टेंडाल गांवीं या घराण्याचें वास्तव्य असून तेथील व्यापारी संस्थेचें प्रमुखत्व याच घराण्याकडे असे. एकंदरीनें तेव्हांपासूनच हें घराणें मध्यम स्थितींतील खाऊन पिऊन सुखी लोकांत गणलें जात असे. उच्च वर्गीय सरदार घराणीं आणि सामान्य गांवकरी यांच्या मधल्या दर्जांत हें घराणें गणलें जात होतें. यानंतर इ. स. १३४५ सालीं ब्रँडनबर्ग संस्थानाधिपति लुई यानें क्लॉस फाँ बिस्मार्क याला जमीनदारी देऊन त्याबरोबर बर्गस्टॉलचा किल्लाहि त्याच्या स्वाधीन केला. तेव्हांपासून हें घराणें उच्च वर्गीय सरदारांत जमा झालें. पुढें इ. स. १५९२ सालीं जॉन जॉर्ज यानें या घराण्याची मुळची मिळकत काढून घेऊन तिच्याऐवजीं एल्ब नदीच्या कांठीं असलेला शॉनहॉसन हा गांव इनाम दिला.

युरोपच्या इतिहासांत 'तीस वर्षांचें युद्ध' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या धामधुमींत शॉनहॉसन गांवाचीहि धुळधाण होऊन बिस्मार्क घराण्याचा वाडा भस्मीभूत झाला. या वेळीं जर्मनींत बेशिस्तपणा इतका

माजला होता कीं, कोणतेंहि एक घराणें फाटाफुटीशिवाय राहिलें नव्हतें. खुद्द बिस्मार्क घराण्यांतहि हाच बेशिस्तपणा शिरला असून त्यांतील कांहीं पुरुष स्वीडनच्या बाजूनें व इतर कांहीं दुसऱ्या देशांच्या वतीनें लढत असत. संयुक्त जर्मन साम्राज्याचा देखावा स्वप्नांतहि कोणास दिसत नव्हता. ज्यानें त्यानें साधेल तसें आपलें कल्याण करून घ्यावें, हाच विचार सर्वांच्या चित्तांत या वेळीं होता. प्राचीन 'होली रोमन साम्राज्य' शतधा विदीर्ण झालें होतें व त्यांतील प्रत्येक तुकडा दुसऱ्याची पोळी आपल्या पानावर ओढूं पहात होता; तथापि या वेळीं-सुद्धां फ्रान्सबद्दलचा जर्मनांच्या मनांतील द्वेष इतका पक्का होता कीं, एरव्हीं आपसांत तंटे करणारे जर्मन फ्रान्सविरुद्ध मात्र एकोप्यानें लढत असत. जर्मन संस्थानांची एकी होऊन त्यांचें संयुक्त प्रबळ राष्ट्र बनूं नये, याकरितां भलेबुरे शक्य ते उपाय फ्रान्सहि योजीत असे. तीस वर्षांच्या धामधुमीच्या काळांत परस्परांशीं लढणारे बिस्मार्क घराण्याचे पुरुष चवदव्या लुईच्या विरुद्ध लढण्याकरतां ऱ्हाईन नदीच्या कांठीं वरील कारणास्तव एकत्र झाले होते.

"फ्रान्स देशांत ह्यूग्नोज नांवाचा धर्मसुधारकांचा वर्ग उपस्थित झाल्या वेळेपासूनच माझे पूर्वज आणि नंतर माझे प्रत्यक्ष वडील व माझे तीन चुलते फ्रान्सविरुद्ध लढले !" असें बिस्मार्क एकदां ह्मणाले होते. फ्रान्सच्या धर्मसुधारकांनीं आपल्या बाजूनें लढण्यास कांहीं पगारी जर्मन पलटणें तयार केलीं होतीं. या जर्मनांविरुद्धहि शस्त्र धरण्यास बिस्मार्क घराण्यांतील पुरुषांनीं कमी केलें नाहीं.

ऑगस्टस फॉं बिस्मार्क यानें इ. स. १६९० सालीं जुन्या जळून गेलेल्या वाड्याच्या जागीं नवा वाडा बांधण्याचें काम सुरू करून इ. स. १७०० सालीं तें पुरें केलें. शॉनहॉसन गांवीं जाणाऱ्या प्रवाशास

अद्यापिहि या वाड्याचें दर्शन होतें. हा वाडा एका टेकडीच्या शिखरावर बांधलेला असून शॉनहॉसन गांवाचें चर्चहि वाड्याच्या नजिकच आहे. येथून हाव्हेल आणि एल्ब या दोन नद्यांच्या संगमाचा मनोहर देखावा स्पष्ट दिसतो. हा वाडा इ. स. १७०० सालीं पुरा झाला, अशा अर्थाचा लेख दरवाजावर कोरला असून त्यांत बांधणाराचें नांवहि कोरलें आहे.

फार जुन्या काळासून बिस्मार्क घराणें लष्करी बाण्याचें आहे. ऑगस्टस बिस्मार्क याचा मुलगा ऑगस्टस फ्रेड्रिक हाहि लष्करांतच नौकरी करीत होता. तो मेजरच्या हुद्यापर्यंत चढला असून आपल्या घोडदळाबरोबर पोमेऱ्यानिया प्रांतांतील गॉलनो गांवीं रहात असे. यानें लग्न केलें तेव्हा नीपॉफ, कुल्ज आणि जॉरशेलिन येथील मिळकती त्याला आंदण मिळाल्या. मेजर आगस्टस फ्रेड्रिक हा निधड्या छातीचा व आनंदी वृत्तीचा असल्याबद्दल त्याची ख्याती होती. फ्रेड्रिक दी ग्रेट यानें केलेल्या इ. स. १७४२ च्या मोहिमेंत हा त्याजबरोबर असून झ्यासलॉच्या लढाईंत यास जबर जखम लागली. जखमी लोक गाड्यांतून पिछाडीकडे जात असतां कांहीं आस्ट्रियन घोडेस्वारांनीं त्यांस वाटेंत गांठून सर्वांस कंठस्नान घातलें. अशा रीतीनें कर्नल आगस्टस फ्रेड्रिक याचा अंत झाला.

आगस्टस फ्रेड्रिकचा मुलगा चार्लस आलेक्झांडर हा रॉसब्याचच्या लढाईंत होता. हा प्रिन्स बिस्मार्क यांचा आजा होय. चार्लस आलेक्झांडरचा मुलगा चार्लस वुइलियम फर्डिनंड हा आपल्या वयाच्या बाराव्या वर्षींच पलटणींत शिरला. इ. स. १७९२–९३ सालीं ड्यूक ऑफ ब्रन्स्वीक यानें केलेल्या फ्रान्सवरच्या मोहिमेंत चार्लस फर्डिनंड हजर होता.

फर्डिनंड फॉं बिस्मार्क, हे आमच्या चरित्रनायकाचे पिते होत. यांनीं लष्करी नौकरी सोडली, तेव्हां ते क्यापटनच्या दर्जापर्यंत वाढले होते. नौकरीला रजा दिल्यानंतर शॉनहॉसन गांवीं येऊन तेथें त्यांनीं कायमची वसती केली. यांच्या पत्नीचें नांव वुइलहेल्मीना लुईसा असें होतें. विवाहाच्या वेळीं हिचें वय सोळा वर्षांचें होतें.

फर्डिनंड हे गृहस्थाश्रम स्वीकारून आपल्या गांवीं आल्यापासून संकटांनीं त्यांचा पिछा पुरविण्यास आरंभ केला. त्यांचा विवाह झाल्यापासून तीन महिन्यांच्या अवधींतच फ्रान्सनें जर्मनीवर हल्ला केला. साल्फेल्डच्या लढाईंत प्रशियन फौजेचा पराभव होऊन तींत प्रिन्स लुई फर्डिनंड कामास आला. राणी लुईसा हीं जिवाच्या भयानें पळत सुटली, ती प्रथम ब्रँडनबर्ग येथें गेली. नंतर शॉनहॉसनगांवाशेजारीं असलेल्या एका किल्लयाच्या आश्रयास ती गेली. आपणास मदत करण्याबद्दल सर्व ब्रँडनबर्गच्या लोकांस तिनें विनंति केली. ब्रँडनबर्गची प्रजाहि फार राजभक्त होती; पण तिच्या शौर्याचा व राजभक्तीचा कांहीं उपयोग न होतां नेपोलियन बादशाहाच्या झंझावातापुढें तिचा टिकाव लागला नाहीं. १४ आक्टोबर रोजीं झालेल्या जेना येथील सुप्रसिद्ध लढाईंत प्रशियन फौजेचा पुरा मोड झाला. मार्शल सूल्ट् यानें पराभव पावलेल्या प्रशियन फौजेचा पुरा पाठलाग करून तिला दशदिशा उधळून लाविलें. मार्शल सूल्ट् यानें व्यांगरमुंड गांवीं आपल्या फौजेचा तळ दिला. याच गांवाजवळ असलेल्या किल्लयांत राणी लुईसा रहात होती.

ज्या प्रांतांत एकदां आपलें पाऊल रोंवलें त्याच प्रांतांतील अन्नसामुग्रीचा उपयोग करावयाचा, असें फ्रेंच लष्कराचें तत्व होतें. आणि प्रस्तुत प्रसंगींहि हें तत्व त्यांनीं चांगलें पाळलें होतें. फ्रेंच अम्मलदार कांहीं मागावयास आला कीं, त्यास नाहीं ह्मणण्याची सोय नसे. कोणी

नाहीं ह्मटलें, तरी लागेल तो जिन्नस ते जबरीनें घेऊन जात. फ्रेंच लष्कराचा तळ टयांगरमुंड व शॉनहॉसन या गांवांनजिक असल्यामुळें लष्कराचा उपद्रव या गांवांस लागावा, हें अगदीं साहजिक होय. घेण्यासारखा जिन्नस लुटावयाचा व बाकीच्याचा नाश करावयाचा असा क्रम फ्रेंच लष्करांनीं ठेवला होता. या झटापटींत पुष्कळ वेळां निरुपद्रवी रहिवाश्यांसहि इजा करण्यास लष्करी लोक कमी करीत नसत. हा सर्व त्रास चुकवावा ह्मणून फर्डिनंड बिस्मार्क व त्यांची पत्नी हीं उभयतां पळून जाण्याच्या विचारास लागलीं. पण वाटेंत फ्रेंच घोडदळानें त्यांची गाडी पकडली. आणि अशा रीतीनें शॉनहॉसन गांवीं परत येणें त्यांस भाग पडलें. फ्रेंच घोडदळांतील कांहीं लोक त्यांजबरोबर त्यांच्या वाड्यांत शिरले व लुटालूट करण्यासाठीं इकडेतिकडे फिरूं लागले. पण त्यांची तृप्ति होण्यासारखा एकहि जिन्नस त्यांस सांपडला नाहीं. यामुळें वाड्यांतील माणसांस छळण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला. घराचा मालक व मालकीण हीं पुस्तकसंग्रहालयाच्या खोलींत शिरलीं व खोलीचा दरवाजा त्यांनीं आंतून बंद केला. फ्रेंच शिपायी त्यांच्या मागोमाग गेले व दरवाजा उघडण्यासाठीं धडपड करूं लागले. फ्रेंच लष्कर त्या वेळीं आपल्या बिनहत्यारी शत्रूंस कसें वागवीत असे हें सांगण्यास या दरवाजावर अद्यापीहि फ्रेंच संगिनींच्या खुणा हयात आहेत. फर्डिनंड बिस्मार्क व त्यांची पत्नी हीं युक्तिप्रयुक्तीनें रात्रीच्या वेळीं जंगलांत पळून गेलीं. ती रात्र मोठ्या कष्टानें त्यांनीं जंगलांत काढली. बाहेर थंडीचें संकट आणि आपलें घरदार फ्रेंच शिपायी जाळूनपोळून टाकतात कीं काय, ही पोटांत धास्ती. सकाळ झाल्यावर हीं दोघेंहि दुसऱ्या कांहीं शेतकऱ्यांबरोबर गांवाकडे परत येण्यास निघालीं. त्या वेळीं गांवाची जी दुर्दशा फ्रेंच शिपायांनीं केली होती, ती पाहून दगडाच्या अंत:करणासहि

पाझर फुटला असता. बिस्मार्कच्या घरांतील सर्व जिनसांचा चक्काचूर त्यांनीं उडविला होता. भिंतीवर टांगलेला वंशवृक्षहि संगिनींनीं त्यांनीं जिकडे तिकडे भोंसकून टाकला होता.

शॉनहॉसन येथील त्या वेळच्या पाद्र्याच्या रोजनिशींत पुढील वाक्य आढळतें. 'तीस वर्षांच्या युद्धानंतर एल्ब आणि हावेलच्या या संगमभूमींत कोणाहि शत्रूचें पाऊल पडलें नव्हतें. हे सर्वशक्तिमान् परमेश्वरा, आमचीं कोठारें, आमचीं घरेंदारें आणि गुरेंढोरें सुरक्षित ठेव. नाहीं तर आमच्या विपत्तीस पारावार उरणार नाहीं. आजपर्यंत आह्मांस लाभलेलें शांतीचें सुख आह्मांस पुन्हां केव्हां मिळेल ?' यावर दुसऱ्या कोणीं पुढील उत्तर लिहून ठेवलें आहे. 'जन्मभूमीच्या उद्धारार्थ ईश्वराच्या साह्यानें प्रशियन वीर प्यारीसमध्यें शिरतील तेव्हां.'

आपलें जडजवाहीर फ्रेंचांच्या हातीं लागूं नये ह्मणून फर्डिनंड बिस्मार्क यांनीं तें पुरून टाकलें होतें. यांत पुष्कळ सोन्याचीं नाणींहि होतीं. हा ठेवा बागेंतील एका झोंपडीच्या उंबरठ्याजवळ पुरला होता. शॉनहॉसनगांवीं रानांतून ते परत आले, तेव्हां या झोंपडीकडे ते प्रथम गेले. झोंपडीच्या शेजारीं माती उकरल्याचीं कांहीं चिन्हें दिसतांच त्यांच्या पोटांत धस्स झालें. इतक्यांत कांहीं सोन्याचीं नाणींहि त्यांच्या नजरेस पडलीं. तेव्हां फ्रेंच शिपायांनीं आपणास पूर्ण नागविलें असें त्यांस वाटलें; पण जवळ जाऊन पाहतां सर्व ठेवा सुरक्षित असल्याचें त्यांस आढळून आलें. ती जागा एका कुत्र्यानें उकरली होती. फ्रेंच शिपायांचा उपद्रव होऊं नये ह्मणून फ्रेंच सेनापतीकडे अर्ज करून कांहीं रक्षक आपणाकडे पाठविण्याची विनंति बिस्मार्क यांनीं त्यास केली. फ्रेंचसेनापतीनेंहि दयाळुपणें त्यांजकडे कांहीं रक्षक पाठविले;

तथापि फर्डिनंड यांनीं अधिक सुरक्षितपणासाठीं आपल्या पत्नीची रवानगी रँथेनोगांवीं केली.

या नंतर चोहोंकडे स्थिरस्थावर झाल्यावर फर्डिनंडची पत्नी शॉनहॉसनगांवीं परत आली. त्याची पत्नी मूळची शहरवासी, त्यांतून ती उच्चकुळांत जन्मलेली असल्यामुळें बर्लिनमधील सरदार घराण्यांशीं तिचा परिचय होता. अशा स्थितींत खेड्यांतील राहणी तिला वास्तविक आवडूं नये; पण विवाहानंतर आपली आवडनावड बाजूला ठेवून ती शॉनहॉसन गांवींच राहिली. शॉनहॉसनगांवीं बिस्मार्क घराण्याचा जो प्रचंड तटबंदी वाडा आहे, त्याच्या बांधणींत बाह्य भपका आणि डामडौल हीं आढळून येत नसलीं, तरी त्यांत सर्व प्रकारच्या सुखसोयी आहेत. हा वाडा तिमजली आहे. तळमजल्यांत एक दिवाणखाना, स्वयंपाकघर व जेवणाची जागा आहे. त्याचप्रमाणें ग्रंथसंग्रहाची खोली तळमजल्यावरच आहे. आजूबाजूस मोठा बाग लावला असून बागेंत हिंडण्याफिरण्यास सुंदर वाटा केलेल्या आहेत. बागेपासून कांहीं अंतरावर एक कृत्रिम बेट केलें असून त्यांत एक छोटेखानी बंगली बांधलेली आहे.

बिस्मार्क घराण्याचा ग्रंथसंग्रह फार चांगल्या प्रतीचा होता. आणि फर्डिनंडची पत्नी सुशिक्षित असल्यामुळें त्या ग्रंथसंग्रहाचा तिनें चांगला उपयोग केला. घराच्या बाहेर सृष्टिसौंदर्य आणि आंत विद्वानांचा सहवास, या दोन गोष्टींमुळें बर्लिन येथें घालविलेल्या सुखाच्या दिवसांचा विसर तीस आपोआपच पडला. इ. स. १८०९ सालीं फर्डिनंड यांस पहिला मुलगा झाला, पण तो फारच अल्पायु निपजला. त्याचें थडगें अद्यापीहि शॉनहॉसनगांवीं दृष्टीस पडतें. दुसरी मुलगीहि याचप्रमाणें लहानपणीं वारली. यानंतर त्यांचा तिसरा पुत्र बर्नाड हा मात्र मोठा

होऊन अखेरीस प्रिव्ही कौन्सीलर व म्याजिस्ट्रेट झाला होता. कुल्ज् आणि जॉर्चेलीन हीं गांवें वडिलार्जित मिळकतीची वांटणी ह्मणून त्यांस मिळालीं होतीं. यानंतर इ. स. १८१५ सालीं एप्रिल महिन्याच्या १ तारखेस आपला चरित्रनायक ऑटो एडवर्ड लिओपोल्ड जन्मास आला. यानंतर थोड्याच दिवसांनीं वाटर्लूची लढाई होऊन तींत जर्मन सैन्यानें नेपोलियनचा पुरा मोड केला.

ज्या प्रकारच्या मनुष्यांच्या सहवासांत मुलें लहानपणीं वाढतात, त्यांच्या वळणाची छटा त्या मुलांच्या मोठेपणीं पुष्कळ वेळां स्पष्ट दिसून येते. ऑटो बिस्मार्क याच्या आंगीं आईचे सगळे गुण दिसत होते. तिनें लहानपणीं त्यास दिलेलें शिक्षण आणि केलेली जोपासना हीं ऑटोच्या भावी आयुष्यांत त्यास फार उपयोगीं पडलीं. बिस्मार्कची आई अनेक दृष्टींनीं असामान्य स्त्री होती. प्रिव्ही कौन्सीलर मेन्केन यांची कुशाग्र बुद्धिमत्ता तिच्यांत उतरली होती. तिचे वडील मेन्केन यांजबद्दल प्रशियाचे प्रधान फॉ स्टीन यांनीं पुढील उद्गार काढले आहेत:— “मेन्केन हे मोठे उदारधी आणि सभ्यगृहस्थ असून त्यांच्या कल्पना आणि त्यांचीं ध्येयें हीं फार उदात्त आहेत.” बापाचे हेच गुण मुलीच्या आंगीं पूर्णपणें उतरले होते व आनुवंशिक संस्कारानें ते पुढें ऑटो बिस्मार्क यांस प्राप्त झाले. मांडीवर खेळवितां खेळवितां ऑटोच्या आईनें ज्या गुणांचें बीजारोपण त्याच्या ठिकाणीं केलें, त्याचींच मधुर फळें पुढें जर्मन राष्ट्रास चाखावयास सांपडलीं.

बिस्मार्क घराणें आरंभापासूनच लष्करी बाण्याचें होतें, हें पूर्वी सांगितलें आहेच. फर्डिनंड बिस्मार्क हेहि मोठ्या निधड्या छातीचे व शिपायीबाण्याचे गृहस्थ होते. तसेंच स्वभावानें ते अत्यंत करारी व कडक शिस्तीचे कट्टेभक्त होते. शिस्त आणि करारीबाणा हे गुण

फ्रेड्रिक दी ग्रेटच्या काळापासून प्रशियन लोकांत—विशेषत: जमीनदार वर्गांत-आढळून येतात. लष्करीबाण्याचे हे गुण ऑटोच्या ठिकाणींहि लहानपणापासूनच दिसून येऊं लागले व बालवयांत त्यास मिळालेल्या शिक्षणानें ते चांगले वाढीस लागले. नेपोलियनच्या वावटळींत प्रशियानें दाखविलेला दुबळेपणा आणि त्यामुळें त्याची झालेली दुर्दशा यांच्या हृदयद्रावक कथा ऑटोच्या आईनें त्यास नित्य सांगाव्या.

ऑटोचा जन्म झाला, त्या वेळीं बिस्मार्क घराणें सांपत्तिक दृष्ट्या पूर्वीच्याहून बरेंच खालावलें होतें. एकंदर प्रशियाचीच स्थिति या वेळीं शोचनीय झाली होती. आपल्या इस्टेटीपैकीं बराच भाग व शॉनहॉसन गांवाजवळील दुसरा एक तटबंदी वाडा फर्डिनंड यांस विकावा लागला. इ. स. १८०६-७ सालीं झालेल्या युद्धांत पुष्कळ जमीनदारांस इतकें जबर नुकसान सोसावें लागलें होतें कीं, त्यांच्या गहाण पडलेल्या इस्टेटी सोडविणेंहि त्यांस मोठ्या मुष्किलीचें झालें. ही स्थिति लक्षांत घेऊन प्रशियाच्या राजानें तहकुबीचा जाहिरनामा ( मोरेटोरियम ) इ. स. १८१० सालीं काढला होता. या जाहीरनाम्यांत बऱ्याच सवलती त्यानें कर्जदारांस दिल्या होत्या; पण प्रशियाचा बराचसा भाग त्या वेळीं फ्रेंचांनीं व्यापला असल्यामुळें या सवलतींचा उपयोग व्हावा तसा झाला नाहीं. फ्रेंच सैन्याच्या त्रासामुळें प्रशियन जमीनदारांची दुर्दशा दिवसेंदिवस वाढतच चालली होती. चलनी नाण्यांच्या तुटवड्यांमुळें त्यांच्या दुर्दशेंत आणखी भरच पडली. हीच स्थिति बिस्मार्क घराण्यासहि अर्थातच लागू होती. चलनीं नाणें कमी झाल्यामुळें इस्टेटीची खरी किंमत घटली व धान्यादिकांचे बाजारभाव उतरत गेले.

भरींत भर ह्मणून ह्याच वेळीं शेतकींचा एक कायदा प्रशियांत लागू झाला. या कायद्यामुळें जमीनदारांची कुळावरील सत्ता नाहींशी झाली.

ह्या कायद्याची अम्मलबजावणी बेताबातानें व आरंभीं अल्पप्रमाणानें व्हावयाची असें ठरलें होतें; तथापि आधींच खालावलेल्या जमीनदार वर्गाच्या संकटांत या कायद्यानें अधिक भर मात्र पडली. कायद्याबद्दल चुकीची कल्पना बऱ्याच कुळांच्या डोक्यांत शिरली होती. इ. स. १८१० सालापासून आपणावरील जमीनदारांची सत्ता समूळ नाहींशी होणार, असें त्यांच्या मनानें घेतलें होतें. यांतच कित्येक उपव्यापी लोकांनीं भर घातली. जमीनदारांचें जूं झुगारून देण्याच्या कामीं कुळांस राजाचें सहाय्य मिळेल, असें हे उपव्यापी लोक त्यांस सांगत सुटले. अडाणी कुळांस ही गोष्ट खरी वाटली व आपण नौकरींतून जाणार अशा अर्थाच्या नोटिसा जमीनदारांस त्यांनीं ताबडतोब दिल्या. यामुळें सारा जमीनदार वर्ग एकदम नाराज झाला. कुळें दंगेधोपे करूं लागले व कित्येक जमीनदारांनीं त्यांजवर बंदुकीचाहि प्रयोग केला. यामुळें कुळें अधिक चिडून जाऊन जमीनदारांचे वाडे लुटावयास निघालीं; पण इतक्यांत लष्करी लोकांच्या तुकड्या येऊन पोहोंचल्यामुळें या अडाणी कुळांचे डोळे ताबडतोब उघडले. आपल्या वर्तणुकीनें राजा नाखुष झाला आहे, हें ऐकून त्यांस फार नवल वाटलें. यानंतर कुळें व जमीनदार यांचे हितसंबंध ठरविण्याकरतां प्रशियांत एक कमिशन बसलें. या कायद्यामुळें आपले पुरातन हक्क नष्ट झाले, असें सर्व सरदारांस वाटलें. जमीनसारा वसूल करण्याच्या नवीन पद्धतीमुळें आपल्या इस्टेटी धोक्यांत येतात कीं काय, अशी त्यांस भीति पडली. राज्यपद्धतीचा जो मार्ग आपण आंखला आहे, त्यांत यत्किंचितहि बदल व्हावयाचा नाहीं, अशा अर्थाचा इषारा राजाकडून मिळतांच या सरदारमंडळीनें राजाकडे एक तक्रार अर्ज दिला. त्यांत राज्यपद्धतीवर बरीच प्रतिकूल टीका केली असून खुद्द राजाचाहि उपमर्द करणारा असा मजकूर त्यांत होता. सरदार

मंडळीच्या या वागणुकीचा राजास इतका राग आला कीं, तीपैकीं कांहीं प्रमुख माणसांवर खटले करण्याचा त्यानें हुकूम दिला. या खटल्यांत दोन जमीनदारांस किल्ल्यांतील कोठड्यांत ठेवण्याची शिक्षा झाली आणि राजाचे दोन सल्लागार बडतर्फ झाले.

कुळें ह्मणजे जमीनदारांच्या मिळकतीचाच एक भाग, असा समज या वेळेपर्यंत होता. यामुळें जमीनदार लोक कुळांवर हवातसा जुलूम करीत असत. अशा प्रकारच्या जुलुमास आळा घालणें, अर्थातच न्याय्य होतें; तथापि जमीनदारांस ही गोष्ट पटेना. या बाबतींत राजानें केलेली प्रत्येक सुधारणा ह्मणजे आपल्या पुरातन हक्कांचे लचके तोडणें होय, असें जमीनदारांस वाटलें. या गडबडींतून बिस्मार्क घराणें, बऱ्या प्रकारें निभावलें, असें ह्मणावयास हरकत नाहीं. ऑटोच्या जन्मानंतर एक वर्षानें फर्डिनंड यांस कुल्ज, नीपॉफ आणि जार्चेलीन येथील इस्टेट वारसदार या नात्यानें मिळाली. तेव्हां फर्डिनंड नीपॉफ गांवीं रहावयास गेले. या गांवीं मेजर आगस्टस फ्रेड्रिक फॉं बिस्मार्क यांनीं एक लहानसें घर बांधलें होतें. इस्टेटींत बराच घोंटाळा माजला असल्यामुळें तिची नीट व्यवस्था लावण्या करतां तेथेंच राहणें फर्डिनंड यांस भाग होतें. याशिवाय या गांवांच्या आजुबाजूस जंगल असल्यामुळें फर्डिनंड यांची शिकारीची हौसहि तेथें भागण्यासारखी होती. यामुळें तेथेंच कायमची वस्ती करण्याचा विचार फर्डिनंड यांनीं केला; तथापि फर्डिनंड यांची शिकारीची हौस येथें फारशी भागली नाहीं. कारण पूर्वी फ्रेंच सैन्याचा तळ तेथें पडून आजुबाजूचें सगळें रान फ्रेंचशिपायांनीं उध्वस्त करून टाकलें होतें. ऑटोचें नवें घर लहानच होतें; तथापि आजूबाजूस पसरलेल्या सृष्टिसौंदर्यामुळें तेथें राहणें कोणासहि आवडलें असतें. झ्यांपेल नांवाचा ओढा कुरणाकुरणांतून झुळझुळ वहात असतो. या

ओढ्याच्या कांठानें वृक्षांची सुंदर राई आहे. घराच्या बाजूस एक सुंदर बगीचा आहे. अशा प्रकारच्या या घरांत ऑटोच्या आयुष्याचीं पहिलीं सहा वर्षें मोठ्या सुखानें गेलीं.

ऑटोचें प्राथमिक शिक्षण त्याची आई वुइलहेल्मीना इच्या हाताखालींच झालें. ही स्त्री शरिराप्रमाणेंच मनानेंहि सुंदर होती, याचा उल्लेख वर आला आहेच. केवळ सामान्य मनुष्यांप्रमाणें आयुष्याचा काळ आपल्या मुलांनीं कसा तरी कंठावा, अशी तिची इच्छा नव्हती. प्रत्येक ख्रिस्ती मनुष्यास शोभेल अशा प्रकारचें आपल्या मुलांचें आदर्शवत् वर्तन असावें असें तिला वाटे. ती कधीं गांवभर चकाट्या पिटीत हिंडली नाहीं. अथवा स्त्रीसमाजांतहि फारशी कधीं मिसळली नाहीं. यामुळें ती एकलकोंडी व अबोल असावी असें गांवांतील स्त्रियांस वाटे; वास्तविक आपला सारा वेळ मुलांच्या संगतींत घालवून त्यांस नीतीचें वळण लावणें तिला अधिक प्रिय असे. विशेषत: ऑटोसंबंधीं ती फारच काळजी घेई. आपल्या मातेसंबंधीं अत्यंत प्रेमळपणाचे उद्गार बिस्मार्क हे आपल्या उत्तर वयांत काढीत असत. आपला जयजयकार बघण्यास आपली माता जिवंत राहिली नाहीं, या गोष्टीचा त्यांस वारंवार फार खेद होई. फर्डिनंड बिस्मार्क हे देहयष्टीनें उंच व मजबूत बांध्याचे होते. तसेंच स्वभावानें ते सालस व फार आनंदी वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांस शिक्षण फारसें मिळालेलें नव्हतें. वयाच्या बाराव्या वर्षीं जमीनदारांचीं बहुतेक मुलें त्या वेळीं सैन्यांत दाखल होत असत. पुढील सारें आयुष्य स्वारीशिकारींत जावयाचें असल्यामुळें बौद्धिक शिक्षणाची जरूर सरदार मंडळीस फार करून भासतच नसे. त्या वेळच्या दंग्याधोप्याच्या काळांत बौद्धिक शिक्षणास फारसा अवसरच नव्हता, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. वुइलहेल्मीना बाईचें बालपण बर्लिन शहरांत गेलें

असल्यामुळें व तिचे वडील मोठ्या दर्जाचे नौकर असल्यामुळें बौद्धिक शिक्षणाचें महत्व लहानपणापासूनच तिला कळूं लागलें. " लिप्झिग येथील पंडितांचें रक्त माझ्या धमन्यांत खेळत आहे." असे उद्गार ऑटो बिस्मार्क यांनीं आपल्या एका भाषणांत काढले होते. वुइल-हेल्मीना बाईचा आजा मेन्केन हा लिप्झिग विश्वविद्यालयांतील एक पंडित होता. बिस्मार्कचा आजा इ. स. १८०१ सालापर्यंत प्रिव्ही-कौन्सिलर होता. फ्रेड्रिक दी ग्रेट मरण पावल्यानंतर या जागेवर स्वतः-च्या मृत्यूपर्यंत त्यानें हें काम केलें. राज्यपद्धतींत अनेक प्रकारच्या नव्या-नव्या सुधारणा यानें घडवून आणल्या.

बापाच्या मनोवृत्ति आणि त्याचे बरेच गुण वुइलहेल्मीना बाईच्या आंगीं उतरले होते. आजुबाजूच्या समाजांत नव्या प्रकारच्या विचारांचें बीजारोपण करावें एतदर्थ तिनें बरीच खटपट केली; पण तींत तिला फारसें यश आलें नाहीं. इस्टेटींत माजलेला घोंटाळा नाहींसा करण्या-साठींहि ती जिवापाड मेहेनत करीत असे. तथापि या खटपटींतहि तिला फारसें यश आलें नाहीं.

आपल्या मुलांच्या वागणुकीवर तिचें फार बारीक लक्ष असे. आपलीं मुलें कर्तृत्वशाली निपजतील असें तिला वाटे आणि हा तिचा समज बरोबर होता. वडील मुलगा बर्नार्ड चांगला वकील होईल, असा तिचा अजमास होता. त्याचप्रमाणें धाकटा मुलगा ऑटो राजकारणी पुरुष होईल, असें ती ह्मणे. या धोरणास अनुसरूनच तिनें आपल्या मुलांचा शिक्षणक्रम ठेवला होता; तथापि ऑटोचा कल क्षात्रवृत्तीकडे अधिक होता. स्वभावानें तो द्रूड आणि मनानें एकमार्गी असल्यामुळें राजकार-णाच्या नागमोडी वाटेंत त्याचा चांगलासा टिकाव लागण्यासारखा नव्हता; तथापि या बाबतींतहि त्याच्या आईचा अजमासच अखेरीस खरा

ठरला. अत्यंत सरळ मार्गानें व चोखपणें वागूनहि राजकारण यशस्वी करतां येतें ही गोष्ट बिस्मार्क यांनीं आपल्या उत्तर वयांत सिद्ध केली. राजकारण ह्मटलें कीं, त्यांत आंत एक व बाहेर एक, असा प्रकार असलाच पाहिजे, या फ्रेंचांच्या तत्वास बिस्मार्क यांनीं पूर्ण हरताळ फासला. राजकारणांत गेलेल्या माझ्या साऱ्या आयुष्यांत मी एकहि असत्य शब्द उच्चारला नाहीं," असें वृद्धपणीं बिस्मार्क अभिमानानें म्हणत असत. त्यांचें हें म्हणणें अक्षरशः खरें होतें.

बिस्मार्क यांच्या लहानपणच्या कांहीं थोड्या गोष्टी त्यांच्या कुटुंबांतील विश्वसनीय अशा माणसांकडून समजल्या आहेत. त्यांवरून ऑटो हा आपल्या इतर सोबत्यांहून कांहीं विशेष बुद्धिवान् पुरुष निपजेल, असें अनुमान कोणी केलें नसतें. मोठेपणीं नांवरूपास आलेले पुष्कळ पुरुष लहानपणीं कांहीं विशेष गुण दाखवितात, असें नाहीं. बालवयांत ऑटो थोडासा बोबडा होता. त्याला ल आणि र हीं अक्षरें उच्चारतां येत नसत. त्याच्या आईनें त्याला कांहीं कविता शिकविल्या होत्या. त्या तो ह्मणूं लागला, ह्मणजे या दोन अक्षरांचे विलक्षण उच्चार ऐकून सर्वांस मोठें हंसूं येई.

आपल्या मुलांनीं शिस्तीनें आणि सुविनीतपणें वागावें अशाबद्दल वुइलहेल्मीनाबाई मोठी दक्षता बाळगीत असे, पण ऑटोच्या वडिलांचा स्वभाव निष्काळजी असल्यामुळें तिच्या शिस्तीचा फारसा उपयोग होत नसे. सत्याची भक्ति लहानपणापासूनच ऑटो यास किती होती, हें एक दोन गोष्टींवरून दिसून येतें. क्षुल्लक बाबींतहि ऑटो खोटें बोलत नसे. एके दिवशीं तो निजावयास जाऊं लागला असतां 'तुझें जेवण झालें का?' असा आईनें प्रश्न केला; पण ऑटोचें डोकें ठिकाणावर नसल्यामुळें आपलें जेवण झालें कीं नाहीं, हें त्याला बरोबर आठवेना. तेव्हां

तो धांवत धांवत स्वयंपाकीण बाईकडे गेला आणि 'मी जेवलों कीं नाहीं' असें तिला विचारूं लागला. तिनें 'होय' असें उत्तर देतांच तो धांवत आपल्या आईकडे गेला आणि ह्मणाला, 'आई, मी जेवलों.' दुसऱ्या एका प्रसंगीं ऑटोची आई त्याला ह्मणाली. ऑटो, तूं काय खाल्लें आहेस ? तुझ्या तोंडाला कसलीशी घाण येत आहे.' थोडा वेळ थांबून ऑटो ह्मणाला, "आई, बाबांच्या खोलींतली एक बाटली मी तोंडांत घातली होती, पण तिच्यांतल्या पाण्याला घाण येत होती ह्मणून मी तें प्यायलों नाहीं."

ऑटोचा स्वभाव लहानपणापासूनच स्वाभिमानी असे. कोणी त्याचा अपमान केला, तर ती गोष्ट त्याला सहन होत नसे. एके वेळीं त्याच्या घरीं मेजवानी होती. सर्व मंडळी जेवावयास बसली. त्या गडबडींत ऑटोला हांक मारण्याचें स्मरण कोणाला राहिलें नाहीं. इतक्यांत चांगला पोषाख करून ऑटोची स्वारी जेवणाच्या जागीं येऊन बसावयास जागा पाहूं लागली. एके जागीं कांहीं बडे गृहस्थ बसले होते त्यांच्या शेजारीं असलेल्या एका रिकाम्या खुर्चीवर ऑटो जाऊन बसला. थाटमाटाचा पोषाख केलेली ही बटु मूर्ति पाहून त्या गृहस्थांस मोठी गम्मत वाटली. त्यांपैकीं एकजण थट्टेनें ह्मणाला, "कांहो, बडे गृहस्थ, आपण कोण ?" "मी छोटा यजमान आहें, मेहेरबान." ऑटोनें उत्तर दिलें. ऑटोचें हें उत्तर ऐकून सर्वांस मोठें नवल वाटलें.

घरची स्वयंपाकीण लोटी शेम्लींग हिजवर ऑटोची मोठी भक्ति असे आणि तीहि पोटच्या पोराप्रमाणें त्याच्यावर प्रेम करी. त्याला आवडणारे पदार्थ मुद्दाम तयार करून ती त्याला घालीत असे. खाण्यापिण्यासंबंधीं त्याची निगा राखण्यांत खुद्द त्याच्या आईपेक्षांहि कांकणभर अधिक काळजी ती घेई. कित्येक वेळां ती त्याचे फाजील लाडहि करी; पण

त्यामुळें ऑटो शेंफारून गेला नाहीं अथवा हट्टीहि बनला नाहीं. लहानपणापासूनच सर्वांशीं तो नम्रतेनें व सौजन्यानें वागे. आपल्या बालमित्रांशींहि त्याची वागणुक फार प्रेमळपणाची असे. ब्र्यांड या नांवाचा त्याचा एक गुराखी मित्र होता. त्याचें स्मरण वृद्धपणापर्यंत बिस्मार्क यांस होत असे. "गवतांतून हिंडून रानफुलें तोडण्याचे ते दिवस मागें राहिले." असें इ. स. १८७० सालच्या मोहिमेच्या प्रसंगीं ते एकदां ह्मणाले होते. फ्रान्सवरच्या मोहिमेंत अनेक वेळां त्यांस रानांतून फिरावें लागे. तेव्हां ब्र्यांडबरोबर घालविलेल्या लहानपणच्या दिवसांचें त्यांस स्मरण होई. मुक्या जनावरांवर लहानपणापासूनच ऑटोचें प्रेम असे. त्याच्या स्वभावांतील हा विशेष गुण अखेरपर्यंत टिकला. मुकीं जनावरेंहि या आपल्या मित्राला ताबडतोब ओळखीत असत. ऑटो दृष्टीस पडल्याबरोबर मोठयानें खिंकाळून घोडीं आकाशपाताळ एक करून सोडीत. ऑटो सृष्टिसौंदर्याचाहि मोठा भक्त होता. नीपॉफच्या कुरणांतून आणि बगीच्यांतून हिंडण्यांत तासांचे तास तो घालवीत असे. सृष्टिदेवतेशीं अत्यंत परिचय झाल्यामुळें ऑटोचा लहानपणचा आयुष्यक्रम जणूं काय काव्यमय होऊन गेला होता.

---

प्रकरण दुसरें.

## विद्यार्थीदशा.

बर्लिनमध्यें वुइलहेल्म रस्त्यावर असलेल्या प्ल्यामन नांवाच्या शाळेंत ऑटोची रवानगी झाली, त्या वेळीं त्याचें वय सहा वर्षांचें होतें. उत्तम शिक्षणाबद्दल या शाळेचा त्या वेळीं मोठा लौकिक झाला होता. विद्येच्या निरनिराळ्या अंगांच्या मूलतत्त्वांचें शिक्षण येथें फार चांगलें होतें, अशी त्या शाळेची प्रसिद्धि होती. याशिवाय जर्मन नागरीक बनविण्याला

लागणारें शिक्षण या शाळेंत मिळे, हा तिचा विशेष होता. बिस्मार्क यांच्या एकंदर दानतीवर या बाळपणींच्या शिक्षणाचा फार चांगला परिणाम झाला. येथें जें शिक्षण त्यांस मिळालें, तें त्यांच्या वरिष्ट विद्यालयीन क्रमांत त्यांच्या फार उपयोगीं पडलें. तथापि त्यांच्या घरच्या पद्धतींत आणि शाळेच्या पद्धतींत एक मोठा फरक असे. मुलांच्या विशिष्ट वृत्ती वाढीस लावण्याचें काम करणें शाळागुरूंस अर्थातच शक्य: नव्हतें. सर्वांस एकाच दावणींत बांधल्याप्रमाणें ते शिक्षण देत. यांत कित्येक शाळागुरू फाजील कडकहि असत. या त्यांच्या फाजील शिस्तीमुळें कित्येक शाळागुरूंची आठवण बिस्मार्क यांना पुष्कळ दिवस राहिली होती. मुलें कणखर बनावीं म्हणून कित्येक वेळ कांहीं गुरू त्यांस सबंध दिवस उपाशीं ठेवीत व दुसऱ्या कित्येक प्रसंगीं पांघरुणाशिवाय थंडींत उभे करीत. दुसरे कित्येक गुरू प्रत्येक फ्रेंच वस्तूचा द्वेष मुलांच्या मनांत भरवीत. ही गोष्टहि बिस्मार्क यांस पसंत नव्हती. फ्रेंचांच्या करड्या अमलाखालचें सुख ऑटो यासहि जाणवलें होतें; तथापि फ्रेंचांच्या कांहीं राष्ट्रीय संस्था आणि त्यांचें राष्ट्रीय जीवित यांजबद्दल ऑटोला पूज्यभाव असे.

शाळागुरूंची वागणूक अशा प्रकारची असल्यामुळें ऑटोला या प्रकाराचा कंटाळा येऊन घराची वारंवार आठवण होऊं लागली. नीपॉफ येथल्या आपल्या गांवीं आपण केव्हां जाऊं, असें त्याला होऊन गेलें. त्याचें बालपण कुरणांत आणि वृक्षांच्या रायांत सृष्टिदेवतेच्या अंकावर गेलेलें. बर्लिन शहरांत बघावें तिकडे घराशिवाय दुसरें कांहीं दिसावयाचें नाहीं. शाळेजवळ असलेल्या खेळावयाच्या पटांगणांत ईडलिंबाचें एकच झाड त्याच्या दृष्टीस पडे. अशा स्थितींत घरच्या बगीच्याची आणि कुरणाची आठवण त्यास वारंवार व्हावी, यांत आश्चर्य नाहीं. ऑटो कधीं

शहराच्या बाहेर फिरावयास गेला व तेथें एकादा शेतकरी त्याच्या नजरेस पडला, तर घराची चटकन आठवण होऊन त्याच्या डोळ्यांस पाणी येई. अशा प्रकारच्या शाळेच्या काचांत ऑटो शरीरानें आणि मनानेंहि खंगत चालला. त्याला विरंगुळा कायतो एक त्याच्या भावाचा. त्याचा वडील भाऊ बर्नार्ड हा त्याच्या आधीं एक वर्ष त्याच शाळेंत गेला होता.

शाळेंत जेवणासाठीं जे पदार्थ करीत, ते अगदीं बेचव आणि खाण्यास कंटाळवाणे असे असत. मांसांचे पदार्थ इतके चामट असत कीं, ते दांतांनीं तुटत नसत, असें एकदां स्वतः बिस्मार्क यांनींच सांगितलें. केव्हां केव्हां नुसते उकडलेले बटाटे आणि त्याबरोबर तोंडीं लावावयास कच्चीं गाजरें मुलांस मिळत. कच्चीं गाजरें ऑटोला आवडत; पण तीं त्याला चांगलीं पचत नसत. कधींमधीं एकाद्या स्नेह्यासोबत्याच्या घरीं तो जेवायला गेला, तर त्या दिवशीं मात्र त्याला पोट भरल्यासारखें वाटे. प्रेमळ आई आणि लाड करणारी स्वयंपाकीण यांच्या हाताखालीं वाढलेल्या ऑटोला आपल्याला शाळेंत घातलें नसून तुरुंगांतच पाठविलें आहे, असें वाटल्यास नवल नाहीं. या शाळेचा सामान्य दिनक्रम त्या वेळच्या दुसऱ्या एका विद्यार्थ्यानें लिहून ठेवला आहे.

आह्माला सकाळीं बरोबर सहा वाजतां उठविण्यांत येत असे. प्रातर्विधी आटोपल्याबरोबर पावाचा एक तुकडा आणि लहानसा एक पेला दूध आह्मास मिळे. नंतर सर्व मुलें प्रार्थना करण्यासाठीं एकत्र जमत. शाळेच्या कामास बरोबर सात वाजतां सुरवात होई. दाहा वाजतां आह्माला अर्ध्या तासाची सुटी मिळे. या वेळींहि पुन्हा एक पावाचा तुकडा आणि त्या ऋतूंत मिळणारीं थोडीं फळें आह्मास मिळत. दुपारीं बारा वाजतां आमचा मुख्य भोजनसमारंभ होई. या वेळीं आमचे सर्व गुरू आह्माबरोबरच जेवावयास बसत. मुख्य अध्यापकाची

पत्नी आणि त्यांची पुतणी सर्वांस वाढीत असत. जेवणांत मिष्ट अथवा मसालेदार पदार्थ मुळींच नसत; तथापि जेवण अगदीं साधें असलें, तरी तें पौष्टिक असे. कोणाला आणखी पदार्थ लागल्यास मास्तरीण बाईंची याचना करावी लागे. पानांत कोणी कांहीं टाकूं नये असा नियम होता. हा नियम कोणी मोडला, तर ताट हातांत घेऊन तें रिकामें करीपर्यंत त्यास बागेंत उभें राहाण्याची शिक्षा होई. अशा प्रकारच्या तिनचार अपराध्यांची मौज आह्मास रोज पाहावयाला सांपडे. दुपारीं दोन वाजतां पुन्हा शाळा भरे. चार वाजतां पुन्हा एक पावाचा तुकडा आणि थोडेंसें मीठ आह्मास मिळे. संध्याकाळीं सात वाजतां शाळेचें सर्व काम खलास होई. यानंतर कांहीं मुलें खेळावयास जात व कांहीं दुसऱ्या दिवसाचा अभ्यास करीत. रात्रीचें जेवण ह्मणजे थोडीशी बीर आणि थोडीशी पुरणपोळी ( Sandwich ). शाळेच्या अभ्यासक्रमांत दोनतास रोज तालमीकडे खर्च होत. यामुळें पुस्तकी शिक्षणाचा आह्मास तेथें कधीं कंटाळा आला नाहीं.

खोटा अभिमान अथवा लाजाळुपणा ऑटोच्या आंगीं लहानपणापासूनच नव्हता. अडल्यापडल्या गोष्टींत आपली गरज आपणच भागवून घ्यावी, असा ऑटोचा क्रम असे. उठल्या सुटल्या दर कामासाठीं शाळागुरूकडे जाणें त्याला पसंत नव्हतें. त्या वेळच्या शिक्षणक्रमाचा वास्तविक हेतु हाच होता. प्रत्येक मुलानें स्वावलंबी व्हावें, याच हेतूनें तेव्हांचा शिक्षणक्रम आंखलेला होता; तथापि ऑटोच्या या वागणुकीचा परिणाम मुलांवर व गुरूंवर वेगळाच झाला. ऑटो मोठ्या ताठ्याचा व कुऱ्याचा असावा असें त्यांस वाटलें. नवीन आलेल्या मुलानें नम्रपणें आपणाशीं वागावें असें जुन्यांस वाटे. कोणापुढें मान वांकविणें ऑटोला लहानपणापासूनच ठाऊक नव्हतें. शेवटीं ऑटोला नरम करण्याचा बेत मुलांनीं ठरविला. शाळेजवळील एका लहानशा तळ्यांत मुलें पोहावयास जात, त्या वेळीं हा उपाय अमलांत आणण्याचा बेत त्यांनीं केला. या प्रसंगाची मोठ्या मौजेची हकीकत बिस्मार्क यांच्या एका स्नेह्यानें वर्णिली आहे.

या प्रसंगीं प्रत्येकानें धीटपणा दाखविणें अवश्य असे. एकादा मुलगा तळ्यांत उडी घेण्यास कांकूं करूं लागला, तर सर्वजण त्याला हिणवीत. शाळागुरू अशा मुलांना उचलून तळ्यांत भिरकावून देत. नंतर त्याचा जीव गुदमरेपर्यंत मुलें त्याला पाण्यांत दाबून धरीत असत. अशा रीतीनें पाण्याची सर्व भीति त्याच्या चित्तांतून नाहींशी करीत असत. ऑटोला नरम करण्याची संधी लवकरच मिळणार, असें वाटून कांहीं मुलें अगदीं हुरळून गेलीं होतीं. सर्व मुलें तळ्याच्या कांठीं जमून हारेनें उभीं राहिलीं. इतक्यांत सर्वांच्या अगोदर ऑटोनें पाण्यांत धाडकन् उडी घेतली आणि पाण्यांत भोंड मारून स्वारी तळ्याच्या दुसऱ्या टोंकाला जाऊन उभी राहिली. ऑटोच्या या कृतीनें सर्व मुलांची किती निराशा झाली असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. यानंतर ऑटोच्या वाटेला कोणीहि गेलें नाहीं.

बिस्मार्कच्या वागणुकीबद्दल आपली झालेली समजूत चुकीची होती, ही गोष्ट शाळेंतल्या विद्यार्थ्यांच्या लवकरच लक्षांत आली. पुढें विद्यार्थ्यांचा ऑटो इतका आवडता झाला, कीं, सर्व बाबींत ऑटो त्यांचा मोहोरक्या बनला. शाळेंतील एका विद्यार्थ्याला एक गोष्टीचें पुस्तक बक्षीस मिळालें होतें. त्यांतील गोष्टी अत्यंत मनोवेधक होत्या. साऱ्या मुलांना गोष्टी वाचण्याची मोठी हौस आणि पुस्तक आळीपाळीनें वाचण्याइतका धीर नाहीं; तेव्हां बिस्मार्कनें तें वाचावें आणि सर्वांनीं ऐकावें, असें ठरलें. पूर्वीं सांगितलेल्या त्या ईडलिंबाच्या झाडाची योजना व्यासपीठाच्या जागीं झाली. शाळा सुटली कीं, सारीं मुलें त्या झाडाखालीं जमत. पार्लमेंटांत एकाद्या सुप्रसिद्ध वक्त्याचें भाषण चाललें असलें, म्हणजे तेथले प्रतिनिधी जसे चित्राप्रमाणें बसलेले असतात, त्याचप्रमाणें हे बालश्रोते ऑटोचें वाचन ऐकण्यास बसत. त्या पुस्तकांत जुन्या पुराण्या दंतकथांचा भरणा होता. ग्रीक दंतकथांतील सुप्रसिद्ध ट्राय येथील वीरांच्या कथा मुलें फार लक्ष लावून ऐकत. कथानकांतल्या नायकांचीं नांवें त्यांनीं एकमेक मुलांनाही दिलीं होतीं. यांत प्रसिद्ध वीरशाली जो आजास्क याचें नांव छोट्या ऑटोच्या वांट्याला आलें होतें.

हिंवाळा पडूं लागला म्हणजे बर्फाचे चेंडू एकमेकांच्या अंगावर फेंकून लुटूपुटूची लढाई मुलें खेळत असत. या लढाईंत स्वतःच्या सैन्याचें आधिपत्य ऑटो करीत असे. दोन बाजूंला सैन्याच्या दोन तुकडया उभ्या राहून हें युद्ध चाले. धाकटा ऑटो आपल्या तुकडीच्या आघाडीस उभा राहून हल्ल्याचे हुकूम देत असे

अशा रीतीनें ऑटोचें शाळेंतील आयुष्य आडदांडपणें चाललें होतें हें खरें; तथापि त्यामुळें त्याच्या मनोवृत्ति बिघडल्या नाहींत. सुट्टींत तो घरीं जाई अथवा थंडीच्या दिवसांत त्याचीं आईबापें कधींमधीं बर्लिनला येऊन रहात, तेव्हां तो त्यांजबरोबर राही. एवढी विश्रांति मिळाली कीं, शाळेचा पूर्वापार क्रम चालविण्याला त्याला दुप्पट हुरूप येई.

यानंतर ऑटो याची रवानगी बर्लिनमधील दुसऱ्या एका उच्च शाळेंत झाली. याच सुमारास ऑटोला मालविन नांवाच्या एका बहिणीची जोड मिळाली.

सर्व विषयांत ऑटोची तयारी फार चांगल्या प्रकारची असे. विशेषतः इतिहास आणि भूगोल या विषयांची त्याला स्वभावतःच फार आवड असे. या नव्या शाळेंत बिस्मार्क यांच्या नांवाची नोंद डॉ. आगस्टस श्मिड यांनीं पुढीलप्रमाणें केली आहे.

“ ता. २१ सप्टेंबर १८२७. फॉं बिस्मार्क एडवर्ड ऑटो लिओपोल्ड. वय १२. जन्म रॅथेनोजवळील शॉनहॉसन गांवीं, बेहरनर रस्त्यावर ५३ नंबरच्या घरांत. धर्म प्राटेस्टंट. पेनशन घेतलेल्या घोडदळ कप्तानाचा मुलगा. कच्ची तिसरी इयत्ता. ”

प्लॅमन् शाळेपेक्षां या नव्या शाळेची व्यवस्था फार निराळ्या पद्धतीची होती. तेथें पूर्वींच्या इतका कडकपणा नव्हता. या शाळेंत आपले

दिवस फार सुखाचे जातील, असें ऑटो यास वाटलें. या शाळेंत डॉ. बॉनेल या नांवाचे एक प्रमुख अध्यापक होते. ऑटोच्या पाणीदार चेहऱ्याकडे पाहिल्याबरोबरच बॉनेल यांचें चित्त त्याजकडे वेधलें. यानंतर बॉनेल यांचें ऑटोवर फार प्रेम जडलें.

ऑटो फार हुशार निघेल असा अजमास बॉनेल यांनीं केला होता, आणि पहिल्याच सहामाहींत तो खरा ठरला. पहिल्या सहामाहीच्या परिक्षेंत त्याचा नंबर चवथा येऊन 'उत्तम' असा शेरा त्याच्या नांवांपुढें पडला. वर्तणूक नम्रपणाची आणि चालरीत सभ्यतेची असें त्याच्या गुरूनें त्याच्या शेरेबुकांत लिहिलें. ल्याटीन व्याकरण, ग्रीक भाषा आणि जर्मन व फ्रेंच भाषा यांत ऑटोनें चांगले गुण मिळविले.

इ. स. १८२८ सालीं ऑटोला वरच्या वर्गांत घालण्यांत आलें. या वर्गांतहि ऑटोची हुषारी पहिल्याप्रमाणेंच चांगली दिसून आली. हा वेळपर्यंत त्याचा वडील भाऊ बर्नार्ड त्याच शाळेंत होता. इ. स. १८२९ सालीं ही शाळा सोडून बर्नार्ड कायद्याच्या शाळेंत गेला. यानंतर लवकरच डॉ. बॉनेल यांची बदली ग्रेफ्रायर्स नांवाच्या शाळेवर झाली. यांच्या ठिकाणीं ऑटोची फार भक्ति असल्यामुळें तोहि त्यांजबरोबर या नव्या शाळेंत दाखल झाला. या वेळेपर्यंत ऑटो व बर्नार्ड एकाच जागीं रहात असत; पण बर्नार्डचें वय सैन्यांत दाखल होण्याजोगें झाल्यामुळें त्याला बराकींत जाऊन रहावें लागलें. तेव्हां ऑटोनें आपली सोय प्रो० प्रेव्हो यांच्या घरीं केली. पुढें थोड्याच दिवसांनीं तो डॉ. बॉनेल यांच्या घरीं जाऊन राहिला. त्या वेळच्या ऑटोच्या वागणुकीचें वर्णन बॉनेल यांनीं स्वतः असें केलें आहे:—" ऑटोची वागणूक फार नम्रपणाची असे. खोटी आढ्यता त्याला कधीं शिवलीहि नाहीं. आमच्या गरिबीच्या कुटुंबांतसुद्धां तो फार आनंदानें राहिला. मी घरीं नसलों,

ह्मणजे माझ्या बायकोबरोबर इकडच्यातिकडच्या गप्पागोष्टी तो करीत असे. जणूं काय ही आपली आईच, अशा प्रकारें तो तिच्याशीं वागे."

या गुरूवर बिस्मार्क यांची भक्ति अखेरपर्यंत होती. मोठेपणीं सुद्धां वारंवार आपल्या गुरूच्या घरीं जाऊन त्यांची चौकशी ते करीत असत. हर्बर्ट आणि वुइलियम या नांवांच्या आपल्या दोघां मुलांस त्यांनीं बॉनेल यांच्याच शाळेंत घातलें होतें.

देवळांतील प्रार्थना, बायबलचें वाचन आणि पाद्र्याचा उपदेश, यांचा परिणाम ऑटोच्या मनावर फार चांगल्या प्रकारचा झाला. पाद्र्याच्या तोंडांतलें एक वाक्य त्याच्या चित्तावर विशेषपणें कोरलें गेलें होतें. हें वाक्य त्याच्या भावी आयुष्यंक्रमाच्या ब्रीदवाक्याप्रमाणें झालें. तें वाक्य असें:– तूं जें कांहीं करशील, तें मनःपूर्वक कर. मनुष्यासाठीं नव्हे, तर परमेश्वराप्रीत्यर्थच आपण हें काम करीत आहों, अशा भावनेनें तें कर.

ऑटोचा स्वभाव फार विनोदी असे आणि प्रसंगानुसार तो बाहेर पडे. एके वेळीं सुटींत ऑटो आपल्या घरीं आला होता. घराजवळच्या बागेंत हरक्युलीसचा एक प्रचंड पुतळा उभा केला होता. शिकारी करतां हातांत बंदुक घेऊन ऑटो बाहेर पडला असतां, त्याचें लक्ष सहज या पुतळ्याकडे गेलें. त्यावर गोळीबार करण्याची इच्छा ऑटोला झाली. मागचा पुढचा विचार न करतां त्यानें त्या पुतळ्यावर बंदुक झाडली. इतक्यांत फिरतां फिरतां त्याचे वडील तेथें आले. पुतळ्यावर ऑटोनें बंदुक झाडली, ही गोष्ट फर्डिनंड यांच्या लक्षांत येऊन ते ऑटोला ह्मणाले; " ऑटो, तूं हरक्युलीसवर गोळी झाडलीस काय ? "

ऑटोनें चटकन् उत्तर दिलें, "होय बाबा; पण त्यानें तो कांहीं मरणार नाहीं. कारण मी बंदुक पुढें करतांच, त्यानें आपले दोन्ही हात छातीवर धरले."

चिरंजिवाचें हें उत्तर ऐकून फर्डिनंड यांस हंसूं कोसळलें. ऑटोच्या लहानपणाच्या या दांडगाईच्या खुणा त्या पुतळ्यावर अद्यापीहि आहेत.

ग्रेफ्रायरच्या शाळेंत ऑटो दोन वर्षें होता. इ.स. १८३२ च्या एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या तारखेस त्यानें ही शाळा सोडली. शेवटच्या परिक्षेंतही ऑटो चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाला. फ्रेंच आणि इंग्लिश या दोन भाषांत त्यानें विशेष नैपुण्य मिळविलें होतें. एके वेळीं त्याच्या फ्रेंच शिक्षकानें जर्मनीसंबंधानें कांहीं अनादराचे उद्गार काढले. यामुळें या देशभक्त ऑटोचें पित्त खवळलें. पुढें केव्हां निबंध लिहावयाची पाळी आली, ह्मणजे ते फ्रेंच भाषेंत न लिहितां इंग्रजींत तो लिहीत असे. अशा रीतीनें वयाच्या १७ व्या वर्षीं दुय्यम शिक्षण संपवून ऑटो उच्च विद्यापीठांत प्रवेश करण्यास योग्य झाला. त्याचा शिक्षणक्रम फार चांगल्या प्रकारें पार पडला होता. तथापि तेवढ्यावरून हा जर्मनसाम्राज्याचा जनक होईल, असें भविष्य त्याच्या गुरूंपैकीं कोणींहि वर्तविलें नसतें.

---

प्रकरण तिसरें.

## राजकीय वातावरण.

सर्व युरोपखंड पादाक्रांत करून, तें आपल्या एकट्याच्या सत्तेखालीं आणण्याचा यत्न नेपोलियननें केला. या दास्यशृंखलेंतून सुटण्यासाठीं युरोपखंडानेंहि कंबर बांधून नेपोलियनशीं दोन हात करण्याची तयारी केली. या भांडणांत अखेरीस युरोपखंडाचा विजय होऊन ज्या शांतीच्या प्राप्तीसाठीं तें आतुर झालें होतें, ती त्यास मिळाली; पण हें घडवून आणण्यास किंमतहि तशीच जबर द्यावी लागली होती. हजारों शिपायांच्या रक्तानें व उघड्या पडलेल्या विधवांच्या व पोरक्या पोरांच्या उष्ण अश्रूंनीं युरोपनें ही शांति मिळविली. युरोपखंडांत अशा प्रकारें

शांतता झाली; तथापि जर्मनीचें उद्दिष्ट अद्यापि साध्य झालें नव्हतें. जर्मन राष्ट्रांतल्या पुष्कळशा भानगडी अद्यापि मिटावयाच्या होत्या. जर्मन संस्थानांची एकी होऊन त्यांचें संघटित साम्राज्य बनावें, यासाठीं तिसरा फ्रेड्रिक वुइलियम धडपड करीत होता. नेपोलियनवरची इ.स. १८१५ तली मोहीम पूर्ण यशस्वी होऊन युरोपखंडांतून नेपोलियनचें उच्चाटन झाल्यानंतर जर्मनीच्या एकीची ही चळवळ थोडीशी मंदावली. वाटर्लूच्या लढाईंत जर्मन संस्थानांनीं जें अश्रुतपूर्व यश मिळविलें, त्याचें खरें फळ त्या वेळीं पदरांत पाडून घेण्याची उत्सुकता त्यांनीं दर्शविली नाहीं. यामुळें ही अखेरची फलप्राप्ति करून घेण्यासाठीं जर्मनीला इ. स. १८७० पर्यंत वाट पहावी लागली. “ जर्मन संस्थानांची एकी होऊन त्या साम्राज्याचें अध्वर्युत्व दुसऱ्या कोणास प्राप्त झालें, तर तें मी कधींहि कबूल करणार नाहीं; तथापि हें पद सांभाळण्याचें सामर्थ्यहि माझ्या आंगीं नाहीं. कारण अशा प्रकारें बनलेल्या बादशहाशीं संस्थानिक वैर करतील. त्याचप्रमाणें निरनिराळ्या संस्थानांचे प्रजाजनहि त्याला बरें पाहाणार नाहींत. त्याला कोणाचें पाठबळ मिळालेंच, तर तें कांहीं उलाढाल्या लोकांचें मिळणार. एकमेकांस सदोदीत पाण्यांत पहात असणाऱ्या संस्थानांचें चक्रवर्तित्व पत्करण्यास लागणारें सामर्थ्य माझ्या आंगीं आहे, असें मला वाटत नाहीं. ” असे उद्गार आस्ट्रियाचा बादशाहा फ्रान्सिस यानें काढले होते. यामुळें इ. स. १८१५ सालीं व्हिएन्ना येथें भरलेल्या कांग्रेसमध्यें जर्मन संस्थानांच्या एकीकरणाचा विचार तसाच मागें पडला. मध्ययुरोपांत आस्ट्रियन साम्राज्यच त्या वेळीं सगळ्यांत प्रबळ होतें. यामुळें जर्मन संस्थानांचें चक्रवर्तित्व पत्करण्याची पात्रता वस्तुतः आस्ट्रियन बादशाहाच्याच ठिकाणीं होती; पण ही पात्रता त्यानें स्वतःच नाकबूल केली आणि त्या जागेसाठीं दुसरा कोणी उमेदवार पुढें न आल्यामुळें जर्मन संस्थानांचें

एकीकरणाचें कार्य तितकेंच राहिलें. जर्मन संस्थानांचें स्वतंत्र अस्तित्व लुप्त न होतां त्यांचें एकछत्री साम्राज्य तयार करण्याचें काम फार बिकट होतें. सर्व संस्थानिकांस सारखेच पूर्ण अधिकार असावेत व नांवाचें अध्वर्युत्व मात्र आस्ट्रियन बादशहाकडे असावें, असाहि एक विचार त्या वेळीं निघाला होता. या विचारास केवळ आस्ट्रियाच्या बादशाहाचीच नव्हे, तर युरोपांतील इतर राजांचीहि अनुकूलता होती; तथापि दुधाची तहान ताकावर भागविण्याचा हा प्रकार प्रशियाला मात्र सम्मत नव्हता. जर्मन संस्थानांची संहति राजकीय दृष्ट्या अधिक एकजीवी असली पाहिजे, असें प्रशियाचें ह्मणणें होतें; तथापि या वेळींहि ही संहति घडवून आणण्यास प्रशियानें नेटाचे प्रयत्न केले नाहींत. नेपोलियनचा पाडाव करण्याचे कामीं प्रशियानें जें कर्तृत्व दाखविलें, तें या बाबतींत दिसलें नाहीं. या वेळची हकीकत लिहितांना एका इंग्रजी पत्रानें पुढील उद्गार काढले होते.

"नेपोलियनच्या विजयी तरवारीस अडथळा करण्यासाठीं जर्मनींत प्रथम कंबर कोणी बांधली? प्रशियानें. हायनोची लढाई कोणी जिंकली? प्रशियानें. ग्रसबीरेन, काझबॉश, डेनेविट्झ, यांत अपूर्व यश कोणी मिळविलें? प्रशियानें. कुल्म, वारटेंबर्ग, मॉकर, आणि लिप्झिग येथील रणसंग्रामांत फत्ते कोणी मिळविली? प्रशियानें. जेथें तेथें प्रशियाचें पाऊल पुढें." अशा प्रकारच्या प्रशियाचें पाऊल या संहतीच्या कामीं मात्र या प्रसंगीं मागें राहिलें.

एकट्या युरोपच्याच काय, पण साऱ्या जगाच्या इतिहासांत ज्या प्रशियानें एवढें अतुल कर्तृत्व दाखविलें, तोच प्रशिया अशा प्रकारें निर्मिलेल्या जर्मन साम्राज्यांतला एक नांवाचा मात्र घटक होऊन बसला. या साम्राज्यघटनेंत त्याच्या कर्तृत्वशक्तीस वाव मिळाला नव्हता.

आस्ट्रियन बादशाहीचा तो एक हस्तक मात्र होऊन बसला. आस्ट्रियाच्या राज्यकाभाराचें सारें सूत्र या वेळीं प्रिन्स म्याटरनिच् या नांवाच्या प्रधानाच्या हातीं होतें. चाणक्य नीतींत हे प्रधान महापंडित होते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. राष्ट्राची जोमदार वाढ कशी करावी, ही विद्या म्याटरनिच् यांस मुळींच अवगत नव्हती; तथापि आंतून लावालावी करून प्रशियाचें महत्व कमी करण्याचा उद्योग मात्र त्यांनीं यशस्वी केला. जर्मन राष्ट्र आस्ट्रियन बादशाहीच्या निशाणाखालील बाहुलें न बनतां तें स्वतंत्र राष्ट्र व्हावें, यासाठीं प्रशिया व दुसरीं कांहीं संस्थानें धडपड करीत होतीं; पण या त्यांच्या खटपटीस म्याटरनिच यांनीं यश येऊं दिलें नाहीं. तोंडाच्या अघळपघळ व गोड गोड बातांनीं अनेक जर्मन संस्थानांस त्यांनीं नुसतें झुलवीत ठेवलें होतें. जर्मन संस्थानांत लावालावी करण्याचा उद्योग म्याटरनिच् यांनीं केला असल्यामुळें कोणत्याहि साम्राज्यविषयक बाबतींत या संस्थांनांचें एकमत होत नसे. यामुळें कोणाचेंहि पाऊल अघाडीस न पडतां सर्वांची सारखीच पीछेहाट होई.

साम्राज्यविषयक बाबींत जर्मन संस्थानांत अशा प्रकारें आधींच फाटाफूट होती. यानंतर व्हिएन्नाच्या कांग्रेसमध्यें नवें साम्राज्य निर्माण होतांना जे करारमदार झाले, ते अशा स्वरूपाचे होते कीं त्यामुळें, ही पूर्वीची फाटाफूट अधिकच बळावली. बाह्य शत्रूपासून कोणत्याहि एका संस्थानाचें रक्षण करण्याचा भार साम्राज्य सरकाराच्या शिरीं राहील, असें जर्मन संस्थानास वाटत होतें; पण या बाबींत रशिया, इंग्लंड आणि फ्रान्स यांचें ह्मणणें कांहीं वेगळेंच पडलें. या संहतीस आपण अनुमति दिली असल्यामुळें या नव्या साम्राज्याचें रक्षण करण्याचा भार आह्मा सर्वांच्या माथीं आहे, असें हीं राष्ट्रें ह्मणूं लागलीं.

"कोणत्याहि मोठ्या राष्ट्राचें खरें महत्त्व त्याच्या स्वातंत्र्यावर अवलंबून असतें." हें तत्त्व सर्वमान्य आहे. पण रशिया, इंग्लंड आणि फ्रान्स यांनीं जर्मनसाम्राज्याच्या बाबतींत या तत्वासच प्रथम हरताळ लावला. 'पहिल्या वुइलियमनें निर्माण केलेंलें जर्मन साम्राज्य' या ग्रंथांत हेनरिक फॉं सिबेल ह्मणतात,

"ज्या संस्थानांनीं एकसारखे विजयावर विजय मिळविले, त्यांच्या माथीं असल्या प्रकारची क्षुद्र राज्यपद्धति यापूर्वी कोणीहि मारली नव्हती. तसेंच, असल्या अपमानकारक प्रकाराला यापूर्वी जर्मन संस्थानिकांप्रमाणें दुसऱ्या कोणीहि मान डोलाविली नव्हती. जो हेतु मनांत धरून प्रशियानें आपली तरवार म्यानांतून वर काढली, तो हेतु अगदींच बाजूस राहिला; एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष घडलेलें कार्य त्या हेतूच्या अगदीं विरुद्ध होतें. यामुळें या बाबतींत प्रशियांत सर्वत्र चळवळ उडाली, यांत नवल नाहीं. एकटया नेपोलियनचें जूं झुगारून देण्यासाठीं प्रशियानें आपली तलवार उपसली व त्याप्रमाणें नेपोलियनचें जूं नाहींसें झालें खरें; पण त्याऐवजीं इंग्लंड, रशिया, फ्रान्स व आस्ट्रिया या चौघांचें जूं या नव्या शासनपद्धतीनें त्याच्या मानेवर बसविलें. युद्धांत विजयी होऊन परत आलेल्या जर्मन तरुणांनीं विश्वविद्यालयांतील इतर विद्यार्थ्यांस आपल्या देशाभिमानानें भारून टाकलें. राजकीय विषयांचे चर्चा करणारे समाज आणि संस्था स्थापन केल्या. जर्मनीच्या सर्व सुशिक्षित तरुणांत एकोप्याची प्रबल इच्छा त्यांनीं निर्माण केली. या त्यांच्या प्रयत्नामुळें जर्मन संस्थांनांची एकी, त्यांचें पूर्ण स्वातंत्र्य आणि त्यांचे स्वतंत्र हक्क हीं प्राप्त करून घेण्याबद्दल सर्व तरुण विद्यार्थ्यांत विलक्षण उत्साह उत्पन्न झाला. या संस्थेचीं ध्येयें प्रथम केवळ काल्पनिक मात्र होतीं. चालू राजकीय पद्धति उलथून पाडण्याचा त्यांचा हेतु नव्हता. जर्मनीच्या तरुण पिढीच्या मनांत स्वातंत्र्याच्या इच्छेचें बीजारोपण करून द्यावें, इतकाच त्यांचा हेतु होता. देशाभिमान आणि प्रबल नीतिमत्ता यांचें बीज चालू तरुण पिढीच्या मनांत उत्तम प्रकारें रुजलें, ह्मणजे अखेरचें साध्य सिद्ध करण्यास सोपें होईल, एवढयाच इच्छेनें त्यांनीं हा यत्न चालविला होता. आतां जी एकी ते निर्माण करणार होते, तिचें राजकीय स्वरूप काय असावें, याबद्दल त्यांचा चित्तांत ठाम अशा कोणत्याहि स्वरूपाचा विचार न-

व्हता, ही गोष्ट खरी. तसेंच त्यांचीं कांहीं मतें अव्यवहार्य होतीं, हेंहि खरें. यांतील कित्येक तरुणांची मजल माथेफिरू बनण्यापर्यंत गेली असून जुलमी सत्ताधाऱ्यांचे खून केल्याशिवाय आपलें उद्दिष्ट सिद्ध होणार नाहीं, असेंहि ते ह्मणत. तथापि असल्या मूठभर तरुणांना देशाच्या मोठ्या भागाचें पाठबळ मिळालें नाहीं, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे."

जहाल भाषेनें भरलेल्या चोपड्यांचा सुकाळ या वेळीं जर्मनींत झाला होता. यामुळें पुष्कळ तरुणांचें पित्त खवळलें. हें वारें अखेरीस विद्यालयांत शिरून त्यानें गुरू आणि शिष्य या दोघांसहि पछाडलें.

बिस्मार्क विश्वविद्यालयीन शिक्षण घेत असतां त्याच्या मनावर कोणत्या प्रकारच्या परिस्थितीचा परिणाम घडत होता, हें बरोबर समजण्याकरितां त्या वेळच्या परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करणें अवश्य आहे. जर्मनीचें सारें वातावरण या वेळीं अगदीं खवळून गेलें होतें आणि या वातावरणाचा परिणाम आपल्या चित्तावर होऊन आपण लोकसत्ताकवादी बनलों होतों, असें खुद्द बिस्मार्क यांनींच कबूल केलें आहे. तथापि त्यांचें वय व त्यांचा अनुभव वाढत चालला, तसें त्यांचें हें मत बदललें व ही गोष्टहि त्यांनीं तितक्याच स्पष्टपणें कबूल केली.

जेना येथील विद्यार्थ्यांच्या संस्थेनें तारीख १८ आक्टोबर रोजीं एक मोठें सम्मेलन भरविण्याचें निश्चित केलें. साऱ्या विश्वविद्यालयांतल्या विद्यार्थ्यांस या समारंभाकरतां त्यांनीं बोलाविलें होतें. तारीख १८ आक्टोबर रोजींच लिप्झिगची लढायी होऊन त्यांत जर्मन तलवार यशस्वी झाली होती. या समारंभास पांचशें विद्यार्थी व कित्येक गुरू हजर राहिले होते. विश्वविद्यालयीन शिक्षणांत नैतिक शिक्षणाचा अंतर्भाव होऊन तरुण पिढीची दानत अधिक बलवान् कशी करण्यांत येईल, याचा विचार या समारंभांत झाला. अशाच प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या संस्था जागोजाग स्थापण्याचा ठराव पास झाला.

लिप्झिग्च्या विजयस्मरणार्थ संध्याकाळीं विद्यार्थ्यांनीं एक प्रचंड होळी पेटविली. जर्मनीविरुद्ध मजकूर असलेलीं कांहीं पुस्तकें या होळींत भस्मसात झालीं. तथापि पुस्तकें जाळण्याच्या या समारंभाच्या वेळीं फारसे विद्यार्थी हजर राहिले नाहींत. वास्तविक हा निव्वळ पोरखेळ होता. असा प्रकार विद्यार्थ्यांनीं करावयास नको होता, हें खरें, तथापि राज्य उलथून पाडण्याचा विचार त्यांच्या मनांत होता, असें अनुमान बांधणें या गोष्टीवरून अगदींच चुकीचें होईल; पण यामुळेंच विद्यार्थ्यांत दोन तट उत्पन्न झाले. या दोन तटांत शाब्दिक तुमुल युद्ध कित्येक दिवस चाललें होतें. परस्परांनीं परस्परांवर शब्दांचा प्रचंड भडिमार केला, तथापि एकंदरीनें पाहतां, विद्यार्थिवर्गानें आपली ही चळवळ शहाणपणानें आणि दूरवर नजर ठेवून चालविली होती, यांत शंका नाहीं. त्या वेळची चालू राजकीय पद्धति आपणास पसंत नसून तींत योग्य प्रकारचा बदल झाला पाहिजे, हें या चळवळीनें त्यांनीं स्पष्टपणें सर्वांच्या निदर्शनास आणलें. पन्नास वर्षांचा काळ लोटल्यानंतर बिस्मार्क यांच्या हातून त्यांच्या या आकांक्षा पूर्ण झाल्या. यांतच कित्येक विद्यार्थी अत्यंत उतावळ्या स्वभावाचे होते. आपलें अखेरचें उद्दिष्ट त्यांच्या लक्षांत राहिलें नाहीं. सर्व कांहीं आजच झालें पाहिजे, असें त्यांना वाटत होतें. असल्या प्रकारचे विद्यार्थी काळवेळ न पाहतां बेफामपणें वागत. या त्यांच्या वृत्तीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संस्था मोडण्यांत झाला. इ. स. १८१९ च्या मार्च महिन्यांत या संस्था बेकायदेशीर ठरविण्यांत आल्या. यामुळें हा उतावळा विद्यार्थीवर्ग अधिकच चिडला. त्यांच्यापैकीं सँड नांवाच्या एका माथेफिरूनें आगस्ट फाँ कोझेब्यू नांवाच्या सुप्रसिद्ध ग्रंथकाराचा खून केला. या ग्रंथकारानें विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीसंबंधानें कांहीं कडक लेख लिहिले होते. असल्या

प्रकारच्या नुकसानकारक तत्वांचा बींमोड करण्याकरतां जर्मन संस्थानिकांनीं नेटाचे प्रयत्न चालविले; पण त्यांचा परिणाम विपरीत होऊन प्रजाजनांत असंतोष माजला व संस्थानिक अधिक जुलमी बनले.

ऑटो फॉं बिस्मार्क यांच्या बाल्याच्या व तारुण्याच्या काळीं जर्मनीची स्थिति अशा प्रकारची होती.

---

## प्रकरण चवथें.

# विश्वविद्यालयीन शिक्षण.

( इ. स. १८३२ ते इ. स. १८३५. )


शाळेंतल्या कंटाळवाण्या शिक्षणक्रमाच्या ओझ्यामुळें ऑटोच्या तोंडावरील तेज थोडें कमी झालें होतें; तथापि त्याची शरीरप्रकृति उत्तम होती. उच्च विद्यार्थिदशेंत त्यानें प्रवेश केला, तेव्हां त्याचें हाडपेर मोठें होऊन शारीरिक बलहि वाढलें होतें. पुष्कळ प्रकारच्या शारीरिकखेळांत तो तरबेज झाला होता. विशेषतः पोहणें, दांडपट्टा खेळणें आणि घोड्यावर रपेट करणें, त्यांस फारच प्रिय असे. या सर्व गोष्टींत तो फार तरबेज असल्याबद्दल त्याची फार ख्याति होती. त्याला शिकारीचा विलक्षण नाद असल्यामुळें धांवण्याचा व उंच कुंपणावरून उड्या मारण्याचाहि आटोला चांगला सराव झाला होता.

ऑटोचा प्रवेश भलत्याच कमी दर्जाच्या विश्वविद्यालयांत झाला, तर तो बिघडेल, अशी त्याच्या आईला फार काळजी लागली होती. ऑटोचें वर्तन त्याच्या सरदार कुळास योग्य अशा थाटाचें असलें पाहिजे, असें तिला वाटत होतें. गाटिंजेनचें विश्वविद्यालय आपल्या मुलाच्या शिक्षणास सर्वतोपरी योग्य आहे, असें जाणून तिनें त्याची रवानगी तिकडे करून दिली. त्याच्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांपैकीं कांहींजण

बॉन येथें व कांहीं हिडलबर्ग येथें गेले होते. आपणहि या पैकीं एकाद्या ठिकाणीं जावें, असें ऑटोच्या मनांत होतें; पण गाटिंजनचें विश्वविद्यालय सरदारी थाटाचें ह्मणून त्याची प्रसिद्धी असल्यामुळें त्याच्या आईनें त्याची रवानगी तिकडेच केली. बिस्मार्क याचा विशेष असा स्नेह फार करून कोणाशीं जडलाच नव्हता; पण ज्या कोणाशीं तो जडला होता, त्यांच्याशीं मात्र तो कायमचा टिकला. यांत मॉरिट्झ् फॉं ब्लाकनबर्ग, आस्कर फॉं आर्निम, हॅन्स् फॉं डेविडस् व वुइलियम फॉं शेंक हे त्याचे विशेष स्नेही होते. हे सर्व विद्यार्थी बॉन किंवा हिडलबर्ग येथें गेले होते. त्यांजकडून ऑटोला नेहमीं पत्रें येत असत. विश्वविद्यालयांतील आपला आयुष्यक्रम निवळ बहारीचा आहे, अशा प्रकारचीं वर्णनें हे विद्यार्थी आपल्या पत्रांत करीत.

ऑटो याची इच्छा बॉन अथवा हिडलबर्ग येथें जाण्याचीच होती; पण घराण्याच्या एका जुन्या स्नेह्याच्या आग्रहामुळें त्याची रवानगी गाटिंजनला झाली. गाटिंजन येथील कांहीं गुरूंची व या स्नेह्याची ओळख होती. विशेषतः भूस्तरशास्त्राच्या गुरूचा व त्याचा विशेष स्नेह होता. या गुरूला ओळखपत्र देण्याचें या स्नेह्यानें कबूल केलें होतें. या प्रसंगाला अनुसरून बिस्मार्क पुढें एक वेळ म्हणाले, “जगभर खडक फोडीत मीं हिंडावें, अशीच जणूंकाय या जुन्या स्नेह्याची इच्छा होती; पण काळाच्या ओघांत मला निराळेंच वळण लागलें. बॉनला मी गेलों असतों, तर जुन्या स्नेह्यासोबत्यांची तरी तेथें गांठ पडली असती. गाटिंजन येथें जुन्यास्नेह्यांपैकीं मला कोणी भेटला नाहीं. शाळा सोडल्यानंतर माझ्या थोड्याशा जुन्या स्नेह्यांची व माझी भेट पार्लमेंटांत मात्र झाली.”

इ. स. १८३२ च्या मे महिन्याच्या १० व्या तारखेस ऑटो बिस्मार्क याची ‘न्यायाचीं मूलतत्वें’ व ‘अर्थशास्त्र’ या विषयांत पहिली परिक्षा पास



प्रिन्स बिस्मार्क.

झाली. आरंभींच्या पहिल्या सहामाहींत बहुधा साऱ्या विषयांच्या व्याख्यानांस ते हजर रहात; पण पुढें युरोपचा इतिहास, युरोपीय सामाजिक संस्था व फौजदारी कायदा; इतक्याच विषयांचा अभ्यास ते करूं लागले. या वेळीं जुन्या रोमन कायद्याचाहि अभ्यास रोज दोन तास ते करीत असत.

विश्वविद्यालयांत अभ्यास करीत असतां व्हासगार्डन नांवाच्या बागेच्या शेजारीं त्यांनीं एक खोली भाड्यानें घेतली होती. नव्या विद्यार्थ्यांशीं ओळखपाळख करून विश्वविद्यालयांतील मौजा चार दिवस भोगाव्या असा विचार त्यांच्या मनांत आला. मेकलेनबर्ग येथील फाँ ड्रेकन या नांवाच्या विद्यार्थ्याची व ऑटोची पहिली थोडीशी ओळख होती. ड्रेकनमुळें दुसऱ्याहि कांहीं विद्यार्थ्यांची ओळख होऊन एक लहानसा चैनीचा आखाडा निर्माण झाला. एका सुट्टींत या मंडळीनें हार्ज नांवाच्या डोंगराळ मुलखाची सफर केली. सर्व मंडळी सफरीहून परत आल्यानंतर बिस्मार्कनें त्यांस एक मेजवानी दिली. मेजवानी ऐन रंगांत आली होती. सर्व मंडळी तरुणांच्या स्वभावास अनुसरून थोडीशी उत्च्छृंखल बनली होती. जर्मन विद्यार्थी असभ्य असतात, असा आरोप त्यांजवर युरोपांतले इतर विद्यार्थी करीत असत. या मेजवानीच्या वेळीं हा विषय चर्चेस निघून त्यावर बरीच भवती न भवती झाली. "आह्मावर असला आरोप करणारांस मी हें उत्तर देतों पहा!" असें ह्मणून ऑटो बिस्मार्क यानें एक शाईची दौत खिडकीकडे भिरकावली. ती एका विद्यार्थ्याला लागली. तेव्हां चिडून जाऊन अधिकाऱ्याकडे त्यानें तक्रार केली. आपल्यासमोर हजर राहाण्यास विश्वविद्यालयाच्या कोर्टानें ऑटोला हुकूम केला. पायांत लष्करी पद्धतीचे जाड बूट, डोक्याला उंच टोपी

तोंडांत विलीमेची नळी आणि बरोबर एक लठ्ठ कुत्रा अशा थाटानें ऑटोची स्वारी कोर्टांत हजर झाली.

आपल्या पुढें येणाऱ्या आरोपीचा हा विलक्षण शिष्टाचार पाहून कोर्ट अगोदरच बुजून गेलें. कोर्टाचा उपमर्द करण्याबद्दल आरोपीला प्रथम पंधरा रुपये दंड होऊन मग पूर्वीच्या अपराधाची चवकशी सुरू झाली. यांतहि ऑटोला आणखी थोडा दंड झाला. कोर्टांतून तो बाहेर पडतो न पडतो, तोंच दुसऱ्या एका विद्यार्थिसंघांतले चार इसम त्याला भेटले. ऑटोचा विचित्र पोशाख पाहून ते एकदम मोठ्यानें हंसत सुटले. दंड झाल्यामुळें ऑटो अगोदरच चिडला होता; आणि विद्यार्थ्यांच्या या सलामीनें त्याच्या रागांत आणखी भर पडली. त्या विद्यार्थ्यांस तो ह्मणाला, "तुह्मी मलाच हंसतां काय?" त्यांनीं उत्तर दिलें, "अर्थात्! तुला नाहीं, तर दुसऱ्या कोणाला आम्ही हंसावें?" ऑटो ह्मणाला, "तुह्मी महामूर्ख आहां."

जर्मनींत असल्या प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या भांडणांतील शेवट नेहमीं द्वंद्वयुद्धांत व्हावयाचा, अशी चाल त्या वेळीं असे. ऑटो बिस्मार्क यानें त्या चौघांना उद्देशून अपशब्द उच्चारला असल्यामुळें चौघांबरोबर द्वंद्व करण्याची पाळी त्याला आली. या वेळीं विश्वविद्यालयांत निरनिराळ्या प्रांतांचे निरनिराळे विद्यार्थिसंघ होते. वरील चार विद्यार्थी हॅनोवेरा संघांतील होते. ऑटो बिस्मार्क ब्रन्स्वीक संघाचा सभासद होता. द्वंद्वाची जागा वगैरे ठरविण्याकरितां ब्रन्स्वीक संघाची एक सभाहि झाली; पण या भांडणाचा निकाल पुढें कांहीं निराळ्याच प्रकारें लागला.

याच सुमारास गाटिंजन येथें आलेल्या तिघां अमेरिकन विद्यार्थ्यांशीं बिस्मार्क याचा स्नेह जडला. या विद्यार्थ्यांचीं नांवें जॉन मोटले, मिचेल किंग आणि एमरी कॉफिन अशीं होतीं. अमेरिकन संस्थानांनीं तारीख ४ जुलई

रोजीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें असल्यामुळें हा दिवस स्वातंत्र्यदिन या नांवानें सणासारखा पाळला जातो. वरील तिघां विद्यार्थ्यांनींहि या दिवशीं मोठी मेजवानी करून बिस्मार्क यास भोजनास बोलाविलें. अशा रीतीनें या अमेरिकन स्नेह्यांशीं त्याचें संघटन वाढत जाऊन ते परस्परांचे पूर्ण स्नेही बनले. यानंतर इ. स. १८३२ सालच्या अखेरीस ब्रन्स्वीक संघाशीं असलेला ऑटोचा संबंध तुटला आणि हॅनोवेरासघाशीं त्याची दिलसफाई होऊन तो त्या संघाचा सभासद झाल्यामुळें त्याचें पूर्वीचें भांडण अर्थातच मागें पडलें. अशा रीतीनें पहिलें भांडण मिटलें खरें, पण त्यामुळें दुसरेंच एक नवें भांडण जन्मास आलें. ऑटो बिस्मार्कनें आपला संबंध एकदम तोडण्यांत आपला अपमान केला, असें ब्रन्स्वीक संघाला वाटून त्याच्या सर्व सभासदांनीं ऑटोला द्वंद्वयुद्धास पाचारण केलें. ऑटोला स्वतःच्या सामर्थ्याची खात्री होतीच; पण याशिवाय तो फाजील धाडशीहि होता. सर्व ब्रन्स्वीक संघाबरोबर आपण एकदमच द्वंद्व करणार, असें त्यानें जाहीर केलें.

गाटिंजन येथील विद्यार्थ्यांची राहणी कशा प्रकारची असे, याचें सुरस वर्णन मोटले यानें आपल्या आईला लिहिलेल्या एका पत्रांत केलें आहे.

"विश्वविद्यालयाच्या नियामक मंडळापुढें हजर होऊन मीं आपलें नांव एका मोठ्या लठ्ठ पटांत दाखल केलें. ज्या गृहस्थानें हा मजकूर टिपून घेतला, त्याला त्याच्या मेहनतीबद्दल नऊ रुपये देऊन एक रुपया निराश्रित फंडाच्या पेटींत मीं टाकला. विद्यार्थ्यांनीं आपली वागणुक कशा प्रकारें ठेवावी, याजबद्दल येथें बरेचसे नियम आहेत. या नियमांच्या एका छापील कागदावर माझी सही घेण्यांत आली. अशा रीतीनें चांगल्याप्रकारें वर्तणुक ठेवण्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांकडून लेखी वचन घेतलें जातें; पण एकहि विद्यार्थी यांतला एकहि नियम पाळीत नाहीं. यामुळें हीं वचनपत्रें ह्मणजे निव्वळ थट्टा झाली आहे. 'मी विद्यार्थिसंघाचा सभासद होणार नाहीं, मी द्वंद्व करणार नाहीं, बीर पिणार

नाहीं ' असल्या प्रकारचीं हीं वचनें असतात, आणि विद्यार्थी तीं हटकून मोडतात.

येथील विद्यार्थ्यांबद्दल काय आणि किती लिहावें, तेंच मला समजत नाहीं. जर्मन विद्यार्थ्यांची तऱ्हा कांहीं जगानिराळीच आहे. त्यांच्यासारखे खोडकर आणि कल्पक डोक्याचे विद्यार्थी साऱ्या जगांत कोठें सांपडणार नाहींत. विश्वविद्यालयाचीं स्थलें ह्मणजे विद्यार्थिसंघांचीं माहेरघरेंच होत. लौकिक, रीतभात आणि आचार हीं पाळावयाचींच नाहींत अशी जणू काय त्यांनीं शपथच वाहिलेली असते. सगळेच जेथें विक्षिप्त तेथें विक्षिप्तपणें वागणें हीच सभ्यपणाची चालरीत. तेथें सामान्य लौकिक रूढीच्या सभ्यतेनें कोणी वागला, तर त्याची गणना विक्षिप्तांत व्हावयाची. येथले विद्यार्थी जशा प्रकारचा पोषाख करतात, तशा पोषाखानें कोणी दुसऱ्या देशांत हिंडला, तर हुर्यो करीत रस्त्यांतलीं पोरें त्याच्या खास मागें लागतील. यांत आणखी गम्मत ही कीं, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पोषाखांत कांहीं नव्याच तऱ्हेचा विक्षिप्तपणा आढळावयाचा. एकाच तऱ्हेचा पोषाख केलेले दोन विद्यार्थी येथें आढळावयाचे नाहींत.

बाहेरचा कोट निळ्या अथवा लाल रंगाचा असावयाचा. डोक्याला एक लहानशी टोपी असून तिच्या भोंवतीं संघाची निशाणी असावयाची. बुटाला मागें टांचण्या असल्याच पाहिजेत. मग कोणी घोड्यावर बसो अथवा न बसो. विद्यार्थ्यांच्या डाव्या हाताच्या तर्जनींत एक जाड आंगठी असावयाची. मग ती पितळेची असली तरी हरकत नाहीं. येथील विद्यार्थी खालच्या ओंठाला नूर राखतात व दाढीहि वाढवितात. कांहीं विद्यार्थी कल्लेहि राखतात. तोंडांत लांब नळीची चिलीम, खाकोटीस पुस्तकें आणि बरोबर एक दोन बुल जातीचीं कुत्रीं, अशा थाटानें जर्मन विद्यार्थ्यांची स्वारी विश्वविद्यालयांत प्रवेश करते. जर्मन विद्यार्थ्यांच्या खोलींत पाय ठेवतांच प्रथम तंबाखूच्या चिलमीचें दर्शन व्हावयाचें. कांहीं मातीच्या, कांहीं दगडांच्या, कांहीं निरनिराळ्या जातींच्या लांकडांच्या; अशा अनेक प्रकारच्या आणि अनेक आकाराच्या चिलमी भिंतीवर टांगलेल्या असावयाच्या. कित्येक चिलमीवर रंगीत चित्रेंहि असावयाचीं. अशा प्रकारच्या पंचवीस तीस चिलमी एका खोलींत सहज आढळावयाच्या. परस्परांस भेट देण्यासरखा जिन्नस ह्मटला ह्मणजे चिलीम. प्रत्येक विद्यार्थी वाटेल तेव्हां आणि वाटेल त्या ठिकाणीं धुराचे फूत्कार सोडतांना आढळतो. रस्त्यांत मात्र चिलीम ओढण्याची मनाई आहे. द्वंद्वयुद्धें हीं तर त्यांच्या पांचवीस पुजलीं आहेत. नव-

ळ्या मनुष्याला या मारामाऱ्यांचा प्रथम मोठा अचंबा वाटण्यासारखा आहे; पण रोजच्या सरावानें या गोष्टीबद्दल पुढें कांहींच वाटेनासें होतें. मला येथें येऊन तीनच आठवडे झाले. पण तेवढया अवधींत चाळीस द्वंद्वयुद्धें झालीं. आणि दुसरीं दीडशें ठरलीं आहेत.

माझ्या या वर्णनावरून जर्मन विद्यार्थ्यांबद्दल सामान्यतः कोणाचेंहि चांगलें मत होणार नाहीं; पण येथें ज्या कांहीं थोडया विद्यार्थ्यांशीं माझा स्नेह जमला आहे, त्यांजबद्दल माझ्या मनांत पूर्ण आदर उत्पन्न झाला आहे. आतां आह्मी एकमेकांस 'तूं' या एकेरी संबोधनानेंच हांक मारतों."

मोटले यांनीं या पत्रांत जो दोन तीन स्नेह्यांचा उल्लेख केला आहे, त्यांपैकींच ऑटो बिस्मार्क हाहि एक असावा. कारण हें पत्र लिहिल्यानंतर तीन चार दिवसांनींच जो स्वातंत्र्य दिन अमेरिकन विद्यार्थ्यांनीं साजरा केला, त्यांत ऑटो बिस्मार्कहि होता. जर्मन विद्यार्थ्यांच्या चांगल्या गुणांचें वर्णनहि मोटले यानें आपल्या पत्रांत पुढीलप्रमाणें केलें आहे.

" संगिताची जर्मनांइतकी आवड असलेले दुसरे लोक जगांत नाहींत. १०००।५०० चीजा ज्याला येत नाहींत आणि एकादें वाद्य वाजवितां येत नाहीं, असा जर्मन विद्यार्थी बहुधा एकहि मिळावयाचा नाहीं. आमच्या क्रौन नांवाच्या खाणावळींत आह्मीं जेवावयास जमलों ह्मणजे संगीताचा जणूं जलसाच चालला आहे, असें वाटतें. जर्मन लोक अत्यंत प्रेमळ आहेत, असें मला वाटतें. तसेंच ते दांडगे उत्साहीहि आहेत. ह्यांच्या उत्साहांत बाह्य उच्छृंखलपणा नसतो, यामुळें त्यांचा उत्साह स्पष्ट दिसत नाहीं; तथापि त्यांच्या इतक्या चिकाटीचे उद्योगशील आणि उत्साही लोक दुसरे नाहींत, अशी माझी खात्री झाली आहे. सर्व विद्यार्थी घरीं थोडाबहुत अभ्यास करतात; पण गुरूच्या व्याख्यानांचा प्रत्येक शब्द टिपून घेण्यांत मात्र ते पूर्ण दक्ष असतात."

केवळ तीन आठवडयांच्या सहवासानंतरच मोटले यांनीं हें पत्र लिहिलें आहे, या गोष्टीचा विचार केला ह्मणजे त्यांची निरीक्षक शक्ति किती सूक्ष्म व वर्णनशैली किती चोख होती, हें दिसून येतें. मोटले हे एक नाणावलेले इतिहासकार असून लंडन आणि व्हिएन्ना येथील दरबारीं अमेरिकन वकिलाचेंहि काम त्यांनीं केलें. बिस्मार्क व मोटले

यांचा स्नेह आमरण कायम राहिला. मरेपर्यंत यांच्या परस्पर भेटी होत असून त्यांचा पत्रव्यवहारहि असे.

जर्मन विद्यार्थ्यांचें जें सामान्यवर्णन मोटले यांनीं वर दिलें आहे, तें बिस्मार्क यास मात्र पूर्ण लागू पडण्यासारखें नव्हतें. संगीत आणि दुसऱ्या ललितकला बिस्मार्क यांस प्रिय होत्या, तथापि त्यांना स्वतःला त्यांचा गंधहि नव्हता. त्याप्रमाणें गाटिंजन येथें असतांना त्यांनीं मोठा कसून अभ्यास केला, असेंहि नाहीं. बिस्मार्क यानें कसल्याच प्रकारची चैन केली नाहीं. त्या काळच्या एकंदर विद्यार्थिवर्गाची राहणी सध्यांच्या इतकी चैनीची बनलेलीच नव्हती. विश्वविद्यालयांत शिरतांना जो एक काळा कोट आंगांत होता, त्याच एका कोटावर विश्वविद्यालयाचा अभ्यास संपवून ते बाहेर पडले.

द्वंद्वयुद्धें करणें, चिलीम ओढणें आणि बीर पिणें, या विद्यांत मात्र ऑटोनें लवकरच पहिला नंबर मिळविला. पहिल्या वर्षी हॅनोवेरियन आखाड्याचे ते सभासद असतां, त्या वर्षांत त्यानें अठ्ठावीस द्वंद्वें करून त्या सर्वांत त्यानें विजय मिळविले. प्रतिपक्षाचा एकहि वार त्यानें आपल्या अंगास लागूं दिला नाहीं. या गोष्टीवरून त्यांना 'अभेद्य अकिलीस' असें नांव विद्यार्थ्यांनीं दिलें. फक्त एका प्रसंगीं मात्र हातांतली तलवार मोडल्यामुळें प्रतिपक्षाचा एक जबर वार त्यांच्या डाव्या गालावर लागला होता. या प्रतिस्पर्ध्याचें नांव बिडेनवेग असें होतें. या गोष्टीस कित्येक वर्षें लोटल्यानंतर बिस्मार्क व बिडेनवेग यांची गांठ पार्लमेंटांत पडली. तेव्हां आपल्या गालावरील वण बिडेनवेग यांस दाखवून ते ह्मणाले, "हें आपलेंच हस्तकौशल्य काय ?" बिडेनवेगनें हंसून उत्तर दिलें, "होय मेहेरबान. मी आपल्या हस्तकौशल्यानेंच ही जखम केली. ती कांहीं नकळत झाली नाहीं."

इ. स. १८३३ च्या जानेवारी महिन्यांत एका द्वंद्वांतील मध्यस्थ या नात्यानें बिस्मार्क यानें काम केल्याचें दिसून येतें. नाईट आणि ग्रॅबो या नांवांच्या दोन विद्यार्थ्यांचें भांडण झालें. त्याचा निकाल पिस्तुलांच्या द्वारें करण्याचें त्यांनीं ठरविलें. एका आड जागीं हें द्वंद्व होण्याचें ठरलें होतें, पण या द्वंद्वाची बातमी चोहोंकडे पसरून ती गोष्ट विश्वविद्यालयाच्या नियामक कमिटीच्या कानावर गेली. कमिटीच्या कोर्टापुढें या गोष्टीची चवकशी झाली. त्या वेळीं आपल्या साक्षींत ऑटो बिस्मार्क ह्मणाले, "हें द्वंद्व प्रथम तीन पावलांच्या अंतरावरून होण्याचें ठरलें होतें; पण खटपट करून मी तें अंतर बारा पावलांचें केलें. याशिवाय लांब लांब टांगा टाकून तें अंतर वाढवितां येईल तितकें वाढविलें. नाईट यानें पिस्तुलें आणलीं होतीं. मीं तीं भरून दिलीं. शस्त्रवैद्य आह्मी आपल्याबरोबर घेतला होता. फक्त एकच गोळीबार झाला. दोघांपैकीं कोणासहि जखम झाली नाहीं. आतां त्या दोघांची दिलसफाई झाली आहे."

या द्वंद्वांत मध्यस्थाचें काम स्वीकारल्याबद्दल दहा दिवस कोठडींत राहण्याची सजा ऑटो यास झाली. याशिवाय बोलावल्याबरोबर हजर न झाल्यामुळें आणखी एका दिवसाची भर त्यांत पडली.

इ. स. १८३३ च्या एप्रिल महिन्यांत खुद्द ऑटोचीं तीन द्वंद्वें ठरलीं होतीं; पण अधिकाऱ्यांस त्यांची बातमी आगाऊ लागल्यामुळें शाळेंतून हांकून देण्याचा धाक ऑटो यास दाखवून तीं त्यांनीं बंद केलीं. याचप्रमाणें आणखीहि एक द्वंद्व अधिकाऱ्यांस बंद करावें लागलें. एकंदरीनें बिस्मार्क यांचें नांव अधिकारीवर्गाच्या कानावर वारंवार जाई, हें मात्र खरें. दुसऱ्या एका द्वंद्वांत हजर राहण्याच्या अपराधावरून तीन दिवसांच्या कैदेची शिक्षा त्यांस झाली होती. यानंतर मे महि-

ऱ्यांत आणखी एक तोहमत त्यांच्यावर आली. कायद्यानें बंद केलेल्या एका आखाड्याचे ते सभासद आहेत, असा आरोप त्यांजवर ठेवण्यांत आला. विद्यार्थिसंघ आणि क्लब वगैरे आखाडे जरबेंत ठेवण्यासाठीं इ. स. १८३२ च्या एप्रिल महिन्याच्या सहाव्या तारखेस एक कायदा पास झाला होता. कारण हा कायदा पास होण्याच्या आधीं थोडेच दिवस कांहीं विद्यार्थीनीं फ्रँकफोर्ट येथील मुख्य पोलीसठाण्यावर हल्ला करून मोठी मारामारी केली होती. यामुळें असले आखाडे नामशेष करण्याचा उद्योग अधिकारीवर्गानें आरंभिला. सार्वजनिक शांततेचा भंग होईल, अशा तत्वावर चालणाऱ्या सर्व आखाड्यांस कायद्यानें मनाई केली होती. यामुळें या बाबींत सर्व विद्यार्थ्यांकडून शपथ घेवविण्यांत आली होती. ज्या आखाड्यांनीं अशा शपथा घेतल्या तेवढेच जिवंत राहून बाकीचे आखाडे कायद्यानें बंद झाले हें खरें, तथापि त्यांचें अस्तित्व समूळ नाहींसें झालें, असें मात्र नाहीं. बिस्मार्क हे हॅनोवेरियन आखाड्याचे प्रमुख असल्यामुळें शपथ घेऊन आपला आखाडा कायद्याप्रमाणें नोंदाविणें त्यांस भाग होतें; पण आपणास परवानगी मिळणार नाहीं, असें वाटून बिस्मार्क यांनीं शपथ घेतली नाहीं व आखाडा नोंदविला नाहीं. या अपराधाबद्दल बिस्मार्क यांस चार दिवसांच्या सक्त कैदेची शिक्षा झाली व शपथपत्रिकेवरहि त्यांस सही करावी लागली.

बिस्मार्क यांस एके वेळीं हिंवताप येऊं लागला, तेव्हां कोयनेलाच्या पुड्या डॉक्टरानें त्यांस पाठविल्या. त्याच वेळीं घरून खाऊचाहि एक डबा आला होता. विशेष जड अन्न खाऊं नको, असा हुकुम वैद्यानें केला होता; पण डब्यांतला खाऊ पाहून त्यांच्या जिभेचें पाणी आवरेना. तो सारा शेर दीडशेर खाऊ खाऊन फस्त करून व क्विनाईनच्या पुड्या फेंकून देऊन बिस्मार्कची स्वारी रपेट करावयास गेली. परत येऊन वर

दोन ग्लास बीर झोंकली. दुसऱ्या दिवशीं त्यांचा ताप साफ बरा झाला. वैद्यबोवा पाहण्यास आल्याबरोबर आपला ताप गेला असल्याचें त्यांनीं त्यांना सांगितलें. आपल्या औषधाची तारीफ वैद्यबोवा करूं लागले, तेव्हां आपण स्वतः काय औषध घेतलें, तें बिस्मार्क यांनीं सांगतांच वैद्यबोवांसहि हंसूं कोसळलें.

विद्यालयांत असतां तंबाखू ओढण्याचें जें व्यसन बिस्मार्क यांस लागलें, तें मरेपर्यंत कायम होतें. फ्रँको-जर्मन युद्ध आटोपल्यानंतर कांहीं कामासंबंधीं बोलणें करण्याकरतां जूल्स फावर या नांवाचा एक फ्रेंच मुत्सुद्दी व्हार्सेली येथें आला होता. बिस्मार्क यांनीं एक चिरूट त्याच्या पुढें केला. पण तो तंबाखू ओढणारा नसल्यामुळें त्यानें तो घेतला नाहीं. तेव्हां बिस्मार्क त्याला ह्मणाले, "तुह्मी अगदीं चुकतां. मुत्सुद्देगिरीच्या संभाषणांत वादविवादाचा प्रसंग येऊन मनुष्याचें डोकें सहजच तापतें. या करतां एकादा चिरूट त्या वेळीं तरी ओढणें फायद्याचें आहे. हातांतून चिरूट पडूं नये, ह्मणून त्याकडे लक्ष ठेवणें अवश्य असतें. यामुळें देहाच्या हालचालीला आळा घालणारें एक बंधन आपोआपच निर्माण होतें. आपल्या बुद्धीची तीव्रता कमी न करतां आपलें मन शांत ठेवण्यास चिरूट फार उपयोगी पडतो. चिरूट ओढतांना निळ्या रंगाच्या धुराचीं जीं कडीं एकामागून एक वर जात असतात, तीं पाहून अंतःकरणाला किती संतोष होतो बरें ? यामुळें तुमच्या चित्ताला संतोष राहून डोळे आणि हात हेहि कामांत गुंततात. आपल्या घ्राणेंद्रियालाहि कमी संतोष होतो, असें समजूं नका. मुत्सद्देगिरींत देवाण घेवाण नेहमीं करावी लागते. कांहीं प्रसंगीं आपल्या प्रतिस्पर्ध्याचें ह्मणणें कबूल करावें लागतें. असें झाल्याशिवाय कोणताहि मुद्दा निकालास येत नाहीं. चित्तवृत्ति शांत नसली, म्हणजे मुत्सद्दी एककल्ली बनतो आणि आपलेंच

म्हणणें खरें करण्यास पाहूं लागतो. देवाण घेवाण करणें भाग आहे, हें तत्त्वच तो विसरतो."

द्वंद्वांच्या भानगडींत वारंवार सांपडल्यामुळें व आनंदी स्वभावामुळें ऑटो बिस्मार्क यांचें नांव गाटिंजनच्या विश्वविद्यालयांत सर्वतोमुखीं झालें होतें. एवढेंच नव्हे, तर बाकीच्या विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांतहि त्यांनीं प्रसिद्धी मिळविली होती. त्यांची धिप्पाड मूर्ति आणि लष्करी थाटाची वागणूक, यांमुळें विद्यार्थ्यांसहि ते प्रिय झाले होते. जेना येथील धुरींजेन आखाड्यांतून त्यांना पाचारण झालें होतें. या बोलावण्याप्रमाणें फाँ ट्रोथा नांवाच्या आपल्या एका स्नेह्याला बरोबर घेऊन ऑटो जेना येथें गेला. तेथें मोठ्या थाटमाटानें विद्यार्थ्यांनीं त्याचें स्वागत केलें. त्याच्या सन्मानार्थ गाणेंबजावणें वगैरे उत्सव विद्यार्थ्यांनीं सुरू केले. ही बातमी विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांस लागतांच त्यांनीं एक विद्यालयाचा अधिकारी त्याजकडे पाठविला. मोठ्या पहांटेस तो अधिकारी बिस्मार्ककडे येऊन म्हणाला, "मेहेरबान्, आपली झोंपमोड झाली, याचें मला फार वाईट वाटतें; पण उपाय नाहीं. दोन तासांच्या अवधींत जेना गांवाची शींव ओलांडून जाण्याचा हुकूम विश्वविद्यालयानें आपणास केला आहे. गाटिंजन येथील एक अधिकारी आला आहे, तो आपणास सोबत करील. गाटिंजन येथील दोन विद्यार्थ्यांनीं जेनाच्या विद्यार्थ्यांस बिघडवावें, ही गोष्ट गाटिंजन विश्वविद्यालयालाहि आवडत नाहीं."

ही बातमी विद्यार्थिवर्गात पसरतांच सारे विद्यार्थी संतापून गेले. आपल्या सन्माननीय पाहुण्यास अधिकाऱ्यांनीं अशा रीतीनें हांकून द्यावें, हें त्यांस नापसंत पडल्यामुळें मोठ्या थाटानें त्यांची रवानगी करण्याचें त्यांनीं ठरविलें. धुरींजेन आखाड्यानें एक प्रचंड मिरवणूक तयार

केली. बिस्मार्क आणि त्याचा मित्र यांस एका सहा घोड्यांच्या गाडींत बसविण्यांत आलें. त्यांच्या समोरच्या जागीं धुरींजेन आखाड्याचे मुख्य गृहस्थ बसले. विद्यार्थ्यांचा मोठा समारंभ गीतें गातगात पुढें चालूं लागला. अशा रीतीनें अधिकारीवर्गानें केलेल्या अपमानाचें उट्टें विद्यार्थ्यांनीं सव्याज भरून काढलें.

यानंतर इ. स. १८९२ सालीं बिस्मार्क एक वेळ जेना येथें गेले असतां, आपल्या भाषणांत या गोष्टीचा उल्लेख त्यांनीं केला. ते ह्मणाले, "पूर्वीं एकवार थोडे दिवस राहण्यासाठीं मी येथें आलों होतों; पण विश्वविद्यालयाच्या अधिकारीवर्गाची मर्जी मजवर खप्पा झाल्यामुळें मला आपला मुक्काम ताबडतोब हलवावा लागला."

आपल्या मुलाला सभ्यतेचें वळण लागावें, अशी बिस्मार्क यांच्या आईची फार इच्छा होती. तंबाखू ओढणें, बीर पिणें, द्वंद्वें खेळणें, असले चाळे तिला आवडत नसत. आपला मुलगा घरीं आला, तेव्हां या सर्व गुणांत तो पक्का तरबेज झाला असल्याचें पाहून बिस्मार्कच्या आईला काय वाटलें असेल, याचा वाचकांनींच विचार करावा. तथापि एक-दोन गोष्टींमुळें तिला थोडेंसें बरें वाटलें. बिस्मार्क अंगापिंडानें चांगला झाला होता. याशिवाय विश्वविद्यालयीन शिक्षणानें त्याच्या मनाची कोमलता नष्ट झाली नव्हती, हें पाहून तिला त्यांतल्या त्यांत आनंद झाला.

इ. स. १८३३ सालच्या उन्हाळ्याचे सुटींत लेफ्टेनंट ऑल्ब्रेट फॉं रून यांच्याशीं बिस्मार्क यांची प्रथम मुलाखत झिमरहासन या गांवीं झाली. या गांवीं लष्करी दृष्ट्या तेथील भूमीचे नकाशे तयार करण्याकरितां फॉं रून हे गेले होते. त्यांजबरोबर आजूबाजूच्या जंगलांत आणि रायांत बिस्मार्क नित्य फिरत असत. बिस्मार्क यांनीं शिकार करावी आणि रून यांनीं नकाशे तयार करावे, असा क्रम साऱ्या सुटी-

भर चालला होता. जर्मन साम्राज्याच्या आद्यजनकत्वाचा मान ज्यांच्या वांट्यास आला, त्यांपैकीं रून याजकडे बराच मोठा भाग जाईल, असें त्या वेळीं बिस्मार्क यांच्या स्वप्नींहि आलें नसेल.

बिस्मार्क यांचा प्रवेश विश्वविद्यालयांत झाला, त्या वेळीं एकंदर विद्यार्थिवर्गाबद्दल व विशेषत: आखाड्याबद्दल त्यांचें काय मत होतें, तें त्यांनीं आपल्या ८० व्या वाढदिवसाच्या प्रसंगीं स्वत:च सांगितलें. "विश्वविद्यालयांत माझा प्रवेश झाला, त्या वेळीं आखाड्यांस नाकें मुरडणाऱ्या लोकांसंबंधीं माझें फार वाईट मत होतें. विशेषत: अशा प्रकारच्या ज्या कांहीं लोकांशीं माझा प्रथम परिचय झाला, त्यांची चालचणूक मला आवडण्यासारखी नव्हती. त्याचप्रमाणें मवाळपणाबद्दल आखाड्यांची थट्टा करून वाटेल त्या अत्याचारांस उत्तेजन देणारे विद्यार्थीहि मला प्रथम फार अप्रिय होते. आपणास जर्मन म्हणविणाऱ्या सर्व संस्थानांचा एक अभेद्य संघ बनावा ही इच्छा, त्या वेळीं माझ्याहि चित्तांत प्रज्वलित झाली होती; तथापि कोणत्याहि प्रकारचें अत्याचरण करणें अनिष्ट आहे, असें त्या वेळींहि मला वाटत होतें. यामुळें या जहाल संघांचा द्वेष मी करीत असें. कालेंकरून माझ्या मनांतील हा दोष नाहींसा झाला, आणि आतां अशा लोकांबद्दलहि माझ्या मनांत मुळींच द्वेष नाहीं. बर्लिन येथील प्राथमिक शाळेंत मी शिकलों. यानंतर ग्रेफ्रायर्सच्या शाळेंतहि माझें शिक्षण झालें. या ठिकाणीं राष्ट्रैक्य भावनांचें बीजारोपण माझ्या ठिकाणीं झालें. किंबहुना मी पुरा लोकसत्ताकवादी या वेळीं बनलों होतों. माझ्या वेळच्या पुष्कळशा विद्यार्थ्यांची अशीच स्थिति झाली आहे. केवळ एकाच व्यक्तीनें मनास वाटेल तसें करावें आणि सामान्य जनतेच्या इच्छेस कधींहि मुळींच मान देऊं नये, हें तत्व आम्हा विद्यार्थी जनांस आवडण्यासारखें नव्हतें."

विद्यार्थिदशेंत एकराष्ट्रीयत्वाचें बीजारोपण चांगलेंच झालें होतें, असें त्यांच्या त्या वेळच्या कांहीं कृतींवरूनहि स्पष्ट दिसून येण्याजोगें आहे. एके वेळीं एक इंग्रज गृहस्थ ऑटोला म्हणाला, "तुमचें जर्मनराष्ट्र म्हणजे छत्तीस चिंध्यांची कानटोपी डोक्याला घालून निजलेला एक राष्ट्रपुरुष होय." या वेळच्या जर्मन राष्ट्रसंघांत छत्तीस पूर्ण स्वतंत्र संस्थानांचा अंतर्भाव झाला होता. त्या सर्वांचीं राष्ट्रीय निशाणें वेगवेगळीं असत. या गोष्टींला अनुलक्षून त्या इंग्रज गृहस्थानें वरील उद्गार काढले होते. ऑटोनें त्याला उत्तर दिलें, "इंग्लंडचा सारा गर्व आणि ताठा हीं तुझ्यांत ओतप्रोत भरलीं असलीं, तरी माझ्यासारखा जर्मन तरुण तुला तिरस्कारार्ह आणि तुच्छच लेखील." या भांडणाचें पर्यवसान शेवटीं द्वंद्वांत झालें. ऑटोचें हें पहिलें द्वंद्वयुद्ध होय.

"कौंट बिस्मार्क आणि जर्मन लोक" या नांवाचें एक पुस्तक मॉरिट्झ् बुश यांनीं लिहिलें आहे. जर्मन संस्थानांची अखेरीस एकी होऊन त्यांचें जर्मन साम्राज्य बनेल, अशी खात्री बिस्मार्क यांस आरंभापासूनच होती, असें या ग्रंथकर्त्यानें त्या पुस्तकांत म्हटलें आहे. बिस्मार्क गाटिंजन येथें असतां कॉफिन नांवाच्या एका अमेरिकन विद्यार्थ्याबरोबर त्यांनीं या बाबतींत पैजहि मारली होती. इ. स. १८५३ सालापर्यंत जर्मन संस्थानांचें साम्राज्य बनेल, असें बिस्मार्क ह्मणाले. याबद्दल कॉफिन याचें मत विरुद्ध होतें. तेव्हां त्या उभयतांत पैज लागली. पैज जिंकणाराला पंचवीस बाटल्या शांपेन नांवाची दारू मिळावयाची असें ठरलें होतें. हरणारानें अटलांटिक महासागर ओलांडून ती जिंकणाराच्या घरीं पोहोंचवावयाची. इ. स. १८५३ सालीं जर्मन साम्राज्य अस्तित्वांत आलें नाहीं, तेव्हां ठरल्याप्रमाणें बिस्मार्क अमेरिकेस जावयास निघाले ! पण कॉफिन मरण पावल्याचें त्यांस समजल्यामुळें

त्यांचें जाणें राहिलें. ते ह्मणाले, ‘ कॉफिन, ( तिरडी ) या नांवावरूनच हा गृहस्थ फार दिवस जगणार नाहीं, असें मला वाटलें होतें. ’ ही गोष्ट बुष् यांनीं आपल्या ग्रंथांत नमूद केली आहे. यावरून जर्मनीच्या एकीकरणासंबंधीं बिस्मार्क यांस विद्यार्थिदशेंतसुद्धां किती तळमळ लागली होती, हें दिसून येतें.

बिस्मार्क यांच्या विद्यार्थिदशेचें वर्णन वर आलेंच आहे. त्यावरून त्यांचा त्या वेळचा आयुष्यक्रम किती स्वच्छंदीपणाचा होता, हें दिसून येतें; तथापि नीचपणाच्या खोडया अथवा हलकट कुटाळक्या करण्यांकडे त्यांची प्रवृत्ति केव्हांच झाली नाहीं. असभ्यपणाच्या चालीरीतींचा आणि नीच कर्मांचा द्वेष त्यांच्या मनांत लहानपणापासूनच बाणला होता. ते मनानें अगदीं मोकळेपणानें वागत असत. जें कांहीं करणें असेल, तें चारचौघांसमक्ष उघडपणें ते करीत असत. यामुळें त्यांच्यापासून अन्याय्य वर्तन होणें शक्यच नव्हतें. पाठशाळेंतल्या पुष्कळशा वर्गांस ते हजर रहात नसत; तथापि त्यांची बुद्धि तीव्र असल्यामुळें व जात्याच ते व्यवहारचतुर असल्यामुळें पुस्तकी शिक्षणाची उणीव त्यांस केव्हांच भासली नाहीं. सर्व विद्यार्थ्यांस एकाच पद्धतीच्या सांच्यांत दाबून काढल्यानें त्यांची स्वाभाविक वाढ खुंटते. यामुळें पुढें त्यांच्याकडून व्हावी तशी कर्तबगारी होत नाहीं. असें जरी स्वतः बिस्मार्क यांचें मत होतें. तरी आपण करावा त्या रीतीनें अभ्यास केला नाहीं, याबद्दल बिस्मार्क यांना पुढें केव्हां केव्हां वाईट वाटे. ‘मला अधिक अनुभव असता, तर मी निराळ्या पद्धतीनें वागलों असतों ” असेंहि ते केव्हां केव्हां म्हणत. त्यांच्या ८० व्या वाढदिवशीं आखाडयांतर्फे एक विद्यार्थिमंडळ मानपत्र घेऊन आलें होतें; तेव्हां एकंदर विद्यार्थिगणास त्यांनीं पुढील उपदेश केला:—

" विद्यालयांतील माझ्या आयुष्याचें सिंहावलोकन करतां, त्यांत कांहीं भाग अनादरणीय आहे असें, मला आढळून येतें. उल्लडपणानें उधळपट्टी करून कित्येक वेळां मी कर्जबाजारी बनलों. करावा तसा अभ्यास मीं केला नाहीं. याचें कारण एका आखाड्याचा मी सभासद होतों हेंच होय. मी आखाड्याच्या नादीं लागलों नसतों, तर खात्रीनें मीं अधिक अभ्यास केला असता आणि मी कर्जबाजारीहि बनलों नसतों. सांप्रतचे विद्यार्थी तर आमच्याहूनहि अधिक दिवाळखोर आहेत. आमच्या वेळीं खर्चाकरितां आम्हांस घरून जें मिळे त्याच्या दुप्पट रक्कमहि आजच्या विद्यार्थ्यांस अपुरी होते. सध्यां तुह्मी अधिक चैनी मात्र झालां आहां. हल्लीं तुह्मीं ज्या चैनीनें वागतां, ती चैन आमच्या स्वप्नींदेखील कधीं आली नाहीं. गाटिंजन येथें असतां जें कर्ज मला झालें, तें मला तेथून बाहेर पडल्यावरहि भोंवलें. आजच्या स्थितींत मी पुन्हां कालेजांत आलों आणि पूर्वीसारखाच वागलों, तर मला होणारें कर्ज जन्मांततरीं फिटेल कीं नाहीं याची मला शंकाच आहे. "

द्वंद्वयुद्धांच्या भानगडींत सांपडल्यामुळें बिस्मार्क यांस कैदेची शिक्षा कित्येक वेळां झाली होती. याशिवाय तंबाखू ओढण्याच्या नियमांचें उल्लंघन केल्यामुळें त्यांस कित्येक वेळां दंडहि झाला होता. गाटिंजनचें विद्यालय त्यांनीं सोडलें, तेव्हां विद्यालयाच्या अधिकारीवर्गानें त्यांस चांगलेंसें शिफारसपत्रसुद्धां दिलें नाहीं.

इ. स. १८३३ सालीं बिस्मार्क कायद्याचा अभ्यास करण्याकरतां बर्लिन येथें आले. ते गाटिंजन येथें असतां त्यांस कैदेची शिक्षा झाली; पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें ती त्यांनीं भोगली नव्हती. ती शिक्षा बर्लिन येथें भोगण्याची परवानगी गाटिंजनच्या अधिकाऱ्याकडून त्यांनीं मिळविली. बर्लिन येथील आयुष्यक्रमास हा त्यांस प्रथमच अपशकून झाला. शिक्षेचे

संपल्यावर फॉं सॅव्हिग्नी नांवाच्या प्रख्यात कायदेपंडिताच्या हाताखालीं त्यांचा कायद्याचा अभ्यास सुरू झाला. आतां सपाटून अभ्यास करावयाचा असा निश्चय त्यांनीं प्रथम केला होता; पण थोड्याच दिवसांत हा निश्चय लटपटला आणि उलट दुप्पट झपाट्यानें गाटिंजनचा क्रम बर्लिन येथेंहि सुरू झाला.

या वेळीं त्यांचे अमेरिकन स्नेही मोटले हेहि अभ्यासाकरतां बर्लिन येथें आले होते. मोटले यांच्या सहवासापासून बिस्मार्क यांस पुष्कळ फायदा झाला. विशेषतः इतिहासविद्येंत झाला. मोटले चांगले इतिहास निपुण असल्यामुळें बिस्मार्क यांसहि हा विषय चांगला अवगत झाला. मोटले मेहनती आणि बुद्धिमान् गृहस्थ होते. यामुळें त्यांच्या सहवासानें बिस्मार्क यांस चांगला फायदा झाला. बिस्मार्क हे बाह्यतः केवळ उडाणटप्पू वाटत असले, तरी निव्वळ चैन करण्याकडे त्यांची प्रवृत्ति केव्हांहि नव्हती. या दोघांचा स्नेह आमरण अखंड कायम राहिला, याचेंहि कारण हेंच कीं, आस्थेनें कोणतेंहि काम करण्याची प्रवृत्ति दोघांतहि सारखीच होती.

इ. स. १८३५ सालच्या मे महिन्याच्या २० व्या तारखेस बिस्मार्क यांची दुय्यम ॲडव्होकेटची परिक्षा पास होऊन जून महिन्याच्या ४ थ्या तारखेस बर्लिन कोर्टांत त्यांस नौकरीहि मिळाली. अशा रीतीनें बिस्मार्क यांची विद्यार्थीदशा संपून नव्या आयुष्यक्रमास सुरुवात झाली.

---

प्रकरण पांचवें.

## गडबडीचे दिवस.

बर्लिन येथील कोर्टांत नौकरी मिळाली, तेव्हां ऑटो बिस्मार्क आपला वडील भाऊ बर्नार्ड याजबरोबर राहूं लागले. हा वेळपर्यंत बर्नार्ड

यांचें लष्करी शिक्षण सुरू होतें; पण शिक्षण घेण्याचीं सालें संपल्यामुळें ते पुन्हां विश्वविद्यालयांत अभ्यास करूं लागले. एका वर्षांत त्यांचा क्रम संपला व पॉट्स्डयाम येथें त्यांस नौकरीहि लागली. बर्नार्ड यांस लष्करी शिस्त लागली असल्यामुळें ऑटोचें स्वछंदी वर्तन त्यांस फारसें पसंत पडलें नाहीं; तथापि कित्येक वेळां ऑटोच्या कांहीं मौजा ऐकून त्यांचा लष्करी बाणा मावळून त्यांस हंसूं कोसळे. बर्लिन येथील कोर्टांत ऑटो एका साक्षिदाराची साक्ष घेत होते. या साक्षिदाराचें उद्दाम वर्तन आणि फाजील बोलकेपणा पाहून ऑटो यांस संताप आला. त्या साक्षिदाराच्या अंगावर मोठ्यानें खेंकसून ते त्याला ह्मणाले, "आतां तुम्ही सभ्यतेनें वागलां नाहीं, तर धक्के मारून मी तुम्हांस कोर्टाच्या बाहेर घालवीन." ऑटोचे हे शब्द ऐकून म्याजिस्ट्रेट त्यांजकडे वळून हळूच ह्मणाले, "कोणालाहि कोर्टांतून घालविण्याचें काम तुमचें नसून माझें आहे." खटल्यास पुढें सुरुवात झाली. त्या साक्षिदाराचा उद्धटपणा अधिकच वाढत चालला. तेव्हां बिस्मार्क पुन्हां ओरडून त्याला ह्मणाले, "तुह्मी नीट रीतीनें वागलां नाहीं, तर म्याजिस्ट्रेट साहेबांकडून मी तुम्हास धक्के मारवीन." अशा रीतीनें म्याजिस्ट्रेटची कोटी उलट त्यांच्या गळ्यांत घातली.

कायदेपंडिताचा धंदा बिस्मार्क यांस आधींच अप्रिय होता. तशांतून वरच्यासारखे प्रकार नेहमीं घडत असल्यामुळें या धंद्याचा त्यांस अधिकच वीट आला. याशिवाय अधिकारीवर्गाचा उद्दामपणाहि त्यांस खपेनासा झाला. एके वेळीं घटस्फोटाचा खटला ते चालवीत होते. कोर्टांत आलेली बाई काडी मोडून देण्यास कांहीं केल्या कबूल होईना. तिची समजूत घालण्याचा प्रयत्न बिस्मार्क यांनीं नानाप्रकारांनीं केला. पण कांहीं केल्या तिची समजूत पटेना. तेव्हां त्यांनीं आपल्या वरिष्ठ

ॲडव्होकेटला खटला पुढें चालवून तडजोड करण्यास विनंति केली; बिस्मार्ककडे पाहून हंसत हंसत व तुच्छतादर्शक मुद्रा करून वरिष्ठांची स्वारी मोठ्या थाटानें उभी राहिली. धंद्याचें कौशल्य बिस्मार्क यांच्या आंगीं नाहीं, असेंच जणूं काय हे वरिष्ठ आपल्या मुद्रेनें सुचवीत होते. पण ती बाई असली खमंग कीं, येवढ्या मोठ्या कायदेपंडिताच्या जिव्हास्त्रापुढेंहि ती नरम पडली नाहीं. आमच्या कायदेपंडितांनीं अखेरीस नानाप्रकारचे धाकहि दाखवून पाहिलें, पण अखेरीस तो खटला त्यांस तेथेंच सोडावा लागला. असल्या प्रकारच्या खटल्यांत निदर्शनास आलेला कायद्याचा अपुरेपणा व वरिष्ठ कायदेपंडितांचें व सरकारी अधिकारीवर्गाचें उद्दाम वर्तन यांमुळें या धंद्यापासून बिस्मार्क यांचें मन अधिकच प्रवृत्त होत चाललें.

धंद्यांत त्यांस अशा प्रकारें त्रास होत असला, तरी बर्लिनसारख्या राजधानीच्या शहरीं मिळणाऱ्या इतर सामाजिक सुखामुळें या त्रासाचा त्यांना बराच विसर पडे. कौंट फॉं बिस्मार्क-बोहलेन या नांवाचे त्यांचे एक आप्त बर्लिन शहरीं होते. त्यांजकडे बिस्मार्क यांचें बरेंच जाणें येणें असे. याशिवाय त्यांच्या मावशीचा नवरा जनरल फॉं केसेल हाहि त्या वेळीं बर्लिन येथेंच होता. त्याजकडेहि बिस्मार्क वारंवार जात येत असत. बिस्मार्क यांच्या मावसबहिणी स्वभावानें आनंदी आणि कलाकुसरीच्या कामांत चतुर असल्यामुळें मावशीच्या घरीं त्यांचा वेळ मोठ्या आनंदानें जाई. त्यांची हेलेना या नांवाची एक मावसबहिण चित्रकलेंत मोठी कुशल होती. बिस्मार्क यांचें तिनें काढलेलें एक चित्र अद्यापीहि उपलब्ध आहे. मनाचा मोकळेपणा, कर्तबगारी आणि एकाग्रता हे भाव या चेहऱ्यावर तिनें स्पष्टपणें रेखाटले होते. याच गुणामुळें बिस्मार्क बर्लिनमध्यें मोठे लोकप्रिय झाले. त्यांची वागणूक नेह-

मींच मोठी सरदारी थाटाची व फार सभ्यपणाची असे. यामुळें ते कोठेंहि चार मंडळींत गेले तरी कोणासहि ते अप्रिय होत नसत.

बिस्मार्क यांचे आप्तसंबंधी वरच्या दर्जाचे लोक असल्यामुळें राजदरबारीं त्यांची चांगली वग असे. त्याचमुळें बिस्मार्क यांचाहि प्रवेश राजवाड्यांत झाला. इ. स. १८३५ च्या अखेरीस राजवाड्यांत एक मोठ्या थाटाचा बॉल–नाच–झाला. त्या प्रसंगीं बिस्मार्क यांनांहि बोलावणें होतें. त्याच वेळीं त्या वेळचे प्रशियाचे युवराज प्रिन्स वुइलियम यांची व बिस्मार्क यांची पहिली मुलाखत झाली. प्रिन्स वुइलियम हेच पुढें पहिले जर्मन बादशहा झाले. या मुलाखतींत बिस्मार्क यांजबरोबर त्यांचे सहाध्यायी व मित्र फॉं शेंक हेहि हजर होते. या दोन उंच आणि धिप्पाड तरुणांस पाहून प्रिन्स वुइलियम ह्मणाले, "गार्ड पलटणीच्या मोजमापानेंच वकिलीच्या धंद्यांतलीं माणसेंहि निवडलीं जातातसें दिसतें."

नखरेबाज शिष्टाचार पद्धति आणि हंसत मुरकत मितभाषण करणें या सामाजिक कलांचें वळण बिस्मार्क यांच्या आंगीं प्रथमपासूनच नव्हतें. गरीबाच्या झोंपडीपासून राजवाड्यापर्यंत सर्वांशीं सारख्याच मोकळेपणानें ते वागत. प्रस्तुत बॉलच्या प्रसंगींहि त्यांची अशीच वागणूक झाली. तेव्हां दरबारी रिवाजांत मुरलेल्या कांहीं फाजिल शिष्टांच्या अंगावर त्यामुळें शहारे यावेत यांत कांहीं मोठेंसें नवल नाहीं. बिस्मार्क यांच्या मोकळ्या वागणुकीकडे पाहून हे शिष्ट प्रसंगीं मोठ्यानें हंसतहि असत. राजदरबारांत बिस्मार्क यांचा प्रवेश झाल्यामुळें दुसऱ्याहि सरदार दरकदार वगैरे घराण्यांतून प्रसंगविशेषीं त्यांस बोलावणीं येऊं लागलीं. बिस्मार्क यांस नृत्यकलेचा शोक असे व त्या कलेंत ते तरबेजहि होते. यामुळें बॉलसारख्या प्रसंगीं त्यांस हटकून बोलावणें येई व सर्व मंडळीस ते प्रियहि होत असत. एके वेळीं एका दरबारी

वकिलाकडे असाच नाचाचा समारंभ झाला; तेव्हां बिस्मार्क व त्यांचे स्नेही शेंक हे दोघेहि हजर होते. युरोपीय पद्धतीचें नृत्य बऱ्याच मोठ्या शारीरिक श्रमाची बाब आहे. यामुळें आपल्या या नर्तक मंडळीस श्रमपरिहारार्थ कांहीं खाद्य पेय वस्तु देण्याची रीत आहे; पण आमचे वकील साहेब पक्के तिमाजी नाईक असल्यामुळें त्यांनीं खाण्यापिण्याची तजवीज कांहींच केली नव्हती. बिस्मार्क आणि शेंक यांच्या सारख्या तरण्या बांडास हें अर्थातच पसंत होण्यासारखें नव्हतें. सभ्यतेनें हळूहळू सूचना देऊन आपले मनोगत यजमानास कळविणें या कलेचें बाळकडू बिस्मार्क यांस कोणी पाजलें नव्हतें. तेव्हां बिस्मार्क व शेंक यांनीं या वकीलसाहेबांची खोड मोडण्याचा निश्चय केला. वकीलसाहेबांकडे पुन्हां दुसरा नृत्यसमारंभ झाला, तेव्हां नृत्याच्या अखेरीस या दोघांनीं आपल्या खिशांतून मोठमोठाले भाकरीचे तुकडे व लोणी बाहेर काढून फराळास आरंभ केला. त्यांचें हें कृत्य पाहून सारी मंडळी आश्चर्यचकित होऊन त्यांजकडे टकमका बघूं लागली. ही गोष्ट एके प्रसंगीं बिस्मार्क यांनीं स्वतःच सांगितली व अखेरीस ते ह्मणाले, "आपल्या उदार वकील साहेबांनीं यापुढें खाण्यापिण्याची चंगळ उडवून दिली; पण पुढें कोणत्याहि प्रसंगीं त्यांनीं आह्मांस मात्र बोलाविलें नाहीं."

असल्या प्रकारच्या बारिकसारिक कथांतून एकच मुद्दा आपणास घेण्यासारखा आहे. तो हाच कीं, बिस्मार्क यांच्या आंगीं प्रसंगावधान आणि धैर्य हे गुण विशेषेंकरून होते. कोणत्या प्रसंगीं काय करावें, याबद्दल ते कधींहि बुचकळ्यांत पडले नाहींत. प्रसंग आला कीं, त्यावरची तोड त्यांजपाशीं हजर असे. तसेंच त्या तोडीचा अम्मल करण्यास लागणारें मनोधैर्यहि त्यांजपाशीं होतें. क्रोनेन रस्त्यावर एक चांभार त्या वेळीं रहात असे. तो आपल्या धंद्यांत फार प्रवीण होता; पण वक्तशीर काम करणें त्याला

ठाऊक नव्हतें; यामुळें त्याचीं गिऱ्हाइकें अगदीं कंटाळून जात. तो काम चांगलें करीत असल्यामुळें त्याला सोडून देणेंहि जिवावर येई. एके वेळीं बिस्मार्क यांचा जोडाहि ठरलेल्या वेळीं त्यांस मिळाला नाहीं. वेळ ठरविणें आणि ती चुकविणें, या दोन्ही गोष्टी त्या चांभाराच्या अंगवळणींच पडल्या होत्या. पुन्हां दुसऱ्या दिवशीं सकाळीं बिस्मार्क यांचा गडी चांभाराच्या घरीं हजर झाला. अर्थात् जोडा तयार नव्हता. तो थोड्या वेळानें तयार होईल, असें नेहमींचें उत्तर देऊन चांभारानें गड्याची रवानगी करून दिली. गडी जाऊन सुमारें दहा मिनिटें होतात न होतात तोंच बिस्मार्क यांजकडून दुसरा एक गडी येऊन जोडा मागूं लागला. अशा रीतीनें प्रत्येक दहा मिनिटांस एक याप्रमाणें तगादे संध्याकाळपर्यंत सुरू झाले. एकसारख्या पडणाऱ्या पाण्याच्या थेंबानें जसें दगडासहि भोंक पडतें, तशीच गोष्ट या चांभाराची झाली: या तगाद्यांनीं कंटाळून जाऊन त्याच दिवशीं संध्याकाळीं त्यानें बिस्मार्क यांचा जोडा तयार करून दिला. यानंतर पुढें केव्हांहि अशी दिरंगाई बिस्मार्क यांच्या कामास त्यानें केली नाहीं, हें सांगावयास नकोच.

बर्लिन शहरीं एक वर्ष गेल्यानंतर बिस्मार्क यांची नेमणूक सरकारी वकील या नात्यानें एलाशापेल येथें झाली. या गांवीं कौंट अर्निम-बायटझेनबर्ग या नांवाचे अधिकारी चीफ कमिशनरच्या हुद्यावर होते. आपल्या कामांत फार वाकबगार, असा त्यांचा फार लौकिक होता. हे पुढें मागें चांगल्या पदवीस चढतील असें लोक ह्मणत. अशा प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांची बहाल मर्जी ज्या नोकरावर असेल, त्याचें नशीब पुढें मागें चांगलें खुलण्याचा संभव होता. एलाशापेल येथें गेल्यावर बिस्मार्क हे शिरस्त्याप्रमाणें आपल्या वरिष्ठांस भेटावयास गेले व कौंट

साहेबांनीं त्यांचें आदरातिथ्यहि चांगल्याप्रकारें केलें. आरंभीं बिस्मार्क यांनीं आपलें सरकारी वकिलीचें काम फार आस्थेनें आणि फार झटून केलें; पण त्यांचा स्वभाव जन्मतः पडला स्वछंदी.तो त्यांस कसचें स्वस्थ बसूं देतो! मोठमोठ्या सरदार घराण्यांत त्यांचा प्रवेश झाला आणि त्यांच्या आनंदी आणि रंगेल स्वभावामुळें लोकहि त्यास चाहूं लागले. अशा रीतीनें नाच गाणीं पुन्हां चालू झालीं. त्यांना फ्रेंच आणि इंग्लिश या दोन भाषा चांगल्या अवगत होत्या; ऑकेन अथवा एलाशॉपेल हें सरहद्दी नजीकचें गांव असल्यामुळें तेथें फ्रेंच, इंग्रज वगैरे लोकांची बरीच वस्ती आहे. विशेषतः श्रीमंत व चैनी इंग्रज आणि फ्रेंच या गांवीं नेहमीं येऊन राहतात. ऑकेनच्या इंग्रज रहिवाशांस तर बिस्मार्क फारच प्रिय झाले. त्या वेळीं ड्यूक ऑफ क्लीव्हलंड नांवाचे एक इंग्रज उमराव तेथें रहात होते. त्यांची मर्जी बिस्मार्क यांजवर अगदीं बहाल असे. बिस्मार्क यांची वृति अस्सल इंग्रजाचीच आहे, असें ड्यूकसाहेब ह्मणत. वास्तविक पहातां बिस्मार्क यांच्या मनोवृत्ति खरोखर अस्सल जर्मन वळणाच्या होत्या. असें असतांहि त्यांनीं आपली छाप ड्यूक यांजवर बसविली, यावरून आजुबाजूची परिस्थिति ओळखून तदनुरूप आपलें वर्तन ठेवण्याची कला बिस्मार्क यांस कशी अवगत होती, हें दिसून येतें. अशाच प्रकारें ऑकेन येथील बेल्जन् व फ्रेंच रहिवाशांवरहि त्यांनीं आपली छाप बसवून आपणास प्रिय करून घेतलें होतें. बेल्जम, फ्रान्स आणि ऱ्हाईन नदी कांठचा प्रांत यांत आपल्या नव्या स्नेह्यांबरोबर त्यांनीं अनेकवार प्रवास केला. अशा रीतीनें कांहीं काळ त्यांनीं चैनींत घालविला; पण पुढें ही चैन लवकरच संपुष्टांत आली. कर्जांत आपण अगदीं बुडून गेलों आहों, असें बिस्मार्क यांस दिसून आलें. यापुढें एलाशॉपेलसारख्या चैनीच्या आगरांत राहून आपला निभाव लागावयाचा नाहीं, असें त्यांस दिसून

आलें, तेव्हां पॉट्स्डयाम येथें आपली बदली करून घेऊन इ. स. १८३७ साली पावसाळ्यांत बिस्मार्क त्या गांवीं गेले.

सरकारी ऑफीसचें काम करणें बिस्मार्क यांस मनापासून केव्हांच आवडत नसे. विश्वविद्यालयांत असतां स्वच्छंदीपणाचा जो विकार त्यांस जडला, तो अद्यापि नाहींसा झाला नसल्यामुळें सरकारी कचेरीचें काम मानेवर धोंडा दिल्याप्रमाणें त्यांस वाटे. तथापि पॉट्स्डयाम येथें प्रथम कांहीं दिवस त्यांनीं मन लावून काम केलें. त्यांचे मदतनीस वुइल्के हेहि फार काम करणारे गृहस्थ होते. यामुळें बिस्मार्क यांचेंहि काम बहुधा तेच आटोपीत.

त्या वेळीं जमिनीच्या बाबतींत कांहीं नव्या सुधारणा सरकारांतून होत होत्या. त्यांत एका शेतकऱ्याची जमीन सरकारांत घेण्याचें ठरलें, तेव्हां त्या शेतकऱ्याच्या तर्फे बिस्मार्क यांनीं केलेल्या भाषणांतील एक लहानसा उतारा अद्यापिहि विशेष प्रसिद्ध असा आहे. ते ह्मणाले, "अलीकडे जें सुधारणेचें खूळ पिकलें आहे, त्याला बेलगामपणें वाटेल तसा धुडगूस घालूं द्यावयाचा काय? ही सुधारणा आगगाडीच्या वेगानें धांवून वाटेल तिकडे आणि वाटेल तसा खराटा फिरवीत आहे! आमचीं शेतेंभातें आणि जमिनी तुडवून ही सुधारणा आमचीं पवित्र मानसिक बंधनेंहि नष्ट करीत आहे! माझ्या वाडवडिलांनीं लावलेली एकादी बाग तुह्मी मोडून टाकली अथवा माझ्या एकाद्या पूज्य पितराचें थडगें मोडून तेथें तुह्मी एकादें तळें निर्माण केलें, तर माझ्या हृदयाला जो चरका बसेल, त्याचा वण तुम्ही कितीहि पैसा दिला, तरी भरून येईल काय?"

बिस्मार्क हे सुधारणेच्या विरुद्ध होते, असें यावरून सकृद्दर्शनीं दिसतें, पण तें खरें नाहीं. किंबहुना बिस्मार्क हे "भयंकर सुधारक"

आहेत असें त्यांचे स्नेही म्हणत असत. सर्वत्र समता आणि बंधुभाव असला पाहिजे, हें मत त्या वेळीं जर्मनींत बरेंच प्रचलित झालें होतें. या मताचा फ्रिट्झ् रूटर या नांवाचा एक मोठा प्रवर्तक तुरुंगांत शिक्षाहि भोगीत होता. पाठशाळा आणि विश्वविद्यालयें यांत हें मत सर्वत्र प्रचलित झालें होतें. बिस्मार्क यांच्या मनावरहि या वेळीं या मताचा पगडा पूर्ण बसला होता.

सैन्यांत दाखल होण्याचें बिस्मार्क यांचें वय झाल्यामुळें पॉट्स्ड्याम येथील जागर गार्डस् नांवाच्या पलटणींत इ. स. १८३८ च्या मार्च महिन्याच्या २५ व्या तारखेस ते दाखल झाले. त्या वेळीं त्यांच्या वरिष्ठानें त्यांजबद्दल फार चांगलें मत दिलें. "हर् फॉं बिस्मार्क यांस स्वभावतःच सरकारी कामाचा कंटाळा आहे; तथापि केवढ्याहि उच्च सरकारी जाग्यास लागणारी पात्रता त्यांच्या आंगीं पूर्ण आहे, अशी माझी खात्री आहे." असें या वरिष्ठानें आपलें मत प्रदर्शित केलें.

जर्मन साम्राज्याच्या मुख्य प्रधानाच्या पदावर बिस्मार्क आरूढ झाले, तेव्हांहि कामाचा कंटाळा त्यांच्या आंगीं पूर्वींप्रमाणेंच होता; तथापि राजकारणाच्या भानगडी जसजशा उपस्थित होत, तसतसें त्यांस पुरें पडण्याकरतां तासांचे तास ते काम करीत बसत. जरूरीच्या कामांत आळंटाळं करावयाची नाहीं, असा त्यांचा बाणा असे. काम आवडलें अथवा न आवडलें, तरी तें पुरें केल्यावांचून त्याचा पिच्छा ते सोडीत नसत. कित्येक वेळां एकसारखें ते इतकें काम करीत कीं, तें पाहून मोठ्या मी मी म्हणणारांची देखील छाती फाटावयाची.

बर्नार्ड आणि आटो या बंधुद्वयांना आतां थोडेसे काळजीचे दिवस आले. बिस्मार्क यांची आई या वेळीं बरीच आजारी पडली. त्यांतून ती बहुधा उठत नाहीं, असें बिस्मार्क यांस वाटूं लागलें. या वेळीं बिस्मार्क

घराण्याची सांपत्तिक स्थितीहि बरीच काळजी करण्याजोगी होती. बिस्मार्क यांचे वडील आनंदी स्वभावाचे आणि हाताचे सढळ असल्यामुळें इस्टेटीला कर्ज झालें होतें. शेतकी सुधारण्याकरतां बिस्मार्कच्या आईनें बराच खर्च केला होता, पण त्यापासून फायदा न होतां त्यांतला बराच भाग अंगावर राहिला होता; स्वतः ऑटोनेंहि बरेंच कर्ज करून ठेवलें होतें, हें पूर्वी सांगितलेंच आहे. विश्वविद्यालयांतील आणि एलाशॉपेल येथील आपल्या वर्तणुकीचा बिस्मार्क यांस आतां पुरा पश्चात्ताप होऊं लागला.

आतां घरच्या इस्टेटीची व्यवस्था स्वतः पाहून खर्चाला आळा घालून उत्पन्न वाढवावें असें या दोघां बंधूनीं ठरविलें. एल्डेना या नांवाच्या गांवीं एक शेतकीचें कॉलेज होतें. त्यांत जाऊन अभ्यास करण्याचें बिस्मार्क यांनीं ठरविलें. हें साधण्याकरतां ग्रीफस्वाल्ड गांवीं असलेल्या पलटणींत त्यांनीं लष्करी खात्याकडून आपली बदली करून घेतली.

कॉलेजांतील सर्व शिक्षण बिस्मार्क फार मनःपूर्वक करीत असत. त्याचप्रमाणें लष्करी नौकरीहि चांगल्या रीतीनें बजावून आपल्या शिपाईगिरीबद्दल त्यांनीं सर्वांची खात्री पटविली.आपल्या बरोबरीच्या शिपायांशीं ते बंधुभावानें वागत असत. त्यांच्यासाठीं प्रसंगीं जिवास जीव देण्याची त्यांची तयारी होती, असें त्या वेळच्या एका हकीकतीवरून दिसून येतें. एके वेळीं लष्करी तालीम घेण्याकरतां त्यांची पलटण रानांत गेली होती. जागर पलटणींतील लोकांस बगळ्यांची शिकार करण्याचा मोठा शोक असे. पाखरांची शिकार करण्याच्या बाबतींत त्या वेळीं प्रशियांत फार कडक कायदे होते; तथापि लष्करी लोक चोरून हा उद्योग करीतच असत. आपली नेहमींची तालीम संपवून बिस्मार्क यांची पलटण बराकींत येत होती. वाटेंत त्यांना बगळ्यांचा एक मोठा कळप दिसला, तेव्हां बिस्मार्क यांच्या मागच्या रांगेतील एका गृहस्थास

शिकारीची अनावर इच्छा होऊन त्यानें आपली बंदुक त्या कळपावर झाडली. पलटणीचे मुख्य अधिकारी बरेच पुढें असल्यामुळें ही गोष्ट त्यांच्या फारशी लक्षांत येणार नाहीं, असें या शिकाऱ्यास वाटलें; पण त्या बिचाऱ्याचा अदमास अगदीं चुकला. बंदुकीचा आवाज ऐकून कप्तान साहेबांनीं आपली पलटण एकदम उभी केली आणि सर्व शिपायांच्या बंदुकांची तपासणी सुरू केली. पहिल्या रांगेंतल्या सर्व शिपायांच्या बंदुका बरोबर असल्याचें त्यांस आढळून आलें. आतां मागच्या रांगेची पाळी आली. ज्या गृहस्थानें बंदुक उडविली होती, त्याचें काळीज धडधडूं लागलें. रिझर्व सैन्यांत लेफ्टेनंटच्या जागेवर त्याची नेमणूक लवकरच व्हावयाची होती; पण अशा प्रकारच्या अपराधांत सांपडल्यावर या बढतीची आशा आपणास नाहीं, हें त्यास स्पष्ट दिसलें. पुढें सरून अपराधाची कबुली देण्यास तो अगदीं तयार झाला. बिस्मार्क त्याच्या शेजारींच उभे होते. ते हळूच त्याला म्हणाले, 'बंदूक बदल.' ही अदलाबदल एका मिनिटांत झाली. बिस्मार्क यांच्या या कृतीमुळें त्या गृहस्थाच्या बढतीस खो मिळाला नाहीं, हें निराळें सांगावयाला नकोच.

या वेळच्या बिस्मार्क यांच्या एका शिपायी स्नेह्यानें त्यांचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—" आपल्या पूर्वीच्या शाळा सोबत्यांपैकीं ग्रीफस्वाल्ड येथें कोणी भेटला, तर पूर्वीप्रमाणें त्याच्याशीं बिस्मार्क मोकळेपणानें वागत नसत. तसें करण्यास कांहीं कारणें आहेत, असें ते म्हणत. ग्रीफस्वाल्ड येथील बडया लोकांच्या कुटुंबांतहि ते जातयेत नसत. त्यांचा सर्व बाणा पूर्ण सरदारी थाटाचा होता. यामुळें भलता कोणी मनुष्य त्यांजपाशीं फाजील सलगी करण्यास धजत नसे. उद्दाम अथवा हलकट मनुष्याशीं त्यांनीं कधींहि स्नेह केला नाहीं."

इ. स. १८३९ सालच्या अगदीं आरंभींच बिस्मार्क यांजवर एका मोठ्या दुःखाचा पहिला घाला पडला. इ. स. १८३९ च्या जानेवारी महिन्यांत त्याची प्रियमाता इहलोक सोडून गेली. आईवर बिस्मार्क यांचें अतोनात प्रेम होतें. त्याचप्रमाणें बिस्मार्क यांची मनोघटना त्यांच्या आईला जशी समजली होती, तशी ती दुसऱ्या कोणासही ठाऊक नव्हती. यामुळें या मायलेंकरांचीं चित्तें अगदीं एकरूप होऊन गेलीं होतीं. आईच्या मरणानें बिस्मार्क यांस अनिवार दुःख झालें. आपल्या कर्तबगारीसंबंधीं आपल्या आईला फार आशा होती, व ती पुरी करण्याजोगें कोणतेंहि कार्य आपल्या हातून घडलें नाहीं, हें मनांत येऊन त्यांच्या दुःखांत आणखी भरच पडली. कांहीं अलौकिक कर्तबगारी करावी अशी इच्छा त्यांच्या चितांत अनिवार होती; पण काय करावें, हेंच त्यांस सुचेना. आपलें अखेरचें साध्य काय, हेंच त्यांनीं आपल्या चितांत अद्यापि ठरविलें नव्हतें. संसाराच्या ओघाबरोबर आजतागाईत ते कोठें तरी वाहवत होते. या साऱ्या गोष्टीबरोबरच स्वतःचें पूर्वचरित्र आठवून ते फार पश्चाताप करूं लागले. आईची आशा तृप्त करण्यासारखें आपण कांहीं केलें नाहीं, तें नाहींच; पण उलट स्वच्छंदीपणें वागून तिला दुःख मात्र दिलें, हें मनांत येऊन त्यांचें चित्त होरपळूं लागलें. पूर्वकाळ स्वच्छंदांत घालविला आणि भविष्यकाळ अद्यापि अंधेरांत आहे, असें त्यास वाटूं लागलें. कायदेपंडिताचा धंदा त्यांच्या मनाजोगा मुळींच नव्हता. मनाची कितीहि समजूत घालण्याचा यत्न केला, तरी आपलें चित्त या धंद्याकडे लागत नाहीं, असें त्यांस दिसून आलें. 'ऑटो मोठा राजकारणी पुरुष होईल' असें आपली आई ह्मणत असल्याचें स्मरण त्यांस या वेळीं झालें; पण एकाद्या राजकीय खात्यांत आपला प्रवेश होणार कसा, आणि झाला

तरी आपल्या हातून विशेष तें काय होणार, हेंच त्यांस समजेना. याशिवाय घरची इस्टेट धूळ खात पडली होती, तिची व्यवस्था प्रथम लावणें फार अगत्याचें होतें. यामुळें कोणत्याहि सरकारी खात्याकडे ढुंकून पाहणेंसुद्धां या वेळीं शक्य नव्हतें. या काळासंबंधीं पुढें एका प्रसंगीं बोलत असतां बिस्मार्क ह्मणाले, "मी त्या वेळीं कायद्याचा एक मोडका अवयव बनलों होतों." आपणास आवडत नाहीं, अशा धंद्यांत पडण्याचें ज्याच्या नशिबीं येतें, असे लोक त्या धंद्यांत बहुधा अपेशी ठरल्याचें दिसून येतें. एवढेंच नव्हे, तर त्यामुळें त्यांचें मन अदु होऊन पुढें दुसऱ्या कोणत्याहि धंद्यास नालायक ठरतें. सामान्य मनुष्यांची ही गोष्ट झाली. पण लूथर, लेसिंग, गटे, शीलर, फिच, इत्यादि लोकोत्तर पुरुषांची गोष्टच वेगळी. आरंभींच्या अपयशानें त्यांचीं चित्तें मृदु न होतां तीं अधिक तेजस्वी मात्र होतात. आरंभींच्या अपेशामुळें केवढींहि दुःखें त्यांस भोगावीं लागलीं असलीं अथवा केवढ्याहि आपत्ती त्यांजवर कोसळल्या असल्या, तरी त्यांचीं चित्तें भंग न पावतां वज्राहूनहि अधिक कठोर बनतात.

**वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि।**
**लोकोत्तरायां चेतांसि कोहि विज्ञातुमर्हति॥**

हें महाकवी भवभूतीचें वचन किती खरें आहे!

अशा प्रकारें बिस्मार्क यांची मनःस्थिति फार चमत्कारिक झाली होती. त्यांचें मन दुभंग होऊन गेलें होतें आणि काय करावें हें त्यांस सुचत नव्हतें. शिपायी या नात्यानें ज्या कामगिऱ्या त्यांस कराव्या लागत, त्यांत त्यांच्या या फाटलेल्या मनोवृत्तींचें प्रदर्शन फारसें होत नसे; तथापि खाजगी वर्तनांत त्यांचें औदासिन्य ताबडतोब निदर्शनास येई. अशा प्रकारची मनःस्थिति असतां घरच्या इष्टेटीची व्यवस्था त्यांच्या

अंगावर पडली. पोमेऱ्यानिया प्रांतांतील कुल्ज, नीपॉक आणि जॉर्चेलिन इतक्या गांवीं त्यांची वडिलार्जित मिळकत होती. तिची व्यवस्था दोघां बंधूंनीं करावी असें ठरलें. शॉनहॉसन गांवीं त्यांचा मुख्यत्यार बेलिन हा तेथील सगळी व्यवस्था पहात होता. बिस्मार्क यांचे वडील व त्यांची बहीण मालवीन हीं शॉनहॉसन गांवीं जाऊन राहिलीं. बिस्मार्क यांचे वडील फर्डिनंड यांच्या स्वभावांत कांहीं बदल झाला होता असें नाहीं. ते पूर्वींसारखेच निष्काळजी वृत्तीचे असून अरण्यांतून शिकार करण्यांत आपला बराच वेळ घालवीत. तथापि ते परोपकारी असल्यामुळें बाकीचा वेळ गांवच्या कामीं ते घालवीत असत. शॉनहॉसन गांवचीं कुटुंबें त्यांचें नांव अद्यापि मोठ्या प्रेमानें आणि आदरानें घेत असतात.

इस्टेटीचे दोन विभाग करून तिची व्यवस्था प्रत्येकानें स्वतंत्रपणें करावी, असें बिस्मार्क यांचें ह्मणणें होतें. उलटपक्षीं दोघांहि बंधूंनीं समाईक व्यवस्था पहावी, असें बर्नार्ड यांचें मत होतें. आपला हात अधिक सढळ आहे, ही जाणीव बिस्मार्क यांस असल्यामुळें आदा व खर्च हीं समाईक राहिलीं, तर आपल्या वडील बंधूंचें नुकसान आपल्यामुळें होईल, असें त्यांस वाटलें; पण बर्नार्ड यांस हें ह्मणणें पसंत पडलें नाहीं.

उभयतां बिस्मार्क बंधू आतां झटून काम करूं लागले. पहांटे दिसूं लागल्यापासून तों बरीच रात्रपडेपर्यंत ते आपल्या इस्टेटीवर खपत असत. हा वेळपर्यंत अत्यंत अव्यवस्थेमुळें साऱ्या इस्टेटीची वाताहत झाली होती. प्रत्येक बारिकसारिक बाबतींत सुद्धां मालकाचा हात फिरल्यावांचून ती उत्पन्नास येण्यासारखी नव्हती. या वेळीं बिस्मार्क घराणें अगदीं खालावलें असून दहापांच रुपयेसुद्धां हातउसने देण्यासारख्या स्थितींत तें नव्हतें, असें बिस्मार्कचे कांहीं चरित्रकार ह्मणतात;

पण त्यांच्या ह्मणण्यांत फारसें तात्पर्य दिसत नाहीं. बिस्मार्क घराण्यास या वेळीं बरेंच देणें झालें होतें, ही गोष्ट खरी; पण इस्टेटीची व्यवस्था बिस्मार्क बंधूच्या हातीं आल्यापासून दोन वर्षांच्या अवधींतच त्यांनीं सर्व देणें फेडून टाकलें, यावरून त्यांची स्थिति इतकी खलावली असावी, असें दिसत नाहीं. गैरव्यवस्थेमुळें यावें तसें उत्पन्न येत नव्हतें ही गोष्ट मात्र खरी. याशिवाय उत्पन्नाचा जेवढा पैसा येई तेवढा सारा जमिनीचा मगदूर वाढविण्याकडे खर्च होत असे.

इस्टेटीची व्यवस्था आपल्या हातीं घेतल्यावर बिस्मार्क बंधूंनीं शक्य तितका खर्च कमी करून टाकला. ऑटो बिस्मार्क हे आतां अगदीं मध्यम शेतकऱ्याच्या थाटानें राहूं लागले. पूर्ववयांतील स्वछंदी वर्तन आणि सांप्रतच्या स्थितींतील अत्यंत साधेपणा या दोन परिस्थितींचा विरोध बिस्मार्क यांस आरंभीं चांगलाच जाणवला. कांहीं तरी अचाट कार्य करावें ही त्यांची प्रबल मानसिक इच्छा यत्किंचितहि कमी झाली नव्हती; पण परिस्थितीचा ओघ असा प्रबळ होता कीं, त्याच्या सपाट्यांत स्वतंत्र अशा कोणत्याच कर्तबगारीस वाव मिळण्यासारखा नव्हता. अशा रीतीनें एका बाजूस प्रबळ इच्छाशक्ति आणि दुसऱ्या बाजूस तितकीच प्रबळ परिस्थिति बिस्मार्क यांस ओढीत असतां, त्यांचे कसे हाल झाले असावेत, याची कल्पनाच केली पाहिजे.

बर्नार्ड आणि ऑटो या बंधूंत परस्परप्रेम चांगलें असल्यामुळें ऑटो यांस आपल्या भावाच्या संगतीपासून थोडातरी विरंगुळा प्राप्त होई; पण एवढेंहि सुख त्यांच्या दैवाला जणूं सहन झालें नाहीं. कारण या वेळीं बर्नार्ड यांची नेमणूक नागॉर्ड गांवीं एका सरकारी हुद्यावर झाल्यामुळें ते आपल्या पत्नीसुद्धां तेथें रहावयास गेले. आतां इस्टेटीची व्यवस्था दोन भागांनीं करणें प्राप्तच झालें. कूल्ज गांवाची व्यवस्था

बर्नार्ड पहात असत. बिस्मार्क यांस आतां पूर्ण एकांत मिळाला होता; पण कवींना जो एकांत मोठा सुखप्रद वाटतो, तसा तो बिस्मार्क यांना वाटला नाहीं. उलट त्यामुळें त्यांचें चित्त अधिक उदास मात्र झालें.

इ. स. १८४१ सालच्या आगष्ट महिन्यांत लष्करी तालमीसाठीं बिस्मार्क यांस बोलावणें आल्यामुळें त्यांच्या एकांताचा आणि त्याबरोबरच त्यांच्या उदासीनतेचाहि भंग झाला, हें एका अर्थीं बरें झालें. या सालीं त्यांची नेमणूक ९ व्या लँडव्हर पलटणींत दुय्यम लेफ्टेनंटच्या हुद्यावर झाली. या पलटणीचें मुख्य ठाणें स्टारगार्ड गांवीं होतें.

इ. स. १८४२ च्या जून महिन्यांत जी मोठी सहामाही कवाईत झाली, तींत लँडव्हर उल्हान स्वारांच्या पथकांतील एक अम्मलदार या नात्यानें बिस्मार्क हजर होते. ही कवाईत सुरू असतां एके वेळीं उल्हान पलटणींतील दुसऱ्या कांहीं अम्मलदारांबरोबर वेंडेल नदीच्या पुलापाशीं ते उभे होते. त्यांचा मोतद्दार हिल्डब्रँड घोड्यास पाण्यावर घेऊन गेला होता. नदीच्या बऱ्याच खोल जाग्यापर्यंत हिल्डब्रँड घोड्यावर बसूनच गेला. इतक्यांत काय झालें असेल तें असो, घोडा बिचकून उधळला आणि हिल्डब्रँड पाण्यांत पडला. त्यांच्या मागोमाग कुल्ह या नांवाचा एक स्वार नदीपर्यंत घोडा उडवीत गेला. पण तेथें नदीचा कांठ इतका ओंड होता कीं, पुढें जातांच घोडा एकदम थबकला. यामुळें कुल्ह याचा तोल जाऊन तोहि पाण्यांत पडला. त्याच्या घोड्यानेंहि त्याच्या मागोमाग पाण्यांत उडी टाकली. तेव्हां त्याच्या मानेस विळखा घालून कुल्ह यानें आपला जाव कसाबसा वांचविला. हिल्डब्रँड अद्यापि गटंगळ्या खात असून त्याला लवकर मदत मिळण्याचें चिन्ह नाहीं, असें बिस्मार्क यांस दिसून येतांच पुलावरून आपल्या कपड्यासुद्धां त्यांनीं नदींत उडी फेंकली व पोहोत पोहोत ते हिल्डब्रँडपाशीं गेले.

घाबरलेल्या हिल्डब्रँडनें एकदम त्यांच्या गळ्यालाच मिठी मारली व अशा रीतीनें ते दोघेहि नदीच्या तळीं गेले. कांहीं वेळपर्यंत त्या दोघांचा मागमूस कांहीं समजेना; पण थोडयाच वेळानें नदीच्या तीरीं बिस्मार्क आणि हिल्डब्रँड बाहेर पडले. त्यांचा घोडा अद्यापि पाण्यांतच चकरा मारीत होता. तेव्हां ते घोडयापर्यंत पुन्हां पोहोत गेले व त्यालाहि त्यानें तीरापर्यंत खेंचून आणलें.

ही हकीकत लिपेन गांवीं घडली आणि तेथल्या स्टेर नांवाच्या पाद्र्यानें ती नमूद करून ठेवलेली आहे. गोष्टीच्या शेवटीं तो म्हणतो, " लेफ्टेनंट फाँ बिस्मार्क यांनीं आपल्या मोतद्दाराचा जीव जसा आज वांचविला, त्याच प्रमाणें पुढेंहि जर्मनीचा जीव ते वांचवितील, असें भविष्य मीं त्या दिवशीं केलें असतें, तर तें कोणास खरें तरी वाटलें असतें काय ? "

या शौर्याच्या कृत्याबद्दल बिस्मार्क यांस एक चांदीचें पदक मिळालें. पुढें त्यांजवर अनेक प्रकारच्या पदव्यांचा व पदकांचा वर्षाव झाला, तरी हें पदक धारण करण्यास त्यांस जसें भूषण वाटे, तसें दुसऱ्या कोणत्याहि पदकानें तें वाटत नसे. संघटित जर्मन संस्थानांच्या प्रतिनिधींची बैठक फ्रँकफोर्ट येथें भरत असे. प्रशियातर्फें बिस्मार्क हे एक वेळ प्रतिनिधि होते. बैठकीच्या वेळीं आपलें हें पदक धारण करून बिस्मार्क सभा स्थानीं गेले, तेव्हां पुष्कळसे चांद लटकाविणाऱ्या एका आस्ट्रियन प्रतिनिधीनें त्यांस थट्टेनें ह्मटलें, " कांहो, हा चांद कशाचा? हा पूर्वीं माझ्या कोठेंहि पाहण्यांत आलेला नाहीं. " बिस्मार्क यांनीं उत्तर दिलें, " आपल्या पाहाण्यांत तो आलेला नाहीं, हें बरोबरच आहे. कधीं कधीं मनुष्याचा जीव वांचविण्याची संवय मला असल्यामुळें मला तो मिळाला आहे. "

इ. स. १८४२ च्या आगष्ट महिन्यांत बिस्मार्क यांची बदली लँड-व्हर घोडदळांत झाली. त्यानंतर इ. स. १८४३ सालीं, ट्रेपटो आणि ग्रिफनबर्ग गांवीं असलेल्या चवथ्या उल्हान पथकांत त्यांनीं आपली मुद्दाम बदली करून घेतली. आघाडीवरचीं कामें शिकण्याची बिस्मार्क यांची इच्छा होती व त्यासाठीं या स्वारांच्या पथकाबरोबर कांहीं काळ ते राहिले.

नीपॉफ येथील कांहीं स्नेही त्यांस या पथकांत भेटले. युद्धकला मनापासून शिकण्याची बिस्मार्क यांची इच्छा असेल असें त्यांच्या या स्नेही मंडळीस मुळींच वाटलें नाहीं. केवळ कांहीं दिवस मौजेनें काळ काढून शिकार वगैरे करावी, एवढ्याच साठीं ही स्वारी या पथकांत आली असावी, असें त्यांस वाटलें. बिस्मार्क यांचा रंगेल स्वभाव त्यांच्या पुऱ्या ओळखीचा होता. तशांतून रस्त्यांत चिलीम ओढीत फिरणें, मन मानेल तसें स्वतंत्रपणें वागणें अशा प्रकारच्या ज्या संवयी बिस्मार्क यांस जडल्या होत्या, त्या अद्यापीहि कायम असल्यामुळें युद्ध-कलेसारख्या जबाबदारीच्या व कडक शिस्तीच्या विद्येंत त्यांचें मन रमेल असें कोणासच वाटेना. लँडव्हर पथकाचे मुख्य अधिकारी लेफ्-टेनंट कर्नल फाँ प्ल्यू या नांवाचे होते. हे स्वतः पूर्ण लष्करी पेशाचे व कडक शिस्तीचे होते. बिस्मार्क हे खरोखर चांगले अम्मलदार होतील, असें कर्नल प्ल्यू यांसहि वाटेना. तशांतून ते पायदळ पलटणींतून व लँडव्हर घोडदळांतून आले असल्यामुळें उल्हान स्वारांची कडक शिस्त त्यांच्या आंगीं मुळींच नव्हती. यामुळें ड्यूटीवर असतां कित्येक वेळां त्यांचे हातून थोडाबहुत गाफीलपणा होई. अशी वेळ आली ह्मणजे कर्नल प्ल्यू हेहि प्रसंगीं त्यांस चापण्यास कमी करीत नसत. लष्करी बाबींत कोणी ढिलेपणा केला, तर त्याची चवकशी गोल्डनपग

नांवाच्या एका उपाहारगृहांत बसून कर्नल प्ल्यू हे करीत असत. ग्रिफनबर्ग आणि ट्रेपटो यांच्या दरम्यान हें उपाहारगृह आहे. गोल्डनपग हें नांव सर्व पलटणीला मोठ्या बागुलबोवासारखें वाटत असें. या उपाहारगृहांत जाण्याचा प्रसंग बिस्मार्क यांस वारंवार येऊं लागल्यामुळें पहिली सहामाही संपतांच त्यांनीं हें पथक सोडलें. यानंतर पुन्हां केव्हांहि ते उल्हान पथकांत गेले नाहींत.

बिस्मार्क यांस लष्करी बढ़ती आरंभीं तरी लवकर मिळाल्याचें दिसून येत नाहीं. फ्रँकफर्ट येथें भरणाऱ्या जर्मन प्रतिनिधी सभेंत प्रशिया तर्फे त्यांची नेमणूक झाली, तेव्हां सुद्धां त्यांचा लष्करी दर्जा दुय्यम लेफ्टेनंटाचाच होता. प्रशियाच्या प्रतिनिधित्वाचा मोठ्या मानाचा अधिकार त्यांजकडे असतां त्यांचा लष्करी दर्जा बऱ्याच कमी प्रतीचा होता. यामुळें त्यांचे स्नेही त्यांस 'मेहेरबान लेफ्टेनंट' (His Excellency the Lieutenant) असें थट्टेनें ह्मणत. लष्करी आणि मुलकी दर्जाच्या या भेदामुळें बिस्मार्क यांसहि वाईट वाटे. तेव्हां आपला लष्करी दर्जा वाढविण्यासाठीं त्यांनीं एका ब्रिगेड मेजरकडे खटपट केली. तेव्हां 'तुम्हांस लष्करी बढती लवकर पाहिजे असेल, तर खड्या लष्करांत आणखी कांहीं काळ तुम्हांस शिक्षण घेतलें पाहिजे' असा जबाब या अधिकाऱ्यानें त्यांस दिला. लष्करी पेशाची नोकरी आधींच कठीण. या शिवाय मुलकी दृष्टीनें आपण 'मेहेरबान' हें उपपद धारण करीत असतां एकाद्या अक्षरशत्रु हडेलहप्याच्या हाताखालीं नोकरी करणें बिस्मार्क यांस बरें वाटेना, आणि तशी नोकरी करण्यास त्यांस फुरसतहि मिळण्यासारखी नव्हती. यामुळें अधिक शिक्षण घेण्यास आपणास वेळ नाहीं, अशी सबब त्यांनीं ब्रिगेड मेजरला सांगितली. पुढें एके प्रसंगीं ब्रिगेड मेजर याची खासगी गांठ घेऊन त्यास ते म्हणाले, "आपणास

लष्करी कायद्यांची उत्तम माहिती आहे. तशांतून आपण लेखणीचेहि बांके आहां; तेव्हां एकाद्या कायद्याचा आधार घेऊन माझा अर्ज वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मर्जीस येईल, असें करा." कोणत्याहि लँडव्हर अधिकाऱ्याचा दर्जा त्याच्या सामाजिक दर्जाशीं विसंगत असला, तर त्याचा लष्करी दर्जा वाढवावा, अशा अर्थाचा प्रधान मंडळाचा एक जुना हुकूम या ब्रिगेड मेजर साहेबानें काढला. बिस्मार्क यांच्या बाबींत हा हुकूम लागू पडेल कीं नाहीं, अशी शंका मुख्य सेनापती प्रिन्स आगस्टस यांनीं प्रदर्शित केली; तथापि स्वतः चांगला शेरा लिहून बिस्मार्क यांचा अर्ज युद्धखात्याकडे त्यांनीं पाठवून दिला. तेथें तो अर्ज मंजूर होऊन बिस्मार्क यांस बढतीचा हुकूम झाला. यानंतर क्याप्टनच्या हुद्यापर्यंत त्यांची बढती झपाट्यानें झाली. हा क्याप्टनचा हुद्दा मिळाला, तेव्हां त्यांची नेमणूक म्याजूबर्ग येथील घोडदळांत झाली. यानंतर त्यांची आणखीहि बढती होऊन त्यांस कर्नल जनरल व जनरल फिल्डमार्शल हेहि हुद्दे मिळाले. नीपॉफ येथें असतां लष्करी कामकाजांत त्यांचा फारच थोडा वेळ जाई. बाकीचा वेळ ते अगदीं रिकामे असल्यामुळें त्यांस अगदीं कंटाळवाणा वाटूं लागला. हा कंटाळवाणा वेळ कसा घालवावा, हें बिस्मार्क यांस सुचेना, तेव्हां पुष्कळ शांपेन पिऊन व कांहीं उडाणटप्पू स्नेही गोळा करून ते रानावनांत भटकत. त्यांच्या या कृतीमुळें नीपॉफ गांवच्या लोकांनीं 'वेडा बिस्मार्क' असें नांव त्यांना दिलें होतें. घोड्यावर बसून बाहेर पडावें आणि दिवसच्या दिवस रानांत भटकत रहावें, असा त्यांचा क्रम सुरू झाला. नीपॉफपासून सत्तर मैलांवर पोल्झीन नांवाचें एक गांव आहे. त्या गांवीं त्यांच्या एका स्नेह्यानें त्यांस मेजवानीस बोलाविलें होतें. मेजवानीच्या दिवसाचें स्मरण बिस्मार्क यांस आदल्या दिवसापर्यंत राहिलें नाहीं. स्मरण होतांच

घोड्यावर स्वार होऊन, तो सत्तर मैलांचा प्रवास एका दिवसांत करून ते मेजवानीस हजार राहिले. असे दौडीचे प्रसंग त्यांस वारंवार येत. अशा रीतीनें रानावनांतून घोडा पिटाळीत जात असतां शेतकऱ्यांनीं त्यांस पाहिलें ह्मणजे 'हा वेडा पोरगा आपल्या बापाचें नांव बुडविणार' असें ते मनांत ह्मणत.

त्यांचा घोडाहि मोठा उमदा होता. त्याचें नांव त्यांनीं क्यालेब असें ठेवलें होतें. जों जों अंतर अधिक होई, तों तों क्यालेब यास अधिक स्फुरण चढून अधिक झपाट्यानें तो धांवूं लागे. असल्या छंदानें कित्येक वेळां ते विलक्षण प्रसंगांतहि सांपडत. एके वेळीं रेजिनवॉल्ड गांवीं जात असतां अर्ध्या वाटेंत रात्र झाली. पाऊलवाट असून तीहि दाट झाडींतून गेलेली असल्यामुळें रस्त्याचा उमज बरोबर पडेना. इतक्यांत वाटेंत एक दरड लागली. दरडीवरून घोडा खालीं घसरला आणि बिस्मार्क सपाट्यानें जमिनीवर आपटून बेशुद्ध झाले. ते पडले तेथेंच त्यांस झोंपहि लागली. ती इतकी गाढ कीं सकाळीं सूर्य बराच वर येईपर्यंत ते जागे झाले नाहींत. ते जागे झाले तेव्हां, आपण एका देवदाराच्या वृक्षाखालीं पडलों असल्याचें त्यांस आढळून आलें. जमिनीवर उठून बसून व डोळे चोळून ते इकडेतिकडे पाहूं लागले, तों त्यांचा क्यालेब पलीकडेच स्वस्थपणें चरत असल्याचें त्यांस आढळून आलें.

दुसऱ्या प्रसंगीं व्यांगेरीन नांवाच्या गांवीं ते फराळासाठीं उतरले. गांवांत एकच उपाहार गृह होतें आणि तेंहि अगदीं कनिष्ट प्रतीचें होतें. तेथें बीर अथवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची दारू मिळण्यासारखी नव्हती. आणि बीरसाठीं तर बिस्मार्क यांस शोष पडला होता. अशा प्रसंगीं काय करावें, अशी चिंता बिस्मार्क यांस पडली; पण बिस्मार्क यांचें नशीब सवाई शिकंदर असल्यामुळें त्यांची तीहि चिंता

निवारण झाली. उपाहारगृहांत ते क्षणभर बसतात न बसतात तोंच दारूच्या कारखान्याचा एक एजंट तेथें उतरण्यास आला. त्याजपाशीं निरनिराळ्या प्रकारच्या मालाचे बरेच नमुने होते. ते नमुने एकामागून एक पाहण्यास बिस्मार्क यांनीं सुरुवात केली. अखेरची बाटली संपली, तेव्हां त्या एजंटाचे आभार मानून त्यांनीं सरळपणें रिकिबींत पाय ठेवला. आपलें हें गिऱ्हाइक अशा रीतीनें गेलेलें पाहून तो बिचारा एजंट मोठ्या बुचकळ्यांत पडला. नमुने घेऊन गांवोगांवच्या व्यापाऱ्यांकडे तो जात होता. आतां नमुने तर सर्व संपले आणि या भल्या गिऱ्हाई-कानें मालाची मागणीहि मुळींच केली नाहीं, तेव्हां कारखान्याकडे परत जाण्याचा विचार तो करूं लागला. इतक्यांत उपाहारगृहाच्या मालकानें एक पत्र त्याच्या हातीं दिलें. त्यांत आपला पत्ता देऊन बऱ्याच मोठ्या मालाची मागणीहि बिस्मार्क यांनीं केली होती. पत्र वाच-तांच त्या एजंटाचा चेहरा खुलला, हें सांगावयास नकोच.

बिस्मार्कच्या वागणुकीसंबंधीं भयंकर आणि विलक्षण गोष्टी जिकडे तिकडे पसरूं लागल्या. बिस्मार्क यांची वागणुक हा लोकांच्या चर्चेचाच एक विषय होऊन बसला. एके वेळीं बिस्मार्क आपल्या एका स्नेह्यास भेटावयास गेले. त्यांचा तो स्नेही त्या वेळीं गाढ झोंपेंत होता. आपला स्नेही लवकर उठत नाहींसें पाहून बिस्मार्क यांनीं भरलेलें पिस्तुल त्या-च्या कानाजवळ उडविलें. दुसऱ्या एका वेळीं केसेल नांवाच्या आपल्या आप्ताच्या दिवाणखान्यांत चार कोल्हे त्यांनीं हळूच सोडून दिले. ते प्राणी घाबरून इकडे तिकडे पळत सुटले. दिवाणखान्यांत काय गडबड आहे, हें पाहण्याकरितां मालक व एकदोन नोकर दिवाणखान्यांत आले, तेव्हां ते कोल्हे अधिकच घाबरून टेबलांवरून व खुर्च्यांवरून धांवूं लागले. अर्थात् टेबलांवरील सर्व कांचेचीं भांडीं पडून त्यांचा चूर झाला.

बिस्मार्क यांची अशा प्रकारची वागणुक पाहून गांवांतलीं ह्मातारीं माणसें त्यांना शिव्याशाप देऊं लागलीं व 'वेडा बिस्मार्क' ह्मणूं लागलीं, यांत नवल नाहीं. बिस्मार्क हिंदुस्थानांत जाणार, आफ्रिकेंत जाणार, असल्या प्रकारच्या गप्पा लोकांत उठूं लागल्या. बिस्मार्कबद्दल कोणी कितीहि विलक्षण बातमी सांगितली, तरी ती लोकांस खोटी वाटेनाशी झाली.

तथापि बिस्मार्क यांचा हा क्रम हळूहळू बदलत चालला. लोकांच्या दृष्टीनें ते सुधारत चालले. मारीट्झ, ब्लॉंकनबर्ग, डेविझ, फॉं बुलो वगैरे आपल्या स्नेह्यांबरोबर ते राजकीय विषयावर चर्चा करीत असत. त्या वेळीं त्यांचीं राजकीय मतें फार जहाल असत. विश्वविद्यालयांतील त्यांचा शिक्षणक्रम आणि त्यानंतर झालेली त्यांची वागणुक यामुळें त्यांचीं मतें जहाल बनलीं, यांत कांहीं नवल नाहीं. राजकीय विषयासंबंधीं तेव्हांची सामान्य जर्मन जनता फारशी चर्चा करीत नसे. राजा करील तें कारण आणि बांधील तें तोरण असा प्रकार त्या वेळीं जर्मनींत होता. राजा आणि त्याचे प्रधान यांच्या कर्तृत्वावर लोकांचा पूर्ण भरंवसा होता. प्रशियन जनतेस जें शिक्षण त्या वेळीं दिलें जात असे, त्याचें धोरण प्रजेंत आज्ञाधारकता आणि शिस्त हे गुण उत्पन्न करणें एवढेंच होतें. बुद्धिमान् आणि कर्तृत्वशाली राजे आणि प्रधान यांच्या अमलांत या दोन गुणांचा उपयोग कसा उत्तम प्रकारें झाला होता, हें लोकांच्या नजरेस अनेक वार आलेंच होतें. यामुळें राजघराण्यावर त्यांचा स्वाभाविकच विश्वास बसला. सरकार करीत असलेल्या गोष्टीसंबंधीं चर्चा करण्याचें कांहीं कारण आहे, असें लोकांच्या मनांत सुद्धां येत नसे. यामुळें असल्या विषयांची चर्चा बिस्मार्क जेव्हां करूं लागले, तेव्हां लोकांना अधिकच नवल वाटलें. बिस्मार्क घराणें जमीनदार वर्गांतलें आणि सारा जमीनदार वर्ग राजाचा अंकित. राजाचा हुकम होण्याब-

रोबर रिकिबींत पाय ठेवणें एवढेंच आपलें कर्तव्य असें जमीनदार वर्गास वाटे. तो हुकूम बरा कीं वाईट हें ठरविण्याचें आपलें कामच नव्हे, असें ते ह्मणत. अशा स्थितींत प्रधानांनीं केलेल्या राजकारणांसंबंधीं बिस्मार्क जेव्हां उघड चर्चा करूं लागले, तेव्हां सारा जमीनदार वर्ग त्यांजविरुद्ध बिथरून जावा यांत नवल नाहीं. बिस्मार्क यांच्या या वागणुकीचें पर्यवसान कोठें होणार, याचा अजमास कोणासहि लागेना.

एकाद्या मुलकी अथवा राजकारणी खात्यांत बिस्मार्क यांनीं नौकरी करावी अशी त्यांच्या स्नेह्यांची व बंधूचीहि इच्छा होती. राजकीय विषयांत बिस्मार्कची बुद्धि तरतरीत आहे, असें त्यांस वाटे. स्नेह्यांचें व बंधूचें हें म्हणणें बिस्मार्क यांसहि पटलें. ऑफीसचें काम त्यांना प्रिय होतें असें नाहीं, तथापि चालू आयुष्यक्रमाचा त्यांस इतका कंटाळा आला होता कीं, अशा रीतीनें माशा मारीत बसण्यापेक्षां ऑफिसच्या कंटाळवाण्या कामाचें जूंसुद्धां त्यांस बरें वाटूं लागलें. खरडेघाशीच्या धंद्यांत इतक्या लोकांना जर सुख वाटतें, तर तेंच सुख आपल्याहि वांट्यास पुढेंमागें येईल अशी त्यांस आशा वाटे. म्याचिव्हेली, स्पायनोझा, बायरन, वगैरे ग्रंथकारांच्या कृतींत त्यांचें मन रमेनासें झालें.

नौकरींत शिरण्याचा निश्चय बिस्मार्क यांनीं केला खरा; तथापि त्यांच्या चित्ताची उदासीनता जाईना. नीपॉफ येथें आजपर्यंत घालविलेला आयुष्यक्रम सोडून देणें त्यांच्या जिवावर येऊं लागलें. पक्षाप्रमाणें रानावनांत स्वतंत्रपणें फिरणें स्वभावतः त्यांस फार प्रिय होतें. मध्यंतरीं इंग्लंड, स्विट्झरलंड व फ्रान्स या देशांत ते प्रवास करूनहि आले होते. या वेळीं मनुष्यस्वभावाचें ज्ञान त्यांनीं चांगलें करून घेतलें होतें. निरनिराळ्या देशांतील लोकांची सामाजिक आणि राजकीय परिस्थिति कोणत्या प्रकारची

आहे याचेंहि ज्ञान त्यांस चांगल्या प्रकारें होऊन त्यांच्या मनाला प्रगल्भता आली होती. कांहीं तरी विशेष कर्तबगारी करावी, ही त्यांची पूर्ववयांतील महत्वाकांक्षा या प्रवासामुळें अधिकच बळावली होती. अशा स्थितींत सामान्य खरडेघांशीचें काम करणें, त्यांच्या जिवावर आलें. एकाद्या क्षुद्रबुद्धि अम्मलदाराच्या चुकीसहि मान डोलावणें आपणास भाग पडणार, याचें त्यांस वाईट वाटूं लागलें. त्यांची वृत्ति स्वतंत्रबाण्याची. तिला असला करडा अम्मल कसा खपावा; तथापि आपले हे सारे विचार बाजूस ठेवून पॉटस्ड्याम येथील एका ऑफिसांत ते पुन्हां रुजू झाले. तेथें जाऊन थोडे दिवस होतात न होतात, तोंच 'मूळ स्वभाव जाईना' या उक्तीचें सत्यत्व लोकांस दिसूं लागलें. थोडेंसें कारण घडतांच बिस्मार्क यांचा स्वतंत्रबाणा उसळून बाहेर पडे. आपल्या वरिष्ठाची चूक स्पष्ट-पणें त्यांच्या तोंडावर सांगण्यास ते कमी करीत नसत. यामुळें कित्येक वेळां वरिष्ठांशीं खडाजंगीचे प्रसंग येऊन उभयतांचीं मनें एकमेकांबद्दल कलुषित होऊन जात. एके प्रसंगीं ते आपल्या वरिष्ठांस ह्मणाले, " ऑफिसांत तुह्मी माझे वरिष्ठ असलां, तरी फॉं बिस्मार्क आणि फॉं तुह्मी यांचा सामाजिक दर्जा एकच आहे. " दुसऱ्या एका प्रसंगीं कांहीं कामानिमित्त ते आपल्या वरिष्ठांच्या खोलींत गेले. त्यांजकडे मुद्दाम दुर्लक्ष करून वरिष्ठसाहेब खुर्चीच्या मागील तावदानावर टिच-क्या वाजवीत राहिले. तेव्हां बिस्मार्क यांस राग येऊन वरिष्ठाची खोड मोडण्याचा निश्चय त्यांनीं केला. ते दुसऱ्या एका खिडकीपाशीं गेले आणि तिच्या तावदानावर पलटणीच्या पडघमप्रमाणें एका लष्करी गीताचा ताल वाजवूं लागले. या त्यांच्या अपराधाबद्दल त्यांच्या वरिष्ठानें आणखी एक तास त्यांची भेट घेण्याचें नाकारलें. एका तासानें वरि-ष्ठांनीं त्यांस आपल्यासमोर बोलावून ह्मटलें, " काय काम आहे ? "

बिस्मार्क यांनीं उत्तर दिलें, " थोड्या दिवसांची रजा मागण्यासाठीं मी आलों होतों; पण आतां राजीनामा सादर करण्यासाठीं आलों आहें. "

अशा रीतीनें इ. स. १८४४ च्या प्रारंभीं बिस्मार्क यांच्या राजकीय खात्यांतील नौकरीची इतिश्री झाली. सरकारी खात्यांतील वरिष्ठ अम्मलदार निव्वळ जुलमी आहेत, असें ह्मणून आपल्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ स्वतःचेंच उदाहरण ते लोकांना दाखवूं लागले.

नीपॉफ येथें परत येऊन पूर्वीचा कंटाळवाणा आयुष्यक्रम पुन्हा चालू करण्याशिवाय दुसरें गत्यंतर बिस्मार्क यांस उरलें नव्हतें. त्यांची कर्तृत्वशक्ति दांडगी आणि मेहनत करण्याची इच्छाहि प्रबळ; पण या गुणांचें चीज होण्याजोगी परिस्थितीच त्यांस प्राप्त होईना. या वेळीं त्यांचे वडील बंधु बर्नार्ड–बिस्मार्क यांस सरकारी कामगिरी मिळून दक्षिण युरोपांत जाणें भाग झालें. तेव्हां ते परत येईपर्यंत त्यांच्या इस्टेटीची व्यवस्था पाहण्याचें बिस्मार्क यांनीं कबूल केलें.

बिस्मार्क यांस मालविन या नांवांची एक बहीण होती. तिच्यावर त्यांचें फार प्रेम असे. या वेळीं साऱ्या विश्वासाचें काय तें हेंच एक ठिकाण त्यांना होतें. बिस्मार्क यांचे वडील आणि मालवीन हीं शॉन हॉसन गांवीं रहात असत. आपल्या स्वतःबद्दलच्या तपशीलवार हकिकतीचीं पत्रें ते आपल्या बहिणीला लिहीत असत. त्यांचें चित्त या वेळीं अगदीं उदासवाणें झालें होतें; तथापि त्यांच्या मूळच्या आनंदी स्वभावाची छटा या वेळच्या पत्रांतहि दिसून येते. आपल्या आशा आणि आकांक्षा काय आहेत, हें या पत्रांत त्यांनीं कळविलेलें दिसतें. इ. स. १८४४ च्या २७ जूनला त्यांनीं मालवीनच्या वाढदिवसानिमित्त तिला एक पत्र लिहिलें. तें असें—

" प्रिय मालवीन,

मी कधींहि कोणाला पत्र लिहीत नाहीं. कोणाला पत्र न लिहिण्याची जणूं मीं शपथच घेतली आहे, तथापि तुझ्यासाठीं मी ती शपथ मोडतों. तुझ्या वाढदिवसाला मी स्वतःच आलों असतों; पण येथें काम पाहण्यास आमचे व्हाइसराय नसल्यामुळें मला येववत नाहीं. दुसरें असें कीं, मी तुझ्याचसाठीं आलों, तरी कांहीं आपल्या कामालाच आला असेल, असें तूं ह्मणशील हें मला माहीत आहे. तुझ्या वाढदिवसाला परमेश्वराजवळ तुझ्यासाठीं मीं काय मागावें, हेंच मला समजत नाहीं. कारण तूं आहेस तशीच चांगली आहेस, असें मला वाटतें. या दिवशीं तुझी करमणुक करण्यास तुझ्या दोन भावजया तुझ्याजवळ असत्या, तर मला बरें वाटलें असतें; पण एक आपल्या नवऱ्याबरोबर फिरतीवर आहे, आणि दुसरी कोठें आहे तें मला माहीत नाहीं. कसें तरी करून मी आठ पंधरा दिवसांनीं तिकडे येतों. तोंपर्यंत दिवस मोजित रहा. बाबांना आणि वडील माणसांना माझे नमस्कार सांग.

नीपॉफ २७-४-४४. } बिस्मार्क."

आस्कर फॉं आर्निम या नांवाच्या गृहस्थाशीं मालविन हिचें लग्न ठरलें होतें. आर्निम व बिस्मार्क हे बर्लिन येथील शाळेंत एकत्र शिकत होते; तेव्हापासूनच त्या दोघांचा चांगला स्नेह जमला हाता.

बिस्मार्क यांस सरकारी ठरीव पद्धतीच्या कामकाजाचा किती कंटाळा होता, हें त्यांच्या पुढील पत्रांत दिसून येतें.

" माझ्या छोटया ताई,

लँडव्हर पलटणींत जाण्यासाठीं मी निघालों असून त्यासाठीं बांधाबांध करण्याची माझी अगदीं धांदल उडून गेली आहे. पुढें पत्र लिहिण्यास वेळ मिळेल कीं नाहीं, याची वानवा असल्यामुळें आतांच कशातरी दोन ओळी खरडीत आहें. आमचे म्याजिस्ट्रेट साहेब उडाणटप्पू असल्यामुळें त्यांचें सगळें काम मलाच करावें लागे. बाहेरगांवीं फिरतीवर किती फिरावें लागे, याचा नियमच नाहीं. कितीतरी दिवस माझ्या घोड्याच्या पाठीवरच मला काढावे लागले. लोकांना न्याय देण्याच्या या कामाचा मला आतां पुरा वीट आला आहे. आणि

आतां चार आठ दिवस विश्रांति मिळते न मिळते, तोंच मला शिपायीगिरी करावी लागणार. माझा पहिला घोडा लष्करी नौकरीस निरुयोगी ठरला. पुढें मला नवा घोडा घ्यावा लागला. याशिवाय एकादा घोडा शिलकी ठेवावा लागेल तो वेगळाच. माझ्या धान्याच्या विक्रीचे पैसे आले, ह्मणजे हा दुसरा घोडा मी खरेदी करीन. ( येथें पत्रावर बरेच डाग पडले आहेत. ) ही नवीच लिपी पाहून तुला फार नवल वाटेल; पण काय करूं, पत्राची दुसरी प्रत करण्यास मला आतां वेळ नाहीं. आमचा पहिला मुक्काम स्टारगार्ड जवळ होणार असून दुसरा फिडिचौ आणि बान येथें होणार आहे. आतां सामान बांधण्याची धांदल असल्यामुळें येथेंच पुरें करतों.

तुझा प्रियबंधु—**बिस्मार्क.** "

हें पत्र इ. स. १८४४ च्या जुलई महिन्यांत बहुधा लिहिलेलें असावें. वर सांगितलेली लष्करी नौकरी पुरी झाल्यानंतर उत्तर समुद्रकांठच्या हवा खाण्याच्या ठिकाणीं बिस्मार्क गेले होते. तेथून पुढील पत्र त्यांनीं आपल्या बहिणीला लिहिलें आहे.

नार्डरनी, ९--९--४४.

" प्रियभगिनी,

गेला पंधरवडा तुला पत्र लिहिण्याचा विचार मी करीत आहें; पण कांहीं काम आणि कांहीं चैन यांमुळें मला अवकाशच सांपडला नाहीं. एवढें काम तरी कसलें, ह्मणून तूं ह्मणशील, तर तेंहि मला नीटसें सांगतां येत नाहीं. कारण समुद्राच्या भरती ओहोटी बरोबर त्याचें स्वरूप एकसारखें पालटत असतें. पुरी भरती झाली ह्मणजे मी स्नान करतों. कारण उंच लाटांची मौज तेव्हांच असते. यामुळें सकाळीं सहापासून संध्याकाळीं सहापर्यंत केव्हांतरी माझा स्नानाचा वेळ असतो. यामुळें निरनिराळ्या वेळीं स्नान करण्याच्या मजेचाहि उपभोग घेतां येतो. कधीं पहांटेच्या थंडीचा कडाखा असतो, तर कधीं भर दुपारचें कडक ऊन असतें. याप्रमाणें स्नानाच्या वेळेला धरबंध नसल्यामुळें जेवण्याची वेळहि ठरावीक नसते. जेवण्याच्या वेळीं माझ्या शेजारीं एक ड्यानिश तरुणी बसत असते. तिच्याकडे पाहिल्याबरोबर मला नीपॉफला जावेंसें वाटूं लागतें. किंबहुना नीपॉफला मी आपल्या घरींच बसलों आहें, असें वाटतें. आपल्या हडकुळ्या फेपरचीच ती प्रतिमा आहे. तिला पाहून मला त्याची

आठवण होते आणि मग नीपॉफचा साराच देखावा डोळ्यांपुढें दिसूं लागतो. माझ्या खुर्चीच्या खालींच एक लठ्ठसा कुत्रा बसत असतो. त्या बिचाऱ्याचे पुढचे पाय तुटलेले आहेत. तेव्हां उड्या मारून त्याला खाणें मागतां येत नाहीं. भाकरीचा तुकडा पुढें केला, ह्मणजे पडमाच्या पिशवीसारखें तो आपलें तोंड मात्र उघडतो. माझ्या पलीकडच्या बाजूस एक रशियन लष्करी अम्मलदार बसत असतो. याचा बांधा मोठा चमत्कारिक आहे. कमरेपासून हा वर अधिक उंच असून त्याचे पाय आणि मांड्या आंखूड आहेत.

आतां पुढच्या आगबोटीनें ह्मणजे एक दोन दिवसांतच हेलिगोल्यांडला जाण्याचा माझा विचार आहे. तेथून हॅंबर्गला जाऊन मग शॉनहॉसनला येईन. आतां येथला मोसम संपत आल्यामुळें बहुतेक मंडळी निघून जात आहे. यामुळें मला एकटें एकटेंसें वाटूं लागलें आहे. नाहीं तर आणखी कांहीं दिवस येथें मी राहिलों असतों. किनाऱ्याला खडक अगदीं नसून नरम वाळूचें मोठें पटांगण पसरलें आहे. उंच उंच लाटा आल्या म्हणजे त्यांच्या सपाट्यांत दहा-दहा गोलांट्या खाव्या लागतात. अशा रीतीनें स्नान करण्यांत मला मोठी गम्मत वाटते. सायंकाळच्या वेळीं बोटींत बसून मी फिरावयासहि जातों. सुमारें पंधरवड्यापूर्वी येथें एक मोठें तुफान होऊन बारीक बारीक पुष्कळ जहाजांस जलसमाधी मिळाली. पुढें कित्येक दिवसपर्यंत फुटकीं पिंपें, भांडींकुंडीं, कपडे, कागद आणि कांहीं प्रेतेंसुद्धां किनाऱ्यास लागत. वादळांतला प्रवास कसा असतो, याचा थोडासा अनुभव मलाहि आला. एके दिवशीं शेजारच्या एका बेटावर मी मौजेनें फिरावयास गेलों होतों, परत येतांना आमची होडी वादळांत सांपडली आणि चोवीस तासपर्यंत आह्मी समुद्राच्या पाठीवर मोठमोठे हेलकावे खात होतों. होडींत बसून तासभर होतो न होतो तोंच मोठ्या लाटा उठूं लागून माझ्यां अंगांतले कपडे भिजून चिंब झाले. फराळाचें सामान बरोबर होतें म्हणून बरें, नाहीं तर भुकेनें मीं अर्धमेला झालों असतों. बाबांना नमस्कार.

तुझा प्रियबंधु---**बिस्मार्क.** ”

आस्कर फॉं आर्निम यांशीं मालविनचा विवाह होऊन ती लवकरच अॅंगरसुंड गांवीं रहावयास गेली. आर्निम यांस तेथें म्याजिस्ट्रेटची नौकरी होती. मालविन आपल्या नवऱ्याकडे गेल्यानंतर बिस्मार्क शॉनहॉसन

गांवीं आपल्या वडिलांबरोबर राहूं लागले. येथून मालविनला त्यांनीं पुढील पत्र लिहिलें आहे.

"तूं निघून गेल्यानंतर आपलें घर अगदीं ओकेंओकें दिसूं लागलें. तुम्ही मुली खरोखर किती अप्पलपोट्या ? आपल्या भावांना मागें टाकून तुम्हीं खुशाल चालत्या होतां. असो; आतां असा विचार करण्यांत कांहीं फायदा नाहीं. यंदां मी निवडणुकीसाठीं उभा राहिलों होतों; पण इतरांना पुष्कळशीं मतें आधींच मिळाल्यामुळें मी हा नाद सोडून दिला. सध्यांतरी बाबांच्याच कडे राहण्याचा माझा विचार आहे. खाणेंपिणें आणि तंबाखू ओढणें यांखेरीज मला उद्योग नाहीं. कधीं शिकारीचा फार्स बाबा करितात आणि त्यांस मीही मदत करतों. वारा सुटला आहे, आणि बर्फ पडत आहे, अशा वेळीं आमच्या स्वाऱ्या बंदुका खांद्यावर टाकून बाहेर पडतात. जनावरांनीं बिचकूं नये, ह्मणून मोठया सावधगिरीनें आह्मी पावलें टाकीत असतों;पण काटक्या वेचणाऱ्या बायकांशिवाय दुसरें कोणतेंहि सावज आढळत नाहीं. मग आमचे फासे पारधी दोन कुत्रे बरोबर घेऊन रान उठविण्यास जातात. 'हू, ला, ला, हे हा, हा,' असल्या आरोळ्यांनीं सारें रान दुमदुमून जातें. बाबा मला हळूच विचारतात, 'कारे, कांहीं दिसलें काय ?' मीहि त्यांना 'नाहीं' असें उत्तर देतों. कांहीं सांपडावयाचें नाहीं, अशी माझी अगाऊच खात्री असते. तथापि सावज न दिसल्याबद्दल मला साधेल तितकें आश्चर्य मी आपल्या चेहऱ्यावर दाखवितों. मग वाऱ्याला आणि बर्फाला शिव्या देत देत आम्ही दुसऱ्या जंगलांत जातों. अशा रीतीनें दमून शिकारीची इच्छा नाहींशी झाली, म्हणजे आम्ही घरीं परत येतों.

एल्ब नदी अगदीं बर्फमय होऊन गेली आहे. तूं नसल्यामुळें बाबांना अगदीं चुकल्याचुकल्याखारखें होतें. याकरतां वारंवार पत्र लिहून स्वतःबद्दलची सारी माहिती तूं त्यांना देत जा. तुझे नोकरचाकर नीट वागतात कीं नाहीं, घराचीं दारें उघडझांक करतांना आरडाओरड करतात कीं नाहीं, फुटक्या खिडक्यांतून दंव घरांत येतें कीं नाहीं, इत्यादि सगळ्या गोष्टी त्यांना तूं लिहीत जा. बाबांनीं तुला आशीर्वाद सांगितले आहेत. आतां मी लवकरच येथून जाईन ह्मणतों. आस्करला नमस्कार.

तुझा भाऊ--**बिस्मार्क.**"

हें पत्र इ. स. १८४४ च्या अखेरीस बहुधां लिहिलें असावें. या नंतर बिस्मार्क यांची नेमणूक नागार्ड गांवीं म्याजिस्ट्रेटच्या जागेवर झाली. त्या सर्व तालुक्याचें काम त्यांच्याकडे असून त्यांनीं आपली सदर कचेरी नीपॉफ गांवींच ठेवली होती. मधून मधून तेथूनच ते फिरतीवर जात. नीपॉफ येथून पुढील पत्र त्यांनीं ९ एप्रिल सन१८४५ रोजीं लिहिलें आहे.

" बाईसाहेब,

सध्यां शेतकीची जी दुर्दशा झाली आहे, ती कळवितां येत नाहीं. रात्रभर पातळ बर्फ पडत असतें. गुरेंढोरें अजारी पडलीं आहेत. बकरीं किती तरी मेलीं. चाऱ्याचा दुष्काळ पडला. बटाटयाचें पीक चांगलेंसें नाहीं. खत मिळेनासें झालें आणि माझ्याजवळ पैसाहि नाहीं. असल्या रडकथा तुह्माला काय सांगाव्या ? तशांतून बदसुरी लावण्यांचे हेल काढून जॉन माझें डोकें उठवितो. बिचाऱ्याची तेवढी करमणूक बंद करण्याचा निष्ठुरपणा मला करवत नाहीं. तो आपल्या लग्नाच्या खटपटींत होता, पण मुलीच्या आईबापांनीं नकार दिल्यामुळें त्याचा सर्व बेत जागच्या जागींच राहिला. या आपल्या दुःखाला, विरजण घालण्यासाठीं बेसूर लावण्या तो गात असतो. मलासुद्धां आतां लग्न करावेंसें वाटूं लागलें आहे. एकटें राहण्याचा मला आतां अगदीं कंटाळा आला. असल्या त्रासाला कंटाळून मला अखेरीस लग्न करावें लागणार हें खरें. गांवचे लोकहि लग्न कर ह्मणून माझ्या पाठीस लागतात. कित्येक मुली येथें मीं पाहिल्या आणि त्यांच्या संभाषणापासून मला त्रास होत असतांहि तो मी किती शांततेनें सहन केला, हें बाबांनीं तुला सांगितलें असेलच.

अँगरसुंडहून नीपॉफ येथें येत असतां वाटेंत झांपल नदीला पूर आल्यामुळें अर्ध्या वाटेंतच मला मुक्काम करावा लागला. बरोबर घोडा असता तर पुरांतूनहि मी पलीकडे गेलों असतों. पण नागार्ड गांवचा कोणीहि मनुष्य मला आपला घोडा देण्यास तयार होईना. तेव्हां आणखी बऱ्याच उतारूंबरोबर ती रात्र मला तेथेंच काढावी लागली. रात्रींच्या वेळीं पूर आणखी वाढला. झांपल नदीवरचे दोन्हीहि पूल वाहून गेले. म्याजिस्ट्रेट नोबल डॉर्फ माझ्याबरोबरच होता. आह्मी म्याजिस्ट्रेट ह्मणजे आमच्या प्रांताचे राजेच. त्या रात्रीं आम्हा

दोघां राजांना त्या ओसाड जागेंत राहण्याची वेळ आली. सकाळीं पाणी थोडें उतरलें; तथापि प्रवाहाचा जोर तसाच राहिला. दोन पिपें आंत असलेला एक खटारा नदींतून पलीकडे जात असतां वाहून जाऊन गाडी हांकणारा आणि एक घोडा यांना जलसमाधी मिळाली. गालनो गांवांत कितीतरी घरें जमीनदोस्त झालीं.तुरुंगांतल्या एका कैद्यानें रात्रीं आत्महत्या केली. चाऱ्याच्या दुष्काळास त्रासून माझ्या शेजाऱ्यानें डोक्यांत पिस्तुल उडवून घेतलें. एकंदरीनें काळ मोठा चमत्कारिक आला. यंदाचें साल आह्मा शेतकऱ्यांवर चांगलाच वरवंटा फिरविणार असें दिसतें. पीक अगदीं कमी. धान्याला भाव नाहीं आणि थंडी अजूनसुद्धां मी ह्मणते.

बर्नांड उद्यां येऊन आपल्या कामाचा चार्ज घेईल असें वाटतें. तसें झालें तर या नौकरीच्या त्रासांतून तरी मी सुटेन. नौकरींतून मोकळा झाल्यावर मी तुझ्या गांवीं येईन ह्मणतों. आस्कर साहेबांनीं नाहीं ह्मटलें, तर मात्र नाइलाज आहे. नमस्कार बाईसाहेब.

नीपॉफ, ९--४--४५. **बिस्मार्क.** ”

या नंतर याच महिन्यांत आणखी एक पत्र त्यांनीं आपल्या बहिणीला लिहिलें आहे.

“ प्रियभगिनी,

तुझ्या चाव्यांपैकीं एकहि माझ्या जवळ नाहीं. एकादी चावी नाहींशी झाली, ह्मणजे तिला न सांपडण्याची खोड असते, हें मला माहीत आहे. ती शोधीत बसण्याच्या भरीस केव्हांहि पडूं नये. नवें कुलूप करावें हा उत्तम मार्ग. आतां झोंप येऊं लागल्यामुळें माझ्यानें अधिक लिहवत नाहीं. दिवसभर मी इकडे तिकडे भटकत असतों. काल रात्रीं एका नाचाला गेलों होतों. तेथें द्राक्षासवहि थोडा अधिक झाला. नाचून नाचून पायाला पेटके येऊं लागले आणि द्राक्षासवानें पोटांत ढवळूं लागलें. तशांत पडजीभ लांबली असल्यामुळें अन्न गिळण्याचीहि मुष्कील झाली आहे. डोकें एकसारखें दुखतें. बाहेरच्या बाजूस बांधलेला शिकारी कुत्रा एकसारख्या वेडयावांकडया किंचाळ्या फोडतो आहे. त्याला रात्रीचा मोकळा सोडला, तर तो लोकांच्या आवारांत शिरून बकऱ्या मेंढयांची शिकार करतो. आणि बांधून ठेवला, तर ओरडून मला झोंप येऊं देत नाहीं

आणखी एक दोन दिवसांत आणखी एका नाचाला मी जाणार आहें. ११ वाजले. आतां गुपचीप नीज कशी पाहूं.

२७-४-४५. बिस्मार्क."

तारीख २२ नोवेंबर सन १८४५ रोजीं बिस्मार्क यांचे वडील वारले. या सालच्या उन्हाळ्यांत नीपॉफ गांवीं आपल्यां धाकट्या मुलाबरोबर ते बरेच दिवस राहिले होते. या सालीं पाऊस फार पडल्यामुळें शॉनहॉसन गांवीं आणि आजुबाजूच्या प्रांतांतहि फार नासाडी झाली होती. एल्ब नदीला महापूर येऊन कांठाचीं कित्येक धरणें फुटलीं. नदी कांठचे मोठमोठाले वृक्ष उन्मळून पडले. शॉनहॉसन गांवची फार्डिनंड यांची बागहि बरीच मोडून गेली. ईडलिंबाचीं जुनीं झाडें मोडून पडलीं. शॉनहॉसन गांवीं फर्डिनंड परत आले, तेव्हां बागेची ही दशा पाहून ते आपल्या कारभाऱ्याला म्हणाले,'जुनीं झाडें गेलीं आणि माझीहि आतां वेळ आली.' गेल्या बरेच दिवसांपासून फर्डिनंड यांची प्रकृति ढांसळत होती. अखेरीस त्यांस बिछाना धरावा लागला. वडील बरेच आजारी आहेत, असें कळल्याबरोबर ऑटो बिस्मार्क तांतडीनें शॉनहॉसन गांवीं गेले. ते पोहोंचले त्याच दिवशीं त्यांचे वडील परलोकवासी झाले. अखेरची मांडी देण्यास ऑटो जवळ होते, इतकेंच.

शॉनहॉसन गांवची इस्टेट ऑटो यांस मिळाली. यानंतर त्याच गांवीं त्यांनीं आपलें कायमचें ठाणें केलें. या पुढील बरेच महिने तेथील इस्टेटीची व्यवस्था लावण्यास व गांवच्या लोकांच्या ओळखीपाळखी करण्यांत निघून गेले.

एल्ब नदीच्या कांठीं बांधलेल्या बंधाऱ्यावर देखरेख करण्याचें काम इ.स.१८४६च्या उन्हाळ्यांत त्यांना मिळालें. याशिवाय सॅक्सनी प्रांताच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे



प्रिन्स विस्मार्क

प्रांतिक कमेटींत प्रतिनिधि या नात्यानेंहि ते निवडून आले. या कमेटीची बैठक मर्सबर्ग या गांवीं भरत असे. जेरिचौ जिल्ह्याच्या सरदार मंडळीतर्फे त्यांची निवडणूक झाली होती. या कमेटींत कोणाच्याहि हाताखालीं त्यांस काम करावें लागत नसल्यामुळें त्यांच्या बुद्धिस्वातंत्र्याच्या विकासास अवकाश मिळाला. कमेटीच्या बैठकीच्या कामांत आणि बंधाऱ्याच्या देखरेखींत त्यांचा बराच वेळ जाऊं लागला. या सालींहि मोठें वादळ होऊन त्यांच्या पिकाची भयंकर नासाडी झाली. यासंबंधाची हकीकत त्यांनीं पुढील पत्रांत आपल्या बहिणीस कळविली आहे.

"आर्निम बाईसाहेब,

मला गेल्या थोड्या दिवसांत इतकीं पत्रें लिहावीं लागलीं कीं, माझ्याजवळ पत्र लिहिण्यास आतां कागद उरला नाहीं. आज माझ्याजवळ एकच कागदाचा तुकडा असून त्यावरहि कॉफीचे डाग पडले आहेत. तोच आतां तुमच्या वांटणीला आला आहे. सरकारी कामाच्या याद्या आणि तपशील तयार करण्याचें कंटाळवाणें काम मला सध्यां करावें लागतें. तशांत हाताखालचीं माणसें वेळेवर आलीं नाहींत, म्हणजे आणखी दुप्पट त्रास होतो. नुकताच गारांचा पाऊस पडून तुफान झालें आणि त्यांत माझें राय धान्याचें सगळें पीक बुडालें. खोकल्यानें तर माझें डोकें उठविलें आहे. हल्लीं मी कसल्याहि प्रकारचें आसव घेत नाहीं आणि थंडी होऊं नये ह्मणून फार जपतों, तरी खोकला अजून जात नाहीं. भुकेबद्दल मात्र हरकत नाहीं, आणि झोंपहि चांगली लागते. मला क्षयरोग झाला आहे कीं काय हें समजत नाहीं. पण लोकांना मी असें ह्मटलें, तर माझ्या लठ्ठपणाकडे पाहून ते नुसते हंसतात. परवांच्या दिवशीं म्याजबर्गला मी जाणार आहें. तेथें एकदोन दिवस राहून नंतर मी तुझ्या गांवीं परत येईन. नवीं पिकें साधारण बरीं दिसतात. पुरामुळें बागेचें फार नुकसान झालें आहे. गेल्या सालीं कांहीं झाडें तर वाहून गेलीं. आणि उरलींसुरलीं झाडें मृत्युपंथास लागलीं आहेत. लिंबांच्या सतरा झाडांचे खराटे झाले आहेत. दुसरींहि कित्येक फळझाडें नाहींशीं झालीं. रानांतहि जिकडे तिकडे उघडेबोडके भाग दिसूं लागले आहेत. जमिनीच्या वरचा मातीचा थर धुवून गेल्यामुळें कित्येक ठिकाणीं तर गवतहि उगवत नाहीं.

तुझा क्षयरोगी भाऊ,

शॉन हॉसन, २२-७-४६. **बिस्मार्क.**

अशा प्रकारच्या बारीकसारीक अडचणी बिस्मार्क यांच्या मागें या वेळीं लागल्या होत्या. त्यांतच आणखी एका मानसिक रोगाची भर पडली. पोमेऱ्यानिया प्रांतांतील रीनफेल्ड गांवच्या एका जहागीरदाराच्या मुलीवर त्यांचें प्रेम जडलें होतें. या जहागीरदाराचें नांव पुटक्यामर असें असून त्याच्या मुलीचें नांव जोहाना असें होतें. या मुलीशीं लग्न करण्याची खटपट ते करीत होते. जोहाना ही वागणुकीनें विनीत व साधीभोळी होती. पेहेरावांत आणि चालण्याबोलण्यांत नटवेपणाचा गंधहि नसून सर्व जुनी पद्धत तिनें कायम ठेवली होती. यामुळें ऑटो बिस्मार्क यांचें चित्त तिजकडे ओढलें. कामांत अथवा वाचनांत त्यांचें चित्त लागेनासें झालें. तिचा ध्यांस विसरून जावा ह्मणून त्यांनीं पूर्वींचा उडाणटप्पूपणाहि कांहीं दिवस करून पाहिला; तथापि यापैकीं कोणत्याहि उपायांचा उपयोग होईना. आपल्या सुखांत कोठें तरी अपुरेपणा आहे, ही त्यांची जाणीव नष्ट होईना. "कौटुंबिक सुखाकडे तुझी ओढ आहे" असें त्यांचे गुरू डॉ. बॉनेल हे त्यांस एकवार ह्मणाले होते. त्यांच्या बोलण्याची आठवण बिस्मार्क यांस आतां वारंवार होऊं लागली. जोहानाचा शांत आणि धिम्मा स्वभाव व परमेश्वरावरील अढळ विश्वास हीं पाहून बिस्मार्क यांचें चित्त तिजकडे एक सारखें ओढ घेऊं लागलें. जोहानाचें लक्षहि बिस्मार्क यांच्या अंतर्गत गुणांकडे ओढूं लागलें. बिस्मार्क हे स्वभावतः निष्काळजी आणि उडाणटप्पू आहेत, असें वरवर पाहणारास वाटे. तथापि त्यांचें अंतःकरण उदार आणि त्यांचे स्वाभाविक गुण बिनमोल होते. सत्याचे ते कट्टे भक्त होते. त्यांची सत्यप्रियता त्यांच्या पुढील साऱ्या आयुष्यांत स्पष्टपणें निदर्शनास आली. इ. स. १८४६ च्या उन्हाळ्यांत ब्ल्यांकनबर्ग कुटुंबाबरोबर हार्ज डोंगरांत हवा खाण्यासाठीं ते गेले होते. या कुटुंबाबरोबर जोहानाहि आली

होती. या प्रवासांत परस्परांच्या प्रेमास आणखी नवी भरती आली. शॉनहॉसनला परत आल्याबरोबर पुटक्यामर यांस एक पत्र लिहून त्यांनीं आपला मनोदय कळविला. हें पत्र वाचून पुटक्यामर यांस विलक्षण नवल वाटलें. वेडा बिस्मार्क आपल्या मुलीला मागणी घालतो, हें पाहून त्यांस अनावर राग आला. " माझ्या डोक्यांत कोणी कुऱ्हाडच घालीत आहे, असें हें पत्र पाहून मला वाटलें. " असें ते लोकांजवळ बोलूं लागले. आपल्या मुलीला हांक मारून तिला त्यांनीं तें पत्र दाखविलें. बिस्मार्कच्या मागणीचा तिरस्कार आपली मुलगी करील, अशी तिच्या वडिलांची पुरी खात्री होती; पण तसें न होतां. तिनें उलट रुकार दिला, हें पाहून पुटक्यामर यांस अत्यंत आश्चर्य वाटलें. ' असल्या वेड्याच्या नादीं लागूं नको, ' असा उपदेश तिची आई देखील तिला करूं लागली. तथापि तिच्या उपदेशाकडे लक्ष न देतां जोहानानें आपला निश्चय कायम ठेवला.

' तुम्ही सध्यां चार दिवस इकडे राहण्यास या. लग्नाचा विचार पुढें करतां येईल. ' अशा अर्थाचें उत्तर पुटक्यामर यांनीं बिस्मार्क यांस पाठविलें. पत्राच्या एकंदर स्वरूपावरून आपला शब्द वांया जात नाहीं, असा अजमास बिस्मार्क यांनीं काढला. इ. स. १८४७ च्या जानेवारी महिन्याच्या १२ तारखेला ते रीनफेल्डला गेले आणि नंतर लौकरच त्यांनीं आपल्या बहिणीला ' सर्व ठीक झालें, ' असें पत्रानें कळविलें.

जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत बिस्मार्क रीनफेल्ड येथें राहिले. ते परत आले, तेव्हां आपल्या प्रवासांतील वादळाचे दिवस संपले, असें त्यांस वाटलें. त्यांचें चित्त शांत आणि प्रसन्न झालें. अंतःकरणांतील संदेह, भीति आणि बावरेपणा हीं नाहींशीं झालीं. इ. स.

१८४७ सालच्या जुलई महिन्याच्या २८ व्या तारखेस जोहानाशीं त्यांचा विवाह होऊन त्यांच्या नव्या मार्गक्रमणास सुरुवात झाली. परिचयानें या दोघांचें प्रेम कमी न होतां, उत्तरोत्तर अधिक वाढत जाऊन तें अखेरपर्यंत टिकलें.

जोहानाबाई पियानो फार उत्तम वाजवीत असत. बिटोव्हन, शूमन, शूबर्ट इत्यादि विख्यात संगीतकारांच्या चीजा त्या फार चांगल्या रीतीनें वाजवीत. बिस्मार्क यांस संगीताची फारशी गोडी नव्हती, तरी पियानोवर जोहानाबाईचा हात फिरूं लागला ह्मणजे, त्यांसहि विलक्षण आनंद होई. शॉनहॉसन गांवीं संध्यासमयीं बागेंत बसून एक दोन चीजा ऐकल्याशिवाय त्यांसहि चैन पडेनासें झालें. जोहानाबाई फार धार्मिक बुद्धीच्या होत्या. त्यांच्या सहवासानें बिस्मार्क यांचेंहि मन धर्मशास्त्रांतील अंतर्गत उदात्त विचारांकडे वळूं लागलें. बाह्य आचार आणि शुष्क धर्मविधि त्यांस अगोदरच अप्रिय होते. यामुळें तत्त्वविचारांकडेहि त्यांचें दुर्लक्ष झालें होतें. पण धार्मिक पत्नीच्या सहवासानें तत्वविचारांकडे त्यांचें मन ओढलें. बाह्य आचार आणि शुष्क विधि यांचें विलक्षण प्राबल्य या वेळीं प्रशियांत झालें होतें. त्या वेळचा प्रशियाचा राजा चवथा फ्रेड्रिक वुइलियम हा ह्या बाह्य विधींचा कट्टा भक्त होता.

राजा बोले आणि दळ हाले, या ह्मणीला अनुसरून सरदारदरकदार आणि गांवांतील इतर शिष्ट लोक हेहि धार्मिक बाबींत फ्रेड्रिक वुइलियमचें अनुकरण करूं लागले. राष्ट्रांतील विचारवंत मनुष्यांवर आपल्या वागणुकीचा परिणाम काय होतो, हें पाहण्याचें कारण या शिष्टांस कधींच नसतें. सरदारांच्या आणि शिष्टांच्या अशाप्रकारच्या वागणुकीचीं हजारों उदाहरणें इतिहासांतरीं दिसून येण्याजोगीं आहेत. जुना राजा जाऊन त्याच्या जागीं नवा आला आणि त्यानें आणखी

एकादी नवी टूम काढली, तर हे लोक आपलें तोंड फिरवून तिचेंहि अनुकरण करूं लागतात. असल्या प्रकारच्या परिस्थितींत बिस्मार्क मात्र अगदीं स्वतंत्रपणें वागत होते. धर्माचीं जीं तत्वें त्यांना मान्य झालीं होतीं, त्यांचें ग्रहण त्यांनीं बुद्धिपूर्वक केलें असल्यामुळें त्या तत्त्वांस ते अखेरपर्यंत चिकटून राहिले. केवळ मोठ्या लोकांच्या नादीं लागून ते तत्वविमुख झाले नाहींत.

विवाह झाल्याबरोबर आपल्या नववधूस बरोबर घेऊन ड्रेसडेन, प्रेग, व्हिएन्ना, साल्सबर्ग इत्यादि गांवीं बिस्मार्क यांनीं प्रवास केला. परत येतांना इटली आणि स्विट्झरलंड या देशांतहि त्यांनीं प्रवास केला. इ. स. १८५२ सालीं सरकारी कामानिमित्त ते व्हिएन्नाला गेले होते, तेव्हां तेथून आपल्या पत्नीला लिहिलेल्या एका पत्रांत ते ह्मणतात, "इ. स. १८४७ सालीं आपण बरोबर या शहरीं आलों होतों, तेव्हां येथें मला जी मौज वाटली, ती आतां वाटत नाहीं. पूर्वपरिचित ठिकाणें पाहून आपल्या त्या दिवसांची आवठण मला होते आणि त्यामुळें जी कांहीं मौज वाटते तेवढीच. बाकी आतां हें शहर मला अगदीं शुष्क वाटूं लागलें आहे."

इ. स. १८४७ च्या प्रवासांत बिस्मार्क व्हेनिस येथें गेले असतां राजे फ्रेड्रिक वुइलियम यांशीं त्यांची मुलाखत झाली. यापूर्वीं कांहीं दिवस प्रशियाच्या संयुक्त पार्लमेंटांत बिस्मार्क यांनीं राजाची तरफदारी करणारें एक जोरदार भाषण केलें होतें. हें भाषण फ्रेड्रिक वुइलियम यांच्या चांगलें लक्षांत राहिलें होतें. यामुळें व्हेनिस शहरीं त्यांची गांठ पडली, तेव्हां राजेसाहेबांनीं बिस्मार्क यांस आपल्या पंक्तीचा लाभ दिला. भोजनाच्या वेळीं त्या वेळच्या राजकीय परिस्थितीचा उल्लेख होऊन त्यांत जर्मनीबद्दलहि

सहजच बोलणें निघालें. त्या वेळीं बिस्मार्क यांचीं स्पष्ट आणि जोरदार मतें ऐकून राजेसाहेबांच्या मनावर बिस्मार्क यांच्या कर्तृत्वशक्तीबद्दल चांगला ग्रह झाला. आणि बिस्मार्कसारख्या कर्तृत्वशाली आणि विशाल बुद्धीच्या मनुष्याचा उपयोग राजकारणांत करून घेण्याचा निश्चय राजेसाहेबांनीं केला.

राजेसाहेबांकडे मेजवानीस ते गेले परंतु त्या प्रसंगाला साजेल अशा प्रकारचा पोषाक बिस्मार्क यांजपाशीं नव्हता. तेव्हां घटकाभर त्यांनीं एक पोशाक उसना आणला. तो त्यांच्या अंगाला बरोबर बसत नव्हता. यामुळें बिस्मार्क यांचें चित्त थोडेंसें अस्वस्थ झालें होतें; तथापि तो सारा प्रसंग मनाप्रमाणें पार पडला, हें पाहून बिस्मार्क यांस संतोष झाला.

आपला प्रवास संपवून बिस्मार्क आपल्या पत्नीसह शॉनहॉसन गांवीं परत आले. आपली पत्नी स्वभावानें आनंदी आणि समाधानवृत्तीची आहे, असें त्यांच्या अनुभवास येऊन त्यांना फार संतोष वाटला. राजकारणांत जी दगदग त्यांच्या भावी आयुष्यांत त्यांस झाली, तिचें परिमार्जन घरीं होत असे. आपल्या सर्व स्नेही मंडळीपाशींहि आपल्या पत्नीचे गुण ते नित्य गात असत. बिस्मार्क यांची ही व्याज स्तुति होती, असें नाहीं, तर त्यांची पत्नी खरोखरच तशी गुणवती होती. बिस्मार्क यांचे परम स्नेही मोटले आपल्या एका पत्रांत ह्मणतात, ‘ ती किती तरी दयाळु अंतःकरणाची आणि आनंदी आहे, ह्मणून सांगूं ! खरोखर ती फारच सात्विक स्त्री आहे. बिस्मार्क अद्यापिहि अगदीं पूर्वीसारखाच माझ्याशीं वागतो. मी असलों, म्हणजे जणूं काय आपण पूर्वींच्या विद्यार्थिदशेंतच आहों, असें त्याला वाटतें. यामुळें माझें राहणें जोहा-

नावांईच्याहि पसंतीस उतरतें. या जोडप्याचें परस्परांवरहि अत्यंत प्रेम आहे.'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

---

प्रकरण सहावें.

## राजकारणांत प्रवेश.

चवथ्या फ्रेड्रिक वुइलियमच्या अमदानीच्या आरंभींच्या कांहीं वर्षांत प्रशियाच्या राजकीय परिस्थितींत बरीच बदलाबदल झाली होती. जर्मन संस्थानांचें एकीकरण होऊन त्यांचें एक बलाढ्य साम्राज्य बनावें, अशी जी इच्छा लोकांच्या मनांत इ. स. १८१९ सालापासून प्रादुर्भूत झाली होती, ती आतां पूर्ण बळावून या ध्येयाच्या साद्ध्याकरितां सर्व तट एक चित्तानें झटण्यास तयार झाले होते. आस्ट्रिया आणि प्रशिया यांनीं परस्परांच्या संमतीनें इ. स. १८१९ सालीं कार्ल्सबाद येथें एक कायदा पास केला होता. लोकांत उत्पन्न झालेली साम्राज्याची महत्वाकांक्षा दाबून टाकण्याचा या कायद्याचा हेतु होता. साम्राज्य विषयक कोणी चर्चा केली, तर असा मनुष्य या कायद्यानें शिक्षेला पात्र होत असे. यामुळें सरकार आणि लोक यांत विरोध उत्पन्न झाला. पूर्वींच्या दहावीस वर्षांत झालेल्या युद्धांत प्रशियानें मोठाले जय मिळविले होते. या युद्धांत प्रशियन जनतेनें विलक्षण आत्मत्याग केला होता. युद्धांत मिळालेल्या यशानें सरकार आणि जनता यांत चांगला सलोखा उत्पन्न झाला होता; पण हीं युद्धें संपल्यानंतर जी परिस्थिति उत्पन्न झाली, तिनें या सलोख्यास बरेंच विरजण घातलें. आस्ट्रिया, रशिया, प्रशिया या तिघांनीं 'होली अलायन्स' या नांवाचा एक त्रिकुटसंधि केला होता. या संधीचीं कलमें प्रशियाला अत्यंत बाधक अशीं होतीं. यामुळें प्रशियन राजघराण्याशीं एकनिष्ठेनें राहणाऱ्या मुत्सद्यांचीं मनेंहि

हवालदील झालीं. इ. स. १८२४ च्या एका पत्रांतील पुढील उद्गार मनन करण्यासारखे आहेत. त्यावरून प्रशियाच्या त्या वेळच्या राजकीय परिस्थितीचें चांगलें अनुमान करतां येतें. हे उद्गार असे.

“ इ. स. १८१३ सालीं प्रशियानें जी कर्तबगारी दाखविली व जो असामान्य आत्मयज्ञ केला, त्याचें पर्यवसान अशा प्रकारच्या क्षुद्र राजकीय परिस्थितींत होईल, असें स्वप्न जर त्या वेळीं प्रशियन लोकांस पडलें असतें, तर त्यांनीं एवढा आत्मयज्ञ केला असता कीं नाहीं, याची शंकाच आहे. जर्मनीला चांगले दिवस दिसतील, या आशेनें प्रशियन लोकांनीं रणकुंडांत धडाधड उड्या टाकल्या; पण एवढ्या अट्टाहासाचा परिणाम आज अकरा वर्षांनीं काय झाला आहे पहा! प्रशियासारख्या सव्वा कोट प्रजेच्या लहानशा राष्ट्रानें न भूतो न भविष्यति अशा प्रकारें स्वदेहाच्या आहुत्या रणयज्ञांत दिल्या आहेत. धारातीर्थी पावन झालेल्या या वीरांचें रक्त एक पवित्र कर्तव्य करण्यास आपणास बजावीत आहे. आपण सांडलेलें रक्त वांया जाऊं देऊं नका, असें हे वीर पुरुष आपणास बजावीत आहेत. पण आतां या विषयाकडे कोणाचें लक्षहि नाहीं.”

वरील उद्गारांवरून प्रशियाची राजकीय परिस्थिति फार भयंकर झाली असावी, असें उघड दिसून येतें. हा उतारा युवराज वुइलियम यांच्या पत्रांतील आहे. हेच वुइलियम पुढें पहिले जर्मन बादशाह झाले.

इ. स. १८३० च्या जुलई महिन्यांत प्यारीस मध्यें घडून आलेल्या राज्यक्रान्तीनें जर्मनींतील कांहीं असंतुष्ट प्रजाजनांचीं चित्तें खवळलीं. आस्ट्रियाचे मुख्य प्रधान मेटरनिक हे जर्मनीला आपल्या पायाखालीं पूर्ण दडपावयास पहात होते. व बिथरलेल्या जर्मन लोकांनीं मेटरनिकची सत्ता उलथून पाडण्याचा यत्न चालविला होता. पुढें देशभर लहानसहान बंडेंहि झालीं.

या बंडांस चांगले पुढारी नसल्यामुळें व त्यांचें प्रमाणहि अल्प असल्यामुळें सरकारानें तीं तावडतोब मोडून टाकलीं हें खरें, तथापि एवढ्यामुळें सुद्धां बऱ्याच जर्मनसंस्थानांच्या राज्यव्यवस्थेंत बदलाबदल झाली. जर्मन-संस्थानांचें साम्राज्य बनूं नये, एतदर्थ फ्रेंच लोकांनीं जी गडबड या वेळीं केली, तीमुळें या प्रश्नांत आणखी एका नव्या अडचणीची भर पडली. खुद्द जर्मन संस्थानिकांत अनेक प्रश्नासंबंधीं मतभेद होते. युद्धप्रसंगीं कोणत्या संस्थानानें किती सैन्य द्यावें, या प्रश्नाबद्दल, तसेंच या संस्थानिकांच्या संयुक्त सैन्याचें आधिपत्य कोणाकडे असावें, याबद्दलहि या संस्थानिकांत एकमत नव्हतें. सर्व संस्थानांचें मिळून एक मध्यवर्ती सरकार असावें, याबद्दल तर कोणाच्या चित्तांत कल्पनाहि नव्हती. अशा प्रकारचें संयुक्त सरकार असावें, असे नुसते विचार कोणी प्रदर्शित केले, तर त्याला कायद्यानें शिक्षा होत असे. नेपोलियनचें जूं झुगारून देऊन स्वातंत्र्यप्राप्ति करून घ्यावी या आशेनें प्रशियानें नेपोलियनशीं युद्धें करून जय मिळवूनहि अखेरीस ती त्यांची आशा अशा रीतीनें नष्ट होण्याच्या पंथास लागली.

प्रशियांतील लोकमत थंड पडण्यास आणखी एक कारण होतें. राजे फ्रेड्रिक वुइलियम हे वयातीत झाले होते. तेव्हां त्यांच्या अंतकाळच्या दिवसांत कांहीं गडबड करावी, अशी लोकांची इच्छा नव्हती. इ. स. १८०६ पासून इ. स. १८१५ पर्यंत जो अस्मानी सुलतानीचा काळ गेला, त्यांत या राजाचे सद्गुण लोकांच्या चांगले नजरेस आले होते. त्यांचें धैर्य, लोककल्याणाची त्यांची इच्छा आणि त्यांचें उदार वर्तन, या गुणांमुळें लोकांची भक्ति त्यांच्या ठिकाणीं बसली होती. राज्यक्रांतिकारक मतांचा प्रसार बंद करण्यासाठीं जे कडक कायदे त्यांनीं केले होते, त्यांनींहि त्यांजबद्दल लोकांचीं मनें कलुषित

झालीं नाहींत. कारण खुद्द राज्यालाच अपाय होईल असल्याच प्रकारची चळवळ बंद करण्याचा त्यांचा हेतु होता, हें लोकांस चांगलें ठाऊक होतें. लोककल्याणासाठीं फ्रेड्रिक वुइलियम यांनीं विलक्षण संकटें सोसून कौटुंबिक सुखाचाहि त्याग केला होता; ही गोष्ट लोकांच्या स्मरणांतून गेली नव्हती. राजभक्ति दाखविण्याचा कोणताहि प्रसंग आला, तरी लोक तो वांया जाऊं देत नसत. इ. स. १८२७ सालीं त्यांच्या पायाला इजा होउन ते बरेच दिवस आजारी होते. ते बरे झाले, तेव्हां लोकांनीं आनंद प्रदर्शित करण्याकरतां आपलीं मुलें राजवाड्याकडे पाठविलीं. हजारों मुलें राजेसाहेबांच्या खिडकीखालीं जमलीं आणि ' महाराजांस परमेश्वर शतायु करो ' अशा अर्थाचें गीत त्यांनीं गाईलें. राजेसाहेबांनींहि मुलांस फळें आणि मिठाई वांटली. फ्रेड्रिक वुइलियम या आजारांतून बरे झाल्यानंतर ते प्रथमच नाटकाला गेले, तेव्हां सर्व लोकांनीं प्रचंड जयघोष करून पांचचार मिनिटेंपर्यंत नाटक बंद पाडलें. पुष्कळांच्या डोळ्यांतून त्या वेळीं खरोखरच आनंदाश्रु गळाले.

इतर जर्मन संस्थानांतील प्रजाजन अद्यापिहि असंतुष्ट स्थितींत होते. इ. स. १८३० सालीं झालेल्या दंग्याधोप्यामुळें कांहीं संस्थानांच्या राज्यपद्धतींत थोडीबहुत सुधारणा झाली होती. तरी ती सुधारणा केवळ कागदी होती. पूर्वींचा अनियंत्रित अम्मल तसाच चालू होता. यानंतर इ. स. १८३७ सालीं हनोवरच्या राजानें या कागदी सुधारणाहि नाहींशा करून टाकल्या. राजाचें हें कृत्य दंडेलीचें आहे, अशा प्रकारचें मत गाटेंजन विद्यालयाच्या सात पंडितांनीं प्रदर्शित केल्यावरून त्यांस कारागृहवास भोगावा लागला. हानोवरच्या राजाला मेटरनिक यांचें पूर्ण पाठबळ होतें. जर्मन संस्थानांची खरी एकी घडून येऊं नये,

हीच मेटरनिक यांची इच्छा होती. फ्रेड्रिक वुइलियम यांस हनोवरच्या राजाचें हें कृत्य आवडलें नाहीं; तथापि तो त्यांचा मेव्हणा असल्यामुळें कसल्याहि संकटांत त्याला मदत करणें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांस वाटलें.

जर्मनीची परिस्थिति दिवसेंदिवस अधिक भयंकर होत चालली. जर्मन लोकांत देशाभिमान फार होता; तथापि जर्मनसाम्राज्याची संघटना करण्यासाठीं प्रसंग पडेल, तर दंगेधोपे अथवा राज्यक्रांतीहि घडवून आणावी, असेहि विचार त्यांच्या चित्तांत घोळूं लागले. प्रशिया आणि आस्ट्रिया हे एकमताचे होऊन संस्थानिकांच्या जुलुमाला आळा न घालतां जेव्हां भरच देऊं लागले, तेव्हां जर्मन राष्ट्राच्या भावि कल्याणावर पाणीच पडलें, असें लोकांस वाटूं लागलें. अशा प्रकारें हॅनोवरच्या राजाच्या जुलमी कृत्याला मिळालेल्या प्रशियाच्या व आस्ट्रियाच्या पाठबळाचा असा परिणाम झाला.

जर्मनीची राजकीय परिस्थिति अशा प्रकारची असतां प्रशियाचे राजे तिसरे फ्रेड्रिक वुइलियम हे इ. स. १८४० च्या जून महिन्याच्या ७ व्या तारखेस परलोकवासी झाले. त्यांच्या मागून त्यांचा मुलगा चवथा फ्रेड्रिक वुइलियम हे गादीवर बसले. नवा राजा वागणुकीनें फार चांगला; पण काळवेळ न जाणणारा होता. प्रजेच्या आकांक्षा त्याच्या ध्यानांत आल्या नाहींत. पूर्वकाळचे राजे जसे मन मानेल तसे वागत, तसेंच वागणें राजाच्या इभ्रतीस साजेसें आहे, असें त्यास वाटे. हा राजा फार गोडबोल्या असून लोकांस भरपूर वचनें देण्यास कमी करीत नसे, तथापि प्रत्यक्ष राजकारभारांत तो मेटरनिक याचाच पट्टशिष्य शोभण्यासारखा होता. राजाच्या अशा वागणुकीनें प्रशियाच्या सर्व प्रजा-

जनांत असंतोष उत्पन्न झाला. पूर्वींच्या राजानें प्रांतिक कौन्सिलांची स्थापना केली; तथापि यांच्या बैठकी फारशा कधीं भरत नसत. राज्यकारभारांत लोकांचा हात आपण कधींहि शिरकूं देणार नाहीं, असें नव्या राजानें लोकांच्या लवकरच प्रत्ययास आणून दिलें. पूर्वींच्या अमदानींत वर्तमानपत्रांचा कायदा रद्द झाला असल्यामुळें सर्व पत्रें मोकळेपणीं लोकनियुक्त पार्लमेंटाच्या स्थापनेबद्दल ओरड करूं लागलीं. लोकांच्या या मागणीस राजानें स्पष्टपणें नकार दिला. लोकांतील असंतोष दिवसेंदिवस अधिक वाढत चालला. अमेरिकेंतून आणि स्विट्झरलंडांतून गुप्त हस्तपत्रकें येऊन त्यांचा प्रसार साऱ्या जर्मनींत होऊं लागला. हीं हस्तपत्रकें क्रांतिकारक मजकुरानें भरलेलीं असत. बंडाचा बावटा उभारून सर्व राजांचा आणि सरदार घराण्यांचा व अधिकारी वर्गाचा निःपात करावा, असा उपदेश या पत्रकांतून केलेला असे.

ज्वालाग्राही पदार्थ अशा प्रकारें एकत्र जमले असतां त्यांत लवकरच एक ठिणगी पडली. श्लेश्वीग आणि हॉलस्टीन या दोन जहागिऱ्या जप्त करून त्या आपल्या राज्यास जोडाव्या, असा विचार डेन्मार्कचा राजा ख्रिश्चन याच्या मनांत आला. हें त्याचें कृत्य शुद्ध अन्यायाचें होतें; तथापि न्यायान्याय न पाहतां आपला हेतु तडीस नेण्याचा उद्योग त्यानें आरंभला. राजाच्या या कृत्याला वास्तविक जर्मन संस्थानिकांच्या संघानें आळा घालावयास पाहिजे होता; पण ती गोष्ट या संघाच्या हातून झाली नाहीं. यामुळें जर्मन राष्ट्र फारच खवळलें. जर्मन संस्थानिकांचा संघ न्यायाच्या बाबतींतहि इतका दुर्बळ आहे, हें पाहून जर्मन राष्ट्रास असल्या भेकड संघाचा वीट आला.

या वेळीं लोकनियुक्त राज्यपद्धतीबद्दल बर्लिनमध्यें मोठ्या जोराची चर्चा चालत होती. अशा प्रकारच्या राज्यपद्धतीस राजा अत्यंत प्रतिकूल

होता. लोकनियुक्त पद्धतीच्या ऐवजीं आपण एकादें कायदे करणारें कौन्सिल नेमूं, असें राजा म्हणूं लागला. कायदे करणाऱ्या मंडळाच्या हातांत, प्रत्यक्ष व्यावहारिक सत्ता नसल्यामुळें राजाच्या एकमुखी सत्तेस आळा घालण्याचें सामर्थ्यहि त्यांना अर्थातच नव्हतें. अखेरीस अशा प्रकारचें कौन्सिल तरी असावें, एवढ्या देणगीस लोक कबूल झाले; तथापि हा मार्ग त्या वेळचा युवराज वुइलियम याला पसंत नव्हता. कारण हें नवें कौन्सिल तरी लष्करी बाबतींत करावा लागणारा खर्च मंजूर करील कीं नाहीं, याची त्यास जबर शंका होती. या परिस्थितीसंबंधीं त्यानें पुढीलप्रमाणें आपलें मत प्रगट केलें.

"ही नवी कायदे करणारी असेम्बली अस्तित्वांत आली, ह्मणजे प्रशियाच्या नव्या मनूस सुरवात होईल. या नव्या मनूंत प्रशियाचें पूर्वीचें तेज, पूर्वींचा मान आणि पूर्वींचें महत्व हीं कायम रहावीं इतकीच परमेश्वराजवळ माझी प्रार्थना आहे."

यावरून या नव्या मनूबद्दल युवराजांच्या मनांत किती संशय होता, हें दिसून येण्याजोगें आहे.

ही 'संयुक्त कायदेकारी सभा' इ. स. १८४७ च्या एप्रील महिन्याच्या ११ व्या तारखेस प्रथम भरावी, असा राजाचा हुकूम तारीख ३ फेब्रुआरी रोजीं प्रसिद्ध झाला. या सभेंत दोन विभाग होते. पहिल्या वरिष्ठ विभागांत जहागिरदार आणि जमीनदार यांच्या प्रतिनिधींचा समावेश झाला असून दुसऱ्या अथवा खालच्या भागांत. सामान्य शिपायी, नगरवासी लोक आणि शेतकरी, यांच्या प्रतिनिधींचा समावेश झाला होता. लोकांवर कर कोणत्या प्रकारचे बसवावे व कारभाराचा खर्च कसा करावा, याबद्दल आपलें मत देण्याचा अधिकार या दोन सभा-

गृहांस देण्यांत आला होता; तथापि ह्यांचें मत राजानें मान्य केलेंच पाहिजे, असा अधिकार या कायद्यांत नव्हता. सभागृहांच्या तक्रारींकडे आणि मताकडे राजानें वाटल्यास लक्ष द्यावें अथवा देऊं नये.

राजानें लोकमतास अशाप्रकारें अर्धवट मान दिल्यासारखें दाखवून दुसऱ्या हातानें त्यांची सर्वमान्यता काढून घेतली. यामुळें लोक अधिक नाखुष होऊन अधिक असंतुष्ट मात्र झाले. सभेच्या पहिल्याच बैठकींत राजानें पुढील आशयाचें भाषण केलें.

“ राजा आणि प्रजा यांचे जे संबंध स्वाभाविक रीत्या आजपर्यंत परिणत होत आले आहेत, त्यांत बदलाबदल करण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. कांहीं झालें तरी लोकांच्या हातीं राजसत्तेचा अंश मी कधींहि जाऊं देणार नाहीं. प्रजेनें राजनिष्ठ रहावें आणि राजानें आपल्या मताप्रमाणें राज्य करावें, असा ईश्वरी संकेत आहे. हा ईश्वरी संकेत एकाद्या कागदाच्या चिठोऱ्यानें मी कधींहि नष्ट होऊं देणार नाहीं. ” असलें भाषण ऐकून सभासद आश्चर्यानें थक्क होऊन गेले असतील यांत नवल नाहीं.

राजाला मानपत्र देण्याचा पहिला ठराव या सभेपुढें विचारास निघाला. कौंट स्करीन यांनीं हा ठराव सभेपुढें मांडला. पूर्वींच्या देणगीप्रमाणें लोकांचे हक्क राजानें ध्यानांत ठेवले पाहिजेत व इ. स. १७२० सालीं वचन दिल्याप्रमाणें या सभेची बैठक राजानें दरवर्षीं बोलाविली पाहिजे, अशा आशयाचें भाषण कौंट यांनीं केलें. यावेळीं बिस्मार्क हेहि जमीनदारांतर्फे प्रतिनिधी या नात्यानें हजर होते. बिस्मार्क हे लोकसत्तेचे मोठे चहाते आहेत, असा साऱ्या विश्वविद्यालयांत त्यांचा लौकिक होता. यामुळें लोकांतर्फे ते या सभेंत भाषण करतील, असा सर्वांचा अदमास

होता; पण लोकांचा हा अदमास चुकून उलट बिस्मार्क यांच्या भाषणाचें सर्वांस फार नवल वाटलें.

" सरदार या नात्यानें, ब्रँडनबर्गचा प्रजाजन या नात्यानें व एक प्रशियन या नात्यानें राजघराण्याचें महत्व कायम राखणें, हें माझें कर्तव्य होय. राजसत्तेविरुद्ध सरदार घराण्यांतील मनुष्यांनीं भाषणें करावींत, हा राजसत्तेचा उपमर्द होय. फार प्राचीन काळापासून माझे पूर्वज राजसत्तेला पाठिंबा देत आले आहेत. प्रशियन राजघराणें आणि प्रशियन राज्य यांचे हितसंबंध परस्परांशीं इतके जखडले गेले आहेत, कीं, त्यांत एकाची सत्ता कमी झाल्यानें दुसऱ्याच्या हितालाहि अंतर पडेल. याकरतां राजसत्तेवर घाव घालूं पाहणारा प्रत्येक मनुष्य देशद्रोही आहे, असें मी ह्मणतों." बिस्मार्क यांचें हें वक्तृत्व ऐकून सर्वांसच फार मोठें नवल वाटलें. तारीख ७ जून रोजीं दुसऱ्या एका सभेंत मोठें लांबलचक भाषण करून त्यांनीं आपलें हें मत पुन्हां स्पष्टपणें जाहीर केलें.

त्यांचें विशेष महत्वाचें असें भाषण इ. स. १८४७ सालीं मे महिन्याच्या १७ व्या तारखेला झालें. 'नेपोलियनच्या युद्धांत प्रशियानें जो विलक्षण स्वार्थत्याग इ. स. १८१३ सालीं दाखविला. त्याचें कारण फ्रेंचांचा द्वेष हें एकच नसून इ. स. १८०७ सालीं लोकांस जे हक्क कायद्यानें मिळाले, त्यामुळेंहि लोकांत अधिक उत्साह उत्पन्न झाला होता.' अशा आशयाचें एका प्रतिनिधीचें भाषण ऐकून त्यावर उत्तर देतांना बिस्मार्क ह्मणाले,

" आमच्या जन्मभूमीवर परकीयांचा अम्मल असणें हीच गोष्ट इतकी लाजिरवाणी आहे कीं, तिजविरुद्ध इ. स. १८१३ सालीं आमच्या लोकांनीं उठाव केला, यांत नवल नाहीं. हें एकच कारण लोकांत

उत्साह उत्पन्न करण्यास इतकें सबळ आहे कीं, त्या उत्साहाच्या मुळाशीं दुसरा कोणताहि हेतु शोभण्याची अपेक्षा नाहीं. परकीयांच्या अमलाखालीं प्रशियन प्रजाजनांस जो अपमान आणि जो जुलूम सोसावा लागला, तो त्यांचें रक्त खवळण्यास पुरेसा नव्हता आणि परकीयांचा अम्मल झुगारून देण्यास दुसरा कांहीं हेतु होता, असें ह्मणणें ह्मणजे आपल्या पूर्वजांचा उपमर्द करणें होय."

बिस्मार्क यांच्या या भाषणानें सभेंत मोठा गोंधळ झाला. क्रॉस नांवाच्या एका सायलेशियन प्रतिनिधीनें 'ज्या गोष्टी तुमच्या अनुभवाच्या नाहींत, त्यांजबद्दल बोलणें वेडेपणाचें आहे,' असा टोमणा बिस्मार्क यांना दिला. केवळ परकियांची सत्ता झुगारून देणें, एवढाच क्षुद्र हेतु त्या वेळच्या प्रशियन लोकांत नसून अधिक उच्च हेतूसाठीं ते लढत होते, असेंहि तो म्हणाला. सभेंत अशा प्रकारची गडबड चालली असतां बिस्मार्क पुन्हा उत्तर द्यावयास उठले. ते म्हणाले,

"इ. स. १८१३ सालीं मी या जगांत आलों नव्हतों आणि त्या काळाचा प्रत्यक्ष अनुभवहि मला नाहीं, ही गोष्ट मोकळ्या मनानें मी कबूल करतों. त्या वेळच्या राष्ट्रीय उत्साहांत स्वतः सामील होऊन तलवार गाजविण्याची संधि मला मिळाली नाहीं, यांचें मला फार वाईट वाटतें. त्या वेळचा आमचा राष्ट्रीय हेतु इतका कमी प्रतीचा होता हें सायलेशयिन प्रतिनिधीचें मत खरें असेल, तर त्या वेळीं मी जन्मास आलों नाहीं, याबद्दल मला फारसें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. परकियांचा अम्मल झुगारून देणें हा एकच हेतु आमच्या राष्ट्रापुढें तेव्हां होता, असा प्रथमपासूनच माझा समज आहे. हा माझा समज चुकीचा आहे, असें आमचे सायलेशियन प्रतिनिधी म्हणतात; पण त्यांचें ह्मणणें अद्यापिहि मला पटत नाहीं."

बिस्मार्क यांच्या या मतास सभेंतून त्या वेळीं फारशी पुष्टी मिळाली नाहीं. राज्यकारभारांत लोकांचा हात अधिक प्रमाणानें पोहोंचावा, या मताचें प्राबल्य प्रशियांत त्यावेळीं असल्यामुळें बिस्मार्क यांचें भाषण प्रतिनिधीस फारसें आवडलें नाहीं; व कित्येकांनीं तर त्याचा उघड निषेधहि केला; तथापि बिस्मार्क यांच्या आंगीं वाक्पाटव चांगल्या प्रकारचें असून प्रतिपक्षास ताबडतोब प्रत्युत्तर देण्यास लागणारी समयसूचकताहि त्यांच्या आंगीं चांगली होती, हें सर्वांच्या प्रत्ययास आलें. प्रतिनिधीसभेच्या बैठकी वारंवार भराव्या व त्यांस प्रत्यक्ष हक्क अधिक असावेत, या मुद्यांविरुद्ध त्यांनीं तारीख १ जून रोजीं केलेलें भाषण इतकें कडक नव्हतें. यहुदी लोकांच्या कांहीं सामाजिक अडचणी दूर करण्यासाठीं जो कायदा १५ जून रोजीं सभेपुढें आला, त्यावर बिस्मार्क यांनीं बरेंच कडक भाषण केलें. यहुदी लोकांवर बिस्मार्क यांचा बराच तीव्र कटाक्ष होता. पुढें वयोमानानें आणि कालांतरानें हा कटाक्ष बराच कमी झाला होता; तथापि एकंदरीनें त्यांचें मत यहुदी लोकांस फारसें अनुकूल नव्हतें, एवढें खरें. तरुणपणचीं आपलीं कांहीं कांहीं मतें बुद्धिपूर्वक विचारांनीं बनलेलीं नसून आपल्या ठिकाणीं त्यांचा प्रवेश आईच्या दुधाबरोबरच झाला होता, असें खुद्द बिस्मार्क हे पुढें एक वेळ ह्मणाले होते. यहुद्यांच्या कायद्याबाबत ते ह्मणत—

" मी यहुद्यांचा शत्रु आहें असें नाहीं; आणि माझ्याशीं ते शत्रुत्व करीत असतील, तर त्याजबद्दल मी त्यांस पूर्ण क्षमाहि करतों. कांहीं कांहीं बाबतींत ते लोक मला प्रियहि आहेत. त्यांना सर्वप्रकारचे सामाजिक हक्क देण्यास माझी तयारी आहे; तथापि सरकारी अम्मलदारांच्या जागा त्यांस द्याव्या, या मताला मात्र मी कधींहि सम्मती देणार नाहीं. इ. स. १८१२ सालचा सरकारी हुकूम ज्या प्रांतीं लागू आहे,

७

त्या त्या ठिकाणीं सरकारी अम्मलदारी शिवाय बाकीचे सर्व सामाजिक व मुलकी हक्क त्यांस मिळालेले आहेत, असा माझा समज आहे. आतां म्याजिस्ट्रेट, सेनापति अथवा प्रधान होण्याचाहि हक्क ते मागत आहेत. एवढेंच नव्हे, तर धर्माधिकारी होण्याचा आणि धर्मज्ञानदानाचा हक्कहि ते मागत आहेत. ही मागणी मी कधींहि मंजूर करणार नाहीं, हें मी प्रांजलपणें सांगतों. या बाबतींत माझ्या ठिकाणीं प्रबळ पूर्वग्रह आहेत, हेंहि मला कबूल आहे. हे पूर्वग्रह आईच्या दुधाबरोबरच माझ्या ठिकाणीं आले असल्यामुळें मनांतून ते काढून टाकणें मला अशक्य वाटतें. राज्यप्रतिनिधी या नात्यानें एकादा यहुदी आपला अम्मल मजवर गाजवूं लागला, तर त्याच्या हुकुमा-खालीं मान देतांना मला अत्यंत दुःख होईल, व मी पाण्याहूनहि पातळ होऊन जाईन. आज ज्या उत्साहानें मी आपल्या राष्ट्रीय कर्त-व्यास जागत आहें, तो माझा उत्साह अशा स्थितींत नष्ट होईल. सरकारी कामकाज करण्यांत जें भूषण मला आज वाटतें, तें अशा स्थितींत वाटणार नाहीं. माझे गरीब देशबांधवहि याच मताचा अनु-वाद करणारे असल्यामुळें या बाबतींत ते मला पूर्ण पाठिंबा देतील आणि त्यांचा पाठिंबा हलक्या प्रतीचा आहे, असें मला मुळींच वाटत नाहीं. ”

या प्रातिनिधिक सभेच्या आणखीहि कांहीं बैठकी होऊन आणखी बऱ्याच प्रश्नांवर पुष्कळशी भवति नभवतींहि झाली; तथापि कोणताहि प्रश्न कायमच्या निकालास लागला नाहीं. प्रातिनिधिक सभेची पहिली बैठक तारीख २६ जून रोजीं राजाच्या हुकुमानें बरखास्त झाली. आणखी चार वर्षांनीं ही सभा भरविण्यांत येईल, असें गोड अभिवचन राजानें बरखास्तीच्या वेळीं दिलें.

राजघराण्याचे हक्क सुरक्षित आणि अनियंत्रित रहावेत, अशा प्रकारचें जें मत बिस्मार्क यांनीं या सभेंत प्रदर्शित केलें, त्यामुळें त्यांस पुष्कळसे कट्टे शत्रु उत्पन्न झाले, ही गोष्ट खरी, तथापि त्यांचा सभाधीटपणा, त्यांची विशाल बुद्धि आणि त्यांचा शुद्ध हेतु हीं निदर्शनास येऊन त्यांस कांहीं कट्टे मित्रहि मिळाले. त्यांचे मित्र संख्येनें थोडे होते, तथापि ते एकदिलानें काम करणारे होते. याच मित्रांच्या मदतीनें आपल्या हेतूंची पूर्तता करण्याचा पाया बिस्मार्क यांनीं घातला. प्रशियाच्या मातृभूमीचें कल्याण साधणें आणि सर्व जर्मन संस्थानांचें एकीकरण करून त्यांचें बलाढ्य साम्राज्य बनविणें, हाच बिस्मार्क यांचा मूळ हेतु होता. हा हेतु साधण्याची खटपट करण्यास आपल्या मित्रांच्या साहाय्यानें त्यांनीं आरंभ केला.

प्रातिनिधिक सभेच्या बैठकी चालू असतां, सभेंत व सभेच्या बाहेरहि बिस्मार्क यांच्या शत्रूंनीं त्यांस भंडावून सोडलें होतें. शत्रूंच्या या खटपटीपासून बिस्मार्क यांस पुष्कळ त्रास झाला, पण या त्रासाचें परिमार्जनहि लवकरच झालें. प्रातिनिधिक सभा बरखास्त झाल्यापासून एक महिन्याच्या अवधींतच त्यांचा विवाह होऊन त्या आनंदांत या त्रासाचें परिमार्जन झालें. आपल्या नूतन पत्नीसमवेत ते प्रवासास गेले असतां, तेथेंहि त्यांच्या मागचें राजकारण अगदींच सुटलें, असें मात्र नाहीं. व्हेनीस शहरीं प्रशियाच्या राजाशीं त्यांची मुलाखत झाल्याची हकीकत मागें सांगितलीच आहे. या भेटींत बिस्मार्क यांची बुद्धिमत्ता, त्यांचें धैर्य व कोणतीहि गोष्ट तडीस लावण्यास लागणारें सामर्थ्य, हे गुण त्यांच्या आंगीं भरपूर आहेत, असा प्रत्यय राजाला येऊन बिस्मार्क यांचा संग्रह करण्याचा त्यानें निश्चय केला.

यानंतर थोड्याच महिन्यांनीं जर्मन संस्थानांच्या संघटनेचा विषय कांहीं तरी निकालास लागण्यासारखी वेळ आली. आस्ट्रियाच्या संमतीनें ज्या

करारपत्रावरहुकूम जर्मन संस्थानांचें एकीकरण झालें होतें, त्या करारपत्राच्या शर्तींत कांहीं फेरबदल होणें अवश्य आहे, असें फ्रेड्रिक वुइलियम यांस दिसून आलें. बनेल तोंपर्यंत हे फेरबदल आस्ट्रियाच्या संमतीनें व्हावेत अशीहि फ्रेड्रिक वुइलियम यांची इच्छा होती; पण आस्ट्रियाची संमति न मिळाल्यास प्रसंगीं आस्ट्रियाविरुद्धहि हा फेरबदल घडवून आणावयाचा विचार फ्रेड्रिक वुइलियम यांनीं केला. अशाप्रकारें प्रशियाच्या राजाचा विचार चालू असतां दुसऱ्या कांहीं जर्मन संस्थानांनीं या बाबतींत प्रत्यक्षच उचल केली. बेडन संस्थानांतील लोकनियुक्त सभेंत ब्यासरमन नांवाच्या एका प्रतिनिधीनें एक नवी सूचना पुढें आणली. सर्व जर्मन संस्थानाची एक लहानशी संघटित सभा ( diet ) आस्ट्रियाच्या नेतृत्वाखालीं भरत असे. याशिवाय आणखीहि साऱ्या संस्थानांचें मिळून मोठें मध्यवर्ती जर्मन पार्लमेंट भरावें, असा त्या सूचनेचा आशय होता.

तारीख २४ फेब्रुआरी रोजीं फ्रान्समध्यें एक राज्यक्रांति घडून आली. त्यावेळीं लुईफिलिप नांवाचा राजा तेथें राज्य करीत होता. लोकांनीं त्याला हद्दपार करून वरील तारखेस पारीसमध्यें प्रजासत्ताक राज्याची स्थापना केली. या राज्यक्रान्तीची धग जर्मन संस्थानांस लागून तेथेंहि आगीचा भडका झाला. जर्मन संस्थानांत अनेक ज्वालाग्राही पदार्थांचें एकीकरण अगोदर कित्येक वर्षें होत होतें, त्यांत ही ठिणगी पडतांच तेथें आगीचा लोळ उठला, यांत नवल नाहीं. तथापि या स्थितींतहि प्रशियाचें संस्थान अगदीं स्तब्ध राहिलें. इतर संस्थानांत लोकमताचा जोर एवढा झाला, कीं, त्यास आळा घालण्याचें सामर्थ्य संस्थानिकांस राहिलें नाहीं. एक मध्यवर्ती जर्मन पार्लमेंट असावें, वर्तमानपत्रें स्वतंत्र असावींत, लोकांस वाक्स्वातंत्र्य असावें, सर्वांस शस्त्रें द्यावीं आणि प्रधान मंडळ लोकनियुक्त असावें, अशा प्रकारच्या मागण्या

लोकांनीं केल्या. सर्व जर्मन संस्थानांतले जर्मन प्रतिनिधी हिडलबर्ग येथें जमा झाले. जर्मन पार्लमेंटासंबंधीं पुढील विचार करण्याकरितां एक अगाऊ सभा तारीख ३१ मार्च रोजीं फ्रँकफर्ट येथें भरावी, असा ठराव या प्रतिनिधींनीं पास केला. लोकांच्या या उच्छृंखलपणास आळा घालण्याचें सामर्थ्य एकाहि संस्थानिकाला नव्हतें. लोकमताची ही खवळलेली लाट अखेरीस आस्ट्रियांत आणि प्रशियांतहि पोहोंचली. आस्ट्रियन बादशाहीचा सूत्रधार प्रिन्स मेटरनिक हा आपल्या कुटिल नीतीनें लोकांस फार अप्रिय झाला होता. खवळलेल्या लोकमतानें त्याला राजीनामा देण्यास भाग पाडलें. प्रशियांतहि लोकांत गडबड उडून दंगे सुरू झाले. बर्लिनच्या रस्त्यांतून दंगेखोरांनीं मोर्चेबंदी केली. शेवटीं तारीख १६ मार्च रोजीं सैनिकांच्या सहाय्यानें ही बंडाची आग विझवून लोकांत शांतता करावी लागली. प्रजाजनावर शस्त्रप्रहार करूं नये, अशी राजाची प्रबळ इच्छा असल्यामुळें लोकांस वाटतील ते हक्क देण्यास आपण तयार आहों, अशा अर्थाचा जाहिरनामा त्यानें प्रसिद्ध केला. जर्मन संस्थानांचें एकीकरण कोणत्या प्रकारें व्हावें, या मुद्याचा विचार करण्याकरितां संयुक्त कायदेकारी सभेची बैठक तारीख २ एप्रील रोजीं भरविण्यांत येईल असें त्यानें जाहीर केलें. वर्तमानपत्रांस पूर्ण स्वातंत्र्य देऊन प्रशियन राज्यपद्धतींत प्रजाजनांच्या मताप्रमाणें बदल केला जाईल, असेंहि आश्वासन त्यानें लोकांस दिलें.

राजाच्या या उदारपणाबद्दल त्याचे आभार मानण्याकरतां प्रचंड जनसमूह दुसऱ्या दिवशीं राजवाड्याभोंवतीं जमला. या जमावांत ज्वलत जहाल लोकांचेंहि बरेंच मोठें मिश्रण होतें. राजा आणि प्रजा यांजमध्यें अशा प्रकारचा सलोखा घडून येणें, हेंच त्यांस पसंत नव्हतें. या लोकांनीं राजवाड्यासमोर दंग्यास आरंभ केला. शेवटीं लोकांस हांकून देण्या-

चा हुकूम राजानें केला. तेव्हां ड्रागून घोडेस्वारांचें एक पथक व ग्रेनेडियन पायदळांची एक पलटण तेथें येऊन लोकांस निघून जाण्यास विनवूं लागली. शक्य तोंपर्यंत रक्तस्राव होऊं न देण्याचा हुकूम राजानें त्यांस केला होता; पण दंगेखोरांनींच सैनिकांवर हल्ला करण्यास सुरुवात केली, तेव्हां आत्मसंरक्षणासाठीं तलवारीस हात घालणें त्यांनाहि भाग पडलें.

कांहीं अपघात होऊन एका ग्रेनेडियन शिपायाची बंदुक आपोआप उडाली. इतक्यांत दुसऱ्या एका शिपायाच्या चापावर धोंडा लागल्यामुळें तिचाहि आवाज झाला. शिपायांनीं बुद्धिपूर्वक प्रहार केला नव्हता व दोन्हीहि गोळ्या हवेंत उडाल्या होत्या; तथापि या अपघाताचा फायदा घेऊन बंडखोरांनीं ' खून खून,' ' विश्वासघात,' ' मोर्चामागें पळा, ' ' शस्त्रें बाहेर काढा ' अशा आरोळ्या मारण्यास सुरुवात केली. या आरोळ्यांमुळें पुष्कळ लोक घाबरून जाऊन वाट फुटेल तिकडे पळत सुटले व ' सैनिक प्रजाजनांची कत्तल करीत आहेत,' अशा आरोळ्या मारण्यास त्यांनीं सुरुवात केली. यानंतर बंडखोर व सैनिक यांजमध्यें उघड लढाई जुंपली. बंडखोरांच्या पुढाऱ्यांत बरेचसे विद्यार्थी आणि उदीम धंदा करणारे लोकहि होते. हे लोक मोठ्या शौर्यानें आणि निकरानें लढले.

कांहीं वेळानें ही लढाई थंड झाल्यानंतर कांहीं लोक राजवाड्यांत शिरले व शिपायांस शहराबाहेर काढण्याची विनंति त्यांनीं राजाला केली. लोक बिथरले असून नुसत्या सैनिकांना पाहूनच ते बुजतात, असें हे लोक राजास सांगूं लागले. ना हो करतां करतां राजानें या लोकांच्या म्हणण्यास मान देऊन सैनिकांस हलविण्याचा हुकूम केला. बंडखोरांच्या

या भलत्याच मागणीस मान वांकवूं नये, अशाबद्दल मुख्य सेनापति फॉं प्रिटव्हिज व युवराज वुइलियम यांनीं राजापाशीं रदबदली केली. उलट मुख्य प्रधान कौंट आर्निम बॉइट झेनबर्ग यांनीं लोकमतास मान द्यावा, असें राजास सुचविलें. मुख्य सेनापतीच्या व युवराजांच्या मतांस मान न देतां राजानें आपले सैनिक शहराबाहेर घालविले. सैनिकांची पलटण शहराबाहेर जात असतां ओरडाआरड करून बंडखोरांनीं तिचा अनेक प्रकारांनीं अपमान केला. राजानें एक जाहिरनामा प्रसिद्ध करून त्यांत सर्व बंडखोरांस क्षमा करण्याचें वचन दिलें. बंडखोरांत जे लोक मारले गेले होते, त्यांची स्मशानयात्रा बंडखोरांनीं मोठ्या थाटानें काढली. 'या स्मशानयात्रेस आपणहि हजर राहिलें पाहिजे,' अशी मागणी त्यांनीं राजापाशीं केली. या वेळीं राजाहि अगदीं दुबळा असल्यामुळें बंडखोरांची ही मागणी त्यानें कबूल केली. कांहीं सरदार, दरबारी लोक आणि बंडखोरांचे प्रमुख बरोबर घेऊन राजा या लोकांसमवेत स्मशान-यात्रेस गेला. या वेळीं प्रशियाचें राजकीय निशाण कांहीं बंडखोरांनीं यात्रेच्या आघाडीस चालविलें होतें.

बंडखोरांना अशा रीतीनें शरण जाणें, हें राजाच्या पदवीला योग्य नव्हतें; तथापि त्याचा स्वभाव दुबळा असल्यामुळें, त्यांना तोंड देण्याचें धैर्यहि त्याजपाशीं नव्हतें. सैनिकांनीं बंडखोरांवर जो हल्ला केला, त्याला मूळ कारण राजपुत्र वुइलियम आहे, असें हे बंडखोर लोकांस सांगत सुटले. ही गोष्ट भोळ्या जनतेला खरी वाटली आणि राजपुत्राबद्दल त्यांचा राग इतका विकोपास गेला कीं, त्यामुळें राजपुत्राला कांहीं दिवस बर्लिन सोडून लंडनला जाणें इष्ट वाटलें. ऑपेरा मोहल्यांतील त्याचा खा-जगी वाडाहि जाळण्यास लोकांनीं कमी केलें नसतें, पण त्यावर कोणीं ' राष्ट्राची मालमत्ता ' असे शब्द लिहून ठेवल्यामुळें तो वाडा वांचला.

बर्लिन शहराची परिस्थिति अशा प्रकारची असतां संयुक्त सभेच्या बैठकीस हजर राहण्याकरतां बिस्मार्क तारीख २ एप्रिल रोजीं बर्लिन शहरीं येऊन पोहोंचले. आपल्या नूतन पत्नीसमवेत कांहीं महिने शॉन हॉसन येथें सुखासमाधानानें घालवावेत असा बिस्मार्क यांचा विचार होता; पण बर्लिन शहरीं झालेले दंगे, त्यांत राजाचा व सैनिकांचा झालेला अपमान इत्यादि गोष्टी त्यांच्या कानीं गेल्यावर स्वस्थ बसणें त्यांस शक्य नव्हतें. ही बंडाची लाट थांबविण्याला त्या वेळीं तरी त्यांना कांहीं उपाय दिसत नव्हता. यामुळें त्यांचें चित्त अत्यंत उद्विग्न होऊन गेलें होतें. अशा प्रकारच्या मन:स्थितींत, त्यांनीं राजाला एक पत्र लिहिलें व देहपातापर्यंत आपण महाराजांच्या बाजूस राहूं, असें त्यांनीं राजाला कळविलें. ही राजनिष्ठा पाहून राजालाहि अत्यंत समाधान वाटलें. बिस्मार्क यांचें पत्र राजानें आपल्या मेजावर राजभक्तीची खूण म्हणून कित्येक महिनेपर्यंत नजरेसमोर ठेवलें होतें.

लोकांना शांत करण्याच्या उद्देशानें अनेक पत्रांत लेख लिहिण्यास बिस्मार्क यांनीं सुरुवात केली. संयुक्त सभेची बैठक लवकरच सुरू व्हावयाची होती. तींत राजाला सादर करण्याच्या मानपत्राचा मसुदा प्रथम पुढें यावयाचा होता. राजानें जे नवे हक्क लोकांस दिले, त्यांबद्दल सभेनें या मानपत्रांत आभार प्रदर्शित केले होते. हें मानपत्र बिस्मार्क यांस फारसें आवडलें नाहीं; तथापि परिस्थितीकडे लक्ष देऊन त्यांनीं त्याला आपली मान्यता दिली. या मानपत्राविषयीं बोलतांना एकदां सभेंत बिस्मार्क स्वत: म्हणाले,

"बंडखोरांना नव्या सवलती मिळाल्या, याचा उल्लेख करून त्याबद्दल या मानपत्रांत आभार मानले असल्यामुळें, हें मानपत्र मला आवडलें

नाहीं. झालें तें होऊन गेलें. तें विसरून जाण्यासाठीं आपण सर्वांनीं झटलें पाहिजे. त्याचा पुनःपुन्हां उल्लेख करणें, मला इष्ट वाटत नाहीं. परिस्थितीकडे लक्ष देऊन मी या मानपत्राला आपली संमति देतों; तथापि ज्या मार्गानें या सवलती मिळाल्या आहेत, तो लक्षांत घेतां त्याबद्दल मला आनंदहि होत नाहीं अथवा त्याबद्दल आभार मानावेत, असेंहि मला वाटत नाहीं. बंडखोरीच्या पद्धतीचा विजय होऊन संयुक्त जर्मन साम्राज्य खरोखरच निर्माण झालें, व त्याची उभारणी खरोखर दृढमूल पायावर झाली, तर या बंडखोरांचे आभार मानण्यास भविष्यकाळीं मी तयार होईन. पण सध्यांतरी तसें करणें मला शक्य नाहीं."

हा मानपत्राचा मसुदा सभेंत एकमतानें पास झाला. श्लेस्वीग आणि हॉलस्टीन हे प्रांत आपल्या राज्याला जोडण्याची खटपट डेन्मार्कचा राजा करीत होता. या गोष्टीला त्या प्रांतांतील प्रजाजनांची कबुली नव्हती. पूर्वीपासून ही स्वतंत्र जोड जहागीर आहे, असें त्यांचें ह्मणणें होतें. 'त्यांचें हें ह्मणणें बरोबर आहे,' असे उद्गार प्रशियाच्या राजानेंहि काढले होते. या बाबीबद्दल व पोलंडांतील भानगडीबद्दल सर्व प्रकारची माहिती सभेपुढें यावी, अशी मागणी बिस्मार्क यांनीं केली. जर्मन संघांत येण्यास आपण कबूल असून डेन्मार्कचा सशस्त्र प्रतिकार करण्यासहि आपण कबूल आहों, अशा अर्थाचा निरोप श्लेस्विग आणि हॉलस्टीन प्रांतांतून प्रशियाकडे आला. या बरोबरच कांहीं सैनिकांच्या मदतीचीहि मागणी त्या प्रांतांनीं केली. तेव्हां प्रशियाच्या राजानें कांहीं पलटणी त्या प्रांताच्या सरहद्दीवर पाठविल्या. डेन्मार्कविरुद्ध तुम्हीं युद्ध पुकारणार काय ? असा प्रश्न बिस्मार्क यांनीं विचारला. तेव्हां त्यावर मुख्य प्रधानांनीं उत्तर दिलें, डेन्मार्कबरोबर आम्ही युद्ध करीत नाहीं. केवळ आमच्या हक्कांचें, हितसंबंधाचें व प्रांतांचें रक्षण

करण्यापुरतीच ही मोहीम आहे.' यावर बिस्मार्क ह्मणाले, 'अशा प्रकारची धरसोडीची राजनीति राज्याला अपायकारक होईल कीं काय अशी मला भीति वाटते.' पोलंडच्या परिस्थितीबद्दल बिस्मार्क यांनीं विचारलेल्या प्रश्नांस सरकारतर्फे जबाब मिळाला नाहीं. या वेळीं पोल लोकांनीं उघडपणें बंड सुरू केलें होतें. यामुळें पोझेनच्या जहागिरींत राहणाऱ्या जर्मन लोकांच्या जीविताची व वित्ताची शाश्वति त्यांस वाटेनाशी झाली. जर्मन लोकांचें जीवित व मालमत्ता हीं सुरक्षित आहेत, असें आश्वासन सरकारनें दिलें, तरी वस्तुस्थिति मात्र अगदीं निराळी होती.

वर सांगितलेल्या दोन प्रश्नांबद्दल बिस्मार्क यांनीं आपलें मत 'मॅजबर्ग झिटंग' पत्रांत पुढील प्रमाणें प्रसिद्ध केलें.

"बंड केलें ह्मणजे वाटेल ते हक्क मिळतात, ही गोष्ट बर्लिनच्या जनतेनेंच पोल लोकांस शिकविली. बर्लिनच्या जनतेनें बंडखोरांचा जयजयकार करून पोल लोकांस उत्तेजन दिलें व पर्यायानें त्यांचाहि जयजयकार केला. या उपकाराची फेड आतां कशी होत आहे, ती पहा. उच्छृंखल झालेले पोल लोक आतां दरवडेखोर बनून प्रशियाच्या प्रांतांतील जर्मन प्रजाजनांस लुटीत आहेत व प्रसंगीं त्यांचा खूनहि करीत आहेत. जर्मन बायकांमुलांचें रक्त सांडण्यासहि या बंडखोरांनीं कमी केलें नाहीं. जर्मन लोकांनीं राजाकडून जे नवे अधिकार मिळविले, त्यांचा उपयोग आज अशा प्रकारें झालेला दिसत आहे. या नव्या अधिकारामुळें आलेल्या सामर्थ्याचा उपयोग अधिक चांगल्याप्रकारें होईल, अशी मला आशा होती. फ्रान्सकडून आलसेस प्रांत घेऊन स्ट्रासबर्गच्या किल्ल्यावर जर्मनीची विजयपताका फडकविण्यांत या सामर्थ्याचा उपयोग झाला असता, तर ती गोष्ट अधिक वाजवी झाली असती. प्रजास्वातंत्र्याच्या भलत्याच कल्पनांच्या मागें लागून आम्ही काय

कमाई केली आहे पहा ! जर्मनीनें कित्येक शतकांच्या अवधींत आपल्या मनगटाच्या जोरावर पोलंडमध्यें जी कमाई केली होती, ती मात्र आज आम्ही गमावून बसलों. असल्या प्रकारच्या कल्पनातरंगांस वश होण्यानें पोलंड आपल्या हातचा जाण्यावांचून दुसरा कोणताच परिणाम होणार नाहीं."

या लेखाखालीं 'शॉनहॉसनचा जमीनदार' अशी सही बिस्मार्क यांनीं केली होती. अशाच आशयाचे दुसरेहि अनेक लेख दुसऱ्या वर्तमानपत्रांतून त्यांनीं प्रसिद्ध केले होते. या पत्रांतून जर्मनीला वास्तविक कशाची गरज आहे, याचें विवेचन त्यांनीं सविस्तरपणें केलें होतें. हे लेख बिस्मार्क यांनीं लिहिलेले आहेत, हें राजाला समजतांच त्यानें बिस्मार्क यांस अनेकवार भेटीला बोलाविलें व पुढील कारभारासंबंधीं त्यांचा सल्लाहि घेतला.

देशाच्या कारभारांत जो घोंटाळा माजला होता, तो काढून टाकून त्याची शिस्त ठरविण्यास काय उपाय योजावेत याबद्दल बिस्मार्क यांशीं राजाचें खलबत एका बागेंत चाललें होतें. विशेष कडक उपाय योजल्यास लोक बिथरतील, असें राजाचें ह्मणणें होतें. यावर बिस्मार्क ह्मणाले, "दुबळेपणाची, अथवा धरसोडीची नीति मात्र राज्यास अपायकारक झाल्यावांचून राहणार नाहीं. महाराज, आपण धैर्य धरा. जो मार्ग राज्याचें हित करील, अशी आपली खात्री आहे, त्याचा अवलंब धीटपणानें केल्यास अंतीं आपणास खास यश येईल."

इतक्यांत राणी इलिझाबेथ एका झुडुपाच्या आडून येऊन ह्मणाली, "बिस्मार्क, महाराजांना शहाणपणा शिकविण्याची तुम्हाला छाती तरी कशी होते ?"

महाराज हंसून ह्मणाले, "जाऊंदे, त्याच्या भानगडींत तूं पडूं नकोस. त्याला योग्य मर्यादेंत ठेवण्याचें मला पूर्ण सामर्थ्य आहे."

पूर्वीं सांगितलेली कायदेकारी सभा आतां 'राष्ट्रीयसभा' या नांवाखालीं भरणार होती. लोकमतानुसारें नव्या नियमांची रचना करण्याचें काम तिनें हातीं घेतलें होतें. त्याचप्रमाणें सर्व जर्मन संस्थानांचें एक मोठें पार्लमेंट फ्रँकफर्ट येथें तारीख १८ मे रोजीं भरलें होतें. या दोन्ही संस्थांचा मार्ग बिस्मार्क यांस पसंत नसल्यामुळें त्यांच्याशीं कोणताहि संबंध ठेवणें बिस्मार्क यांस बरें वाटलें नाहीं. तेव्हां त्यांतून आपलें आंग काढून घेऊन 'न्यू प्रेश्विश झिटंग' नांवाचें एक वर्तमानपत्र त्यांनीं सुरू केलें. या पत्रावर आयर्न क्रासची खूण प्रमुख स्थानीं छापली असल्यामुळें लोक त्या पत्राला 'क्रूझ झिटंग' असें ह्मणूं लागले.

बर्लिन येथें राष्ट्रीय सभेचा व फ्रँकफर्ट येथें जर्मन पार्लमेंटच्या बैठकी पुष्कळ वेळां भरल्या तथापि एवढ्या खटपटीचें प्रत्यक्ष फळ मात्र कांहीं दिसलें नाहीं. अनेक प्रकारच्या मुद्यांवर कित्येक महिनेपर्यंत शाब्दिक वादविवाद झाले, तंटेबखेडे झाले व व्याख्यानांचा पाऊस पडला, पण शेवटीं शुष्क पांडित्यावांचून त्यांतून दुसरें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. बर्लिनमध्यें बंडखोरांचा अम्मल अद्यापिहि जारी होता. अथवा तेथें कोणाचाच अम्मल नव्हता, असें म्हणणें अधिक युक्त होय. तेथें सर्वच बेबंदशाही माजली असून कोणाचाहि पायपोस कोणाच्याहि पायांत नव्हता. असल्या प्रकारच्या उपहासास्पद प्रकारास आळा घालून राज्यशकट सुरळीत मार्गाला लावण्यास लागणारें धैर्य कोणापाशींच नव्हतें.

राज्यकारभाराची ही स्थिति अशाप्रकारें बेशिस्तपणाच्या कळसास पोहोंचली असतांहि तिचा संपर्क सैन्याला मात्र लागला नव्हता. श्लेश्विग

व हॉलस्टीन प्रांतांत गेलेल्या लष्करी तुकडीनें फार शौर्य गाजविलें. फील्ड मार्शल रँगल यांनीं फार शिताफीच्या हालचाली करून जटलंडपर्यंत सारा देश थोड्याच अवधींत आक्रमण केला. यानंतर डेन्मार्कशीं तह होऊन रँगल यांची बदली मुख्य सेनापतीच्या जागीं झाली व बर्लिन येथें माजलेली अंदाधुंदी नाहींशी करण्याचें काम या नव्या सेनापतीनें तावडतोब हातीं घेतलें. मुख्य सेनापतीची जागा मिळतांच त्यांनीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. " या प्रांतांत प्रथम स्वस्थता नांदेसें करणें हें माझें कर्तव्य आहे. चांगल्या नागरिकांच्या मदतीनें हें कार्य पार पडत नाहीं, असें मला दिसून आलें, तर अन्य उपायांची मी योजना करीन " अशा अर्थाचा मजकूर या जाहीरनाम्यांत होता.

या वेळींहि बिस्मार्क यांचें राजाजवळ चांगलें वजन होतें. बिस्मार्क यांच्याच सल्ल्यानें कौंट ब्रँडनबर्ग यांची नेमणूक प्रधानमंडळाच्या अध्यक्षाच्या जागीं राजानें केली होती. कौंट ब्रँडनबर्ग हे मोठे दूरदर्शी मुत्सद्दी असून राजाच्या विश्वासास पूर्ण पात्र होते. राज्याच्या हिताशिवाय दुसरा कोणताहि स्वार्थी हेतु त्यांच्या चित्तांत नव्हता. त्या काळच्या मुत्सद्यांत हे गुण फारसे ढळढळीतपणें आढळून येत नव्हते. राज्याची शिस्त या नेमणुकीमुळें हळू हळू पूर्वपदावर येत चालली. राज्यशकटाच्या दोऱ्या आपल्या हातीं आतां खास येतात, असें राजासहि वाटून बर्लिन येथून गेलेलें सैन्याचें ठाणें; तेथें पुन्हां आणून ठेवण्याचा हुकूम त्यानें फील्ड मार्शल रँगल यांस केला. राष्ट्रीय सभेची बैठक अद्यापि चालूच होती. सैन्याचें ठाणें पुन्हां बर्लिन येथें आल्यास आपल्या पूर्वीच्या साऱ्या यशाला हरताळ लागेल, अशी भीति सभेच्या चालकांना पडली. तेव्हां राजानें हा आपला हुकूम अमलांत आणूं नये यासाठीं राजाचें मन वळविण्याकरितां सभेनें एक डेप्युटेशन राजाकडे पाठविलें. या मंड-

ळानें राजाचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. राजाच्या भित्रेपणाचा अनुभव पूर्वीं एक वेळ त्यांना आला असल्यामुळें त्याला धमकी देण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. जेकबी नांवाचा एक कॉनिस्बर्ग येथील प्रतिनिधी राजाला ह्मणाला, " वस्तुस्थिति लक्षांत न घेणें, हा दुर्गुण सर्वच राजांच्या ठिकाणीं आजपर्यंत आढळून आला आहे." या डेप्युटेशनच्या म्हणण्याला उत्तरहि न देतां राजानें त्यास रजा दिली.

राजाच्या हुकुमाप्रमाणें सैन्याचा तळ पुन्हा बर्लिन येथें पडला. शहरांत सैनिक फिरूं लागतांच मारामारीस व रक्तपातास पुन्हां सुरुवात होईल, अशी भीति बर्लिन नागरिकांस पडली होती. दंगेखोरांच्या अनिष्ट वागणुकीचा वीट साऱ्याच लोकांस आला होता. यामुळें सेनापति रँगल यांनीं वर सांगितलेला जाहिरनामा प्रसिद्ध करतांच सर्व नागरिकांनीं मोठ्या उत्साहानें त्यांचा जयजयकार केला. रँगल यांनीं आपल्या सैन्याची मिरवणूक ब्रँडनबर्ग दरवाजांतून काढून सर्व शहरभर मिरविली. ही मिरवणूक पाहण्यास सर्व शहर लोटलें होतें. घरांच्या छपरावरून आणि शहरांतील झाडांवरूनहि लोकांचे थवे आढळून येत होते. शहराच्या मुख्य चौकांत ही मिरवणुक पोहोंचली, तेव्हां सैनिकांस तेथेंच उभें करून रँगल यांनीं एक लहानसें भाषण तेथें केलें. ते ह्मणाले, "जेथें शांततेचा भंग होईल, तेथें शांतता प्रस्थापित करण्याच्या कामावर माझी नेमणूक झाली आहे. कायदा मोडला गेला, तर तो प्रस्थापित करण्याचें माझें कर्तव्य आहे. माझे सैनिक शूर आहेत, त्यांच्या तलवारी पाणीदार आहेत आणि त्यांच्या बंदुकाही भरून तयार आहेत. बर्लिनचे नागरिक हो, तुम्हाला धमकी दाखविण्यासाठीं मी आलों नसून तुमचें संरक्षण करण्यासाठीं आलों आहें. महाराजांनीं जें स्वातंत्र्य तुम्हास दिलें आहे व तुमच्या हितासाठीं जे कायदे केले आहेत, त्यांचें संरक्षण करण्यासाठीं मी येथें आलों आहें."

लोकांनीं टाळ्यांचा मोठा गजर केला. सेनापति पुढें ह्मणाले, "बर्लिनशहरवासी लोक हो, माझा हा बेत तुह्मास पसंत आहे का ?" यावर 'होय होय.' असा ध्वनि चोहोंकडे निघाला.

सेनापति पुढें बोलूं लागले, "माझें ह्मणणें तुम्हास पसंत पडलें, हें पाहून मला फार संतोष होतो. तुम्हा नागरिकांसाठीं जें कांहीं मी करीन तें तुमच्या मदतीनेंच करीन."

यानंतर सर्व कारभाराला शिस्त लावण्याचें कार्य रँगल यांनीं हातीं घेतलें. राष्ट्रीय सभेची बैठक बर्लिन येथून उठवून ब्रँडनबर्गला नेली. या ठिकाणींहि सभेच्या बऱ्याच बैठकी होऊन पुष्कळ भवति न भवति झाली; तथापि सभेच्या हातून प्रत्यक्ष कार्यभाग कांहींच होत नसल्यामुळें लोकांना तिचा आपोआपच वीट येऊं लागला. बर्लिन शहरांतील बंडावा मोडण्याचें कार्य रँगल यांनीं शौर्यानें आणि चातुर्यानें चालविलें होतें. उरलेल्या थोड्याशा बंडखोरांनीं बर्लिनचा किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन तेथें ते दबा धरून बसले होते. रँगल हे आपल्या मदतगारांसह किल्ल्या-पर्यंत गेले व तेथें मोठ्यानें ओरडून म्हणाले, "तुम्हाला बंदुका उडवा-वयाच्याच असतील, तर माझ्यावर निशाण झाडा." सेनापतीचें हें धाडस पाहून बंडखोर घाबरून तावडतोब शरण आले. त्यांनीं आपल्या भरलेल्या बंदुका जशाच्यातशाच सेनापतीच्या स्वाधीन केल्या. या परि-स्थितीसंबंधानें बोलतांना रँगल पुढें एका वेळीं म्हणाले, "त्या वेळची परिस्थिति अत्यंत भयानक होती खरी, तथापि परमेश्वराच्या कृपेनें रक्ताचा एकहि बिंदु सांडल्याशिवाय मला पुन्हां शांतता प्रस्थापित करतां आली."

बर्लिन शहरांत पूर्ण शांतता होऊन लोक पूर्ववत् आपल्या उद्योग-धंद्यास लागले. राज्यपद्धतीचें गाडें आतां कोणत्या मार्गानें जाणार

याची वाट लोक उत्सुकतेनें, पण शांततेनें पहात होते. अशा रीतीनें बंडखोरांची सारी गडबड शांत झाली, हें पाहून बिस्मार्क यांस आनंद झाला, हें सांगावयाला नकोच. आपल्या पक्षाच्या लोकांचा आतां खात्रीनें विजय होणार, असें त्यांस वाटूं लागलें. त्यांनीं काढलेलें क्रूझ झिटंग या वेळीं चांगलें भरभराटीस येऊं लागलें होतें. याच वेळीं त्यांचें पहिलें अपत्य मेरी इलिझाबेथ जोहाना ही तारीख २१ आगस्ट रोजीं जन्मास आली.

या वेळीं त्यांच्या भावी आयुष्यांतील एक मोठे प्रतिस्पर्धि त्यांस प्रथम भेटले. यांचें नांव कौंट फॉं बोस्ट असें होतें. राबर्ट ब्लूम नांवाच्या एका आस्ट्रियन राजद्रोह्यास नुकतेंच फांशी देण्यांत आलें होतें व त्यामुळें साऱ्या जर्मनीभर खळबळ उडून गेली होती. याच विषयासंबंधीं बोस्ट व बिस्मार्क यांजमध्यें त्या प्रथम भेटींत मोठा कडाक्याचा वाद-विवाद झाला.

बिस्मार्क यांस प्रधानमंडळांत घ्यावें अशी सल्ला नोवेंबर महिन्यांत राजाला मिळाली; पण राजानें बिस्मार्क यांची नेमणूक करण्याचें नाकारलें. तेव्हां राजा ह्मणाला, “ बिस्मार्क फार जहाल आणि उतावळा आहे. त्याच्या अंगाला रक्ताचा वास येतो. त्याची नेमणूक पुढें केव्हां तरी करतां येईल.”

यानंतर इ. स. १८४९च्या फेब्रआरी महिन्यांत राष्ट्रीय सभेसाठीं होणाऱ्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली. रॅथेनो शहरातर्फे प्रतिनिधि ह्मणून बिस्मार्क निवडून आले. बिस्मार्क यांच्या उतावळ्या व धाडशी स्वभावाचें प्रदर्शन या बैठकींत वारंवार होत असे.

एका प्रसंगीं ते ह्मणाले, “बंडाचें केंद्रस्थान नेहमीं शहरांतच असतें. खेडींपाडीं आणि मध्यम गांवें असल्या भानगडींत कधीं पडत नाहींत.

या करतां जगांतील सारीं शहरें उध्वस्त करून टाकणें बरें." हें भाषण ऐकून सारी सभा आश्चर्यानें थक्क होऊन गेली असली, तर त्यांत नवल नाहीं. त्यांच्या या भाषणामुळें त्यांना 'शहरांचे शत्रु' असें टोपण नांव लोकांनीं दिलें. त्यांचीं शेंकडों 'हास्य चित्रें' निघून तीं बर्लिन शहरांत जिकडे तिकडे विकलीं गेलीं.

इ. स. १८४९ च्या फेब्रुआरी महिन्याच्या २६ व्या तारखेस लोक-प्रतिनिधींची (Lower Chamber) बैठक भरून तींत राजाचें भाषण वाचलें गेलें. या बैठकींत अनेक प्रश्नांवर भवति नभवति झाली व बिस्मार्क यांनीं आपल्या शत्रूंचा पुष्कळसा समाचारहि घेतला. बर्लिन शहरांत अद्यापि सैन्याच्या तुकडीचें ठाणें कायम होतें. हें ठाणें उठवून लावण्याचा ठराव सभेपुढें आला, तेव्हां त्यावर बिस्मार्क यांनीं पुढील भाषण केलें.

" लोकांची मनःप्रवृत्ति अगदीं शांत होऊन बंडाचा बींमोड झाला आहे, असें आमच्या प्रतिपक्षाचें ह्मणणें आहे; पण १७ मार्च रोजीं घडलेल्या गोष्टीमुळें या त्याच्या मतास मुळींच पुष्टि मिळत नाहीं. या दिवशीं गतवर्षींच्या मारामारीचा वार्षिक दिन ह्मणून लोकांनीं उत्सव केले. या उत्सवानिमित्त भरलेल्या सभांत जीं गीतें ह्मणण्यांत आलीं, तीं शांतीचीं निदर्शक नव्हतीं. यांतील कांहीं कांहीं गीतें माझ्या पाहण्यांत आलीं. यांपैकीं एकांत 'मरेपर्यंत तलवार खालीं ठेवूं नका.' असा उपदेश केला आहे. दुसऱ्या एकांत 'आरक्त निशाणाभोंवतीं जमा' अशा अर्थाचा उपदेश आहे. या तांबड्या निशाणाचा अर्थ काय, हें आपणा सर्वांना ठाऊक आहेच. असल्या प्रकारचीं गाणीं ज्या सभांतून गायिलीं गेलीं, त्या सभांस आमच्या प्रतिपक्ष्यांपैकीं कोणी हजर होतें कीं नाहीं ? असा प्रश्न मी त्यांस करतों. या गाण्यांत आरक्त निशाणाचा उल्लेख आहे. जुलमी सत्ताधिशांच्या रक्तानें हें निशाण रंग-

विलें आहे, असा गर्भितार्थ या गाण्यांत ध्वनित केला आहे. हे जुलमी सत्ताधीश कोण ? या प्रश्नाचें उतर आमचे लोकसत्तावादी प्रतिनिधी देतील काय ?

" लोकसत्तावादी प्रतिनिधीहो, माझीं मतें तुमच्याहून अगदीं भिन्न आहेत, हें मला पूर्ण माहित आहे. तुमच्या मताचा येथें उल्लेख करावा, असा माझा मुळींच उद्देश नव्हता. तुमचीं मतें बोलून दाखविण्यासाठीं माझी निवडणूक झालेली नाहीं. प्रतिपक्षीयांनो, गडबड करून माझ्या भाषणांत तुह्मी व्यत्यय आणला, तर हा वादविवाद अधिक लांबण्यावांचून दुसरा कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. नुसत्या आरडाओरड्यानें जे आपल्या प्रतिपक्षास चीत करूं पाहतात, त्यांचें बुद्धीचें शस्त्र अगदीं बोथट झालेलें असतें, अथवा तें त्यांजपाशीं मुळींच नसतें, एवढें मात्र दिसून येतें. ज्यांना बुद्धिवाद करावयाचा असेल त्यांनीं माझें भाषण संपल्यानंतर आपला कोटीक्रम खुशाल सभेपुढें मांडावा. हुश्हुश्, आरडा ओरडा आणि बेसूर आलाप, असल्या गोष्टींनीं तुमचें ह्मणणें सिद्ध होणार नाहीं. ज्यांना हीं गाणीं गाण्याची हुक्की आली असेल, त्यांनीं सभा आटोपल्यानंतर खुशाल तसें करावें."

पलटणीचें ठाणें उठवूं नये, ही बिस्मार्क यांची सूचना १८५ विरुद्ध १४३ मतांनीं नापसंत झाली. दुसऱ्या दिवशींच्या बैठकींत बंडखोरांना क्षमादान करावें, या ठरावावरहि बिस्मार्क यांनीं असेंच जोरदार भाषण करून आपलें प्रतिकूल मत दिलें. या वेळीं बिस्मार्क यांनीं केलेल्या भाषणावरून स्पष्ट बोलण्याची त्यांची छाती उघड दिसून आली.

बंडखोरांस क्षमादान करण्याच्या बाबतींत बिस्मार्क यांचा मुख्य आक्षेप असा होता कीं, सभेची मागणी राजाच्या हक्का आड येते. दयादान हा राजाचा विशेष हक्क आहे. सभेच्या सांगण्यानें राजानें दयादान

करणें ह्मणजे अर्थातच त्यानें आपला हक्क गमावणें होय. ते म्हणाले, “ सभेनें अशी मागणी करणें म्हणजे राजाला धमकी देणेंच होय. याशिवाय बंडखोरांना क्षमादान न करण्याला दुसरेंहि एक कारण आहे. अशाप्रकारें कोणत्याहि अपराधाबद्दल वारंवार क्षमा होऊं लागली, तर नीति आणि अनीति यांच्या मर्यादा लोकांच्या मनांतून समूळ नष्ट होतील. आतांच या विषयासंबंधीं दोन प्रतिनिधींनीं जीं भाषणें केलीं, त्यांवरूनहि माझ्या म्हणण्यास कशी पुष्टी मिळते, हें सभेच्या लक्षांत येईल. एक प्रतिनिधि आपल्या भाषणांत म्हणाला, ‘लोकांनीं सर्व बंडखोरांस क्षमा केली आहे.’ यावरून राजाच्या क्षमेचा हक्क लोकांकडे आला आहे, असें या प्रतिनिधींचें ह्मणणें दिसत नाहीं काय ? बंडखोरांना क्षमा करणें हें राजाच्या मर्जीवर आहे. ( बंडखोर ? कोण ? असा ध्वनि. ) होय होय, त्यांना मी बंडखोरच ह्मणतों. गादीच्या हक्कांचा सशस्त्र प्रतिकार करणारे लोक बंडखोर याच नांवास पात्र होतात. दहापांच माणसें जमा करून एखाद्या दुबळ्या सरकाराला, कोणतीहि गोष्ट आपल्या मर्जीनुरूप करावयास भाग पाडणें, अथवा सरकारांनीं तसें न केलें, तर शहरांत मोर्चेबंदी करून बंड करणें विहित आहे, हें मत लोकांत कसें प्रचलित होत आहे, हें या प्रतिनिधींच्या उदाहरणावरून सभेस दिसून येणारें आहे. आमचे प्रतिपक्षी हे खरोखर बंडखोरांचा पक्ष घेऊन भांडत आहेत. मानवी न्यायानें मिळणाऱ्या योग्य शासनापासून बंडखोरांचा बचाव ते करूं पाहत आहेत. सत्य, स्वातंत्र्य आणि न्याय हीं त्यांच्या बाजूला नसून आमच्याच बाजूला आहेत. पार्लमेंटी वादविवादानें या तत्वांचा निकाल लागत नसून दहाबारा मतांच्या आधिक्यानेंहि तो लागत नाहीं. युद्धदेवता आपल्या हातांतल्या पोलादी दंडानेंच या प्रश्नांचा कायमचा निकाल लावीत असते. ”

फ्रँकफर्टच्या पार्लमेंटानें राजे चवथे फ्रेड्रिक वुइलियम यांस जर्मन बादशाहीचा राजमुगुट तारीख ३ एप्रिल रोजीं देऊं केला; पण त्याचा स्वीकार करण्याचें त्यांनीं नाकारलें. अशा प्रकारें पार्लमेंटानें दिलेलें बादशाहीचें तक्त राजानें कां नाकारलें, याबद्दल बिस्मार्क यांनीं पुढील कारण दिलें आहे. ते ह्मणतात, " फ्रँकफर्ट पार्लमेंटानें देऊं केलेला राजमुकुट अत्यंत तेजस्वी असेल; पण प्रशियन राजमुकुटाचें सोनें वितळवून तो केलेला आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. प्रशियन राजघराण्याची सत्ता नियंत्रित करून मग त्याला असला मोठेपणा देण्यानें फारसा फायदा होईल, असें मला वाटत नाहीं."

तारीख ७ एप्रिल रोजीं राजानें हा मान स्वीकारण्याचें साफ नाकबूल केलें. त्यावेळीं राजा म्हणाला, " राजमुकुट फक्त रणमैदानावरच मिळविले जातात." राजाच्या या शब्दांत किती सत्य भरलें होतें, याची कल्पना त्या वेळीं लोकांच्या मनांतहि आली नसेल.

तारीख २७ एप्रील सन १८४९ रोजीं राजाच्या हुकुमानें राष्ट्रीय प्रतिनिधी सभेची बैठक बरखास्त झाली. लोकसत्तेच्या बाजूनें भांडणाऱ्या प्रतिनिधींच्या दृष्टीनें महत्वाचें असें कांहींच कामकाज बैठकींत न झाल्यामुळें त्यांची अगदीं निराशा झाली. राजाची पूर्वकालीन सत्ता हळूहळू त्याच्या हातांत पुन्हां जाणार, अशीं चिन्हें दिसूं लागलीं. तसें झालें, तर आपले हाल होतील, असेंहि लोकसत्तावाद्यांस वाटूं लागलें. त्यांपैकीं कांहींजणांनीं तर अमेरिकेंतहि जाण्याची तयारी केली.

तारीख ७ आगष्ट रोजीं असेंब्लीची ( राष्ट्रीय प्रतिनिधींची सभा ) आणखी एक बैठक भरली. फॉं रॅडोविट्झ् या नांवाच्या प्रधानानें एक नवा त्रिकुट संधी झाला असल्याची हकीकत सभेला कळविली. प्रशिया, सॅक्सनी

आणि हॅनोव्हर या तीन संस्थानांच्या राजांनीं हा तह घडवून आणला होता. हा संधि बिस्मार्क यांस पसंत पडला नाहीं. तारीख ६ सप्टेंबर रोजीं केलेल्या भाषणांत आपल्या नापसंतीचीं कारणें त्यांनीं सांगितलीं आहेत. "आजपर्यंत आम्ही प्रशियन लोक केवळ स्वावलंबित्वामुळेंच जिवंत राहिलों आहों. अनेक वर्षांच्या प्रशियन राज्यकर्त्यांच्या खटपटीनें जें सैन्य तयार झालें, त्यानेंच आजतागाईत आमची अब्रु राखिली आहे. आमच्या राष्ट्रीय गरजा आजपर्यंत प्रशियन खजिन्यानेंच भागविल्या आहेत. या स्वावलंबित्वामुळेंच प्रशियन राजा आणि प्रशियन प्रजा यांस परस्परां-बद्दल आदर वाटत असून यामुळेंच परस्परांत एकोपा राहिला आहे. माझें हें एकट्याचेंच मत आहे, असें समजूं नका. माझे पुष्कळ देशबांधव निःसंशय याच मताचे आहेत. वाळून कोळ झालेल्या पानांची पावसा-ळ्यांत जशी स्थिति होते, तशी या तहाच्या चिटोऱ्याची स्थिति झाली, तरी त्यानंतरहि आम्ही पूर्वींसारखेच बाणेदार प्रशियन राहूं अशी माझी खात्री आहे. परमेश्वर माझी ही आशा सफल करो." स्वदेशाबद्दल बिस्मार्क यांस किती अभिमान होता, हें तारीख २४ सप्टेंबर रोजीं केलेल्या भाष-णावरून दिसून येईल. राज्यकारभारास लागणाऱ्या खर्चाची यादी नामं-जूर करण्याचा हक्क प्रतिनिधींस आहे कीं नाहीं, हा विषय वादास निघाला असतां ते म्हणाले, "मी प्रशियांत जन्मास आलों, याबद्दल मला नेहमींच मोठा अभिमान वाटतो. आणि परक्या देशांतून मी प्रवास करून आलों, म्हणजे तर माझा हा अभिमान दुणावतो."

बिस्मार्क हे अप्रतिम वक्ते आहेत आणि त्यांचीं भाषणें फार जोरदार असतात, असा अनुभव लोकांस आला खरा, तथापि बिस्मार्क यांस आपल्या पूर्ण तर्फेचा असा पक्ष निर्माण करतां आला नाहीं. त्यांना अनेक शत्रु होते व त्यांजकडून त्यांना पुष्कळसा उपद्रवहि होत होता.

स्वपक्षाचें व राजाचेंहि समर्थन करणें, अशी दुहेरी कामगिरी त्यांस करावी लागत होती. अशा प्रकारच्या अडचणीच्या परिस्थितींत न डगमगतां आपलें काम मोठ्या शांततेनें व धैर्यानें ते करीत होते. यावरूनच त्यांचें असामान्यत्व दिसून येतें. प्रतिनिधी सभेंत त्यांस महत्वाचें असें कांहीं कार्य साधतां आलें नाहीं, यामुळें जें थोडेंबहुत दुःख त्यांस झालें असेल, त्याची भरपाई दुसऱ्या एका गोष्टीनें या वेळीं झाली. तारीख २८ दिसेंबर रोजीं त्यांस पहिल्या पुत्ररत्नाचा लाभ झाला. या मुलाचें नांव त्यांनीं निकोलस-हेनरी-फर्डिनंड-हरबर्ट असें ठेवलें.

इ. स. १८५० च्या जानेवारीच्या ३१ तारखेला असेंब्लीनें सुचविलेल्या कांहीं फेरफाराप्रमाणें राज्यशासनपद्धतीचा नवा खर्डा तयार होऊन त्यावर राजानें शिक्कामोर्तब केलें. इ. स. १८५० च्या मार्च महिन्याच्या २० व्या तारखेस राष्ट्रीय पार्लमेंटाची बैठक अर्फुर्ट येथें भरली. या बैठकींत बिस्मार्क हे रँथेनो भागातर्फे निवडून आले होते. याच बैठकींत पार्लमेंटाचे सेक्रेटरी या नात्यानें त्यांची नेमणूक होऊन दरबारी नोकरींत त्यांचा प्रथम प्रवेश झाला.

पूर्वींच्या बैठकीप्रमाणें या बैठकींतहि महत्वाचें असें एकहि कामकाज झालें नाहीं. या बैठकीचें एकंदर काम पुरतें महिनाभरहि झालें नाहीं. पूर्वींच्या बैठकी दहादहा बाराबारा महिने वादविवाद करून कांहींच साध्य करीत नसत, त्या अर्थीं ही बैठक निष्कारण लांबली नाहीं, हेंच मोठें कार्य झालें असें ह्मणावयास हरकत नाहीं. या बैठकींत बिस्मार्क यांनीं फक्त एकच भाषण केलें. त्यांत ते ह्मणाले,

“ सद्गृहस्थ हो, आपल्या जुन्या प्रशियन मनोवृत्ति ध्यानांत धरून त्यांच्या अनुरोधानें आपण वागलों नाहीं, तर राज्यशासनपद्धतीच्या या नव्या खर्ड्याचा कांहीं उपयोग होईल, असें मला वाटत नाहीं. एकादा नवा

खर्डा तयार झाला आणि त्यावर राजमुद्रा झाली, म्हणजे तेवढ्यानेंच सर्व सुधारणा पुरी झाली, असें होत नाहीं. केवळ हट्टानें या सुधारणा प्रशियन जनतेवर तुह्मी लादूं पहाल, तर तेजदार घोड्यावर मांड ठेवूं पाहणाऱ्या नवख्या स्वारासारखी तुमची अवस्था होईल. आपणावर स्वारी करणारा स्वार नेहमींचा सराईत स्वार नाहीं, ही गोष्ट तेजदार घोड्याच्या लक्षांत आली, ह्मणजे त्या नवशिक्याला जसें तो गटारांत फेंकून देतो, त्याच प्रमाणें तुमचीहि गति होईल."

यावर बेसरमन् नांवाच्या एका प्रतिनिधीनें कांहीं आक्षेप घेतल्यावरून त्यांनीं त्याला पुढील उत्तर दिलें. "आमच्या प्रशियन मनोवृत्तींची तुलना मी तेजदार घोड्याबरोबर केली, याबद्दल माझ्या एका प्रतिनिधी मित्रानें आक्षेप घेतला आहे; पण पूर्वकाळीं ज्या कांहीं गोष्टी घडून आलेल्या आहेत, त्यांवरून माझ्या या मतास पुष्टीच मिळते. गेल्या वर्षाच्या मार्च महिन्यांत झालेल्या वादळाचा जो शेवट झाला, त्यावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. प्रशियन जनतेच्या तोंडांत लगाम देऊन तिला आम्ही वाटेल तिकडे नेऊं, असें कोणास वाटत असेल, तर तो त्याचा भ्रम होय. प्रशियन जनतेवर अधिराज्य गाजविण्यासाठीं पुढें सरून ज्या लोकांनीं प्रशियाच्या गरुडांकित ध्वजाचा अपमान केला, त्या लोकांना त्याच गरुडाच्या पंखाखालीं अखेरीस आश्रयास यावें लागलें."

अर्फुर्ट येथील ही बैठक राजाज्ञेनें तारीख २० एप्रील रोजीं बरखास्त झाली.

ही बैठक आटोपल्यानंतर शांततेच्या सुखाचा अनुभव घेण्याकरतां बिस्मार्क शॉनहॉसन गांवीं आले. या बैठकींत त्यांस बरेंच सरकारी कामकाज करावें लागलें होतें. आतां ही सुट्टी आनंदांत व चैनींत

घालवावयाची असा त्यांचा बेत होता. हे दिवस आपल्या मुलबाळां-बरोबर त्यांनीं कशा रीतीनें घालविले, हें त्यांच्या पुढील पत्रांत दिसून येतें. तारीख २५ जून रोजीं आपल्या बहिणीला ते लिहितात:—

" तुझ्या २४ साव्या वाढदिवसानिमित्त मी तुझें अभिनंदन करतों. वास्तविक पाहतां तुझें हें पूर्ण समजुतीचें वय आहे; पण तूं स्त्री असल्यामुळें कायदेपंडित मात्र तुला समजूतदार म्हणणार नाहींत. स्त्रियांना मोठाले मुलगे होऊन नातवंडें झालीं, तरी सुद्धां आमच्या कायदे-पंडितांच्या दृष्टीनें त्यांना समजूत येतच नाहीं. माझ्याभोंवतीं सध्यां विलक्षण कटकटी आहेत. तुझा नवा भाचा पंचम स्वरांत ओरडतो आहे आणि तुझी भाची हळूहळू रडते आहे. यांच्या सुरांतच त्यांना सांभाळणाऱ्या दाया आपलाहि सूर मिसळवित आहेत. आजूबाजूंला भिजलेले कपडे पडले आहेत आणि दूध पाजण्याच्या बाटल्या नमस्कार घालीत आहेत. अशा थाटांत अस्मादिकांची स्वारी स्वाधिष्ठानीं विराज-मान झालेली आहे. कोठेंतरी समुद्रतटाकीं चला, असें टुमणें माझ्यामागें लागलें आहे. खरोखर येथून कोठेंहि जाण्याची माझी इच्छा नाहीं; पण काय करावें? तुझ्यासारख्या आत्याबाईच्या ह्मणण्याला मान न दिला, तर प्रत्येक बारीकसारीक गोष्टींचें खापर माझ्या डोकीवर फुटावयाचें. मेरीला किंवा हर्बर्टला एकादी अधिक शिंक आली, तर त्यांना हवेवर न नेल्याचा तो परिणाम, असें तूंच उद्यां ह्मणूं लागशील. कद्रू, दुष्ट, रानटी, अशीं किती विशेषणें तूं मला देशील याचा नियमच नाहीं. मुलांच्या सत्तर वर्षांपर्यंत त्यांना जे कांहीं आजार होतात, त्या साऱ्यांचें कारण बापानें त्यांना हवा खाण्याच्या ठिकाणीं नेलें नाहीं, हें असतें. तुह्मी स्त्रिया तरी हें कारण सांगण्यास चुकणार नाहीं. आतां माझ्या मनांत नसतांहि बाल्टिक किनाऱ्याचें दर्शन घेण्याचा मीं बेत केला आहे."

ऑक्टोबर महिन्यांत राजाबरोबर शिकारीस जाण्याचें आमंत्रण बिस्मार्क यांस आलें. बिस्मार्क यांच्या भेटीसाठीं शिकारीचें निमित्त राजानें केलें होतें; तथापि त्याचा अंतःस्थ हेतु वेगळाच होता, ही गोष्ट बिस्मार्क यांच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. राजकारणविषयक कांहीं गोष्टींचा खल राजाला बिस्मार्क यांजपाशीं करावयाचा होता. या वेळीं एक नवा तह होण्याची वाटाघाट चालली होती. जेना येथें झालेल्या पराभवानें प्रशियाचें जेवढें नुकसान झालें, तेवढेंच नुकसान या कागदी शस्त्रानें होणार होतें. राजानें तारिख ३ नवंबर रोजीं मुख्य प्रधान रॅडोव्हिट्झ् यांस राजीनामा देण्यास लावलें. प्रधानांनीं राजीनामा दिला, त्या वेळीं बिस्मार्क ह्मणाले, "आमच्या सर्वांच्या मनाजोगी अशी ही एकच गोष्ट प्रधानसाहेबांनीं इतक्या दिवसांच्या कारकीर्दींत केली. आतां त्यांचा प्रवास सुखाचा होवो, असा आशिर्वाद आह्मीं मनापासून त्यांस देतों. माझ्या छातीवरचें एक मोठें दडपण निघून गेलें, असें मला वाटतें."

तारीख २१ नवंबर रोजीं चेंबरची बैठक पुन्हां भरली व तारीख २९ नवंबर रोजीं आस्ट्रियाशीं 'ऑलमुझ' चा तह झाला. हेसेच्या संस्थानांत बंडावा अझून चालूच होता. तो मोडून टाकण्याकरितां आस्ट्रिया आणि प्रशिया या दोन्ही संस्थानांनीं सैन्यें रवाना केलीं. आस्ट्रिया आणि प्रशिया यांजमध्यें या बाबींत खडाजंगी उडणार असा रंग दिसूं लागला. या वेळीं रशियाच्या झारनें मध्यें पडून हें भांडण मिटविलें नसतें, तर आस्ट्रिया आणि प्रशिया या दोघांत खास युद्ध जुंपलें असतें. ज्या कोणाकडून युद्धास आरंभ होईल, त्या संस्थानाबरोबर आपण युद्ध सुरू करूं, अशी धमकी झारनें दिल्यामुळें या दोन्ही संस्थानांस स्वस्थ बसणें भाग पडलें. आपल्यापेक्षां कांकणभर सरस

अशा शत्रूलाहि आपल्या तलवारीचें पाणी पाजण्यास प्रशियाचें सैन्य उद्युक्त झालें होतें; पण 'होली अलायन्स' या नांवाचा जो तहनामा आस्ट्रिया, प्रशिया व रशिया यांमध्यें झाला होता, तो मोडण्याचें धैर्य प्रशियन राजास झालें नाहीं. आस्ट्रियाची समजूत घालण्याकरितां व नवे करारमदार करण्याकरितां प्रशियाच्या राजानें मँटयुफेल यांची रवानगी ऑलमुझ येथें केली. आस्ट्रियाच्या वतीनें प्रिन्स श्वार्झेनबर्ग हे ऑलमुझ येथें आले. प्रशियाला स्वतंत्र असा कोणताहि अधिकार असूं नये व त्या राज्यानें सदोदित आस्ट्रियाच्या पंखाखालीं राहिलें पाहिजे, असें श्वार्झेनबर्ग यांचें पक्कें मत होतें. या अटी ज्या प्रकारानें साधतील त्या वांचून दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचा तह करण्यास ते कबूल होईनात. सर्व संस्थानांच्या एकीचा नाद प्रशियानें सोडून द्यावा, हेसे आणि श्लेस्वीग-हॉलस्टीन या प्रांतावर दोघांची एकत्र सत्ता असावी व पूर्वींची जर्मन डायट नांवाची प्रातिनिधिक सभा आस्ट्रियाच्या हुकुमतीखालीं जुन्या पद्धतीनें भरविली जावी, या अटीवर हा तहनामा अखेरीस पुरा झाला.

या तहांत प्रशियाची झालेली नाचक्की आणि आस्ट्रियाच्या मत्सराचें, द्वेषाचें व उद्दामपणाचें झालेलें प्रदर्शन यांजमुळें प्रत्येक खऱ्या प्रशियनाच्या अंतःकरणास पीळ पडला. प्रशियाचें महत्व आतां सर्वस्वी लयास जाणार म्हणून ज्या कांहीं जर्मन संस्थानांस आनंद झाला होता, त्यांनाहि आस्ट्रियाच्या वर्तणुकीबद्दल संशय येऊं लागला. श्वार्झेनबर्ग यांच्या या राजकारणावर खुद्द व्हियेन्नाच्या राजधानींतहि थोडी बहुत टीका होऊं लागली.

प्रशियन सैन्याच्या शौर्याबद्दल कोणासहि शंका नव्हती; तथापि त्यांची शिस्त व संघटना हीं पहिल्या प्रतीचीं नव्हतीं. लँडव्हर अथवा

मिलिशिया या जातीच्या दुय्यम प्रतीच्याच सैन्याचा भरणा या वेळीं प्रशियन लष्करांत अधिक होता. यामुळें त्या वेळीं युद्धास तोंड लागलें असतें, तर विजयश्रीची माळ अखेरीस कोणाच्या गळ्यांत पडली असती, हें ठरविणें अनिश्चित होतें. फ्रेड्रिकच्या काळानंतर प्रशियाच्या मानहानीचा हा दुसरा प्रसंग होय. युरोपीय राष्ट्राच्या संहतींत आपली योग्यता आणि आपलें महत्व हीं कायम ठेवण्यास जशा प्रकारच्या सैन्याचें पाठबळ लागतें, तसल्या प्रकारचें सैन्य प्रशियाजवळ नसल्यामुळें ही मानहानी त्याला निमूटपणें गिळावी लागली.

ऑलमुझचा तहनामा झाला, ही गोष्ट एकंदरीनें बरी झाली, असें बिस्मार्क यांचें मत होतें. आपल्या सैन्याच्या तयारीबद्दल फॉं रून यांनीं जो अजमास बांधला होता, तो अगदीं बरोबर आहे, अशी बिस्मार्क यांची खात्री झाली होती. उसनें सव्याज फेडण्याची वेळ अद्यापि आली नाहीं, असें बिस्मार्क यांचें मत होतें. खुद्द प्रशियांतील राज्य-क्रांतिकारक चळवळीचें बीज अद्यापि निर्मूल झालें नव्हतें. यामुळें आस्ट्रिया आणि त्याचीं पाठीराखीं जर्मन संस्थानें यांज-बरोबर युद्ध सुरू करण्यापूर्वीं स्वतःचें घर आधीं साफसूफ करणें बिस्मार्क यांस अधिक पसंत वाटलें. जर्मन संस्थानांचें आधिपत्य कोणाकडे असावें याबद्दल प्रशिया आणि आस्ट्रिया यांजमध्यें भयंकर चुरस लागून राहिली होती. या बाबींचा अखेरचा निकाल बिस्मार्क यांच्याच हातून लागावा असा जणूं काय परमेश्वराचा संकेत होता. एवढ्या मोठ्या राजकारणाचा निकाल सामान्य मनुष्याच्या हातून लागला नसता. तो लावण्यास कडे-कोट छातीचाच मनुष्य हवा होता. तसें धैर्य बिस्मार्क यांजपाशीं होतें. ‘ कोणतेंहि काम निधड्या छातीनें आणि धैर्यानें पार पाडलें पाहिजे ’ असा उपदेश बिस्मार्क यांनीं राजाला एकवार केल्याचें वाचकांस आठवत असेलच.

प्रकरण सातवें.

## फ्रँकफर्ट येथील संयुक्त पार्लमेंटांत.

ऑलमुझ येथें ठरलेल्या तहनाम्याप्रमाणें मेन नदीच्या कांठीं असलेल्या फ्रँकफर्ट शहरांत ‘ जर्मन डायट ’ या नांवाचें जर्मनसंस्थानांचें संयुक्त पार्लमेंट भरलें. त्यांत प्रशियाचा प्रतिनिधि या नात्यानें चवथ्या फ्रेड्रिक वुइलियम राजांनीं बिस्मार्क यांची नेमणूक केली. बिस्मार्क यांची कुशाग्रबुद्धि आणि प्रशियाबद्दलचा त्यांचा अभिमान याबद्दल राजाची जशी खात्री होती, त्याच प्रमाणें प्रधान मंडळाचीही असल्यामुळें बिस्मार्क यांच्या नेमणुकीस कोणी हरकत घेतली नाहीं. फ्रँकफर्टला निघून जाण्यापूर्वीं तारीख ८ मे इ. स. १८५१ रोजीं राजानें बिस्मार्क यांस आपल्या भेटीस बोलाविलें. फ्रँकफर्ट येथें बिस्मार्क यांस करावें लागणारें कामकाज किती अडचणीचें व घोंटाळ्याचें आहे व त्यांत कोठें कोठें अडथळे उत्पन्न होण्यासारखे आहेत, याबद्दल बिस्मार्क यांची समजूत राजानें करून दिली व अखेरीस त्यांस म्हटलें, “ हें काम तुमच्यानें झेपेल ना ?”

यावर बिस्मार्क यांनीं उत्तर दिलें, “महाराजांनीं अनुभव घेऊन पहावा. माझ्या कामकाजांत कांहीं उणेपणा दिसला, तर महिन्याभराच्या अवधींत माझी नेमणूक रद्द करण्यास हरकत नाहीं.”

कोणतेहि आढेवेढे न घेतां बिस्मार्क यांनीं एवढी मोठी जबाबदारी आपल्या शिरावर घेतली, हें पाहून राजाला त्यांच्या धैर्याबद्दल कौतुक वाटलें व थोडीशी शंकाहि आली. बिस्मार्क हे राजकारणांत रुळलेले नव्हते. किंबहुना या बाबींचा त्यांना मुळींच अनुभव नव्हता. तशांतून बिस्मार्क यांचा स्वभाव तापट होता, यामुळें फ्रँकफर्ट येथें त्यांचा कितपत जम बसेल याबद्दल राजाला शंका होती; तथापि बिस्मार्क यांचें

अलोट धैर्य, त्यांची अप्रतीम कर्तबगारी आणि त्यांची निस्सीम राजनिष्ठा या गुणांबद्दल राजाची खात्री अनेकवार होऊन चुकली असल्यामुळें त्याला एक प्रकारचा भरंवसाहि वाटला. शेवटीं राजा म्हणाला, " ठीक आहे; परमेश्वराच्या कृपेनें तुम्हांस यश येवो. "

याप्रमाणें प्रशियन प्रधानमंडळाचे प्रतिनिधी या नात्यानें बिस्मार्क यांची नेमणूक होऊन फ्रँकफर्टला एकदम निघून जाण्याबद्दल सरकारी हुकूम त्यांच्या हातीं पडला.

यापूर्वीं जनरल फॉं रोलो हे प्रशियाचे प्रतिनिधी होते. त्यांची नेमणूक सेन्टपिटर्सबर्ग येथें प्रशियन दरबाराचा वकील या नात्यानें झाली.

बिस्मार्क यांची नेमणूक जाहीर होतांच प्रशियांतील वर्तमानपत्रांनीं बरेंच काहूर उठविलें. " समुद्राचें वारेंहि लागलें नसतां एकाद्यानें लढाऊ जहाजावर कप्तानगिरी करावी अथवा शस्त्रविद्येचा ओनामा ठाऊक नसतां एकादी कठिण शस्त्रक्रिया करण्यास सज्ज व्हावें, अशांतलाच हा प्रकार आहे. यावरून या गृहस्थाचा धाडशी स्वभाव मात्र दिसून येतो. " असाहि मजकूर एका पत्रानें प्रसिद्ध केला. फ्रँकफर्ट येथें जमलेल्या इतर प्रतिनिधींनींहि बिस्मार्क यांचें स्वागत फारसें मनःपूर्वक केलें नाहीं.

बिस्मार्क यांनीं डायटच्या कामाकडे आतां आपलें सर्व लक्ष लाविलें. या डायटच्या बैठकी गुप्त रीतीनें भरत असत. कोणतेहि कायदे पास करण्याचें काम या डायटकडे नसून कांहीं बारीकसारीक सूचना मात्र ती करीत असे. कोणत्याहि कायद्याची अम्मलबजावणी करण्याचा अधिकार तिच्या हातांत मुळींच नव्हता. यामुळें कित्येक प्रसंगीं स्वतःच्या हुकुमाची अम्मलबजावणीहि तिच्याकडून होत नसे. जर्मनींत अंतर्गत स्वस्थता राखणें

व बाह्य शत्रूकडून उपाधी पोहोंचल्यास तिचें निवारण सर्वांनीं एकदिलानें करणें हें या संयुक्त सभेचे बाह्य हेतु होते; पण तिच्या संघटनेच्या मुळाशींच दुर्बळपणा असल्यामुळें हे हेतु अर्थातच साध्य होण्यासारखे नव्हते. मोठाल्या संस्थानांनीं आपलीं मतें छोट्या संस्थांनिकांवर जबरीनें लादावीं, अशीच या सभेची रचना होती. संयुक्त संस्थानांत कितीहि अन्याय अथवा जुलूम झाला, तरी त्याची दादहि या सभेस नव्हती. मोठ्या गंभीर मुद्रा धारण कराव्या व बारीकसारीक गोष्टींवर वादविवाद करावे, एवढेंच महत्वाचें कार्य ही सभा करीत असे. एकाद्या संस्थानांत जुलुमाचा अतिरेकच झाला, तर ही सभा त्याचें निवारण करण्याची थोडी बहुत खटपट करी. मोठीं संस्थानें लहान संस्थानांवर खुशाल जुलूम करीत व याचा वचपा काढण्याकरतां कांहीं लहान संस्थानें एकत्र होऊन एकाद्या मोठ्या संस्थानाला भंडावून सोडीत. असल्या प्रकारांस या सभेस आळा न घालतां आल्यामुळें साऱ्या जर्मनींत ती एक उपहासाचा विषय मात्र होऊन राहिली.

तारीख १० मे रोजीं बिस्मार्क हे फ्रँकफर्ट शहरीं पोहोंचले. ज्यांबरोबर आपणास पुढें काम करावें लागणार, त्या प्रतिनिधींचे स्वभाव, त्यांची चालचलणूक, त्यांचीं मतें इत्यादिकांबद्दल माहिती मिळविण्याचें काम बिस्मार्क यांनीं प्रथम केलें. ही माहिती त्या वेळीं त्यांनीं लिहिलेल्या सरकारी कागदपत्रांतून व कांहीं खाजगी पत्रांतून आजहि पाहण्यास सांपडते. तारीख १८ मे रोजीं त्यांनीं आपल्या पत्नीला लिहिलेल्या एका खासगी पत्रांत पुढील मजकूर आहे.

"फ्रँकफर्ट शहर मला अगदींच उदासवाणें वाटतें. बर्लिन येथें माझ्या मित्रांच्या सहवासांत व तुझ्या आणि मुलाबाळांच्या सहवासांत गेलेल्या दिवसांची किंमत मला आतां कळली. मी बर्लिन येथें होतों, तेव्हां जो थोडासा पक्षाभि-

मान मला होता, त्याची किंमत सुद्धां येथें आल्यावर कितीतरी वाढली. येथें जमलेले आह्मी प्रतिनिधी एकमेकांवर पाळत ठेवण्यापेक्षां दुसरें कोणतेंहि खरें कार्य करीत नाहीं. येथले लोक इतके निःसत्व दिसतात कीं, नाटक तमाशाशिवाय अधिक महत्वाच्या बाबीकडे त्यांचें कधीं लक्षहि जात नाहीं. आणि आमच्या राजकारणी मंडळांतील लोकहि जवळ जवळ त्याच किंमतीचे. यापेक्षां आमच्या प्रशियन सभेंतील प्रतिनिधी मला कितीतरी अधिक बरे वाटतात. जी गोष्ट एका दिवसांत होण्यासारखी असेल, ती चारपांच वर्षांच्या अवधींत तरी आमची ही सभा पार पाडील कीं नाहीं याची मला शंका आहे. आतां तसें करण्यास एकाद्या बाह्य शक्तीनें तिला भाग पाडलें, तर गोष्ट वेगळी. येथें एकाचेंहि मन शुद्ध नसल्यामुळें मोकळ्या मनानें कोणत्याच गोष्टीची चर्चा होत नाहीं. हजारों वाक्यें बोलूनहि त्यांतून कोणताच अर्थ न निघूं देण्याची कला मी येथें चांगली शिकलों आहें कित्येक कागद भरतील एवढें मोठे रिपोर्ट मी येथें लिहितों. त्यांतील डौलदार भाषापद्धति पाहून एकादा वाचक खरोखरच भांबावून जाईल. एकाद्या वजनदार पत्राच्या अग्रलेखाप्रमाणें माझा हा लेख खूप सफाईदारहि असतो; पण त्यांतील खरें तात्पर्य काय आहे, हें 'मॅन्टयूफेल' ( प्रशियन प्रधानमंडळाचे अध्यक्ष ) याला समजलें, तर माझ्यापेक्षां तो जास्त हुशार आहे, असें मी खचित समजेन. प्रतिनिधी मंडळांतील आपले सर्व सहकारी विलक्षण कर्तृत्ववान आणि हुषार असल्याची आपली खात्री आहे, असा बहाणा आमच्यापैकीं प्रत्येक जण करीत असतो. अशा परिस्थितींत जर्मन संस्थानांची दशा अखेरीस काय होईल, हें मात्र आह्मांपैकीं कोणासहि सांगतां येत नाहीं. आमचें हें मंडळ किती नाटकी आहे, याची कल्पना कोणासहि—अस्सल नाटक्याला अथवा भोंदूला सुद्धां—होणार नाहीं. पण हें शिव्याचें पुराण आतां पुरें झालें. माझी प्रकृती बरी आहे. रात्रीची थंडी खूप पडते. शेतवाड्या मोठ्या चांगल्या स्थितींत दिसतात. येथील राजकारणाबद्दल अथवा राजकारणी व्यक्तीबद्दल पत्रांत कोणताहि मजकूर लिहिणें इष्ट नाहीं. कारण आमचीं सारीं पत्रें येथें फोडलीं जातात."

बिस्मार्क हे राजकारणांत अननुभवी आहेत, असें राजाचें मत होतें हें वर सांगितलें आहेच; पण राजाच्या या मतांत फारसें तथ्य नव्हतें, हें या एका पत्रावरूनहि उघड दिसून येण्यासारखें आहे.

बर्लिन येथील प्रशियन प्रधान मंडळाचे अध्यक्ष फॉं मॅंटयुफेल यांस जो सरकारी रिपोर्ट बिस्मार्क यांनीं पाठविला, त्यांत त्या वेळच्या सामान्य परिस्थितीचें आणि कांहीं प्रसिद्ध व्यक्तींचें मोठें मौजेचें वर्णन केलें आहे.

"मी बर्लीन सोडून निघालों, तेव्हां येथल्या हकीकतीबद्दल वारंवार रिपोर्ट लिहिण्याविषयीं आपण परवानगी दिली होती. येथें महत्वाचें कामकाज फारसें होत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. येथें कोणीहि कोणाशीं मन मोकळें करून वागत नाहींत. येथील समासदांशीं जपून राहण्याबद्दल मला आपली आज्ञा असल्यामुळें मीहि त्यांच्याशीं विशेष मोकळेपणानें वागत नाहीं; यामुळें कामकाजाबद्दल लिहिण्यापेक्षां कांहीं विशेष व्यक्तीबद्दलच माझें मत आपणास कळवीत आहें.

डायटचे अध्यक्ष, आस्ट्रियाचे वकील कौंट थून हे बाह्यतः मोठी आनंदी व निष्काळजीपणाची वृत्ति दाखवीत असतात. आमच्यापैकीं कोणीहि त्यांना भेटला, तरी आदरातिथ्याच्या भाषणांची ते रेलचेल उडवितात. डायटचे अध्यक्ष या नात्यानें जें करणें त्यांस भाग असतें, त्याकडे ते फारसें लक्ष देत नाहींत. पण या पातकाचें क्षालन धार्मिक रीतीनें वागून ते करीत असतात. जुन्या ख्रिस्तीमतानें लावून दिलेले सारे आचार आणि विधी ते कडकपणें पाळतात. चार वाजेपर्यंत ते क्लबांत खेळत असतात. दहापासून पांचपर्यंत त्यांचा सारा वेळ नृत्यांत जातो. बर्फ घातलेल्या शांपेनचीं ग्लासेंच्या ग्लासें ते फस्त पाडतात. तसेंच येथल्या व्यापाऱ्यांच्या सुंदर स्त्रियांबरोबर हंसण्याखेळण्यांतहि ते पुष्कळ वेळ घालवितात. एकंदरीनें स्वतःची आणि लोकांची करमणूक करण्यांत बाह्यतः ते गुंग झाल्यासारखे दिसतात; तथापि ह्या पडद्यामागें त्यांचे राजनीतीचे डाव अगदींच चालत नाहींत, असें नाहीं. ते मोठे पहिल्या प्रतीचे बुद्धिवान् अथवा निष्णात मुत्सद्दी आहेत, असें माझ्यानें ह्मणवत नाहीं; तथापि ते विलक्षण हिशोबी आणि पाताळयंत्री आहेत, यांत मात्र संशय नाहीं. त्यांचा पाताळयंत्रीपणा त्यांच्या रंगेल वृत्तीच्या पडद्यांतून बाहेर डोकावल्यावांचून रहात नाहीं. त्यांच्याचसारखा पाताळयंत्रीपणा न करतां जर कोणी उघडया माथ्यानें त्यांच्या नीतीच्या आड येऊं लागला, तर त्याचें जबर नुकसान केल्यावांचून ते रहाव-

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे



प्रिन्स विस्मार्क.

याचे नाहींत. कडक शिस्त हा आस्ट्रियन राजनीतीचा मोठा सद्गुण आहे. तेव्हां कौंट थून हे कदाचित् स्वतः चांगले असतांहि आस्ट्रियाचे मुख्य प्रधान प्रिन्स श्वार्झेनबर्ग यांच्या हुकुमास अनसरून कदाचित् असे वागत असतील. वरिष्ठांचे हुकूम अमलांत आणणें, ही गोष्ट खरोखरच फार स्तुत्य आहे आणि या दृष्टीनें पहातां कौंट थून हे आपलें कर्तव्य फारच चोख बजावतात, असें ह्मणावयास हरकत नाहीं. मुत्सद्देगिरीचा फारसा अनुभव मला नाहीं; तथापि आस्ट्रियाच्या धोरणाबद्दल माझें मत मीं आपणास कळविण्याची परवानगी घेतों. एकादी गोष्ट केवळ न्याय्य ह्मणूनच ती करावयाची, असें श्वार्झेनबर्गच्या वर्गांतील मुत्सद्यांचें धोरण नाहीं. एकादा जुवेबाज भल्याबुऱ्या कोणत्याहि संधीचा जसा फायदा घेतो, त्याच प्रमाणें आस्ट्रियन मुत्सद्यांची वर्तणूक आहे. आपला डाव जितका पूर्ण यशस्वी होईल, तितका तो करून घ्यावयाचा, असें त्यांचें धोरण दिसतें. खुशालचेंडूंची व मोकळेपणाची वृत्ति हे लोक बाह्यतः दाखवितात, तरी अंतःस्थ रीतीनें आपला डाव साधावयास ते चुकावयाचे नाहींत. ”

अशाच रीतीनें आणखी कांहीं आस्ट्रियन प्रतिनिधीबद्दल माहिती मिळाल्यानंतर बिस्मार्क पुढें लिहितात.—

“ इतर कांहीं प्रतिनिधीबद्दल संशयांनीं भरलेले रिपोर्ट आस्ट्रियन प्रतिनिधीकडून मजकडे येत असतात; तथापि या त्यांच्या संशयांत किंतपत तथ्य आहे, हें माझ्यानें आज सांगवत नाहीं. कोलन येथील क्रांतिकारक पक्षाच्या वर्तमानपत्राशीं आमच्यापैकीं एका मुत्सद्याचा निकट संबंध आहे, असें कौंट थून आणि कौंट गोल्डज हे ठांसून सांगतात. या वर्तमानपत्रांत जो कांहीं मजकूर प्रसिद्ध होतो, त्यावरून त्यांनीं हें अनुमान बसविलें आहे. ”

फ्रँकफर्ट येथील मुत्सद्यांचें कांहीं वर्णन बिस्मार्क यांनीं क्रूझ झिटंग पत्राला लिहिलें आहे.

“बाह्यतः आनंदी आणि मोकळेपणाच्या पांघरुणाखालीं आस्ट्रियन मुत्सद्दी पाताळयंत्रीपणा करण्यास चुकत नाहींत. प्रत्येक गोष्टींत आम्हां

इतर प्रतिनिधींवर आपला शह रहावा अशासाठीं ते खटपट करीत असतात. बारक्यासारख्या संस्थानांचे प्रतिनिधी हे जुन्या पद्धतीचे घमंडानंदन आहेत. आपण मोठे मुत्सद्दी आहों, असें लोकांस भासविणें एवढेंच आपलें कर्तव्य ते समजतात. विडी पेटविण्यासाठीं कोणी काडी मागितली, तर ती देतांना सुद्धां जी आढ्यता ते आपल्या चेहऱ्यावर आणतात, ती पाहून कोणासहि हसूं लोटल्याशिवाय राहणार नाहीं. येथें कोणाचा कोणाशीं मेळ नाहीं, जो तो आपल्या आढ्यतेंतच गर्क असतो, आणि इतरांचा उपहास करीत असतो. तीन मुलकी आणि दोन लष्करी असे आम्हीं पांचजण येथें प्रशियाचे प्रतिनिधी आहों; परंतु आह्मां पांचांतहि परस्परांत मेळ नाहीं. प्रत्येक जण आपापले खास रिपोर्ट वेगवेगळे धाडीत असतो."

प्रशिया तर्फेच्या मुत्सद्दी मंडळाचें अध्यक्षत्व इतके दिवस जनरल फॉं रोचो यांजकडे होतें. अखेरीस यांची नेमणूक पिटर्सबर्ग येथें झाल्यामुळें ते तिकडे निघून गेले व त्यांच्या जागीं बिस्मार्क यांची नेमणूक झाली. ही गोष्ट तारीख १५ जुलई रोजीं घडली.

प्रशियाचे मुख्य प्रधान मॅन्टयुफेल यांस बिस्मार्क यांनीं या वेळीं जीं पत्रें लिहिलीं, त्यांत प्रशियाच्या राजकीय परिस्थितीबद्दल व फ्रँकफर्ट येथील राजनीतीबद्दल बऱ्याच महत्वाच्या सूचना त्यांनीं केल्या होत्या. कौंट थून यांच्या उद्दामपणाबद्दल व अरेरावीनें आपला अधिकार गाजविण्याच्या पद्धतीबद्दल बिस्मार्क यांस राग येत असे; तथापि याबद्दल आपल्या सरकाराकडे त्यांनीं वारंवार तकरारी केल्या नाहींत. एकंदरीनें कौंट थून व त्यांच्या मागून आलेले फॉं रेचबर्ग यांशीं त्यांचे दिवस बऱ्या प्रकारें गेले असें ह्मणावयाला कांहीं हरकत नाहीं; पण रेचबर्ग यांच्या मागाहून आलेल्या गृहस्थाशीं बाह्यतः सुद्धां मित्रत्व राखणें बिस्मार्क यांस

दुरापास्त झालें. सरकारी नौकरीमुळें फ्रँकफर्ट येथें बिस्मार्क यांचें बरेच दिवस राहणें होणार होतें; तथापि कांहीं अडचणीमुळें कुटुंबांतील मंडळीस फ्रँकफर्ट येथें आणतां आलें नाहीं, म्हणून कुटुंबीयांच्या वियोगाचा वचपा बिस्मार्क यांनीं पत्रांनीं भरून काढला. बिस्मार्क यांच्या मनोवृत्ति खरोखर कशा प्रकारच्या होत्या, याचें उत्तम चित्र या पत्रांत पहावयास सांपडतें.

आपला अथवा आपल्या देशाचा कोणी यत्किंचित अपमान केला, तर तो सहन करावयाचा नाहीं, याबद्दल बिस्मार्क यांचा निश्चय किती पक्का होता, ही गोष्ट पुढील मजेदार हकीकतीवरून कळून येईल.

जर्मन डायटचे अध्यक्ष कौंट थून यांना चिरूट ओढण्याचें विलक्षण व्यसन होतें. डायटच्या बैठकीच्या वेळींहि चिरूट बाजूस ठेवणें त्यांस खपत नसे. प्रतिनिधी गंभीर विषयांची चर्चा करीत असतां अध्यक्षसाहेब तंबाखूच्या धुराच्या लोटांनीं त्यांस गुदमरून सोडीत. सभ्य चालीरितींच्या दृष्टीनें पहातां अध्यक्षसाहेबांची ही वागणूक सभेस उपमर्दकारक होती; पण तिजबद्दल आक्षेप घेण्याचें धैर्य एकाहि प्रतिनिधीस झालें नाहीं. बिस्मार्क यांची नेमणूक प्रतिनिधीच्या जागीं होऊन ते बैठकीच्या दिवशीं हजर झाले. आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून चिरूटाच्या धुरांत अध्यक्षसाहेबांनीं सभेच्या कामास सुरुवात केली. हें पाहतांच बिस्मार्क आपल्या जाग्यावरून शांतपणें उठले आणि अध्यक्षसाहेबांकडे जाऊन आपणास काड्यांची पेटी देण्याची विनंति त्यांनीं त्यांस केली व ताबडतोब आपल्या खिशांतून एक चिरूट काढून त्यांनीं तो पेटविला व धुराचे फुत्कार सोडीत सोडीत ते आपल्या खुर्चीवर येऊन बसले. बिस्मार्क यांचें हें धाष्टर्य पाहून सर्व प्रतिनिधी

अगदीं भयचकित होऊन गेले. आतां कांहीं तरी अननुभूत प्रकार घडणार असें सर्वांस वाटलें. आस्ट्रियन पादशाहीचा अपमान अध्यक्ष-साहेब सहन करणार नाहींत, अशी सर्वांची खात्री होती; पण तसें कांहीं न घडतां अध्यक्ष व बिस्मार्क यांच्या चिरुटाच्या धुरांतच सभेचें काम संपलें. दुसऱ्या दिवसांपासून चिरुट ओढणें हा एक सभेचा कार्य-क्रमच होऊन गेला.

बिस्मार्क हे फ्रँकफर्ट येथें असतां आणखी एक महत्वाची हकी-कत घडली. प्रशियाचे युवराज मेन्स शहरीं जात असतां वाटेवर त्यांचा मुक्काम फ्रँकफर्ट शहरीं पडला. तेव्हां आपल्या भावी राजाला कुर्निसात करण्याकरतां बिस्मार्क त्यांच्या मुक्कामीं गेले. बिस्मार्क सा-रख्या अननुभवी तरुणाला राजकारणाचें ओझें कितपत झेपेल, याजबद्दल युवराजांस मोठी शंका होती; तथापि बिस्मार्क यांच्या हुशारीबद्दल जनरल फॉं रोचो यांजकडून एक रिपोर्ट युवराजांकडे अगोदरच गेला होता. प्रशियाच्या हितसंबंधाचीं सूत्रें सांभाळण्याची योग्यता बिस्मार्क यांच्या आंगीं पूर्णपणें आहे, असें रोचो यांनीं आपल्या रिपोर्टांत ह्मटलें होतें. बिस्मार्क यांशीं थोडा वेळ संभाषण होतांच त्यांच्या निपुणतेबद्दल युवराजांचीहि प्रत्यक्ष खात्री झाली.

“ प्रशियाचा तेजोभंग करून त्याला धुळीला मिळविलें पाहिजे, ” असें श्वार्झेनबर्गच्या कुटिल राजनीतीचें आद्यसूत्र होतें व या सुत्रानुरू-पच कौंट थून वगैरे आस्ट्रियन मुत्सद्यांनीं आपलें धोरण राखलें होतें. ह्या मुत्सद्देगिरीला यश येऊं न देण्याची बिकट कामगिरी बिस्मार्क यांस करावयाची होती. प्रशियाचें प्रतिनिधित्व स्वीकारून फ्रँकफर्ट येथें आ-ल्याबरोबर तेथील रागरंग पाहतांच आपल्या भावी कार्याची रूपरेषा बिस्मार्क यांनीं ठरवून टाकली. जीं कांहीं बारीकसारीक संस्थानें आस्ट्रि-

याला पाठिंबा देणारीं होतीं, त्यांचें नसतें महत्व आस्ट्रियानें वाढवून ठेवलें होतें. लोकसंख्या व लष्करी तयारी या दृष्टीनें जें वाजवी महत्व त्यांना असावें, त्याहून अधिक महत्व आस्ट्रियानें स्वहेतूसाठीं त्यांना दिलें होतें. प्रशियाच्या वाढीस अडथळा होईल, अशा प्रकारची कोणतीहि गोष्ट आस्ट्रियानें करावयाचें मनांत आणलें ह्मणजे या संस्थानांची संम्मति त्याला मिळे. अशा प्रकारचीं बरीचशीं बारीकसारीक संस्थानें आस्ट्रियानें आपल्या पंखाखालीं घातलीं होतीं. या संस्थानांत फाटाफूट करून त्यांच्यांतील बऱ्याच जणांचीं मनें प्रशियाकडे वळवावयाचीं, ही बिस्मार्क यांची मोठी कामगिरी होती. हें साध्य साधण्यासाठीं बिस्मार्क मनःपूर्वक यत्न करीत होते, व त्यांस थोडेंबहुत यशहि मिळालें होतें; तथापि ह्मणण्यासारखी फलप्राप्ति त्यास अद्यापि झाली नव्हती.

फ्रान्सचें राजकीय वातावरण या संधीस बरेंच घोटाळ्याचें झालें होतें. अखेरीस इ. स. १८५१ च्या डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस लुई नेपोलियन यानें आपणास राज्याभिषेक करून घेतला व तो फ्रान्सचा बादशाहा झाला. फ्रान्समध्यें झालेली ही राज्यक्रांति बिस्मार्क यांस अहितावह वाटली नाहीं. जर्मनीच्या कांहीं संस्थानांतून लोकपक्षाचें प्राबल्य अद्यापिहि बरेंच होतें. तेथील स्वतंत्र लोकसत्तावादी पक्षाचा पूर्ण बींमोड अद्यापि झाला नव्हता. या लोकांच्या खटपटीनें बंडाचा बावटा जर्मनींत कदाचित् उभारला गेला, तर त्याला नेस्तनाबुत करण्याला हा नवा बादशहा मदत करील, असें बिस्मार्क यांस वाटलें. नेपोलियन बादशहानें अभिषेक होतांच नवें प्रधानमंडळ बनविलें व प्रशिया आणि आस्ट्रिया यांनींहि आपली त्यास संमति व्यक्त केली.

परस्परांस जकातीच्या सवलती देऊन त्याद्वारें व्यापारीदृष्ट्या जर्मन संस्थानांचा एकोपा करण्याकरतां झॉलव्हेरीन नांवाचा जो निर्बंध नि-

र्माण झाला होता, त्यासंबंधीं आस्ट्रिया व प्रशिया यांजमध्यें बराच तंटा लागण्याचा संभव उत्पन्न झाला होता. इ. स. १८५२ सालीं बिस्मार्क यांची नेमणूक व्हियेन्नाच्या दरबारीं प्रशियन वकील या नात्यानें दोन महिनेपर्यंत झाली होती. या अवधींत 'झॉलव्हेरीन' बद्दल खुद्द बादशहाशीं वाटाघाट करून निकाल लावण्याचा यत्न बिस्मार्क यांनीं केला.

इ. स. १८५३ सालीं तुर्की साम्राज्यासंबंधींचा प्रश्न विकोपास जाऊन पुढें थोड्याच दिवसांनीं क्रिमियन युद्ध उपस्थित झालें. फ्रान्स, इंग्लंड आणि टर्की यांनीं आपलें सैन्य रशियाच्या क्रिमियन् प्रातांत उतरविलें. तेथें कित्येक हातघाईच्या लढाया होऊन उभयपक्षीं बराच रक्तपात झाल्यावर सेबॅस्टपूल नांवाच्या दुर्गास संयुक्त सैन्यांनीं वेढा दिला. या युद्धांत संयुक्तांचें सैन्य प्रत्यक्ष लढाईपेक्षां रोगानेंच अधिक कामास आलें. वेढ्याचें काम बरेच दिवस चालून अखेरीस संयुक्त सैन्यानें शहराचा बराच भाग आपल्या ताब्यांत घेतला. यानंतर इ. स. १८५६च्या मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस पारीसचा तह होऊन या युद्धाची समाप्ति झाली. या युद्धांत उभय पक्षाकडून पाचारण होत असतांहि प्रशिया व आस्ट्रिया हीं दोन्ही राष्ट्रें तटस्थ राहिलीं. रशिया व प्रशिया यांजमध्यें बरींच वर्षें चांगली मैत्री होती. त्या मैत्रीचा भंग करणें प्रशियाच्या राजास बरें वाटलें नाहीं. याशिवाय या युद्धांत पडल्यानें आपला अथवा आपल्या देशाचा कांहीं फायदा होईल, असेंहि त्यास वाटलें नाहीं. याच वेळीं (इ. स. १८५८) इंग्लंडच्या राजकीय धोरणाबद्दल पुढील मत बिस्मार्क यांनीं प्रगट केलें. 'ब्रिटिश राज्यघटनेंत नव्या सुधारणांचा अंतर्भाव होऊन, जुनी घडी मोडून नवे पक्ष निर्माण झाल्यापासून तेथील राजकीय धोरणाच्या निश्चितपणासंबंधीं किती भरंवसा बाळगतां येईल, हें मला आज सांगतां येत नाहीं. इंग्लंड-

सारख्या देशांत तत्वापेक्षां वर्तमानपत्रांच्या लेखांस फाजील महत्व प्रस्तुत स्थितींत प्राप्त झालें आहे. यामुळें तेथला राज्यकारभार दूरवर दृष्टि देऊन चालविला जात नसून केवळ चालू क्षणाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनेंच चालविला जातो. प्रशियन घराण्याची हीच दशा झाली, तर आमचा देश कोणत्या थराला जाईल, परमेश्वर जाणे ! आमच्याहि देशांत 'या नव्या सुधारणेनें' प्रवेश केला, तर त्याची काय दशा होईल ? तक्ताच्या पवित्र हस्तांतून राज्यसूत्रें निघून तीं पंडितांच्या, वकिलांच्या आणि स्वतःस उदारमतवादी ह्मणविणाऱ्या पोकळ बडबड्यांच्या हातांत गेलीं, तर परमेश्वरच आमचें रक्षण करो.'

बिस्मार्क यांचें हें मत प्रसिद्ध झाल्यामुळें इंग्लंडांत बिस्मार्क यांस पुष्कळ शत्रू निर्माण झाले व या त्यांच्या शत्रूंच्या कारस्थानांचा परिणाम या उभय देशांत आजमितीसहि दिसत आहे.

इ. सं. १८५५ च्या जुलई महिन्यांत बिस्मार्क यांचे विद्यालयीन मित्र मोटले यांची त्यांच्याशीं भेट झाली. या वेळीं बिस्मार्क यांजबद्दल मोटले यांनीं पुढील मजकूर एका खाजगी पत्रांत लिहिला आहे:—

"बिस्मार्क यांच्या घरीं मी पोहोंचलों, तेव्हां ते जेवावयास बसले होते. यामुळें आपल्या भेटीचें कार्ड आंत पाठवून व आणखी अर्ध्या तासानें येतों' असा निरोप नौकराबरोबर त्यांना कळवून मी आपल्या हॉटेलांत परत आलों. हॉटेलांत पोहोंचतों न पोहोंचतों, तोंच बिस्मार्क यांचा नौकर माझ्या पाठोपाठ धांवत आला. त्याबरोबर मी त्यांच्या घरीं गेलों. तेव्हां धांवत बाहेर येऊन बिस्मार्क यांनीं मला कडकडून मिठी मारली. प्रत्यक्ष भावाचें देखील स्वागत त्यांनीं अशा तऱ्हेनें केलें नसेल. पूर्वीपेक्षांहि मजवरील त्यांचें प्रेम आतां अधिक वाढलें आहे. त्यांची विशाल बुद्धिमत्ता आणि चोख दानत याबद्दल माझें पूर्वींचें मत

या भेटीनें अधिकच कायम झालें. बिस्मार्क हे बुद्धिमत्तेनें जसे श्रेष्ठ तसेच अंतःकरणानेंहि उदार आहेत. ज्या उच्चस्थानावर ते सध्यां आरूढ झाले आहेत, तें स्थान त्यांच्यामागें लागून चालत आलें आहे. हा अधिकार प्राप्त करून घेण्याची कोणतीहि खटपट त्यांनीं केली नाहीं. तो अधिकार आपण होऊन त्यांच्या गळ्यांत पडला. इ. स. १८४८ सालीं प्रशियांत जी धामधूम झाली, त्या वेळीं राष्ट्रीय सभेंत ( आसेम्बली ) बिस्मार्क यांनीं जीं भाषणें केलीं, त्यामुळेंच बिस्मार्क यांची विशाल बुद्धिमत्ता सर्वांच्या निदर्शनास आली. त्या वेळचीं त्यांचीं मतें बरोबर होतीं, कीं चुकीचीं होतीं, हें ठरविण्याचें माझें काम नाहीं; पण त्या काळासंबंधीं सर्व प्रकारची माहिती त्यांनीं मला इतकी स्पष्ट करून सांगितली कीं, त्यामुळें त्यांच्या बारीक अंतर्दृष्टीबद्दल माझी पूर्ण खात्री झाली. आपल्या घरीं राहण्याबद्दलच त्यांनीं मला फार आग्रह केला, पण पाहुण्यांची अगोदरच गर्दी असल्यामुळें मी हॉटेलांतच राहिलों.

बिस्मार्क हे पूर्वींपेक्षां शरीरानें अधिक भरल्यासारखे दिसतात; पण ते सहा फुटाहूनहि अधिक उंच असल्यामुळें त्यांचा लठ्ठपणा विशोभित दिसत नाहीं. तथापि त्यांची वागणुकीची पद्धत मात्र हुबेहुब पूर्वींसारखीच आहे. त्यांची पत्नी खरोखर फारच सुशील आहे. तिची वागणूक अगदीं साधेपणाची असून दंभ आणि आढ्यता यांचा गंधहि तिला नाहीं.

इ. स. १८५१ सालीं मँन्टयुफेल यांनीं फ्रँकफर्ट येथें बिस्मार्क यांची नेमणूक केली, त्यासंबंधीची हकीकत बिस्मार्क यांनीं मला स्वतःच सांगितली. ते म्हणाले, ‘ या नेमणूकीची अगाऊ गंधवार्तादेखील मला नव्हती, तथापि मँन्टयुफेल यांनीं ही गोष्ट काढतांच मी ताबडतोब होय म्हणून उत्तर दिलें. दुसऱ्या दिवशीं मला महाराजांकडून बोला-

वणें आलें. त्यांनींहि हा प्रश्न विचारतांच मी आपली कबुली ताबडतोब दिली. हें पाहून महाराजांस मोठें नवल वाटलें. महाराज ह्मणाले, 'एवढी जबाबदारीची जागा स्वीकारतांना तुम्हाला कांहींच काळजी वाटत नाहीं ?' मी उत्तर दिलें, 'माझी नेमणूक करण्याबद्दल जर महाराजांना काळजी वाटत नाहीं, तर तिचा स्वीकार करण्याची काळजी मला कां वाटावी ?' ही गोष्ट इतक्या विस्तारानें मी सांगितली, याचा हेतु हाच कीं बिस्मार्क यांजबद्दल तुला बरोबर कल्पना व्हावी. व्यवहारांत चोखपणा, धैर्य आणि स्वाभिमान हे बिस्मार्क यांचे प्रमुख गुण आहेत. यांच्याच जोडीला असामान्य बुद्धिमत्ता त्यांजपाशीं असल्यामुळें अशा प्रकारचा चौरस मुत्सद्दी सध्यां कोणत्याहि दरबारीं असेल कीं नाहीं, याची मला शंकाच आहे. पुढेंमागें ते मुख्य प्रधान होणार, याबद्दल मला शंका वाटत नाहीं. फक्त एकाच गोष्टीबद्दल मात्र मला थोडी काळजी वाटते. ती गोष्ट हीच कीं, ते सत्याचे पूर्ण भक्त असल्यामुळें राजकारणाच्या नागमोडी वाटेनें पुढें येण्यास त्यांस अवसर सांपडेल कीं नाहीं, याची मला थोडी शंका वाटते.

बिस्मार्क यांची नेमणूक फँकफर्ट येथें झाली, तेव्हां त्यांच्या घरची मंडळी कोठें हवेच्या ठिकाणीं जाण्याच्या तयारींत होती. बिस्मार्क यांचें येणें आपणाबरोबर होत नाहीं, हें त्यांच्या पत्नीला समजलें, तेव्हां तीन दिवस तिच्या डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं. हा वेळपर्यंत बिस्मार्क यांचें आयुष्य खेड्यांत अगदीं साध्या राहणीनें गेलें होतें. सरकारी नौकरींत कोणत्याहि महत्वाच्या जागीं त्यांची नेमणूक झाली नव्हती. राजकारणांतील डावपेंचांची त्यांना मोठी भीति वाटत होती; पण तेथें एकवार प्रवेश झाल्यावर आपली भीति निराधार होती, असें त्यांस आढळून आलें."

यानंतर आणखी कांहीं दिवसांनीं दुसऱ्या एका पत्रांत मोटले ह्मणतात,

"बिस्मार्क यांची पत्नी इतकी चांगली आहे, कीं तिजवर कोणाचेंहि प्रेम बसेल. चारआठ दिवसांच्या परिचयानेंच आह्मीं जणूं काय बाळपणापासूनच मैत्रींत वाढलों आहों, असें मला वाटूं लागलें. 'तुह्मी आल्याचें समजल्याबरोबर लहान पोरासारखा ऑटो आनंदानें नाचूं लागला,' असें बिस्मार्क यांच्या सासूनें मला सांगितलें. बिस्मार्कसारखा मोठा मनुष्य मजवर एवढें प्रेम करतो, हें पाहून मला मोठा आनंद झाला."

या सुमारास राजाची मनःस्थिति चांगलीशी न राहिल्यामुळें राज्यकारभाराचीं सूत्रें युवराज वुइलियम यांस आपल्या हातीं घ्यावीं लागलीं. जर्मनीचें सैन्य संघटित होऊन त्याची पूर्ण तयारी होईपर्यंत आस्ट्रियाशीं कोणताहि तंटा करावयाचा नाहीं, असा युवराजांचाहि निश्चय होता. फ्रँकफर्ट येथें बिस्मार्क हे प्रशियाचे प्रतिनिधी या नात्यानें कामावर असतां आस्ट्रियन प्रतिनिधीशीं त्यांची नित्य कुरबूर चालत असे. ही कुरबूर बंद करण्याच्या हेतूनें बिस्मार्क यांची बदली इ. स. १८५९ सालच्या मार्च महिन्यांत सेन्टपिटर्सबर्ग ( पेट्रोग्राड ) येथें युवराजांनीं केली. या जागीं बिस्मार्क यांनीं तीन वर्षें काम केलें. इ. स. १८६१ च्या जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या तारखेस पहिले वुइलियम यांस राज्याभिषेक झाला, त्या वेळीं त्या समारंभास हजर राहण्यास मात्र पिटर्सबर्गहून ते कॉनिग्जबर्गला आले होते. इ. स. १८६० च्या आक्टोबर महिन्यांत रशिया, आस्ट्रिया आणि प्रशिया या तीन देशांच्या राजांची परस्पर मुलाखत वारसा येथें झाली, त्या प्रसंगींहि बिस्मार्क हजर होते. इ. स. १८६२ च्या मे महिन्याच्या अखेरीस त्यांची नेमणूक प्यारीस येथील प्रशियन वकिलाच्या जागीं झाली. या वेळीं फ्रान्सच्या अंतःस्थितीबद्दल त्यांनीं चांगली माहिती मिळविली होती. एके प्रसंगीं फ्रान्सचे

बादशहा तिसरे नेपोलियन यांची मुलाखत झाली असतां "बिस्मार्क हा एक महामूर्ख मनुष्य आहे" असे उद्गार बादशहांनीं काढले, असें ह्मणतात. बादशहाच्या या मतांत कितपत तथ्य होतें, हें काळाच्या ओघांत पुढें आपोआपच सिद्ध झालें.

प्यारीस येथें कामावर असतां बिस्मार्क लंडन येथें जाऊन आले. या वेळीं इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉर्ड पामर्स्टन व प्रख्यात मुत्सद्दी डिझरायली ( भावी लॉर्ड बिकन्सफील्ड ) या दोघां बड्या गृहस्थांशीं त्यांची भेट झाली. बिस्मार्क निघून गेल्यावर डिझरायली पार्मस्टन यांस ह्मणाले, "या गृहस्थाला नीट ओळखून ठेवा. तो वायफळ बडबडया दिसत नाहीं."

प्रशियन सैन्य नवीन पद्धतीवर सुधारण्यास लागणाऱ्या खर्चाची मंजुरी पार्लमेंट देणार नाहीं, असें भाकित पहिले वुइलियम यांनीं अगोदरच केलें होतें. हें त्यांचें भाकित अगदीं खरें ठरलें. पार्लमेंटांत झगडा करून खर्चाची मंजुरी मिळविण्यास लागणारें चातुर्य प्रधानमंळापैकीं एकाच्याहि आंगीं दिसून न आल्यामुळें नव्या प्रधानमंडळाची नेमणूक राजाला करावी लागली. बिस्मार्क यांच्या धैर्याचा व बुद्धिमत्तेचा उपयोग करून घेण्यास ही संधि चांगली आहे, असें पाहून राजानें त्यांची नेमणूक प्रधानमंडळाच्या अध्यक्षाच्या जागीं केली. ही गोष्ट इ. स. १८६२ च्या सप्टंबर महिन्याच्या २३ व्या तारखेस घडली.

---

## प्रकरण आठवें.

# नव्या मनूस सुरुवात.

" प्रधानमंडळाचें अध्यक्षस्थान स्वीकारल्याबरोबर जर्मन संस्थानांच्या आधिपत्याबद्दल आस्ट्रियाचा व आमचा जो तंटा आहे, तो शांततेनें आणि सौजन्यानें मिटवावा, यासाठीं मीं प्रथम खटपट सुरू केली. या कामांत

रशियाच्या मनांतहि आमच्याबद्दल थोडेंसें किल्मिष उत्पन्न झालें; पण त्याचीसुद्धां पर्वा न करतां हा तंटा विकोपास जाऊं नये, अशी तजवीज मी करीत आहें. राजकीय दृष्ट्या फ्रान्सची व प्रशियाची सध्यां मैत्री आहे, असें ह्मणावयास हरकत नाहीं. रशियाच्या बाबतींत आरंभापासूनच धोरण मैत्रीचें होतें. पोल लोकांनीं बंड केलें, तेव्हांहि रशियाशीं मैत्रीचेंच धोरण असणें इष्ट आहे, असें माझें मत मीं स्पष्टपणें कळविलें. यामुळें प्रशियांत सारें लोकमत माझ्याविरुद्ध झालें. सारे लोक संतापून जाऊन शिव्याशापांचा भडिमार मजवर करूं लागले. तथापि रशियाबद्दलच्या धोरणांत मीं बदल केला नाहीं. यानंतर आमचा संबंध कोणत्या प्रकारचा असावा, हाहि मोठ्या महत्वाचा मुद्दा होता. जर्मनीच्या आधिपत्याबद्दल आस्ट्रियाचें व आमचें भांडण मिटलें नसल्यामुळें फ्रान्सशीं कोणत्याप्रकारचा संबंध ठेवावा, या मुद्यास आणखी विशेषच महत्व प्राप्त झालें. फ्रान्सशीं जो व्यापारी तह आह्मी त्या वेळीं केला होता, त्यामुळें त्या देशाशीं आमचा संबंध सलोख्याचा झाला होता. ह्या तहाची मुदत भरतांच ( झॉलवेरीन ) व्यापारी निर्बंधाच्या बाबतींत आस्ट्रियाशीं आह्मास युद्ध करावें लागणार, हें कोणासहि उघड दिसून येणार होतें. सर्व जर्मनसंस्थानांनीं एक होऊन परस्परांस व्यापारी सवलती द्याव्या व प्रचंड झॉलवेरीन निर्माण करावें, अशी आमची इच्छा होती. उलटपक्षीं प्रशियन झॉलवेरीन मोडून टाकावें, अशी आस्ट्रियाची इच्छा होती. तेव्हां या बाबीचा निकाल युद्धावांचून लागणें शक्य नव्हतें. ही गोष्ट कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखी होती. आमच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्याकरतां अशा प्रकारचे व्यापारी निर्बंध हितकर होते. एवढेंच नव्हे तर तें अत्यंत जरुरीचेंहि होतें. यामुळें फ्रान्सशीं सलोख्यानें वागणें त्या वेळीं अत्यंत इष्ट वाटलें."

जर्मन पार्लमेंटांत इ. स. १८७९ च्या २१ फेब्रुआरी रोजीं जर्मनी व आस्ट्रिया यांजमधील व्यापारी तहाच्या वाटाघाटीच्या प्रसंगीं बिस्मार्क यांनीं वरील उद्गार काढले होते. प्रशियाच्या मुख्य प्रधानकीचीं सूत्रें बिस्मार्क यांच्या हातीं आलीं, त्या वेळीं प्रशियाची राजकीय परिस्थिति कोणत्या प्रकारची होती, याची रूपरेखा वरील उद्गारांत स्पष्ट दिसून येते.

ही राजकीय परिस्थिति प्रशियाच्या वाढीस फारशी अनुकूल नव्हती, हें कोणासहि दिसून येण्यासारखें आहे. या शिवाय आणखीहि जी एक अंत:स्थ अडचण होती, ती या वाढीस फार घातक होण्याजोगी होती. प्रशियन सरकारवर सामान्य प्रजाजनांचें मुळींच प्रेम नव्हतें; एवढेंच नव्हे, तर त्याबद्दल सामान्य विश्वासहि तिच्या मनांत नव्हता. लष्कराची सुधारणा करावी अशी सरकारची प्रबल इच्छा होती; पण त्याकरतां लागणारा पैसा अधिक करांच्या रूपानें देण्यास प्रजा तयार नव्हती. इ. स. १८१३ सालीं ज्या लँडव्हर अथवा दुय्यम सैन्यानें जसे प्रचंड विजय मिळविले, तसेच तें पुढेंहि मिळवील, असा भ्रम प्रजेच्या मनांत उत्पन्न झाला होता. तथापि युद्धपद्धतींत झालेला बदल सरकारच्या ध्यानीं पूर्णपणें आल्यामुळें युद्धाच्या प्रसंगीं लँडव्हर सैन्य भुसकुटासारखें उडून जाईल, अशी सरकारची खात्री झाली होती. उत्तम शिस्तींत पूर्णपणें शिकलेलें सैन्य जय्यत असल्याशिवाय प्रशियाच्या संकटाच्या प्रसंगीं दुय्यम तिय्यम प्रतीचें सैन्य मुळींच उपयोगी पडावयाचें नाहीं, हें सरकारास ठाऊक होतें.

सैन्याच्या सुधारणेसाठीं प्रशियन सरकारनें त्या वेळीं सुमारें साडेतेरा कोट रुपयांची मागणी केली होती. सांप्रतच्या लष्करी खर्चाच्या दृष्टीनें पहातां ही मागणी अगदींच थोडी होती; तथापि तेवढीसुद्धां लोकांनीं

त्यां वेळीं कबूल केली नाहीं. या पैशाचा उपयोग कसा व्हावयाचा होता, याबद्दल युद्धमंत्री जनरल फाँ रून यांनीं पुढील उद्गार काढले होते.

" लँडव्हर सैन्यांतील मनुष्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें रहातां येईल, अशी तजवीज सरकारनें करणें अवश्य आहे, आणि तशी तजवीज करावी हीच सरकारची इच्छा आहे. आमचें लँडव्हर सैन्य कुटुंबवत्सल माणसांचें आहे. पितृभूमीच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची वेळ आली, तर त्या वेळीं कुटुंबवत्सल माणसांस पुढें ढकलण्याच्या अगोदर राष्ट्रांतील तरुणांनीं सर्वांच्या पुढें चालावें, हें इष्ट आहे. लष्करी नौकरीची मुदत कमी करण्याचा सरकारचा बेत आहे. तसेंच युद्धाच्या वेळींहि लष्करी नौकरीची मुदत कमी करण्याची सरकारची इच्छा आहे. सध्यां जमीनदारांवर त्यांच्या मगदुराच्या मानानें जें अधिक कराचें ओझें पडत आहे, तेंहि कमी करून सर्वांवर त्यांच्या मगदुराप्रमाणें सारखेंच कराचें ओझें पडावें, अशी सरकारची इच्छा आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, सर्वांनीं आपल्या मगदुराप्रमाणें योग्य मदत सरकारास केली, तर हें सारें साधण्यास सरकारास अडचण पडणार नाहीं. आमच्याजवळ पुरेसा पैसा नसल्यामुळें $\frac{४}{५}$ सैन्यास लांब लांब मुदतीच्या रजा आम्हास द्याव्या लागतात. यामुळें इ. स. १८१५ सालीं जें सैन्यबळ आह्मांपाशीं होतें, तेंच आजहि आहे. तेव्हांपासून लोकसंख्या किती तरी वाढली असतां, सैन्याच्या बळांत मात्र वाढ झाली नाहीं, याचें कारण हेंच आहे. इ. स. १८२० सालीं फ्रेंच सैन्याची संख्या १,६९,००० असून प्रशियाचें सैन्य १,३०,००० होतें. इ. स. १८५४ सालीं फ्रान्सचें सैन्य ४,००००० झालें असून प्रशियाचें सैन्य १,३८,००० झालें आहे."

वरील आंकड्यावरून पाहतां लोकसंख्येच्या मानानें, प्रशियन सैन्याची वाढ झालेली नसून लष्करी नौकरीस योग्य अशा लोकांपैकीं चौथा हिस्सा नौकरींत दाखल झाला नव्हता, असें दिसून येईल. सैन्यांतील बहुतेक भाग लँडव्हर किंवा दुय्यम प्रतीचा असून सुमारें $\frac{1}{3}$ भाग मात्र पहिल्या प्रतीचा होता. यावरून लष्कराची सुधारणा होणें किती इष्ट होतें, हें कोणाच्याहि ध्यानीं येण्यासारखें आहे.

लष्कराची स्थिति सुधारण्यास राजे पहिले वुइलियम यांनीं एकदम कंबर बांधली. नौकरीची एकोणीस वर्षांची मुदत होती, ती त्यांनीं प्रथम सोळावर आणली व नंतर बारा वर्षांची ठरविली. राखून ठेवलेल्या सैन्याची मुदत दोन वर्षांऐवजीं चार वर्षांची केली. अशा रीतीनें कोणत्याहि वेळीं जय्यत असलेल्या सैन्याची संख्या त्यांनीं दोन लक्षांनीं वाढविली. सैन्यास नव्या पद्धतीच्या बंदुका त्यांनीं पुरविल्या व सैन्यासाठीं नव्या प्रकारची इतर सामग्रीहि निर्माण केली. सैन्याला नव्या पद्धतीचें शिक्षण देऊन त्यांनीं त्याला एकंदरीनें सर्व दृष्टींनीं अगदीं नमुनेदार लष्कर बनविलें. या साऱ्या सुधारणा राजे वुइलियम यांनीं स्वतः एकट्यानेंच पार पाडल्यामुळें या नमुनेदार सैन्याच्या जनकत्वाचा मान त्यांसच दिला पाहिजे.

या कामीं युद्धमंत्री फॉ रून आणि मुख्य सेनापति ( चीफ ऑफ दी जनरल स्टाफ ) फॉं मोल्टके या इतिहासप्रसिद्ध जोडीचेंहि त्यांस उत्तम सहाय्य मिळालें. या त्रिवर्गानें सैन्याच्या बाबतींत कसून मेहनत केल्यामुळें इ. स. १८६० च्या जुलई महिन्यांत या सर्व सुधारणा पूर्णपणें अमलांत आल्या. आतां यापुढें लागणाऱ्या अधिक खर्चास लोकनियुक्त सभेची मंजूरी मिळविणें, एवढेंच कायतें कार्य शिल्लक उरलें. परंतु लष्करावर अधिक खर्च करावयाचा नाहीं अशी जणूं काय या सभेनें प्रतिज्ञाच केली

होती असें दिसतें. पुढील खर्चास मंजुरी देण्याचें सभेनें नाकारलें, इतकेंच नव्हे, तर नवीं उभीं केलेलीं ११७ पलटणें कमी करून नव्या सुधारणाहि नाहींशा करून टाकाव्या असा हट्ट ही सभा घेऊन बसली.

अशा रीतीनें प्रशियाची स्थिति इ. स. १७६० सालीं मोठ्या पेचाची झाली होती. खडकाळ समुद्रांत सांपडलेल्या तारवाप्रमाणें ही राजनौका कोणत्या क्षणीं फुटेल हें कोणासहि सांगतां येण्यासारखें नव्हतें. अज्ञसभासद सैन्य कमी करण्यास पहात होते आणि सरकार सैन्याची वाढ झालीच पाहिजे, असें ह्मणत होतें. प्रधानमंडळास कोणत्याहि मार्गानें लोकांची समजूत घालतां येईना. बिस्मार्क हे या वेळीं प्यारीसमध्यें होते. त्यास बोलावून आणून मुख्य प्रधानपद द्यावें अशी सल्ला जनरल फॉं रून यांनीं राजाला दिली. राजाला ती पसंत पडून बिस्मार्क यांची त्यांनीं नेमणूक केली. ही नेमणूक जाहीर होतांच बिस्मार्क यांजविरुद्ध प्रशियामध्यें एकच काहूर उठलें. 'घमंडानंदन,' 'नेपोलियनचा भक्त,' 'उपटसूंभ,' 'शहरांचा काळ' इत्यादि शेलक्या शब्दांचा वर्षाव त्यांजवर होऊं लागला. 'राष्ट्राचें तारूं आतां फुटणार' असेंहि भविष्य कांहीं उदारमतवादी वर्तमानपत्रें वर्तवूं लागलीं. मुख्यप्रधान या नात्यानें प्रतिनिधिसभेंत त्यांचें पहिलें भाषण ज्या दिवशीं व्हावयाचें होतें, त्या दिवसाची वाट सारे लोक चातकासारखी पहात बसले. कारण त्या दिवशीं आपल्या राज्यधोरणाची रूपरेखा बिस्मार्क सांगणार होते. आपल्या प्रतिपक्षावर यथेच्छ तोंडसुख ते घेतील, असें सर्वांस वाटत होतें; पण तसें कांहीं न घडतां बिस्मार्क यांनीं प्रतिपक्षाशीं अगदीं शांततेचें धोरण स्वीकारलें. आपल्या पहिल्या भाषणांत ते ह्मणाले,

"सरकार व लोक यांजमधील तंट्याचें स्वरूप सामान्यतः वाटतें तितकें भयंकर नाहीं. वर्तमानपत्रांनीं त्याचा नसता बाऊ करून ठेवला आहे; पण हा

तंटा खरोखर इतक्या गंभीर स्वरूपाचा नाहीं. लोकांशीं तंटा करावा अशी सरकारची मुळींच इच्छा नाहीं. बनेल तोंपर्यंत परस्परांच्या संगनमतानेंच सर्व गोष्टी व्हाव्या अशीच सरकारची इच्छा आहे. आपल्या शरीराला झेपेल, त्याहून अधिक जड अशा प्रकारची शस्त्रसामग्री प्रशियाच्या राष्ट्रपुरुषाला शरीरावर बाळगणें भाग आहे, त्या अर्थीं ती सामग्री झेपेल असें आपलें शरीरबळ त्यानें वाढविलें पाहिजे. आपलें कल्याण करून घेण्याचे अनेक प्रसंग प्रशियानें आजवर फुकट घालविले आहेत; पण आतां असें होतां कामा नये. अशा संधीचा पूर्ण फायदा पदरांत पडेल अशी तयारी आतां राखली पाहिजे. व्हियेन्ना कांग्रेसच्या बैठकींत प्रशियाच्या ज्या सरहद्दी निश्चित झाल्या आहेत, त्या प्रशियाच्या राष्ट्रदेहाचें रक्षण करण्याजोग्या नाहींत. आपणापुढें सध्यां जें कोडें आहे, तें मोठमोठ्या भाषणांनीं अथवा नुसत्या मताधिक्यानें सुटण्यासारखें नाहीं. तें फक्त तरवारीच्या धारेनें आणि रक्तस्रावानें सुटणारें आहे."

हें भाषण प्रसिद्ध झालें, तेव्हां साऱ्या युरोपभर मोठी खळबळ उडाली. प्रशियांत होऊं पहाणाऱ्या बंडाळीचा बीमोड करण्यासाठीं बिस्मार्क हे कोठें तरी युद्ध उपस्थित करावयास पहात आहेत असें सर्वांस वाटलें.

या वेळच्या परिस्थितीचें वर्णन खुद्द बिस्मार्क यांनींच जॉन मोटले यांस लिहिलेल्या पत्रांत पुढीलप्रमाणें केलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

बर्लिन, १७ एप्रील, १८६३.

प्रिय मोटले,

तुमचें नऊ तारखेचें पत्र वाचून आनंद झाला. वारंवार व लांबलांब पत्रें लिहिण्याचें आश्वासन तुम्ही दिलें आहे, आणि हें तुमचें वचन तुम्ही पाळाल, तर मला खरोखर फार आनंद होईल. अंजिराच्या मेव्याचा जसा वाण्याला कंटाळा असतो, तसाच राजकारणाचाहि मला कंटाळा आहे. पण कीड लागू नये ह्मणून वाण्याला जसें या मेव्याकडे वारंवार पहावें लागतें, तसेंच राजकारण मला वारंवार चाळावें लागतें. हें पत्र मी लिहीत आहें, तथापि याक्षणीं सुद्धां माझ्या कानांत राजकारणाचा नाद घुमत आहे. अगदीं बालिश आणि माथेफिरू असल्या लोकांचीं अगदीं निरस आणि बेचव भाषणें तासांचेतास ऐकणें मला भाग पडतें. यामुळें वेळ नसतांहि कशी तरी फुरसद काढून तुह्मांला पत्र लि-

हिण्याचें आनंददायक काम करण्यास बसलों आहें. पार्लमेंटांतील प्रधानाचा अयोग्य धंदा करण्याचें माझ्या नशिबीं येईल, असें मला कधींहि वाटलें नव्हतें. परराष्ट्रीय वकील हा नौकर असला, तरी सभ्यतेचें आणि शिष्टाचाराचें उल्लंघन त्याला करावें लागत नाहीं. पार्लमेंटांतील प्रधान ह्मणजे निव्वळ बाजारी मनुष्य असतो. सध्यां माझी किंमत अशी झाली आहे.

ता. १८ एप्रील १८६२.

काल येथपर्यंत पत्र लिहून झाल्यानंतर आमची खाजगी बैठक समाप्त झाली. कारण मला कौन्सीलच्या सभेला जावें लागलें. तेथें पांच तास मोडले. नंतर सरकारस्वारीला रोजच्या कामकाजाचा रिपोर्ट देण्यांत एक तास खर्ची पडला. दुसऱ्या एका मेजवानीकडे तीन तास गेले. या तीन तासांत निरस आणि बेचव भाषणावांचून दुसरा कसलाहि फायदा झाला नाहीं. आज सकाळीं उठून बसतों न बसतों तोंच देनमार्क, इंग्लंड, पोर्चुगाल, रशिया आणि फ्रान्स इतक्या देशांचे वकील एकामागून एक येऊं लागले. दुपारीं एक वाजतां सभेस जाण्याची वेळ झाली ह्मणून त्यांना रजा देणें मला भाग पडलें. हें पत्रसुद्धां मी तेथेंच लिहीत असून कांहीं लोकांच्या मूर्खपणाच्या भाषणांतले कांहीं कांहीं शब्द मधून मधून माझ्या कानावर आदळत आहेत. बेल्जमबरोबर झालेले आमचे तह मंजूर करण्याचा सर्वांचा उद्देश आहे; तथापि आमचे वाक्पंडीत एकमेकांचे वाभाडे काढीत आहेतच. सर्वांचा उद्देश एकच; पण सर्वांच्या डोक्यांत तोच उद्देश उत्पन्न होण्याचीं कारणें वेगळीं असल्यामुळें कोणाचा कोणाशीं मेळ पडत नाहीं. क्षुल्लक गोष्टींत आमच्या पार्लमेंटांत अशा मारामाऱ्या होतात. तुह्मी अमेरिकन प्रतिनिधि झालां, तरी त्याच जातीचे आहां, हें मला ठाऊक आहे. आपण एकमेकांशीं कां भांडतों, यांतला मुद्दासुद्धां त्यांना ठाऊक नसतो. यावरून भांडण्यांत त्यांना मौज वाटते ह्मणूनच ते भांडतात. असल्या कोरड्या वाक्पांडित्यानें प्रशियाचा राज्यकारभार सुरळीत चालणें शक्य नाहीं. त्यांना कांहीं तरी आळा घालण्याचा उपाय मला शोधून काढला पाहिजे. हे लोक व्यक्तिशः थोडेसे बुद्धिवान् असले, तरी त्याहून घमेंडखोर मात्र अधिक असतात. त्यांत बहुतेक युनिव्हर्सिटीचे पदवीधर असतात; तेव्हां त्या मापानें मोजतां त्यांनां सुशिक्षित ह्मणणें अवश्य आहे; पण राजकारणाबद्दल ह्मणाल, तर स्वतःच्या घराच्या भिंतीबाहेरील जगाचीसुद्धां त्यांना जाणीव नसते. परक्या राष्ट्रांच्या माहितीबद्दल शाळेंतल्या मुलांची आणि त्यांची माहिती एकाच किंमतीची.

आतां मी झोंपीं जाण्याच्या तयारींत आहें. वर लिहिलेला भाग मला आतां पोरकट वाटूं लागल्यामुळें हें पत्र सगळेंच जाळून टाकावें असें मनांत येतें; पण दुसरें पत्र लिहिण्यास फुरसद मिळावयाची नाहीं. आणि तें अधिक चांगलें लिहिण्यास स्वस्थता तरी कोठें आहे? मी स्वस्थ बसलों ह्मणजे आपल्या शाळें-तल्या गमतीच्या दिवसांची आठवण मला हटकून होते. माझी बायको आणि सारीं मुलें तुझी वारंवार आठवण करीत असतात. आतां रामराम. इंग्रजी सारखी वेडीवांकडी भाषा पुढें आणखी लिहिण्याचें काम माझ्यानें होत नाहीं. तुझें अक्षर ह्मणजे शुद्ध कोंबडयांचे पाय असतात. माझेंहि तसेंच आहे काय?

तुझा जुना दोस्त—**बिस्मार्क.**

प्रतिनिधि सभेशीं सहकारितेनें वागण्याचें धोरण फारसें यशस्वी होणार नाहीं, ही गोष्ट बिस्मार्क यांच्या लक्षांत ताबडतोब आली. तेव्हां सरकारचे व सभेचे परस्पर संबंध कसे असावेत, याचें दिग्दर्शन त्यांनीं अधिक स्पष्टपणें सभेपुढें केलें. सरकारी कामदार ह्मणजे प्रतिपक्षी प्रतिनिधी नसून त्यांना वाटेल त्या प्रश्नाचीं उत्तरें देणें भाग पाडणें, हें सरकारच्या इभ्रतीस लांछन आहे, असें ते ह्मणाले. बिस्मार्क यांच्या या भाषणामुळें सर्व प्रतिनिधींत मोठी खळबळ उडून गेली. यानंतर १३ आक्टोबरपर्यंत सभेची बैठक तहकूब राहिली. या अवधींत कोणत्याहि महत्वाच्या मुद्याचा निकाल लागला नाहीं; तथापि अखेरीस आपला विजय होईल, अशी बिस्मार्क यांस पूर्ण खात्री होती. ता. ७ आक्टोबर सन १८६२ रोजीं आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांत ते ह्मणतात,

“सभेच्या चेंबरमध्यें बसून मी हें पत्र लिहित आहें. माझ्या नुकत्याच झालेल्या भाषणावर मूर्खपणाची टीका शेजारच्याच खोलींत कांहीं प्रतिनिधि करीत बसले आहेत. काम अतिशय पडलें आहे. पुरेशी झोंपसुद्धां न मिळा-ल्यामुळें मला फारच त्रास होतो. कोणत्याहि कामांत आरंभीं असा त्रास हो-णारच; पण परमेश्वराच्या कृपेनें शेवटीं सर्व कांहीं सुरळीत होईल अशी माझी खात्री आहे. फॉं रूनच्याच घरीं मी रोज जेवीत असतों. अरे, पण हें काय

झालें; पत्र लिहितांना मी कागद उलटाच धरला आहे. हा शकूनसुद्धां कांहीं वाईट नाहीं. रून माझ्याबरोबर नसता, तर मला अगदींच एकटें एकटें वाटलें असतें."

या आरंभींच्या दिवसांत बिस्मार्क यांस कामाचा किती त्रास पडे, याचें याहून चांगलें वर्णन त्यांनीं आपल्या बहिणीला लिहिलेल्या ता. १० आक्टोबरच्या पत्रांत केलें आहे.

"कामाचा बोजा दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. ८ ते ११ परकीय मुत्सद्यांच्या भेटी, ११ ते २॥ आमच्या प्रधानमंडळाचे लोकांशीं तंटे. २॥ ते ४ महाराजांची भेट. ४। पासून ४॥। पर्यंत घोड्यावरून पावसांत रपेट. भोजन ५ वाजतां. ७ ते १० सर्व प्रकारचें लेखन वगैरे काम. माझी प्रकृति बरी आहे."

खुद्द प्रधान मंडळाच्या लोकांबरोबरहि बिस्मार्क यांचें फारसें जमत नव्हतें, असें या उताऱ्यावरून दिसून येतें. एकंदरीनें पाहतां त्यांच्या आजूबाजूची सर्व स्थिति त्यांच्या कार्यास आणि भावनांस पोषक अशी नसून विघातकच होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. प्रशियाकडे मित्रत्वाच्या दृष्टीनें पाहणारें, असें बहुधा एकहि राष्ट्र त्या वेळीं युरोपांत नव्हतें. प्रशियाबद्दल इतर जर्मन संस्थानांच्या मनांत भयंकर तिरस्कार वसत होता. खुद्द प्रशियांत सुद्धां दुफळ्या आणि त्रिफळ्या माजल्या होत्या. बहुतेक लोकमत बिस्मार्कच्या विरुद्ध होत चाललें होतें. अशा प्रकारची हताश करणारी परिस्थिति आजूबाजूस असतांहि बिस्मार्क यांनीं आपलें अखेरचें साध्य आपल्या नजरे समोरून यत्किंचितहि हलूं दिलें नाहीं. पितृभूमिचे अंतस्थ व बाहेरचे शत्रू यांचा निःपात करून प्रशियाचें कल्याण साधावयाचें, हेंच त्यांचें अंतिम साध्य होतें. राजकीय दृष्ट्या सर्व जर्मन संस्थानांचें एकीकरण करून त्यांचें प्रबळ राष्ट्र बनविण्यास त्यांनीं मोठ्या धैर्यानें कंबर बांधली.

प्रतिनिधि सभेची बैठक तहकूब असतां मध्यंतरीं गेलेल्या काळांत पोल लोकांच्या बंडाचा बींमोड करण्याच्या हेतूनें रशियाबरोबर बिस्मार्क यांनीं एक नवा तह केला. इ. स. १८६३ च्या जानेवारी महिन्यांत सभेची बैठक पुन्हां चालू झाली. तेव्हां या तहाच्या बाबतींत सर्व प्रतिनिधींनीं बिस्मार्कविरुद्ध मोठी ओरड सुरू केली. उदारमतवादी पक्षानें तर बिस्मार्क यांस कामावरून दूर करावें, असाहि ओरडा चालविला. एकंदरीनें सारेंच राष्ट्र या वेळीं बिस्मार्क यांच्या विरुद्ध होतें.

या वेळीं आणखी एक नवेंच राजकीय प्रकरण उपस्थित झाल्यामुळें प्रशियाचें लक्ष घरच्या भानगडींतून निघून तिकडे गेलें. डेन्मार्कचा राजा सातवा फ्रेड्रिक हा इ. स. १८६३ च्या नवंबर महिन्याच्या १५ व्या तारखेस मरण पावला. यापूर्वीं चारच आठवडे लिप्झिगच्या प्रचंड जयाबद्दल पन्नासावा वार्षिकोत्सव प्रशियांत मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला होता. या उत्सवामुळें साऱ्या जर्मन राष्ट्राच्या मनांत राष्ट्रीय एकीचे विचार पुन्हां मोठ्या जोरानें प्रज्वलित झाले होते. सातव्या फ्रेड्रिकच्या मागून ख्रिश्चन नांवाचा राजा डेन्मार्कच्या गादीवर बसला. श्लेश्वीग–हॉलस्टीन या दोन जहागिऱ्यांबद्दल एक नवा जाहीरनामा त्यानें प्रसिद्ध केला. या जाहिरनाम्याच्या द्वारें हे दोन प्रांत वस्तुतः त्यानें आपल्या राज्यास जोडल्यासारखेच केले. इ. स. १४६० सालीं या प्रांतांनीं डेन्मार्कच्या राजाचें वर्चस्व कबूल केलें होतें; तथापि वस्तुतः त्यांचा अंतर्भाव जर्मन संहतींतच होत होता. या दोन जहागिऱ्यांवर कोणत्याहि स्त्रीची मालकी असूं नये, असें पूर्व कायद्याप्रमाणें ठरलें होतें. हा कायदा डेन्मार्कला लागू नव्हता. अशा स्थितींत डेन्मार्कच्या गादीला औरस पुत्राचा वंश नसेल, तेव्हां हॉलस्टीन आणि आगस्टनबर्ग येथील राजपुत्रानें श्लेश्वीग आणि हॉलस्टीन प्रांतांची जहा-

गिर संभाळावी असा करार इ. स. १८५२ च्या लंडनच्या तहांत नमूद करण्यांत आला होता. ख्रिश्चन राजानें हे प्रांत आपल्या राज्यास जोडल्यामुळें या अटीस अर्थातच हरताळ लागला.

या जाहागिऱ्यांसंबंधीं डेन्मार्कच्या राजानें जें वर्तन केलें, त्यामुळें साऱ्या जर्मनीभर मोठी खळबळ उडून गेली. डेन्मार्कच्या राजाचें हें वर्तन विश्वासघाताचें आहे, अशी ओरड साऱ्या जर्मनीभर सुरू झाली. जर्मन संस्थानांची आपसांत एकी नसल्यामुळें आपली ही दडपशाही खपून जाईल, अशी आशा डेन्मार्कच्या राजास वाटत होती. त्याच्या या वागणुकीबद्दल बिस्मार्क यांनीं एक निषेधप्रदर्शक जोराचा ठराव पास करून, तो सर्व राजांकडे रवाना केला. फ्रँकफर्ट येथील डायटनेंहि हॉलस्टीन प्रांतांत सैन्य पाठविण्यास आपली अनुमति दिली. जनरल फाँ हेक हे आपल्या बारा हजार सॅक्सन आणि हॅनोवेरियन सैन्यासह दिसेंबरच्या अखेरीच्या सुमारास हॉलस्टीन प्रांतांत शिरले. या वेळीं त्याजबरोबर हॉलस्टीन—ऑगस्टनबर्गचा राजपुत्रहि गेला आणि कील येथें त्यांनीं स्वतःस अभिषेक करवून आठवा फ्रेड्रिक असें नांव धारण केलें.

इंग्लंड आणि स्वीडन यांजकडून आपणास मदत मिळेल, अशा भरंवशावर डेन्मार्कनें हे प्रांत सोडण्याचें नाकारलें. डेन्मार्कनें या जहागिऱ्या सोडून द्याव्या यासाठीं फ्रँकफर्ट येथील आस्ट्रियन व प्रशियन प्रतिनिधींनीं अधिक निकराचा मार्ग स्वीकारण्यास संमति दिली. तथापि दुसऱ्या अकरा संस्थानांच्या प्रतिनिधींनीं या गोष्टीस आपली संमति दिली नाहीं. इतर संस्थानांचीं मतें बाजूस ठेवून आपली इच्छा दोघांनीं मिळून तडीस नेण्याचा निश्चय आस्ट्रिया व प्रशिया यांनीं केला. हा निश्चय जाहीर होतांच बाकीच्या संस्थानांत मोठी गडबड उडाली. 'आह्मी ऑगस्टनबर्गच्या

राजपुत्रासाठीं धडपड करीत नसून जर्मनीच्या हितसंबंधासाठीं ही सारी खटपट करीत आहों' असे उद्गार बिस्मार्क यांनीं काढल्यामुळें जर्मन संस्थानांस अधिकच चीड आली. प्रशियांतील लोकमतहि या मोहिमेस अनुकूल नव्हतें. या मोहिमेप्रीत्यर्थ लागणाऱ्या खर्चाला प्रशियन असेम्बलीची संमति मिळेना. हा खर्च निष्कारण आहे, असें सभेचें ह्मणणें होतें. प्रशियाची इभ्रत राखण्याकरतां व एकंदरीनें जर्मनराष्ट्राच्या हक्काच्या संरक्षणाकरतां ही मोहीम करणें जरूर आहे, असें राजानें परोपरीनें सभेला कळविलें. या वेळीं मागें सरणें हें प्रशियाच्या पूर्वेतिहासास साजेसें नसून अशी वर्तणूक एकंदर सर्व राष्ट्रास कमीपणा आणणारी आहे, ही गोष्ट सभेच्या ध्यानीं आणून देण्यास बिस्मार्क यांनींहि फार खटपट केली. तथापि या दोघांच्याहि खटपटीस यश न येतां ५१ विरुद्ध २७५ मतांनीं हा ठराव नापास झाला. तेव्हां बिस्मार्क ह्मणाले, 'अधिक पैसा तुम्ही न द्याल, तर मिळेल त्या पैशानेंच आह्मी हें काम हातीं घेऊं. तुमच्यासारख्या सत्पुरुषांची मदत आह्मास न मिळाली, तर सैतानाची मदत घेण्यासहि आह्मी मागें पुढें पाहणार नाहीं."

तारीख २८ जानेवारी रोजीं प्रशिया व आस्ट्रिया यांजमार्फत निकराचा खलिता डेन्मार्कच्या दरबारीं गेला व त्याच्या पाठोपाठच फील्ड-मार्शल रँगल यांच्या हाताखालीं साठ हजार फौज जय्यत होऊन बसली. निर्वाणीच्या खलित्यास समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळें तारीख १ फेब्रुआरी रोजीं संयुक्त सैन्यें इडर नदी पार झालीं व एकाच आठवड्याच्या अवधींत डेन सैन्यास त्यांनीं मागें हटविलें. डयानीश सैन्य ड्युपेल येथील तटबंदीचा आश्रय करून बसलें. तारीख १८ एप्रिल रोजीं प्रशियन सैन्यानें या तटबंदीवर निकराचा हल्ला करून तें ठाणेंहि काबीज केलें. तेव्हां ड्यानिश सैनाचा तळ आलसेन येथें गेला. येथेंहि

प्रशियाचा युवराज फ्रेड्रिक चार्लस् यानें त्याजवर हल्ला करून त्या सैन्यास दशदिशा उधळून लावलें. तारीख १८ जुलई रोजीं ख्रिश्चन राजानें युद्ध तहकूब ठेवण्याची मागणी केली व यानंतर तीन महिन्यांनीं व्हियेन्ना येथें पक्का तहनामा होऊन एल्ब नदीवरील या दोन्ही जहागिऱ्यांवरील सर्व हक्क सोडून ते प्रांत त्यानें आस्ट्रिया व प्रशिया यांच्या स्वाधीन केले.

या वेळीं या भानगडींत इंग्लंडनें जें वर्तन केलें, तें त्याच्या इभ्रतीस साजण्याजोगें आहे, असें म्हणतां येत नाहीं. या बाबींत इंग्लंडच्या प्रधानमंडळानें जे उद्गार काढले होते, त्यांवरून इंग्लंडची सशस्त्र मदत आपणास मिळेल, अशी आशा ड्यानिश लोकांस वाटत होती; पण अखेरपर्यंत त्यांची ती आशा सफल झाली नाहीं. प्रशियाच्या व आस्ट्रियाच्या या 'उद्दामपणाचा' निषेध करून इतर राष्ट्रांस शांततेच्या मार्गानें या तंट्याचा निकाल लावण्याची विनंति करून तेवढ्यांतच इंग्लंडनें समाधान मानलें. 'आह्मी बाकीचीं युरोपी राष्ट्रें एक होऊन तुमचा समाचार घेऊं' अशा धमक्या देऊन बिस्मार्क यांस भेडसावण्याचा यत्न इंग्लंडनें बरेच वेळां करून पाहिला; पण बिस्मार्क यांनीं त्यास भीक घातली नाहीं. 'बिस्मार्क हे कोणत्याहि उपायानें आपले शब्द खरे करण्यास चुकणार नाहींत.' असे उद्गार डिझरायली यांनीं दोनच वर्षांपूर्वीं काढले होते.

अशा प्रकारें ही भानगड मिटल्यानंतर आस्ट्रियानें हॉलस्टीनचा व प्रशियानें श्लेश्वीगचा कारभार आपल्या हातीं घेतला. यानंतर ऑगस्टनबर्गच्या राजपुत्राकडे ही जाहागीर चालावी कीं नाहीं, हा प्रश्न उपस्थित झाला. या जहागिरीवर या राजपुत्राचा वारसा कबूल करण्यास प्रशिया कबूल होता, पण कोणाहि राजाच्या वर्चस्वाखालीं न राहतां

ही गादी स्वतंत्र राजा म्हणून चालवूं असा हट्ट या राजपुत्रानें धरल्यामुळें त्याचें हें म्हणणें प्रशियास कबूल होईना. या राजपुत्राला आस्ट्रियाचें मात्र पूर्ण पाठबळ होतें. तेव्हां हे प्रांत प्रशियाच्या राज्यांत सामील करावेत अशा अर्थाचें बोलणें बिस्मार्क यांनीं आपल्या वकिलाच्या मार्फत व्हिएन्नाच्या दरबारीं सुरू केलें. सायलेशिया प्रांताचा कांहीं भाग आह्मास देत असाल, तर तुमचें हें म्हणणें आम्हीं मनास आणूं असा जबाब आस्ट्रियन प्रधान मेन्सडार्फ यांनीं दिला. ही तुमची अट आम्हास मुळींच कबूल नाहीं, असें बर्लिन दरबारानें आस्ट्रियास तावडतोब कळविलें.

प्रशियाच्या असेम्बलींत बिस्मार्क यांजविरुद्ध जी प्रतिकूलता पूर्वीं होती, ती दिवसेंदिवस अधिकच वाढूं लागली. प्रतिनिधींच्या तक्रारींकडे व मागण्यांकडे लक्ष द्यावयाचेंच नाहीं, असें धोरण बिस्मार्क यांनीं निश्चयानें अमलांत आणल्यामुळें त्यांजवर शिव्याशापांचा भडिमार उडूं लागला. एका प्रतिनिधीनें तर 'तुह्मी खोटें बोलतां' असा आरोप बिस्मार्क यांजवर भर सभेंत केल्यामुळें बिस्मार्क यांनीं त्याला द्वंद्वास आव्हान केलें; पण त्याचा स्वीकर करण्याची छाती प्रतिनिधीस न झाल्यामुळें ही गोष्ट तितकीच थांबली.

राजाच्या हुकुमानें तारीख १७ जून रोजीं प्रशियन डायटची सभा तहकूब झाली. त्या वेळीं अखेरचें भाषण करतांना बिस्मार्क म्हणाले, "आज तुम्ही राजाच्या विरुद्ध आहां; पण एक दिवस असा येईल कीं त्या दिवशीं सारें राष्ट्र राजाबद्दल आभारप्रदर्शक उद्गार काढील, हें ध्यानांत ठेवा." बिस्मार्क यांचें हें भविष्य कितपत बरोबर उतरलें, हें पुढें दिसून येईलच. अशा प्रकारें अनेक प्रकारच्या काळजींत चूर असतांहि बिस्मार्क आपल्या जुन्यापुराण्या मित्रांस विसरले नव्हते. मोटलेचें स्मरण

त्यांस झालें कीं, त्यांना विद्यार्थिदशेची आठवण होऊन, तींत ते पुन्हां कसे प्रवेश करीत, हें पुढील पत्रावरून दिसून येईल.

" बर्लिन, ता २३ मे १८६४.

जॅक, वेड्या तूं आहेस तरी कोठें ? मला एक ओळ खरडायला सुद्धां तुला वेळ नाहीं, इतक्या कोणत्या कामांत तूं गुंतला आहेस ? मी रात्रंदिवस हमालासारखें काम करतों आणि तुला पाय ताणून पडण्याशिवाय दुसरा उद्योग नाहीं. मग एकादें पत्र कां लिहित नाहींस ? मला तर पत्र लिहिण्यापुरतादेखील वेळ मिळत नाहीं. गेल्या पांच दिवसांत पंधरा मिनिटें हिंडण्यापुरता देखील वेळ मिळाला नाहीं. तूं इतका बहाद्दर आळशी आहेस कीं त्यामुळें तुला आपल्या जुन्या मित्रांचीहि आठवण होत नाहीं. चार दिवस बर्लिनला तरी कां येत नाहींस ? तूं आलास, तर आह्मां सर्वांनाच खरोखर फार आनंद होणार आहे. तूं आलास, तर आपल्या पहिल्या उपाहारगृहांत जाऊन जुन्या विद्यार्थीदशेची आठवण करण्याचें वचन मीं तुला देतों. मरू दे तें राजकारण. तूं कसेंहि करून येच. आपल्या जुन्या मित्रांना आणि त्यांच्या बायकापोरांना असें विसरून कसें चालेल ? तुला लवकर येतां येत नसलें, तर एक बोटभर चिठ्ठी तरी पाठीव.

**बिस्मार्क.**"

इ. स. १८६४ च्या उन्हाळ्यांत प्रशियाचे राजे दौऱ्यावर निघाले असतां बिस्मार्क त्यांजबरोबर होते. कार्लस्बाड, व्हियेन्ना, शॉनब्रुन आणि ग्यास्टीन इतक्या शहरीं राजाची स्वारी गेली होती. ग्यास्टीन शहरीं ता. २४ आगष्ट रोजीं आस्ट्रिया व प्रशिया यांजमध्यें एक तहनामा होऊन श्लेश्वीग व हॉलस्टीन प्रांताची कटकट तेवढ्यापुरती तरी मिटली. या तहाप्रमाणें श्लेश्वीग प्रांत प्रशियाला मिळून हॉलस्टीन आस्ट्रियाकडे गेला. या भानगडींत बिस्मार्क यांनीं जी कामगिरी बजाविली होती, तिचा मोबदला म्हणून बिस्मार्क यांस वंशपरंपरेनें चालणारी कौंटची पदवी तारीख १५ सप्टेंबर १८६५ रोजीं राजानें दिली. याशिवाय दोन गरुडांचा चांदहि त्यांस नजर मिळाला.

सप्टेंबरच्या अखेरीस नेपोलियन बादशहास भेटण्याकरतां बिस्मार्क हे बियारिट्झ् शहरीं गेले. प्रशिया व आस्ट्रिया यांजसंबंधीं बादशहाचा कल कसा काय आहे, हें जाणण्याचा बिस्मार्क यांचा उद्देश होता. एकंदरीनें या वेळीं या भेटीचा हेतु सफल होऊन प्रशियाचा पुढील मार्ग बराच मोकळा झाला.

इ. स. १८६६ सालच्या सुरवातीसच श्लेश्वीग-हॉलस्टीन प्रांतांत बंडावा झाला. या वेळीं आगस्टनबर्गचे राजपुत्र या प्रांतांत फिरतीवर निघाले होते. त्या प्रांतांतील लोकांकडून त्यांस अनेक मानपत्रेंहि मिळालीं ! प्रशियाच्या राज्यकारभाराविरुद्ध गडबड करण्यास या स्वारीकडून चांगलें उत्तेजन मिळाल्यामुळें तेथें अखेरीस बंड उद्भवलें. हॉलस्टीन प्रांताच्या आस्ट्रियन गव्हर्नरानें ऑल्टोना येथें सभा भरविण्यास लोकांना परवानगी दिली. या प्रांताचा राज्यकारभार बेशिस्तपणें चालला आहे, असा ठराव या सभेनें पास केला. गव्हर्नराच्या या कृत्यास व्हिएन्नाच्या दरबाराचीहि आंतून फूस होती. गव्हरनराची ही वर्तणूक ग्यास्टीन येथील तहाच्या अटीच्या विरुद्ध आहे, अशा अर्थाचा खलिता बिस्मार्क यांनीं व्हिएन्नाच्या दरबारीं रवाना केला. तेथील प्रधानमंडळानें कांहीं तरी गुळमुळीत उत्तर त्या वेळीं देऊन वेळ मारून नेली. यानंतर घरचे तंटे मिटवून राजाचें व प्रजेचें एक मत करण्याचा उपक्रम बिस्मार्क यांनीं केला; तथापि त्यांत त्यांस फारसें यश आलें नाहीं. अशा प्रकारच्या स्थितींत ता० २३ फेब्रुआरी रोजीं चेम्बरची बैठक खलास झाली.

याच महिन्यांत आस्ट्रियानें बोहेमिया प्रांतांत लष्कर जमविण्यास सुरुवात केली. इतर युद्धोपयोगी साहित्यहि तेथें जमा होऊं लागलें. अर्थात् प्रशियावरच्या स्वारीची ही तयारी होती. या लष्कराच्या हाल-

चालीचें कारण काय? असा प्रश्न प्रशियाकडून होतांच 'आमच्या प्रांतांतच बंड होण्याचा संभव दिसल्यामुळें ही जमवाजमव केली आहे' असा जबाब व्हिएन्ना दरबाराकडून आला. झपाट्यानें बदलत चाललेल्या परिस्थितीसंबंधीं पुढें विचार करण्याकरतां राजानें प्रधान मंडळाचें कौन्सिल भरविलें. नवे प्रांत आपल्या हातीं ठेवण्याकरतां जरूर पडेल तर युद्ध करण्यासहि मागेंपुढें पहावयाचें नाहीं, असा निश्चय या कौन्सिलांत ठरला. तारीख ८ एप्रिल रोजीं परस्परांस प्रसंगीं मदत करण्याचा एक गुप्त तहनामा इटलीबरोबर करण्यांत आला. या तहनाम्याची मुदत तीन महिन्यांपुरती होती. तीन महिन्यांच्या आंत युद्ध सुरू झाल्यास इटलीनें प्रशियाला मदत करावी, असें या तहानें ठरलें. आतां फ्रान्सचीच भानगड कायती मागें राहिली होती. आस्ट्रिया व प्रशिया यांजमध्यें युद्ध सुरू झाल्यास, त्यांत नेपोलियनला तटस्थ ठेवणें मोठ्या मुष्किलीचें काम होतें. मोसल आणि -हाइन या नद्यांमधील दोन किल्ले शिवाय करून बाकीचा प्रदेश नेपोलियन मागत होता. या मागणीला प्रशियाचा रुकार मिळणें अर्थातच शक्य नव्हतें. तेव्हां नेपोलियननें आस्ट्रियाकडे संधान बांधून प्रशियाच्या विरुद्ध असा त्याजबरोबर त्यानें करार केला. या कराराप्रमाणें सायलेशिया प्रांत आस्ट्रियाला मिळावयाचा होता. इतक्या साऱ्या भानगडींत नेपोलियनला नुसता झुलवीत ठेवून बिस्मार्क यांनीं आस्ट्रियाला त्याचें सहाय्य मिळूं दिलें नाहीं. बिस्मार्क यांची राजकारणीबुद्धि भयंकर कसास लागण्याचा हा प्रसंग होता आणि या प्रसंगांतूनहि बिस्मार्क आपल्या बुद्धीच्या जोरावर सुखरूप बाहेर पडले.

तारीख ७ मार्च रोजीं सैन्याच्या एकंदर परिस्थितीचा विचार करण्याकरतां व त्यास डेरेदाखल होण्यास हुकूम करण्याकरतां व्हिएन्ना येथें युद्धमंत्री मंडळाची बैठक झाली. ही हकीकत बिस्मार्क यांस समजतांच

त्यांनीं साऱ्या जर्मनसंस्थानांकडे खलिते पाठवून आस्ट्रिया युद्धास सज्ज होत असल्याची वार्ता त्यांस कळविली. तसेंच हें युद्ध सुरू झाल्यास सर्व जर्मन संस्थानांनीं प्रशियाला मदत करावी अशीहि विनंति त्यांनीं या खलित्यांत केली होती. या खलित्यास जर्मन संस्थानांकडून उडवाउड-वीचीं व जवळ जवळ नकारात्मक अशींच उत्तरें मिळालीं. तेव्हां युद्ध सुरू झाल्यास एकाहि जर्मन संस्थानाची मदत न मिळतां आपल्या स्वतः-च्याच हिमतीवर तें चालवावें लागेल, अशी बिस्मार्क यांची खात्री झाली.

तारीख ७ मे १८६६ रोजीं बिस्मार्क यांच्या जिवावरील एक मोठें अरिष्ट टळलें. बर्लिनमधील सुप्रसिद्ध अंटरडेनलिंडन नांवाच्या राजर-स्त्यावरून ते जात असतां फर्डिनंड कोरेनब्लाइन्ड नांवाच्या एका माथे-फिरूनें त्यांजवर चार गोळ्या झाडल्या. त्यामुळें खांद्यावर आणि कुशींत अशा दोन जखमा त्यांस झाल्या. या प्रसंगीं घाबरून न जातां कोहेन ब्लाइन्डचा पाठलाग करून बिस्मार्क यांनीं त्यास पकडलें व त्यास रस्त्यांतून त्या वेळीं जात असलेल्या कांहीं लष्करी लोकांच्या स्वाधीन केलें. तेथून बिस्मार्क सरळ आपल्या घरीं गेले व जणूं काय विशेष कांहीं घडलेंच नाहीं, अशा थाटानें आपल्या रोजच्या उद्योगास लागले. राजाला ही बातमी समजतांच ते स्वतः आपल्या राजकीय परिवारासह बिस्मार्क यांच्या भेटीस आले. त्यांत कांहीं प्रधान मंडळांतील लोक व बरेचसे सेनापतीहि होते. ही बातमी शहरांत फुटतांच लोकांचे थवेच्या थवे बिस्मार्क यांच्या घरासमोर जमले. तेव्हां त्या सर्वांस शांत करण्या कर-तां बिस्मार्क यांनीं एक भाषण केलें. " स्वदेशकल्याणासाठीं झटत असतां असें अपघाती मरण येणेंहि भाग्याचें आहे, " असें ते म्हणाले. या ब्लाइन्डनें कोर्टांत चवकशी होण्यापूर्वींच तुरुंगांत आत्महत्या करून स्वतःची मुक्तता करून घेतली.

---

प्रकरण नववें.

## आस्ट्रियाशीं युद्ध.

तारीख १ जून रोजीं श्लेश्वीग व हॉलस्टीन या दोन जहागिऱ्यांच्या प्रश्नांची चर्चा संयुक्त जर्मन डायट पुढें करण्याचें आस्ट्रियानें ठरविलें. त्याचप्रमाणें या दोन जहागिऱ्यांवर स्वतंत्र राजा असावा किंवा त्याचा अंतर्भाव कोणत्या तरी जर्मन संस्थानांत व्हावा, याबद्दल त्या प्रांतांतील लोकमत घेण्याकरितां त्या प्रांतांतील डायटच्या सभाहि भरविण्यास त्यांनीं हुकूम केला. त्या प्रांतांत अशा प्रकारच्या सभा भरविणें हें ग्यास्टीनच्या तहाच्या कलमाविरुद्ध आहे, असा आक्षेप प्रशियानें घेतला व जनरल फॉं मॅन्टयुफेल यास हॉलस्टीन प्रांत काबीज करण्यास पाठविलें. या हुकुमाप्रमाणें प्रशियन सैन्य त्या प्रांतांत शिरतांच त्यांस कोणत्याहि प्रकारचा अडथळा न करतां तेथील आस्ट्रियन लष्करानें आपला तळ मागें नेला.

तारीख ११ जून रोजीं फ्रँकफर्ट येथील सयुंक्त जर्मन डायटच्या आस्ट्रियन प्रतिनिधींनीं एक खास बैठक बोलावून प्रशियाविरुद्ध संयुक्त सैन्यें डेरेदाखल होण्यास सभेनें परवानगी द्यावी, अशी सूचना त्यांनीं सभेपुढें मांडली. ही सूचना पसार झाल्यास हेंच आम्ही युद्धाचें आव्हान समजूं, असें प्रशियन प्रतिनिधींनीं आस्ट्रियास कळविलें. यानंतर दुसऱ्याच दिवशीं बर्लिन दरबारांतील आस्ट्रियन वकील कौंट कारोली हे दरबार सोडून निघून गेले व या दोन राज्यांतील परस्पर राजकीय स्नेहसंबंध त्या दिवशीं तुटला.

तारीख १४ जून रोजीं प्रशियाखेरीज इतर संस्थानांनीं संयुक्त सैन्यें डेरेदाखल करावीं, असा ठराव संयुक्त जर्मन डायटमध्यें पास झाला. हा ठराव पास झाल्यामुळें जर्मन संस्थानांची पूर्वी झालेली संहति आतां

नष्ट झाली असून यापुढें नवी संहति निर्माण करण्यास प्रशिया मोकळा झाला आहे, अशी नोटीस प्रशियन प्रतिनिधींनीं सर्व संस्थानांस दिली. या प्रसंगीं पंधरा पैकीं सहा संस्थानें प्रशियाच्या बाजूस होतीं.

युद्धाच्या प्रसंगीं जर्मन संस्थानांनीं आपणास मदत करावी, यासाठीं सामदामदंडभेदादि सर्व उपायांची शिकस्त बिस्मार्क यांनीं करून पाहिली; तथापि या खटपटीचा फारसा उपयोग न होतां, बरींचशीं संस्थानें आस्ट्रियाच्या बाजूस गेलीं. बेडन संस्थानाधिपति खुद्द राजाचा जांवई असतांहि ‘ परिस्थितीची ’ सबब सांगून आस्ट्रियालाच मिळाला. आस्ट्रियाच्या प्रबळ साम्राज्याचा धाक सर्वांसच वाटत होता. आस्ट्रियाच्या बाजूस गेलेल्या जर्मन संस्थानांच्या सैन्यांचा तळ मेन नदीच्या कांठानें पडला. यांत फक्त हॅनोव्हर संस्थानाचें सैन्य नव्हतें. या सैन्यानें एक लहानशी लढाई लँजेनसाल्झा येथें स्वतंत्रपणें करून तींत जयहि मिळविला; पण तारीख २७ जून रोजीं या सैन्याला आपलीं हत्यारें शत्रूच्या स्वाधीन करावीं लागलीं.

यानंतर पोडोल, मुंचेनग्राड्झ्, हुनरवेसर, जिशचिन्, टॉटेना, नॉचोड्, स्कालिटझ्, श्वीनशॉडेल, आणि कॉनिजिनहोप इतक्या ठिकाणीं एका मागून एक लढाया जिंकून प्रशियन सैन्य त्वरेनें आस्ट्रियाच्या बोहेमिया प्रांतांत शिरलें. या साऱ्या लढाया तारीख २६ ते २९ जून येवढ्या चारच दिवसांच्या अवधींत प्रशियानें जिंकल्या. यानंतर कॉनिग्ग्राड्झ् अथवा सॅडोबा येथें या दोन्ही मुख्य सैन्यांची गांठ पडून प्रचंड लढाई झाली व तींत प्रशियाचे युवराज फ्रेड्रिक वुइलियम हे ऐनवेळेवर दाखल होऊन त्यांनीं चांगली कामगिरी बजाविल्यामुळें मुख्य सेनापति फॉँ मोल्टके यांचा सर्व डाव पूर्ण यशस्वी झाला. या लढाईंत आस्ट्रियाच्या सर्व सैन्याचा इतका चुराडा उडाला कीं, पुन्हां शस्त्र धरण्याचें सामर्थ्य

त्यांस उरलें नाहीं. या सैन्याला मदत करण्याकरतां व्हिएन्नाहून येत असलेल्या बेनेडेग याच्या हाताखालच्या आस्ट्रोसाक्सन सैन्याचाहि प्रशियानें पुरा मोड करून त्याची त्यानें धुळधाण उडविली. अशा रीतीनें प्रशियानें या युद्धांत अपूर्व यश मिळविलें.

या वेळीं बिस्मार्क यांस जेवणासहि फुरसत न मिळण्याइतकें काम पडत होतें. तथापि तेवढ्या गडबडींतहि आपल्या घायाळ बांधवांचा समाचार घेण्यास ते चुकत नसत. तारीख २२ जुलई रोजीं आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात. " हजार हजार चिरुटांच्या कांहीं पेट्या जमल्यास या स्वारांबरोबरच पाठवाव्यात. देशकल्याणासाठीं जखमी झालेल्या माझ्या शिपायी मित्रांना त्या हव्या आहेत. "

या नंतर आणखी एका आठवड्यानें लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात.

" वरून पाऊस मी म्हणतो. तळावर गडबड असल्यामुळें चांगलीशी झोंपहि मिळत नाहीं. पायांतील बुटांचे तळ फाटून गेले आणि पोटांत अन्नहि भरपूर नाहीं; अशा भयंकर स्थितींत सुद्धां आमच्या शिपायांनीं असामान्य धैर्य दाखविलें. अशा स्थितींत सुद्धां अगदीं शांत राहून त्यांनीं शिस्त मोडली नाहीं. त्यांची वर्तणूक सर्व प्रकारें किती चांगली होती म्हणून सांगूं ? शत्रूच्या मुलुखांत शिरल्यावर त्यांनीं लूटफाट केली नाहीं अथवा कोठें आगीहि लावल्या नाहींत. मिळेल तसली शिळीपाकी भाकर खाऊन स्वदेशासाठीं ते मरण्यास सज्ज झाले आहेत. "

एका ठिकाणीं हातघाईची लढाई चालली असतां खुद्द राजेसाहेबांनीं आपला घोडा धिटाईनें तेथें घातला. त्यांच्या आजूबाजूस अगदीं नजीक तोफांचे गोळे फुटत होते. त्यांच्या आजूबाजूस घोडेस्वार रक्तबंबाळ होऊत पटापट पडत होते. एकदोन गोळे तर सरकार स्वारीच्या अगदीं डोक्याजवळून गेले. एक गोळा थेट त्यांच्या पायापाशीं पडला; पण सुदैवानें तो फुटला नाहीं म्हणून बरें. शेवटीं मी तेथपर्यंत गेलों आणि जबरदस्तीनें महाराजांस मागें ओढून आणलें. एका अर्थी महाराजांच्या या धाडसामुळें मला संतोष झाला. अशी

वीरवृत्ति न दाखवितां ते निर्भयस्थळीं राहिले असते, तर मला वाईट वाटलें असतें. "

बिस्मार्क हे जखमी लोकांसंबंधीं किती काळजी बाळगीत असत, हें त्यांनीं स्वतःच सांगितलेल्या पुढील एका गोष्टीवरून दिसून येतें. "कॉनिग्ग्राड्झ येथें माझ्यापाशीं एकच चिरूट शिल्लक राहिला होता. एकादा कृपण आपल्या डबोल्याला जितका जपतो, तसा मी त्या चिरुटाला जपत होतों. लढाई सुरू असतां, त्याला मीं स्पर्शहि केला नाहीं. जय झाल्यानंतर तो ओढतांना किती मजा येईल, याचें चित्र आपल्या मनापुढें रंगवून त्यांतच मी समाधान मानीत होतों. इतक्यांत एक घोडेस्वार जखमी होऊन घोड्यावरून पडला असल्याचें मला आढळून आलें. त्या बिचाऱ्याचे दोन्ही हात रक्तबंबाळ झाले होते. मला पाहून तो विडी मागूं लागला. मीं आपले सर्व खिसे शोधले, पण थोड्याश्या नाण्यांशिवाय मला कांहीं सांपडलें नाहीं. इतक्यांत माझ्या त्या चिरुटाची आठवण मला होऊन तो बाहेर काढून भरकन् पेटवून त्याच्या तोंडांत घातला. त्या वेळीं त्याच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेचें जें मंद हास्य उमटलें, तें पाहून मलाहि आनंदाचें भरतें आलें. तो चिरूट मी स्वतः ओढला नाहीं, हें खरें, पण त्या वेळीं जें समाधान मला झालें, तसें स्वतः चिरूट ओढून पुन्हां केव्हांहि झालें नाहीं."

अशा रीतीनें आस्ट्रियन सैन्याची पूर्ण दाणादाण उडविल्यानंतर प्रशियन सैन्याचा मोर्चा बव्हेरियन सैन्याकडे वळला. तारीख १४ जुलई रोजीं अॅशाफेनबर्गची लढाई जिंकून विजयी प्रशियन फौजा ता. १६ रोजीं मेन नदीवरील फ्रॅंकफर्ट शहरांत शिरल्या. येथून त्यांनीं म्युनिच शहराकडे आपल्या ढाला फिरविल्या होत्या; पण शत्रूनें तहाचें बोलणें लावल्यामुळें प्रशियन सैन्य तेथेंच राहिलें. या युद्धाचा शेवट अगदीं

थोड्या काळांत लागला. किंबहुना इतक्या लवकर निकालास लागलेलें युद्ध जगाच्या इतिहासांत दुसरें नाहीं. त्याचप्रमाणें या युद्धामुळें जर्मनीच्या राजकीय परिस्थितीवर जेवढे चिरस्थायी व महत्वाचे परिणाम घडून आले, तेवढे ते दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें घडले नाहींत. हा काळ पर्यंत सारीं जर्मन संस्थानें परस्परांपासून पूर्ण विभागलेलीं होतीं. त्यांच्यांत अंत:स्थ कलहाचें खूळ माजलें होतें. एकराष्ट्रीयत्वाचा ओ ना मा जर्मनी या युद्धांत प्रथम शिकला. सर्व जर्मन संस्थानांचें ऐक्य झालेंच पाहिजे, ही कल्पना झाडून सर्व संस्थानांत पक्की रुजली जाऊन तद्विरुद्ध कल्पना आपोआपच मागें पडल्या. सर्व जर्मन लोकांत एकराष्ट्रीयत्वाचें बीज पेरावें, हें जें बिस्मार्क यांचें अंतिम साध्य, त्याचें बीज या युद्धांत पेरलें गेलें. बिस्मार्क हे निव्वळ बढाईखोर घमंडानंदन आहेत, आणि स्वत:चें नुसतें महत्व वाढविण्यासाठींच ते उद्योग करीत असतात, असा जो समज त्यांच्या शत्रूंनीं लोकांत फैलाविला होता, तो दूर होण्यास या वेळीं प्रारंभ झाला. या एकाच वज्राघातानें बिस्मार्क हे केवळ प्रशियनांचेच नव्हे, तर सर्व जर्मनांचे आवडते झाले. राजे वुइलियम आणि त्यांचे प्रधान बिस्मार्क या जोडीनें परस्पर पूर्ण सहकारितेनें आणि एकमेकांच्या पूर्ण विचारानें जी ही अतुल कामगिरी केली, तिजकडे सारें जग मोठ्या कौतुकानें पाहूं लागलें. आपसांतील तंटेभांडणें कशाहि प्रकारचीं असलीं, तरी आपलें मातृराष्ट्र यापुढें खास उदयास येणार व पूर्वीपेक्षांहि अधिक किंमतीची कर्तबगारी तें करून दाखविणार, असा भरंवसा प्रत्येक जर्मनाच्या मनांत उत्पन्न झाला. हा भरंवसा अस्थानीं नव्हता, हें इतिहासानेंहि पुढें सिद्ध केलेंच. इ. स. १८७१ सालीं व्हर्सेलीस येथें जें प्रबळ राष्ट्र जन्मास आलें व ज्याकडे पाहून साऱ्या युरोपनें आश्चर्यानें तोंडांत बोट घातलें, त्या प्रबळ जर्मन राष्ट्राचा

गर्भसंभव या युद्धांत झाला. तारीख ४ आगष्ट रोजीं राजे वुइलियम यांनीं आपल्या परिवारासह बर्लिन राजधानींत मोठ्या थाटाचा विजय-प्रवेश केला. खुद्द राजांच्या स्वारीबरोबर बिस्मार्क व कांहीं सेनापती घोड्यावरून चालत होते. या प्रसंगीं बिस्मार्क आपल्या जवळून चाललेल्या एका सेनापतीला म्हणाले, " आपल्या अजमासाहून फारच लवकर आपण परत फिरलों." यावर त्या सेनापतीनें ताबडतोब उत्तर दिलें, " होय साहेब. आपला हा एकच अजमास अजिबात चुकला खरा. "

जर्मन संस्थानांवर प्रशियाचें वर्चस्व असावें, या प्रश्नाचा निकाल अशा रीतीनें लागल्यानंतर आस्ट्रियाशीं पूर्वींचा स्नेह संपादन करण्याचा उद्योग बिस्मार्क यांनीं सुरू केला. तहाच्या वेळीं प्यारीस दरबारातर्फे कौंट बेनेडिटी हे मध्यस्थी करावयास आले होते. या तहांत हॅनोव्हर, हेसे, आणि साक्सनी हीं संस्थानें प्रशियास मिळावीं, अशी मागणी बिस्मार्क यांनीं केली. त्यांपैकीं साक्सनीची मागणी आस्ट्रियन बादशहानें नाकबूल केली. कौंट बिस्मार्क यांनींहि अधिक ओढून न धरतां बादशहाचें ह्मणणें कबूल केलें. तारीख २६ जुलई रोजीं निकोल्सबर्ग येथें तह होऊन हें आस्ट्रो-प्रशियन युद्ध संपलें. या तहानें जर्मन संस्थानांवरील आस्ट्रियाचें वर्चस्व नष्ट झालें आणि हॅनोव्हर, हेसे क्यासल, हेसे होम्बर्ग, न्यॅसो व श्लेस्वीग-हॉल्स्टीन-लायेनबर्ग हे प्रांत प्रशियन राज्यांत सामील झाले. तसेंच सुमारें नऊ कोट रुपयांची खंडणी प्रशियाला आस्ट्रियाक-डून युद्धखर्च ह्मणून मिळाली. या युद्धसमाप्तीनंतर सर्व उत्तर जर्मन संस्थानें प्रशियाच्या वर्चस्वाखालीं एक झालीं. व यानंतर लवकरच या संयुक्त राज्यानें दक्षिण जर्मन संस्थानांशीं तह केला. या युद्धांत मध्यस्थाचें काम करून ऱ्हाईन सरहद्दीवरील मेंझचा किल्ला उपटावा असा नेपोलि-

यनचा बेत होता. प्रशियानें या युद्धांत अतुल विजय मिळविला, यामुळें फ्रान्स देशाला कमीपणा आला, असें सर्व फ्रेंच लोकांस वाटूं लागलें होतें! मेझचा किल्ला घेतां आला, तर या विजयांत थोडें तरी विरजण पडेल, असें नेपोलियन यास वाटलें; पण त्याचा हा बेत सिद्धीस गेला नाहीं. प्रशियाच्या या विजयानें फ्रेंच लोकांस किती विशाद वाटला, हें पुढें चार वर्षांनीं दिसून आलेंच. फ्रँकोजर्मन युद्ध पुकारलें गेलें, त्या दिवशीं ‘ सॅडोवाचा सूड ’ ( Revanche Pour Sadowa ) असें ओरडत फ्रेंच लोकांच्या टोळ्यांच्या टोळया रस्त्यांत हिंडत होत्या. हें आस्ट्रोप्रशियन युद्ध सुरू होण्यापूर्वी इटलीनें आपणास युद्धप्रसंगीं मदत करावी, अशा अर्थाचा तह त्या देशाशीं झाला होता, ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत असेलच. ऑस्ट्रोप्रशियन युद्ध सुरू होतांच, त्या तहास अनुसरून इटलीनें आस्ट्रियावर दक्षिणेकडून स्वारी केली. इटालियन व आस्ट्रियन या दोन सैन्यांची गांठ कस्टोझा येथें पडून त्यांत इटालियन सैन्याचा पुरा मोड झाला. त्याच प्रमाणें लिसा बंदराजवळ एक आरमारी लढाई होऊन तींत इटालियन आरमाराचाहि मोड झाला; पण प्रशियानें मोठा विजय मिळवून व्हेनीस बंदर या तहांत आस्ट्रियाकडून इटलीस देवावलें. अशा रीतीनें जर्मनी व इटली यांचें नातें उपकाराच्या दुव्यानें जोडलें गेलें.

या वेळीं बिस्मार्क यांचे ग्रह चांगलेच जोरावर होते, असें ह्मणावयास हरकत नाहीं. पूर्वींच्या अहितकारक भासणाऱ्या गोष्टीहि आतां त्यांस पोषक होऊं लागल्या. पूर्वींचा परस्परांशीं भांडणारा जर्मन संस्थानांचा संघ नष्ट होऊन त्या जागीं एकजुटीचें जर्मनराष्ट्र अस्तित्वांत आलें. आतां त्याचा नामकरणविधि मात्र होणें बाकी राहिलें होतें. फ्रान्सच्या नेपोलियन बादशहाला नुसतीं कागदी घोडीं नाचवून व अनेक लांबलांब

गोष्टी सांगून बिस्मार्क यांनीं या युद्धांतून त्याला अलिप्त ठेवलें होतें. थोड्याच महिन्यांपूर्वी ज्या गृहस्थाला नेपोलियन बादशहानें 'महामूर्ख' असें सार्टिफिकिट दिलें होतें, त्यानेंच खुद्द त्या बादशहाला अशा रीतीनें सपशेल चकविलें. फ्रेड्रिक दी ग्रेटच्या अमदानींत प्रशियाला जें महत्व होतें, तें त्यास किंग वुइलियमच्या कारकीर्दींत या वेळीं पुन्हां प्राप्त झालें.

राजे वुइलियम, बिस्मार्क, मोल्टके आणि रून या चौकडीचा विजय-प्रवेश बर्लिन शहरीं झाला, तेव्हां लोकांनीं त्यांचें स्वागत अपूर्व थाटानें केलें, यांत नवल नाहीं. बिस्मार्क यांच्या कर्तबगारीबद्दल जी कांहीं शंका प्रशियाला यापूर्वी होती, ती सारी नष्ट होऊन बिस्मार्क यांनीं लोकांच्या हृदयांत प्रेमाचें आणि अभिमानाचें स्थान पटकाविलें.

---

## प्रकरण दहावें.

# वादळानंतरची शांतता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

इ. स. १८६६ ची मोहीम सुरू होण्यापूर्वी प्रशियाची असेम्बली [ पार्लमेंट ] बरखास्त करण्यांत आली होती. कारण प्रतिनिधी आणि सरकार यांच्यांतील मतभेद या वेळीं इतका विकोपास गेला होता कीं, अशा स्थितींत या प्रतिनिधीसभेचें अस्तित्व राहूं देणें सरकारास इष्ट वाटलें नाहीं ! यानंतर आस्ट्रो-प्रशियन युद्धांत प्रशियानें जे प्रचंड विजय मिळविले, त्यांजमुळें सरकाराबद्दल लोकांत बरेंच अनुकूल मत असावें, असा अजमास करून ही सभा पुन्हां भरविण्याची शिफारस प्रधानमंडळानें राजास केली. प्रधानमंडळाचा हा क्यास चुकला नव्हता, हें पुढें प्रत्यक्ष दिसून आलें. या नव्या बैठकींत सरकारास अनुकूल अशा मतांच्या प्रतिनिधींचा भरणा अधिक होऊन सरकार व लोकमत

यांच्यांत अधिक सलोखा उत्पन्न झाला. या पूर्वींची सभेची बैठक बरखास्त करतांना राजाला जो थोडासा बेकायदेशीरपणा करावा लागला होता, त्या दोषांतून त्याला मुक्त करण्याकरतां एक ठराव बिस्मार्क यांनीं प्रथम या सभेपुढें आणला. अशा रीतीनें लोक व सरकार यांचें ऐक्य अधिक दृढ करण्याचा बिस्मार्क यांचा मानस होता; पण अशा प्रकारचा ठराव पुढें येणें हें प्रधानमंडळांतील इतर सभासदांना फारसें आवडलें नाहीं, असें दिसतें. या विषयासंबंधीं बिस्मार्क स्वतःच ह्मणतात, "हा ठराव पुढें आणणें हें मोठें कठिण काम होतें. राजेसाहेबांना आपला अपमान होतोसें वाटलें. प्रतिनिधी सभेपुढें अशा रीतीनें एक प्रकारची क्षमेची याचना करणें आपल्या इभ्रतीस कमीपणा आणणारें आहे, असें राजेसाहेबांचें मत होतें. यांत कोणताहि कमीपणा नाहीं, ही गोष्ट महाराजांच्या मनावर मला वारंवार ठसवावी लागली."

अशा रीतीनें बिस्मार्क व राजे वुइलियम यांजमध्यें बराच वादविवाद झाल्यानंतर आपल्या भाषणांत या विषयाचा उल्लेख करण्याचें अभिवचन राजानें दिलें व तारिख ५ आगष्ट सन १८६६ रोजीं सभेंत प्रारंभींचें भाषण करतांना राजे वुइलियम यांनीं त्याप्रमाणें या विषयाचा उल्लेख केला. राजाच्या या औदार्याचा प्रतिनिधींवर इतका परिणाम झाला कीं, त्यांच्या चित्तांत जें थोडें किल्मिष बाकी होतें, तें पार नाहींसें होऊन सर्वांचें पूर्ण समाधान झालें. यानंतर तारीख ३ सप्टंबर रोजीं सुमारें चवदा कोट रुपयांची रक्कम सैन्याच्या तयारी करतां प्रनितिधी सभेंत मंजूर करण्यांत आली. या वेळीं या युद्धामुळें फ्रान्समध्यें जी खळबळ उडाली होती, तीवरून प्रशियाला युद्धाची तयारी जय्यत ठेवावी लागणार, हें सर्वांस स्पष्टपणें कळण्यासारखें होतें. याच वेळीं सुमारें पन्नास लक्ष रुपयांची रक्कम बक्षिसें देण्याकरतां मंजूर झाली. यापैकीं सुमारें

दहालक्ष रुपये राजानें बिस्मार्क यांस बक्षिस दिले. याच रकमेंतून बिस्मार्क यांनीं पोमेऱ्यानिया प्रांतांतील व्हार्जिन गांवाची मिळत पुढें खरेदी केली.

यानंतर जर्मनसंस्थानांच्या एकीकरणाच्या अंतर्घटनेस सुरुवात झाली. उत्तरेकडील बहुतेक जर्मन संस्थानें एकीस अनुकूल होतींच; तथापि त्यांतील कांहीं बारीकसारिक संस्थानें अद्यापि मागेंपुढें करीत होतीं. रूसग्रीझ् नांवाच्या गांवाची जहागिरदारीण या एकीकरणास फार प्रतिकूल होती. शेवटीं ग्रीझ् येथें दोन प्रशियन पलटणी आल्याबरोबर तिनें खंडणी भरून आपली मुक्तता करून घेतली व नव्या संघटनेंत आपल्या जहागिरीचा अंतर्भाव करण्यासहि ती राजी झाली. सॅक्समिरिंजेन येथील ड्यूकनें आपल्या गादीचा राजीनामा दिला. प्रशियाचे वर्चस्वाखालीं राहणें त्यास पसंत नव्हतें. त्याच्या पाठीमागून गादीवर आलेल्या त्याच्या मुलानें प्रशियाचें वर्चस्व कबूल करून जर्मन संहतींत आपला प्रवेश करून घेतला. हॅनोव्हर व दुसरीं दोन तीन संस्थानें या एकीकरणास कबूल नव्हतीं. त्यांच्या अधिपतींस बिस्मार्क यांनीं अनेक प्रकारें उपदेश केला, तथापि त्यांजकडून कबुली येत नाहीं, असें पाहून बिस्मार्क यांनीं हीं संस्थानें प्रशियास जोडलीं. यामुळें या संस्थानांतून बिस्मार्क यांजविरुद्ध बरेंच काहूर उठलें. धमकीचीं शेंकडों पत्रें बिस्मार्क यांस आलीं. त्यांतील कांहीं पत्रें उपलब्ध झालीं आहेत.

ब्रॅयटन.

" महाराज, आपण या वेळेस सुटलांत, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे; पण सारेच देशाभिमानी अद्यापि मेलेले नाहींत. तुह्मास ते किड्यासारखे चिरडून टाकतील. फर्डिनंड ब्लाइन्डसारखा सर्वांचाच नेम चुकतो असें नाहीं. खंजिर आणि विष हीं ध्यानांत असूंद्या. "

* * * * *

“ माझा नेम कधीं चुकतच नाहीं. जगाला आतां अखेरचा रामराम करून घ्या. सगळ्या लोकांच्या शिव्याशाप खातखात आपली स्वारी मृत्यूच्या दरबाराकडे लवकरच रवाना होईल. होहेन झोलर्न आणि बिस्मार्क हीं नांवें धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा निःपात करण्याची शपथ मीं घेतली आहे.

**वुइलियम जार्ज,**

एलाशॉपेल जवळील स्टोलबर्ग येथील तालीम मास्तर.”

*　　　*　　　*

“प्रशियाच्या पलटणी आपली सरहद्द सोडून ज्या दिवशीं आपल्या जर्मन बांधवांवर हल्ला करतील, त्याच दिवशीं बिस्मार्क यांच्या डोक्यांतून एक बंदुकीची गोळी आरपार निघून जाईल. मी त्यांच्या छातीवर नेम मारणार नाहीं. कारण ते चिलखत घालतात, हें मला माहीत आहे. माझा नेम कालत्रयांतहि चुकणार नाहीं. हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें.

देशासाठीं रक्ताची तिलांजली देणारा.”

*　　　*　　　*

उत्तरेकडील जर्मन संस्थानांची रीशस्ट्याग अथवा पार्लमेंटची सभा बर्लिनच्या राजवाड्यांत तारीख २४ फेब्रुआरी सन १८६७ रोजीं भरली. उत्तरेकडील जर्मन संस्थानांनीं या बैठकीकरतां एकंदर तीनशें सभासद तीन वर्षांच्या मुदतीनें निवडून दिले होते. याच वेळीं बंडस्राथ नांवाची दुसरी राजास सल्लामसलत देणारी सभा निर्माण होऊन तिच्या अध्यक्षाच्या जागीं प्रशियाच्या राजाची नेमणूक झाली. रीशस्ट्याग व बंडस्राथ यांनीं केलेल्या ठरावांची अम्मलबजावणी करण्याची व संयुक्त संस्थानांच्या सैन्याचें अधिपत्य स्वीकारण्याची सत्ता प्रशियाच्या राजास मिळाली. रीशस्ट्याग सभेंत संस्थानांच्या प्रजेचे व बंडस्राथमध्यें खुद्द संस्थानिकांचे प्रतिनिधी असावेत असें ठरलें. संहतींतील सैन्याची रचना प्रशियन लष्कराच्या धर्तीवर व्हावी, असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें युद्ध पुकारणें व तह करणें हे अधिकारहि प्रशियाच्या राजाच्या हातीं देण्यांत आले.

राज्यशासनास लागणारा खर्च संस्थानांतील लोकसंख्येच्या मानानें सर्व संस्थानांवर प्रमाणशीर वांटण्यांत आला. सर्व संस्थानांस सामान्य अशा ज्या हितसंबंधाच्या गोष्टी असतील, त्यांचा विचार बंडस्राथ व रीशस्थाग यांजमध्यें होऊन बाकीच्या केवळ स्थानिक गोष्टींचा विचार ज्या त्या संस्थानाच्या प्रतिनिधीसभेनें करावा, असें ठरलें.

सर्व जर्मन संस्थानांची एकी व्हावी हाच एक हेतु मनांत धरून जो एक राष्ट्रीय अथवा न्याशनल लिबरल नांवाचा पक्ष निर्माण झाला होता, त्याच्याच सहाय्यानें मुख्यतः ही नवी घटना अस्तित्वांत आली. मध्यंतरीं कांहीं विशेष जहाल लोकांच्या खटपटी सुरू होत्या; पण या लोकांचा आवेश वस्तुस्थितीपेक्षां कल्पनेच्या मागें लागण्यांत अधिक खर्ची पडत असल्यामुळें या पक्षाचा उपयोग फारसा झाला नाहीं. " जर्मनीला नुसतें घोड्यावर बसविण्याचें काम आपण केलें ह्मणजे पुरे, मग त्यावरून रपेट करण्यास त्याचा तोच शिकेल," असें बिस्मार्क या लोकांच्या पक्षास ह्मणत असत. हॅनोव्हर वगैरे कांहीं संस्थानें बिस्मार्क यांनीं खालसा केल्यामुळें त्यांजविरुद्ध लोकमत कसें खवळलें होतें, हें वरील पत्रांवरून दिसून येतेंच. याच मताचा प्रतिध्वनि खुद्द प्रतिनिधी सभेंतहि उमटल्यावांचून राहिला नाहीं. हॅनोव्हरचे माजी प्रधान फॉं म्यूंचहॉसन यांनीं बिस्मार्क यांजवर या बाबतींत खूप कडक टीका केली. तेव्हां त्यांस उत्तर देतांना बिस्मार्क ह्मणाले,

" आमचे शेजारी व आमचीच भाषा बोलणारे हॅनोव्हरचे बांधव त्यांजविरुद्ध शस्त्र उचलणें आह्मासहि बरें वाटलें नाहीं. तथापि आह्मी त्यांस पूर्वी अगाऊ सूचना दिली असतांहि आठलक्ष आस्ट्रियन सैन्याच्या मदतीचा विश्वास त्यांना वाटला. उघडया डोळयांनीं त्यांनीं आह्मावर शस्त्र उचललें. त्यांचा जय झाला असता, तर प्रशियाचे तुकडे करण्याची त्यांची इच्छा होती. किंबहुना त्याच हेतूनें त्यांनीं हत्यार उचललें होतें. अशा स्थितींत जें युद्ध त्यांनीं जाणून

बुजून सुरु केलें, त्याच्या सरळ परिणामाविरुद्ध आतां तक्रार करण्यांत अर्थ नाहीं. अथवा आह्माविरुद्धहि ओरड करून फायदा नाहीं. आह्माला जास्ती डवचण्यांत फायदा नाहीं, हें मी म्युंचहॉसन साहेबांस व त्यांच्या मित्रमंडळीस स्पष्टपणें कळवितों. प्रशियाच्या तेजास आळा घालण्याचें सामर्थ्य तुह्मास खास नाहीं."

हॅनोव्हरच्या पदच्युत राजानें व्हियेन्ना जवळील एका गांवीं राहून तेथें एक लहानसें कारभारी मंडळ जमविलें व थोडीं फार पलटणेंहि उभीं करण्याची खटपट त्यांनीं सुरू केली. संधी सांपडतांच प्रशियावर तुटून पडण्याचा त्यांचा हेतु होता. अशा परिस्थितींत वरील प्रकारच्या कडक भाषणाबद्दल बिस्मार्क यांस दोष देतां येत नाहीं; एवढेंच नव्हे, तर राजनीतीच्या दृष्टीनें इतका कडकपणा आवश्यकच होता. त्यांत विशेष मौज ही कीं, या पदच्युत राजाची ही सारी खटपट प्रशियाच्याच पैशाच्या जोरावर चालली होती. हें राज्य खालसा केलें, तेव्हां त्याच्या मोबदला देणगीदाखल बरीच रक्कम एकदम देऊन शिवाय कांहीं पेनशन तहाहयात देण्याचें वचन प्रशियानें दिलें होतें. प्रशियाविरुद्ध चाललेली ही खटपट बंद करण्याचें वचन राजाकडून येईपर्यंत त्याचें पेनशन बंद करावें, व त्या पैशाचा उपयोग त्याची ही खटपट हाणून पाडण्याकडे करावा, अशी सल्ला बिस्मार्क यांनीं वुइलियम राजास दिली. या पदच्युत राजासारखे लोक उघड माथ्यानें आपला उद्योग न करतां सर्पासारखे लपून छपून घाला घालतात, असें बिस्मार्क एकवार म्हणाले होते. म्हणून या बंद झालेल्या तैनातीचा जो फंड निर्माण झाला होता, त्याला लोकांनीं सर्पसत्र फंड असें नांव थट्टेनें दिलें होतें.

अशा प्रकारें जे कांहीं संस्थानिक प्रशियास पाण्यांत पहात होते, त्यांना आस्ट्रिया व फ्रान्स यांजकडून चांगली मदत होत होती. तथापि या उद्योगानें उत्तर जर्मन संस्थानांच्या चिरस्थाइत्वास केव्हांच धोका

आला नाहीं. या विषयासंबंधीं बोलत असतां बिस्मार्क एकदां म्हणाले, " उत्तर आणि दक्षिण जर्मन संस्थानांचें एकीकरण अभेद्य आहे, अशी माझी पक्की खात्री आहे. जर्मन राष्ट्राच्या भूमीचा एक तुकडाहि कोणाच्यानें पादाक्रांत करवणार नाहीं. " बिस्मार्क यांचें हें मत अवास्तव नव्हतें, याचें प्रत्यंतर पुढें लवकरच आलें.

ऱ्हाइन सरहद्दीवरील कांहीं जर्मन मुलूख घशांत उतरविण्याची खटपट नेपोलियन यानें केली; पण ती कशी फसली हें वर सांगितलेंच आहे. यानंतर हालंडच्या राजाच्या वर्चस्वाखालीं लक्षेंबर्गची जहागीर पदरांत पडावी, या हेतूनें नेपोलियन यानें खटपट सुरू केली. या जहागिरीची किंमत आपण पैशाच्या रूपानें देऊं व त्याशिवाय प्रशियानें तुम्हावर केव्हां शस्त्र धरल्यास त्याचें निवारण आम्ही करूं, असें बोलणें नेपोलियन बादशहानें हॉलंडच्या दरबारीं लावलें. हॉलंडचा दरबारहि या म्हणण्यास राजी झाला होता; पण जर्मन मुलुखांतील एक जहागीर परराष्ट्राच्या ताब्यांत जाणें, ही गोष्ट जर्मन हितसंबंधास विघातक आहे, अशा अर्थाची सूचना जर्मन लोकसभेकडून हॉलंडच्या राजास गेली; तेव्हां नेपोलियनची मागणी त्यानें फेंटाळून लाविली. तेव्हां या प्रश्नाचा निकाल लावण्याकरतां लंडन येथें एक प्रतिनिधी मंडळ जमा झालें. प्रशियानें लक्षेंबर्ग राजधानींतील शिबंदी उठवावी व तेथील किल्लेकोट पाडून टाकावेत व त्यानंतर जहागिरीचा मुलूख हा तटस्थ मुलूख म्हणून समजण्यांत यावा, असें सर्व मोठ्या राष्ट्रांनीं ठरविलें. अशाप्रकारें या प्रश्नाचा निकाल लागल्यामुळें या जहागिरीवरील जर्मनीची सत्ता नष्ट झाली हें खरें, पण नेपोलियनचा डावहि त्यामुळें फसला. आपल्या राज्यास आणखी एक प्रांत जोडण्याची त्याची हांव या वेळीं अशा रीतीनें निष्फळ झाली.

प्यारीस येथें भरलेल्या जगद्विख्यात प्रदर्शनासाठीं फ्रान्सच्या बादशहानें प्रशियाचा राजा व झार यांस प्यारीस येथें बोलाविलें होतें. या बोलावण्याचा स्वीकार करून राजे वुइलियम तारीख ५ जून रोजीं प्यारीस येथें दाखल झाले. त्यांजबरोबर युवराज, बिस्मार्क व मोटले अशी मंडळी आली होती. रशियाचे झार त्यापूर्वीं दोन दिवस प्यारीस येथें आले होते. प्यारीसच्या सर्व प्रजाजनांनीं मोठ्या अपूर्व उत्साहानें व थाटानें या राजमंडळाचें स्वागत केलें. फ्रेंच लोकांच्या अंतःकरणाचें औदा या वेळीं चांगलेंच दिसत होतें. ' सॅडोवाचा सूड ' वगैरे आरोळ्यांनीं या वेळीं कोठेंहि उत्साहभंग झाला नाहीं. 'प्रशियाचें शत्रुत्व या वेळीं मनांत न ठेवतां अथवा पुढें तो कदाचित् आपला शत्रु होईल, हाहि विचार या वेळीं चित्ताला शिवूं न देतां आपण आपल्या पाहुण्यांचें स्वागत मनःपूर्वक करूं या,' अशा अर्थाचा उपदेश फ्रेंच वर्तमानपत्रांनींहि या वेळीं मनःपूर्वक केला.

राजशाली थाटाच्या मेजवान्या, सैन्याच्या परेडी आणि इतर नाचरंग यांची मोठी दंगल उडून गेली होती. राजांच्या आणि बादशहाच्या परस्पर भेटी झाल्या व लोकांनींहि त्या तिघांचा मोठा जयजयकार केला. फ्रान्सची इभ्रत वाढली, असेंहि त्या क्षणापुरतें फ्रेंच लोकांस वाटूं लागलें. नेपोलियन बादशहानें कांहीं नवे प्रांत जिंकलेले नव्हते अथवा मोठा दिग्विजयहि केला नव्हता; तथापि शांततेच्या मार्गानें आपली छाप इतर राजांवर बसवून फ्रान्सची इभ्रत त्यानें वाढविली, असें त्या वेळीं लोकांस वाटलें. पण या बाह्य देखाव्यानें बिस्मार्क मात्र भुलून गेले नाहींत. फ्रेंच लोकांचें मत ह्मणजे अळवावरील पाणी आहे, याची विस्मृति त्यांना केव्हांहि पडली नाहीं. आज शांत दिसत असणारे फ्रेंच लोक आपल्या बादशहास युद्धांत केव्हां ओढतील, याचा

नियम नाहीं, हें बिस्मार्क यांस ठाऊक होतें. फ्रेंच सैन्याची परेड झाली, त्यावेळीं जनरल फॉ मोल्टके हे हजर होते. केवळ राजशाली थाटामाटाच्या दृष्टीनें फ्रेंच शिपायी कितीहि उमदा दिसत असला, तरी कडक शिस्त आणि कर्तव्याची तीव्र जाणीव यांचा आभाव त्यांजपाशीं असल्यामुळें बिकट प्रसंगीं राष्ट्राच्या उपयोगीं पडण्यासारखा तो नाहीं, ही गोष्ट मोल्टके यांच्या लक्षांत येऊन चुकली. नेपोलियन बादशाहाच्या वैभवाचा सूर्य या वेळीं जणूं काय मध्यान्हीं आला होता. पुढें त्याला लवकरच उतरतीकळा लागून नंतर तो लवकरच अस्तासहि गेला. नेपोलियन बादशाहाच्या कारकीर्दीचा फ्रेंच राष्ट्रावर जो वज्राघात झाला, त्या प्रसंगाला इतिहासांत दुसरी तोड नाहीं. लोकांचा उत्साह पाहून आपली गादी आपल्या वंशाकडे आतां यावच्चंद्रदिवाकरौ चालणार, असा क्षणैक भ्रम नेपोलियन बादशाहास त्या वेळीं झाला.

तथापि हे आनंदाचे दिवस अगदींच सुने गेले असें नाहीं. म्याक्झीमिलियन नांवाच्या राजाची स्थापना नेपोलियन बादशहानें मेक्सिकोच्या गादीवर केली होती व फ्रेंच तलवारीच्या बळावरच कांहीं काळ त्याची गादी तेथें टिकली होती. या राजाचा वध या वेळीं झाला. आपल्या पतीचें हें निधनवृत्त ऐकून मेक्सिकोची राणी वेडी झाल्याची बातमी लोकांस कळली. ही एकंदर गोष्ट नेपोलियनच्या इभ्रतीस कमीपणा आणणारी झाली, असें पुष्कळांस वाटलें; पण फ्रेंचलोक तर अगदीं खवळून गेले. फ्रेंच बादशाही विरुद्ध लोक आरडाओरड करूं लागले. तेव्हां लोकांस शांत करण्याकरतां बादशहानें युद्धाच्या अफवा पसरविल्या. 'सॅडोवाच्या सुडाची' स्मृति फ्रेंच लोकांत पुन्हा जागृत झाली. आतां कोठें तरी आपली तलवार चमकविली पाहिजे, असें नेपोलियन बादशहास वाटूं लागलें. भावी युद्धांत आपणास मदत व्हावी ह्मणून आस्ट्रिया व इटली

या दोन देशांशीं त्यानें नवे तह केले. प्रशियाशीं होणाऱ्या भावी युद्धाचा हा पूर्वरंग होता. इटलीनें बव्हेरियावर स्वारी करून म्यूनिच हस्तगत करावें व आस्ट्रियानें बोहिमिया प्रांतांत तयार राहून इटलीस मदत करावी व फ्रेंचांनीं मेन नदी पार होऊन जर्मनींत घुसावें, असा भावी युद्धाचा नकाशा या तीन राष्ट्रांनीं तयार केला होता. रोममध्यें या वेळीं फ्रेंचांची शिबंदी असे. ती प्रथम काढून न्यावी, असें बोलणें इटलीनें बादशहाकडे लावलें व आस्ट्रियानें त्याला दुजोरा दिला; पण या गोष्टीस फ्रान्सांतील धर्माधिकारी मंडळाचें व राणीचें अनुमोदन मिळेना. म्हणून इटलीची ही मागणी बादशहास नाकारावी लागली. यामुळें वर सांगितलेल्या तहाचीं बोलणीं अर्थातच फुकट गेलीं.

इ. स. १८६६ सालीं प्रेग येथें झालेल्या तहाचें एक कलम प्रशियानें मोडलें, असा गवगवा फ्रान्स व आस्ट्रिया यांनीं सुरू केला. दक्षिण जर्मन संस्थानांस जर्मन संहतींत येण्यास प्रशियानें भाग पाडूं नये, असें एक कलम या तहांत होतें; तथापि एकादें जर्मन संस्थान स्वखुषीनें संहतींत गेल्यास त्यास हरकत नसावी, अशी सवलतहि त्यांत ठेविली होती. दक्षिण व उत्तर या दोन्ही जर्मन संस्थानांचा व्यापार नियंत्रित करण्याकरतां एक मोठें जर्मन पार्लमेंट भरवावें, असे तहनामे सर्व दक्षिण जर्मन संस्थानाबरोबर बिस्मार्क यांनीं केले होते. फक्त व्यापारविषयक प्रश्नाचीच चर्चा या पार्लमेंटांत व्हावयाची होती.

"मेन नदीच्या दक्षिण तीरावरील संस्थानांचा संबंध उत्तर तीरावरील संस्थानांच्या संहतींत कोणत्या प्रकारचा असावा व त्यांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण त्या संबंधांत कसें करावें हा प्रश्न सध्यां तसाच ठेवून त्याची चर्चा पुढें एकाद्या प्रसंगीं करण्यास आस्ट्रियन बादशहाची कबूली आहे" असें प्रेगच्या तहांत एक कलम होतें. नव्या व्यापारी पार्लमेंटांत प्रति-

निधि पाठविण्याची कबुली दक्षिण जर्मन संस्थानांकडून बिस्मार्क यांनीं मिळविली, यांत त्यांच्या स्वातंत्र्यावर त्यांनीं गदा घातली, असें कोणासहि ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण हीं संस्थानें स्वखुषीनेंच या पार्लमेंटांत यावयाचीं होतीं व त्या पार्लमेंटांतहि व्यापाराशिवाय इतर कोणत्याहि बाबींची चर्चा व्हावयाची नव्हती; तथापि फ्रँको–जर्मन युद्धास हेंहि एक कारण झालें. या तहामुळें नेपोलियनच्या ' इभ्रतीस ' मोठा धक्का बसला व फ्रेंच लोकांनीं केलेल्या कोल्हेकुईमुळें कांहीं दक्षिण जर्मन संस्थानांतहि लोकमत खवळलें. प्रशियाच्या अमलाखालीं आह्मी कधींहि जाणार नाहीं, अशी ओरड विशेषतः वर्टेंबर्ग येथें सुरू झाली. प्रशियन लोक शुद्ध रानटी असून दक्षिण जर्मन संस्थानांविषयीं स्वातंत्र्यप्रीति त्यांच्यांत नाहीं, असें दक्षिणेंतील कांहीं देशभक्त ह्मणूं लागले. मॉरिट्झ् मोल, नांवाचा एक देशभक्त वर्टेंबर्गमध्यें फार प्रसिद्धीस आला होता. यानें एक चोपडें प्रसिद्ध करून त्यांत प्रशियाची विलक्षण नालस्ती केली होती. प्रशिया ह्मणजे तरवारीनें रक्तपात करणारा व लोकांस पिळून काढणारा अत्याचारी आहे, असें वर्णन या चोपड्यांत केलें होतें. प्रशियाशीं युद्ध सुरू झाल्यास दक्षिण जर्मनसंस्थानें आपणास अनुकूल होतील असा भ्रम या परिस्थितीमुळेंच नेपोलियन याच्या चित्तांत उत्पन्न झाला.

---

## प्रकरण अकरावें.

## व्हार्जिन.

राजकारण थोडें बाजूस ठेऊन बिस्मार्क यांच्या घरगुती गोष्टींकडे आपण थोडा काळ वळूं.

इ. स. १८६६ ची आस्ट्रियावरची मोहीम यशस्वी रीतीनें पार पडल्यानंतर प्रशियाच्या राजानें बरीच मोठी रक्कम बक्षिसादाखल

बिस्मार्क यांस दिली होती या गोष्टीचा उल्लेख गेल्या प्रकरणांत केलाच आहे. या बक्षिसाच्या रकमेंतून पोमेऱ्यानिया प्रांतांतील व्हार्जिन गांवाची मिळकत बिस्मार्क यांनीं इ. स. १८६७ च्या एप्रील महिन्यांत खरेदी केली. या इस्टेटींत सुमारें चाळीस हजार एकर जमीन होती. तींत बागाईत पुष्कळ असल्यामुळें हजारों ईडलिंबाचीं झाडें व मोठाले पापलर, चेस्टनट वगैरे वृक्षहि तींत पुष्कळ होते. बिस्मार्क यांस सृष्टिसौंदर्याची आवड लहानपणापासूनच असल्यामुळें या नव्या इस्टेटीवर त्यांचें फार प्रेम जडलें. व्हार्जिन गांवच्या जवळच एक मोठें अरण्य असून त्यांत बीच, देवदार, ओक वगैरे इमारती वृक्ष पुष्कळ आहेत. जवळच एक सुंदर तलाव असून तो कमळांनीं नेहमीं आच्छादित असतो. विपर नांवाचा एक ओढाहि जवळूनच मोठ्या खळखळाटानें वहात असतो. या ओढ्याच्या पाण्याच्या शक्तीचा उपयोग करून घेऊन बिस्मार्क यांनीं त्याच्या कांठीं एक कागदाची गिरणी लवकरच बांधली. गांवांत बिस्मार्क यांचा मोठा रहाता वाडा असून त्याच्या भोंवतीं सुंदर फुलझाडांचा बगीचा आहे. वाड्यापासून जवळच एक लहानसें जंगल राखलें असून त्यांत हरणेंहि केव्हां फिरतांना आढळतात. जवळचें तळें सोनेरी रंगाच्या माशांनीं भरलेलें असतें.

वाड्याच्या मागच्या बाजूला घोड्याची पागा आहे. या पागेच्या जवळपास आणखी एकदोन तळीं आहेत. या सर्व नैसर्गिक सौंदर्यानें बिस्मार्क यांचें मन या जाग्यावर बसलें व आपल्या विश्रांतीचे दिवस ते तेथेंच घालवीत असत. या ठिकाणीं आल्यावर त्यांचा सारा वेळ बहुधा बागेची निगा राखण्यांत व नवीं नवीं फुल झाडें लावण्यांत जाई. 'बिस्मार्क येथें आले ह्मणजे सारें राजकारण विसरून जातात व राज्याची काळजी त्यांस मुळींच वाटत नाहीं,' असें त्यांचे स्नेही ह्मणत.

बर्लिन मध्यें असतांना बिस्मार्क यांस विश्रांति कशी ती ठाऊकच नसे. व्हार्जिन येथेंच त्यांस स्वस्थ विश्रांतिसुखाचा लाभ मिळे. यामुळें या स्थळावर त्यांचें प्रेम बसलें यांत नवल नाहीं. व्हार्जिन येथें आल्यावर आपल्या सर्व कुळांचा नित्य समाचार घेण्याची त्यांची चाल असे व कुळेंहि भक्तिरूपानें त्यांच्या या ऋणाची फेड करीत. शेतांतून नवें पीक आलें ह्मणजे शेतकरी लोक मोठा उत्सव करीत व बिस्मार्क त्या वेळीं तेथें असले, तर तेहि आपला मोठेपणा बाजूस ठेवून एकाद्या शेतकऱ्या-प्रमाणेंच या उत्सवांत सामील होत असत.

अशा रीतीनें व्हार्जिन येथें बरेच दिवस घालवून बिस्मार्क बर्लिन येथें परत आले. तारीख ४ मार्च इ. स. १८६९ रोजीं अमेरिकन वकील मि. बँक्राफ यांनीं युनायटेड स्टेटचे प्रेसिडेंट ग्रँट यांच्या सन्मा-नार्थ एक मोठी मेजवानी केली. त्या प्रसंगीं बिस्मार्क हे हजर राहिले होते. अमेरिकन संयुक्त संस्थानें अंतःस्थ युद्धांतून नुकतींच मोकळीं झालीं होतीं. या मेजवानीच्या प्रसंगीं पुढील आशयाचें भाषण बिस्मार्क यांनीं केलें.

"सद्गृहस्थहो, आज आपण येथें कां जमलों आहों, हें सांगण्यासाठीं मी आपल्या आनंदांत थोडासा व्यत्यय आणण्याची परवानगी घेतों. युनायटेडस्टेटचे विजयी सेनापति ग्रँट हे आज तेथें अध्यक्षाच्या पदावर आरूढ झाले आहेत. अमेरि-कन संयुक्त संस्थानाशीं प्रशियाचा पूर्वापार संबंध आहे. अमेरिकन संस्थानांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर करून आपल्या लोकसत्ताकाची रचना केली, तेव्हां प्रशियाचे राजे दुसरे फ्रेड्रिक यांचेंच पहिलें अनुमोदन संस्थानांस मिळालें. अशा प्रकारच्या संबंधामुळें अमेरिकेंत कोणतीहि महत्वाची गोष्ट घडली, तरी तिजबद्दल प्रथम अभिनंदन करण्याचा हक्कहि प्रशियाकडेच येतो. अमेरिकेचें लोकसत्ताक जाहिर झाल्यानंतर प्रशिया व संयुक्त संस्थानें यांचे परस्पर संबंध फार सलोख्याचे होत गेले, हें सांगण्यास मला फार आनंद वाटतो.

प्रशियाचा प्रधान एवढयाच नात्यानें हें मी बोलत नसून आमचें जें जुनें दप्तर मला पहावयाला मिळालें, त्यावरून ही गोष्ट मी स्वानुभवानें सांगत आहें. अमेरिकेचे पहिले अध्यक्ष वाशिंग्टन व प्रशियाचे तेव्हांचे राजे फ्रेड्रिक यांजमधील पत्रव्यवहार माझ्या अवलोकनांत आला आहे, त्यावरून या दोन देशांचा स्नेहसंबंध अबाधित चालत आला आहे, असें सांगण्यास मला हरकत वाटत नाहीं. या दोन देशांत कोणत्याहि प्रकारची राजकीय अडचण केव्हांहि उपस्थित झालेली नाहीं. तेव्हां प्रेसिडेंट ग्रँट यांचा जयजयकार करून त्यांना दीर्घायुष्य चिंतणें हें माझें कर्तव्य आहे, असें मी समजतों."

हा समारंभ होण्याच्या अगोदर कांहीं दिवस बिस्मार्क यांनीं सेनापति ग्रँट यांस पुढील पत्र लिहिलें होतें:—

" प्रिय महाशय,

आपण आपल्या चरित्राची एक प्रत ब्यारन जिरोल्ट यांजमार्फत पाठविली, ती मला पोहोंचली. आपण जें युद्ध मोठया यशस्वीपणानें पार पाडलें, त्याच्या अंतःस्थ हकीकतीचा उलगडा होण्यास प्रस्तुत ग्रंथाचा मला फार उपयोग झाला, हें मी मोठया आनंदानें आपणास कळवितों. भिक्स्बर्ग आणि रिचमंड येथील लढाया जिंकणाऱ्या योद्धयानें माझी सप्रेम आठवण करून हा ग्रंथ मला पाठविला, हा विचार मोठया अभिमानानें व आनंदानें माझ्या मनांत नित्य जागृत राहील. युद्धांत यशस्वी होऊन आपण जी शांतता स्थापिली, ती आपल्या मातृभूमीस यापुढें कल्याणप्रद होवो व अमेरिका आणि जर्मनी यांचा पूर्वीचा स्नेहभाव पुढें वृद्धिंगत होत जावो, एवढेंच मागणें मी परमेश्वरापाशीं मागतों.

आपला नम्र सेवक,

व्ही. बिस्मार्क."

अमेरिकेचीं संयुक्त संस्थानें व जर्मनी यांजमधील स्नेहसंबंध सलोख्याचे असावेत, अशी बिस्मार्क यांची फार इच्छा होती व या इच्छेचें प्रत्यक्ष फळ पदरांत पाडून घेण्याचा आणखी एक प्रसंग त्यांस मिळाला. कांहीं बारीकसारीक कारणामुळें बर्लिन येथील अमेरिकन वकील मि.

बँक्राफ्ट यांस परत बोलविण्यांत आलें. हा हुकुम रद्द होण्याची खटपट बिस्मार्क यांनीं केली व तींत त्यांस यशहि आलें.

सुप्रसिद्ध इतिहासकार व बिस्मार्क यांचें लहानपणचे स्नेही जॉन मोटले यांस बँक्राफ्टच्या बाबतींत खटपट करण्यासाठीं पुढील पत्र बिस्मार्क यांनीं लिहिलें होतें.

व्हार्जिन, १९ सप्टेंबर १८६९.

"प्रिय मोटले,

बँक्राफ्ट हे अमेरिकेच्या हितसंबंधास जपत नाहींत, अशा प्रकारच्या सबबी-वर त्यांस येथून हलविलें जात आहे, अशी बातमी प्यारीसहून मला नुकतीच कळली. बँक्राफ्ट यांच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल व हुशारीबद्दल शंका घेणारा असा एकहि माणूस उभ्या बर्लिनमध्यें मिळावयाचा नाहीं. येथील सर्व विद्वान मंडळास बँक्राफ्ट फार प्रिय झाले असून राजदरबारांत व सरकारांतहि त्यांस चांगला मान आहे. प्रशियन सरकारचा त्यांजवर पूर्ण भरंवसा आहे. प्रशिया-संबंधीं त्यांच्या ठिकाणीं विशेष स्नेह आहे, हें सर्वांस ठाऊक आहेच व त्यांनीं स्वतः ही गोष्ट चोरून ठेवलेली नाहीं. जर्मनीची सांप्रतची राजकीय परिस्थिति ज्यांना पसंत नाहीं, अशा लोकांनीं बँक्राफ्ट यांस शत्रूसारखें लेखावें यांत नवल नाहीं. हॅनोव्हरचे पूर्वीचे राजे व हेसेचे संस्थानाधिपति अशासारख्या लोकांनीं वर्तमानपत्रकारांना पैसे चारून बिचाऱ्या बँक्राफ्ट विरुद्ध हें काहूर उठविलें आहे. कदाचित् कांहीं अमेरिकन पत्रकारांचेहि हात ओले करण्याची खटपट त्यांनीं केली असावी; पण अमेरिका व जर्मनी यांचा संबंध सलोख्याचा असावा, असें वाट-णारा एकहि मुत्सद्दि या फंदांत पडला असेल असें मला वाटत नाहीं. बँक्राफ्ट हे येथें फारच लोकप्रिय झाले आहेत, आणि बर्लिनवरचें तुझें पूर्वीचें प्रेम अद्यापि का-यम असेल तर बँक्राफ्ट यांस येथेंच राहूं देण्यासाठीं शक्य ती खटपट तूं कर."

बर्लिन मधून बँक्राफ्टची हाकलपट्टी करण्याकरतां फ्रेंचांनीं पुष्कळ कारवाई केली, तथापि तिचा कांहीं उपयोग न होतां बिस्मार्क व मोटले यांच्या खटपटीस यश येऊन बँक्राफ्ट बर्लिन येथेंच राहिले.

सर्व युरोपची स्थिति या वेळीं मोठी नाजुक झाली होती. प्रत्येक देशांत कोणत्याना कोणत्या कारणानें अस्वस्थता माजली होती. प्रशियाच्या

डोळ्यांपुढें भावी युद्ध दिसत होतें. अशा स्थितींतहि लष्करी खर्च कमी करावा, अशी मागणी प्रो. व्हर्चो यांनीं पार्लमेंटांत केली. ‘ शांतता हवी असेल, तर तलवार तयार ठेवली पाहिजे ’ ही जुनी ह्मण या प्रोफेसर साहेबांच्या लक्षांतून गेली असावी. चालू लष्करीखर्च फुकट जात आहे, असा दोषारोप त्यांनीं प्रधानमंडळावर केला. प्रशियाविरुद्ध कोणतीहि लहानशी चळवळ जर्मनींत झाली, कीं तिचा मोठा प्रतिध्वनि फ्रेंच प्रधानमंडळांत उमटतो, ही गोष्ट बिस्मार्क यांच्या लक्षांत आली होती. प्रशियाशीं युद्ध करण्याची तयारी नेपोलियन बादशहा करीत होता. त्या भावी युद्धांत यश मिळालें, तरच आपली बादशाही गादी सुरक्षित राहील, ही गोष्ट नेपोलियन बादशाहास ठाऊक होती. जर्मन राष्ट्राचा एकोपा कायम राहणें अथवा न राहणें ही गोष्ट त्या वेळीं लष्कराच्या बळावर अवलंबून होती. जर्मनीचें लष्करी बळ या वेळीं कमी करण्यांत आलें असतें, तर फ्रेंचांनीं त्याची ताबडतोब चटणी केली असती. या करतां या वेळीं सैन्य कमी करणें ह्मणजे आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणें होय, ही गोष्ट बिस्मार्क यांस ठाऊक होती. पूर्वींच्या चार वर्षांच्या शांततेच्या काळांत उत्तर आणि दक्षिण जर्मन संस्थानांतील तंट्याच्या बाबी बऱ्याच कमी झाल्या होत्या. सगळ्या जर्मन राष्ट्राची जी संहति पुढें लवकरच होणार होती, तिचा मार्ग निष्कंटक करण्याचा यत्न बिस्मार्क यांनीं या चार वर्षांत केला.

---

## प्रकरण बारावें.

## जर्मनीची जागृति.

नाना प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्या योजून व मोठा पाताळयंत्रीपणा करून तिसरे नेपोलियन बादशहा फ्रान्सच्या बादशाही गादीवर आ-

रूढ झाले होते. युरोपांतील इतर राजांत कलागती कायम ठेऊनच आपली गादी आपणास कायम राखतां येईल, हें नेपोलियन बादशाहास ठाऊक होतें. कोणाशीं गुप्तपणें तह करावे व युरोपांतील एका राजाचें भांडण दुसऱ्या राजाशीं लावून द्यावें, असा त्याचा क्रम होता. आपली ' इभ्रत ' स्वदेशांत कायम ठेवण्यास व इतर राष्ट्रांवर फ्रान्स-देशाचा वर्चष्मा राखण्यास एवढीच युक्ति त्याला अवगत होती. तथापि शेरास सव्वा शेर या नात्यानें या विद्येंत त्याचा गुरु त्याला भेटला. प्रत्येक गोष्टींत हा बिस्मार्कचा कांटा आड येतो, असें नेपोलियन बादशाहास आढळून आलें.

इटली आणि आस्ट्रिया यांशीं तह करून भावी युद्धांत त्यांची मदत मिळविण्याचा योग जवळ जवळ जुळून आला होता. रोम राजधानींतील फ्रेंच शिबंदी उठविण्याचें नेपोलियन बादशाहानें नाकारल्यामुळें हा योग फसला; तथापि भावी युद्धांत इटलीची मदत आपणास मिळेल अशी खात्री बादशाहास अंतर्यामीं वाटत होती; पण या आशेवर सुद्धां बिस्मार्क यांनीं लवकरच विरजण घातलें. उत्तर युरोप व इटली यांजमध्यें रहदारीचा रस्ता होण्यास सेन्ट गोथार्ड नांवाचा डोंगर मध्यें आड होता. हा डोंगर फोडून त्यांतून बोगदा करण्याची इटलीची इच्छा होती. पण या कामास लागणारें द्रव्य त्याजपाशीं नव्हतें. या कामास लागणारा पैसा बिस्मार्क यांनीं इटलीस पुरविला. अशा रीतीनें प्रशियाच्या उपकारऋणानें बद्ध झालेला इटली त्याच्याच विरुद्ध फ्रान्सच्या तर्फेनें लढेल, ही गोष्ट शक्य नव्हती.

राजकारणांतील या नव्या पराजयानें नेपोलियन बादशहाची स्थिति अधिकच नाजुक झाली. प्रशियावर सूड उगविला पाहिजे व त्याचा पाणउतारा केला पाहिजे, अशी ओरड प्यारिसच्या बाजारबुणग्यांनीं

व फ्रेंच पत्रांनीं पुन्हां मोठ्या जोरानें सुरू केली. तथापि यावेळीं सुद्धां युद्ध इतक्या निकरावर आलें असेल, असें कोणासहि वाटत नव्हतें. " सांप्रत सर्वत्र पूर्ण शांतता नांदत असून ती कायम टिकेल " असे उद्गार फ्रान्सचे मुख्य प्रधान ऑलिव्हियर यांनीं नुकतेच काढले होते. त्याचप्रमाणें बर्लिन येथील आस्ट्रियन वकिलानेंहि अशाच अर्थाचें आपलें मत आस्ट्रियास कळविलें होतें. तथापि पोटांत धुमसत असलेल्या अग्नीस याच वेळीं एका अचानक घडलेल्या गोष्टीमुळें वाऱ्याचें सहाय्य मिळून तो ज्वालेच्या रूपानें भडकला. वरील मतें प्रकट होऊन पुरते पंधरा दिवस लोटले नाहींत, तोंच फ्रान्स व जर्मनी या दोन सुसंकृत देशांत युद्धाचा वणवा पेटला.

स्पेनचें तक्त या वेळीं रिकामें होतें. त्यावर होहेन झोलार्न घराण्यांतील एका राजपुत्रानें आपला वारसा सांगितला. हेंच या युद्धाचें बाह्यतः दिसणारें कारण होय. होहेन झोलार्न घराण्यांतील राजपुत्र लियोपोल्ड याला हें सिंहासन मिळावयाचें होतें; पण कांहीं धार्मिक अडचणीमुळें त्या राजपुत्रानें ही गादी नाकारली. पुन्हां इ. स. १८७० सालीं स्पेनचे सेनापति जनरल प्रिम यांनीं ही गादी स्वीकारण्याची विनंति लियोपोल्डला केली. याहि वेळीं लियोपोल्डनें या विनंतीस मान दिला नाहीं. त्यानंतर तारीख १४ जून सन १८७० रोजीं याच बाबींत पुन्हा विनंति करण्यासाठीं सालाझार नांवाच्या कौन्सिलरास राजपुत्राकडे स्पेननें पाठविलें व या वेळीं लियोपोल्ड यानें या विनंतीस मानहि दिला.

होहेन झोलार्न घराण्यांतील वडील पुरुष या नात्यानें प्रशियाच्या राजानें या बाबींतील आपलें कर्तव्य करण्यापलीकडे अधिक कांहीं केलें नाहीं. राजपुत्रानें या गादीचा स्वीकार करूं नये, असें राजे वुइ-लियम व बिस्मार्क या दोघांचेंहि मत आरंभीं होतें; पण स्पेनच्या आग्र-

हाच्या विनंतीवरून माघार घेऊन या दोघांनीं गादी स्वीकारण्याबद्दल राजपुत्रास अनुमोदन दिलें. असें अनुमोदन मिळाल्यानंतर लियोपोल्ड यानें स्पेनच्या सिंहासनाचा स्वीकार केला.

राजपुत्र लियोपोल्ड यानें स्पेनच्या गादीचा स्वीकार केला, अशा अर्थाचा सरकारी खलिता तारीख ३ जुलई रोजीं फ्रेंच प्रधान मंडळाकडे स्पेनकडून रवाना झाला. दुसऱ्याच दिवशीं ही गोष्ट फ्रेंच प्रधान मंडळानें सरकारी पत्रकाच्या रूपानें प्रसिद्ध करून 'प्रशियाचा हा एक अंतस्थ कावा आहे' अशा अर्थाची टीकाहि त्यावर केली. 'पांचव्या चार्लसचा राजदंड एका प्रशियन राजपुत्राच्या हातीं जावा, या गोष्टीचें आह्मास अत्यंत नवल वाटतें' असेंहि एक वाक्य वरील पत्रकांत होतें. स्पेनच्या गादीची वासलात अशा रीतीनें लागली, ही गोष्ट खरी कीं काय? असा प्रश्न बर्लिन मधील फ्रेंच वकील ल सूर्द यांनीं परराष्ट्रीय प्रधानास विचारला. "ज्या गोष्टीशीं प्रशियाचा हितसंबंध नाहीं, त्याची नसती उठाठेव प्रशियन सरकार करीत नाहीं." असा जबाब परराष्ट्रीय प्रधानांनीं ल सूर्द यांस दिला.

फ्रान्सचे परराष्ट्रीयप्रधान ड्यूक ऑफ ग्रॅमॉंट हे प्रशियाला अगदीं पाण्यांत पहात असत. राजपुत्र लियोपोल्ड यांनीं स्पेनच्या तक्तावर बसण्याचें कबूल केल्यामुळें फ्रान्सचें लोकमत फार खळवळून गेलें आहे, असें ग्रॅमॉंट यांनीं जर्मन वकील बरन वर्थर यांजपाशीं बोलून दाखविलें. वर्थर हे आपल्या राजाच्या मुलाखतीसाठीं लवकरच जाणार होते. प्यारीस मधून निघतांना ग्रॅमॉंट यांची भेट त्यांनीं घेतली, तेव्हां ते वर्थर यांस ह्मणाले, 'स्पेनची गादी नाकारण्याविषयीं तुमचे महाराज लियोपोल्डचें मन वळवितील, तर एक मोठीच आपत्ति टळेल. या गोष्टीनें फ्रान्सचें लोकमत किती क्षुब्ध झालें आहे, हें तुह्मासहि माहीत आहेच.' हें भाषण ऐकून

वर्थर यांस मोठें नवल वाटून ते ह्मणाले, "मोठी आपत्ति ह्मणजे युद्ध असाच तुमच्या बोलण्याचा अर्थ काय ?" यावर ते कांहीं उत्तर देणार, तों मुख्य प्रधान तेथें येऊन ह्मणाले, "होय. युद्ध टाळणें मला तर शक्य दिसत नाहीं."

इतकें भाषण झाल्यानंतर वर्थर यांनीं त्यांची रजा घेतली व एम्स येथें ते निघून आले. एम्स येथून अधिक खुलासा येण्यापूर्वींच ग्रॅमाँट यांनीं प्रशिया व लियोपोल्ड यांजबद्दल लोकांचीं मनें अधिकाधिक क्षुब्ध करण्याचा आपला उद्योग चालू ठेवला होता. पार्लमेंटांत या बाबीसंबंधानें विचारलेल्या प्रश्नास उत्तर देतांना ते ह्मणाले, "आमच्या जवळच्या राष्ट्रांच्या हितसंबंधास आड येण्याजोगें कोणतेंहि वर्तन आह्मी करूं नये ही गोष्ट खरी, तथापि पांचव्या चार्लस राजाच्या गादीवर एकादें परकी राष्ट्र आपला एकादा राजपुत्र बसवूं लागलें, तर ती गोष्ट मुकाट्यानें पाहण्यास आह्मी बांधलेले आहों, असें मला वाटत नाहीं. आजपर्यंत जी समबलता सर्व युरोपीय राष्ट्रांत आहे, तिचा भंग होऊन फ्रान्सचे हितसंबंध व इभ्रत यांसहि या गोष्टीनें कमीपणा येणार आहे." याच वेळीं बिस्मार्क यांचाच हा पाताळयंत्रीपणाचा डाव आहे, असेंहि त्यांनीं खाजगी रीतीनें बोलून दाखविलें.

या विषयासंबंधीं बोलतांना "एक प्रशियन राजपुत्र," "पाताळयंत्रीपणा," "बिस्मार्क यांचा डाव" असे शब्द फ्रेंच पार्लमेंटांत विशिष्ट हेतूंनीं उच्चारले जात असत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. लियोपोल्डनें स्पेनच्या तक्तावर बसण्याचें कबूल केलें, या गोष्टीशीं बिस्मार्क यांचा प्रत्यक्ष अथवा परंपरेचा यत्किंचितहि संबंध नाहीं, असें प्रत्यक्ष स्पॅनीश सरकारानें फ्रान्सला स्पष्ट कळविलें असतांहि फ्रेंच चेंबरमध्यें ( पार्लमेंटांत ) बिस्मार्क यांचा असा उल्लेख वारंवार होत असे.

लियोपोल्ड यांनीं राजे वुइलियम यांची संमति मागितली, या गोष्टींत राजकारणाचा कांहीं संबंध नसून होहेन झोलर्न घराण्याच्या वडीलपणाचा मान राखण्यापुरतीच ही संमति त्यांनीं मागितली होती.

मॉनिटौर नांवाच्या सरकारी वर्तमानपत्राच्या तारीख ८ जुलईच्या अंकांत पुढील अर्थाचा उल्लेख आहे.

"आम्ही जी शांतवृत्ति आजपर्यंत दाखविली, तिचा दुरुपयोग प्रशियन सरकार गेलीं चार वर्षें एकसारखा करीत आहे. आतां आमच्या शांतवृत्तीची परमावधि झाली आहे. असल्या प्रकारच्या प्रशियन सरकारच्या नसत्या उठाठेवीस आळा घालण्याची वेळ जवळ आली आहे."

'पेज' या नांवाच्या दुसऱ्या पत्रांत प्रशियाचा पाणउतारा करण्याजोगा पुढील लेख प्रसिद्ध झाला.

"प्रशियानें आमचें ह्मणणें निमूटपणें मान्य केलें पाहिजे अथवा युद्धास तरी सज्ज झालें पाहिजे. युद्धाचा परिणाम काय होणार, हें सर्वांना ठाऊक आहेच. आम्ही त्यास युद्धास पुन्हा आव्हान करतों. आजपर्यंतची आमचीं किती तरी आव्हानें फुकट गेलीं आहेत. प्रशियासंबंधी बोलतांना फ्रान्स जी भाषा वापरतो, तसली भाषा प्रशियानें आमच्यासंबंधी वापरली असती, तर आमचीं घोडदळें केव्हांच ऱ्हाईन नदी पार झालीं असतीं."

आतां युद्ध टळत नाहीं, हें सर्वांस कळून चुकलें. फ्रेंच प्रधानमंडळ युद्धासाठीं अगदीं उत्सुक होऊन बसलें होतें. फ्रान्सची इभ्रत कमी करण्याचा उद्योग प्रशियानें केला असून त्याजबद्दल त्याचा जाब मागितलाच पाहिजे, अशी एकच आरोळी साऱ्या फ्रान्सभर दुमदुमून राहिली. या वेळीं प्रशियाचे राजे हवा फेर करण्याकरतां एम्स मुक्कामीं गेले होते.

ग्रॅमाँट यांच्या हुकुमावरून कौंट बेनेडेटी एम्स येथें गेले. लियोपोल्ड याचें मन वळविण्याविषयीं वुइलियम राजांनीं खटपट करावी, असें त्यांस सांगण्याचा त्यांच्या भेटीचा हेतु होता. तारीख ११ जुलई रोजीं ऑलिव्हियर यांजकडून बेनेडेटी यांस पुढील अर्थाची तार आली.

" लोकमत फार क्षुब्ध झालें आहे. आम्हांस येथें घटकापळें मोजावीं लागत आहेत. वुइलियम राजे यांजकडून होय किंवा नाहीं, हा एकच जबाब तुह्मी ताबडतोब घ्या. जबाब अगदीं बिनशर्तीचा पाहिजे. आणखी एक दिवससुद्धां उशीर खपणार नाहीं. "

हा हुकूम हातीं पडल्यानंतर बेनेडेटी राजाच्या भेटीस गेले व प्रधानाच्या हुकुमाप्रमाणें राजाकडे त्यांनीं बऱ्याच निकराची मागणी केली. फ्रेंच प्रधानमंडळाच्या मनांत आलेला अकारण संशय दूर करून युद्ध टाळावें अशी वुइलियम राजाची अद्यापीहि इच्छा होती. बेनेडेटी यांस ते ह्मणाले, " राजपुत्र लियोपोल्ड यांचें ह्मणणें अद्यापि मला कळलें नाहीं, यामुळें कोणतेंहि उत्तर आजच देणें मला अशक्य आहे. या नंतर दुसऱ्याच दिवशीं " आपण स्पेनची गादी स्वीकारीत नाहीं. " असें लियोपोल्ड यांनीं जाहीर केलें. यामुळें भावीयुद्धाचें मूळच अर्थात उपटल्यासारखें झालें. बिस्मार्क हे या वेळीं व्हार्जिन मुक्कामीं होते. वुइलियम राजांनीं त्यांस तार करून एम्स येथें बोलाविलें होतें. इतक्यांत राजपुत्र लियोपोल्ड यांनीं आपला वारसा सोडल्याची हकीकत त्यांस समजली. तेव्हां एम्सला आजच जाण्याची कांहीं घाई नाहीं, असें समजून आपल्याबद्दल कौंट युलेनबर्ग यांची रवानगी त्यांनीं एम्स येथें केली. प्रधानमंडळांत राज्याची अंतर्गत व्यवस्था पाहण्याचें काम कौंट युलेनबर्ग यांजकडे असे. फ्रान्सची एकेक मागणी प्रशिया जों जों कबूल करूं लागला, तों तों फ्रान्सची मागणी एकसारखी वाढतच चालली. ग्रॅमाँट

यांनीं बॅरन वर्थर यांजमार्फत वुइलियम राजाकडे आणखी एक मागणी केली. लियोपोल्डनें राजीनामा दिला, या गोष्टीबद्दलची पसंती वुइलियम राजानें सार्वजनिक रीत्या जाहीर करावी व अशा प्रकारें या दोन राष्ट्रांच्या मनांत आलेला किंतु नाहींसा करावा, अशी ही मागणी होती.

तारीख १३ जुलई रोजीं कौंट बेनेडेटी हे राजे वुइलियम यांच्या भेटीला गेले. वुइलियम यांची प्रकृति या वेळीं बरीच नादुरुस्त झालेली होती. राजे बागेकडे फिरावयास गेले आहेत, असें समजल्यावरून बेनेडेटी बागेकडे धांवतच गेले. त्यांस पाहतांच वुइलियम यांनीं हास्यमुद्रेनें त्यांचें स्वागत केलें. आपल्यापुरतें तरी तंट्याचें कारण संपलें असावें, असें वुइलियम यांस वाटत होतें. लियोपोल्ड यांच्या राजीनाम्याच्या हकीकतीचा सरकारी खलिता अद्यापि राजाकडे आला नव्हता; तथापि कोलोन गॅझेट पत्रानें एक खास अंक प्रसिद्ध करून त्यांत ही हकीकत दिली होती. हा अंक राजानीं बेनेडेटी यांच्या हातीं दिला. या प्रश्नाचा निकाल आतां कायमचा लागला, असें राजांनीं बेनेडेटी यांस सुचविलें. यानंतर बेनेडेटी यांनीं फ्रेंच प्रधानमंडळाची नवी मागणी राजापुढें ठेवली. “स्पेनच्या गादीच्या बाबतींत वारसदारीचा प्रश्न पुन्हा उपस्थित झाल्यास त्या कामीं आपण पुन्हा केव्हांहि आपली संमति देणार नाहीं, असें वचन वुइलियम राजांनीं फ्रेंच प्रधानमंडळास द्यावें,” अशी ही मागणी होती. असल्या प्रकारच्या विचित्र मागणीस राजानें संमति देण्याचें नाकारलें, हें सांगावयास नकोच. बेनेडेटी यांनीं राजांची समजूत घालण्याचा पुन्हा पुन्हा यत्न केला; तथापि राजे कबूल होत नाहींत, असें पाहून बेनेडेटी आपल्या घरीं परत आले. घरीं येतात, तों राजपुत्र लियोपोल्ड यांच्या वडिलांचें पत्र त्यांच्या हातीं पडलें. या पत्रांत आपल्या चिरंजिवांनीं स्पेनच्या गादीवरील वारसा सोडल्याबद्दलचा मजकूर होता. त्याचप्रमाणें ग्रॅमाँट यांनीं केलेल्या नव्या

मागण्यांचा रिपोर्टहि बॅरन वर्थर यांजकडून आला होता. यापुढें स्पॅनिश सिंहासनाच्या बाबतींत बोलणें करण्यासाठीं कौंट बेनेडेटी आले, तर राजानें त्यांची भेट घेऊं नये, अशी सल्ला बिस्मार्क यांनीं राजांस दिली. कारण या बाबतींत निष्कारण तंटे उपस्थित होऊन प्रशियाची अगोदरच मानहानी झालेली होती. बिस्मार्क यांचा निरोप पोहोंचतांच हा प्रश्न आतां निकालास लागला, अशा आशयाचा खलिता वुइलियम राजानें जासुदाबरोबर बेनेडेटी यांजकडे पाठविला.

तथापि हा प्रश्न इतकाच सोडून देण्यास फ्रेंच प्रधानमंडळ तयार नव्हतें. प्रधानमंडळाच्या नव्या मागणीस राजांची अनुमति मिळविण्याचा दुसरा हुकुम तारीख १३ जुलई रोजीं बेनेडेटी यांच्या हातीं पडला. तेव्हां बेनेडेटी यांनीं राजांची भेट घेण्याचा पुन्हा यत्न केला. त्यांची भेट घेण्याचें साफ नाकारून या बाबतींत आतां नवीन सांगण्यासारखें कांहीं उरलें नाहीं, असें राजानें त्यांस कळविलें. यानंतर दुसऱ्याच दिवशीं कौंट बेनेडेटी पारीसला निघून गेले व वुइलियमराजे बर्लिनला आले. या सर्व भानगडी कौंट बिस्मार्क यांच्या कानावर रोज पडत असत. प्रशियाचा पाणउतारा करण्याचा निश्चय फ्रेंच प्रधानमंडळाच्या मनांत आहे, असें बिस्मार्क यांस कळून चुकलें. शस्त्रानें अथवा शास्त्रानें कोणत्याहि रीतीनें प्रशियावर मात करण्याचा निश्चय फ्रेंच प्रधानमंडळांनीं केला होता. या वेळीं बर्लिनच्या दरबारीं लॉर्ड ऑगस्टस लाफ्टस या नांवाचे इंग्रज वकील होते, त्यांजपाशीं बिस्मार्क यांनीं आपलें पुढील मत बोलून दाखविलें.

"स्पॅनिश गादीच्या प्रश्नाचा निकाल शांततेच्या मार्गानें लावण्याची फ्रेंचांची इच्छा नाहीं, हें निःसंशय आहे. कोणत्या तरी मार्गानें आमचा पाणउतारा करावा, असा त्यांचा निश्चय दिसतो. आम्हांसहि आमच्या इभ्रतीचें संरक्षण

करणें भाग आहे. असले अपमानकारक प्रसंग यापुढें निमूटपणें सोसणें प्रशियन लोकमताच्या दृष्टीनें आम्हांसहि अशक्य आहे. ”

तारीख १३ जुलई रोजीं बर्लिन राजवाड्यांतील खलबतखान्यांत कौंट बिस्मार्क, रणमंत्री जनरल फॉं मोल्टके व युद्धविषयक प्रधान जनरल फॉं रून या तिघांची बैठक झाली. याच वेळीं एम्स येथून आलेली तार कौंट बिस्मार्क यांच्या हातीं पडली. ज्या तारेचा विपर्यास पुढें बावीस वर्षांनीं होऊन बिस्मार्क यांचें नांव बद्दू करण्याचा प्रयत्न झाला, ती तार ही:—

एम्स, १७ जुलई १८७०.
दुपारीं ३ वाजून ४० मिनिटें.

राजाचे खास सल्लागार ॲबेकेन यांजकडून.

महाराजांनीं मला पुढीलप्रमाणें हुकुम केला आहे:—

‘ राईच्या रस्त्यावर बेनेडेटी यांनीं माझी आज पुन्हा गांठ घेतली. स्पेनच्या सिंहासनाच्या बाबतींत होहेन झोलर्न घराण्यांतील कोणाहि पुरुषानें आपली वारसदारी पुन्हां सांगितल्यास मी त्याला संमति देणार नाहीं, असें वचन माझ्यातर्फे फ्रेंच प्रधानमंडळास कळविण्याची परवानगी बेनेडेटी यांनीं मजपाशीं मागितली. त्यांची बोलण्याची तऱ्हा मला उद्धटपणाची वाटली. हें मागणें, मीं ताबडतोब नाकारलें. सहज बोलतां बोलतां असल्या प्रकारचीं वचनें देणें इष्ट नाहीं व युक्तहि नाहीं. मला सरकारी रीत्या लियोपोल्डच्या राजीनाम्याची बातमी कळली नाहीं, असेंहि मीं त्यांला सांगितलें. याशिवाय माद्रिद व प्यारीस येथून ज्या अर्थी ही बातमी आमच्या अगोदर तुह्मास कळली, त्या अर्थी प्रशियन सरकारचा संबंध यांत कांहीं नाहीं, हें तुह्मासहि कळण्यासारखें आहे, असेंहि मीं त्यांना म्हटलें. ’

यानंतर लियोपोल्ड यांजकडून आलेलें पत्र महाराजांस मिळालें. एवढा प्रकार झाल्यानंतर कौंट यूलेनबर्ग व मी स्वतः अशा दोघांनीं ‘ महाराजांनीं बेनेडेटी यांची भेट पुन्हा घेऊं नये, अशी सल्ला महाराजांस दिली. लियोपोल्ड यांचें पत्र मिळाल्यानंतर या प्रकरणाचा अखेरचा निकाल लागला, असेंहि महाराजांस वाटलें. तेव्हां महाराजांनीं राजपुत्राचें पत्र आल्याची खबर जासु-

दावरोबर बेनेडेटी यांस कळवून ‘ आतां अधिक वाटाघाटीचें प्रयोजन नाहीं ’ असेंहि सांगितलें. बेनेडेटी यांनीं केलेली नवी मागणी व तिला आपण दिलेलें नकारात्मक उत्तर हीं आपल्या सर्व दरबारी वकिलांस व वर्तमानपत्रांस कळविण्याच्या बाबतींत आपसाहेबांचें काय मत आहे, तें कळविण्याची महाराजांची विनंति आहे ”

बिस्मार्क यांनीं या पाल्हाळिक तारेंतील पुढील मुद्याचा भाग तेवढा प्रसिद्ध केला.

“ होहेन झोलर्न राजपुत्राचा राजीनामा फ्रेंच सरकारास सरकारी रीत्या मिळाल्यानंतर एम्स येथील त्यांच्या वकिलांनीं राजे वुइलियम यांजपाशीं नवी मागणी केली. होहेन झोलर्न घराण्यांतील कोणाहि राजपुत्रानें स्पेनच्या गादीचा पुन्हां प्रश्न उपस्थित केल्यास त्यांस आपण संमति देणार नाहीं, असें वचन राजातर्फे फ्रेंच प्रधानमंडळास कळविण्याची परवानगी राजांनीं एम्स येथील फ्रेंच वकिलास द्यावी, अशी ही मागणी होती. राजांनीं फ्रेंच वकिलाची भेट घेण्याचें नाकारलें व ‘ आपणास अधिक कांहीं कळवावयाचें नाहीं ’ असा निरोपहि त्यांनीं जासुदाबरोबर फ्रेंच वकिलास पाठविला. ”

या दोन्ही तारांतील मजकूर ताडून पाहतां बिस्मार्क यांनीं मूळच्या तारेंतील मजकुराचा विपर्यास करून सत्यापलाप केला नाहीं, हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. जनरल फॉ रून यांनीं या बाबींत आपलें पुढील मत प्रगट केलें.

“ बिस्मार्क यांस जो मजकूर बिनमहत्वाचा अथवा प्रसिद्ध करण्यास नालायक असा वाटला, तेवढाच त्यांनीं गाळला. बाकीच्या मजकुरांत कोणतीहि फिरवाफिरव न करतां अथवा त्यांत पदरचें कांहीं न घालतां जशाचा तसाच ताबडतोब तो प्रसिद्ध केला. त्यांनीं छाटाछाट केलेल्या तारेचा मसुदा प्रथम आह्मां सर्वांस दाखविला व तो समाधानकारक आहे, असें आह्मीं सर्वांनीं सांगितल्यानंतरच तो प्रसिद्धीसाठीं पाठविला. ”

या बाबींत वुइलियम राजानें किती सहनशीलता दाखविली होती व फ्रेंचांचा उद्दामपणा कसा सहन केला होता; याची हकीकत सर्व लो-

कांस कळविणें इष्ट होतें. प्रशियाचा पाणउतारा करून फ्रान्सचें ‘ वैभव ’ वाढलें पाहिजे यासाठीं फ्रेंच लोक ओरड करीत होते. एम्सची तार मुळाबरहुकूम प्रसिद्ध झाली असती, तर सारें जर्मन लोकमत एकदम खवळून गेलें असतें. राजानें दाखविलेली शांततेची वृत्ति जर्मन राष्ट्रास कधींहि पसंत पडली नसती. ही सर्व राष्ट्राची मान-हानी होय, असें वाटून सारें जर्मन राष्ट्र खवळून गेलें असतें. याकरतां मुळांतील तीक्ष्णपणा तेवढा कमी करून तोच भावार्थ बिस्मार्क यांनीं अधिक सौम्य भाषेंत व्यक्त केला होता.

बिस्मार्क यांनीं अशा रीतीनें तयार केलेला खलिता परराष्ट्रांतील जर्मन वकिलातीकडे व जर्मनींतील पत्रकाराकडे रवाना करण्यांत आला. हा मजकूर प्रसिद्ध झाल्याबरोबर तेवढ्यानें जर्मन राष्ट्रांत जी खळबळ उडाली, तीवरून मूळची तार तशीच प्रसिद्ध झाली असती, तर लोकमतास केवढा धक्का बसला असता, याचें अनुमान कोणासहि करतां येण्याजोगें आहे. हा वेळपर्यंत दक्षिण जर्मनी आणि उत्तर जर्मनी असा कृत्रिम भेद मेन नदीनें केला होता. पण ही हकी-कत प्रसिद्ध झाल्यानंतर मेन नदीचें अस्तित्वच जणूं काय नाहींसें झालें. उत्तर आणि दक्षिण जर्मनीची भाऊबंदकी संपुष्टांत आली. बव्हेरियन, प्रशियन, सॅक्सन असला कृत्रिम जातिभेद नष्ट होऊन त्या जागीं जर्मन हा एकच राष्ट्रीय वर्ण निर्माण झाला. पितृभूमीवर बाहेरून आघात होत आहे, असें पाहतांच तिच्या रक्षणासाठीं ‘ वयं पंचाधिकं शतं ’ असें म्हणून सारे जर्मन एक झाले.

ही गोष्ट घडून गेल्यानंतर बावीस वर्षांनीं सोशल डेमोक्रॅट पक्षाचा पुढारी हर लिब्नेट यानें बिस्मार्क यांचें नांव बद्दू करण्यासाठीं व १८७०–७१ च्या युद्धाची जबाबदारी त्यांजवर टाकण्याकरितां या

गोष्टीचा उपयोग करून घेतला. केवळ स्वतःची महत्वाकांक्षा तृप्त करण्याकरतां एका शांतता प्रिय राष्ट्राला बिस्मार्क यांनीं युद्धाच्या ज्वालेंत लोटून दिलें व हें साधण्याकरतां बिस्मार्क यांनीं 'बनावट' तार तयार केली, असा आरोप त्यानें बिस्मार्क यांजवर केला. त्याला उत्तर म्हणून जर्मन सरकारनें त्याच वेळीं मूळची तार जशीच्या तशीच प्रसिद्ध केली. परराष्ट्रांना भेडसावून व धाकदपटशा दाखवून आपली प्रतिष्ठा वाढविण्याची खोड नेपोलियन यांस होती; तथापि प्रशियाच्या संबंधीं केलेल्या कुटिल कारवाईस इतक्या लवकर फळ येत चाललें, हें पाहून त्यांनाहि थोडीबहुत चिंता वाटूं लागली. लोकमतास आळा घालण्याची वेळ राहिली नव्हती. सारा फ्रान्स देश युद्धासाठीं एका पायावर तयार झाला असतां त्याला आतां मागें ओढणें शक्य नव्हतें. लोकमताविरुद्ध आतां यत्किंचितहि गडबड केल्यास आपला राजमुगुट ढांसळेल ही जाणीव नेपोलियन बादशहास होती. आपल्या लष्कराच्या कर्तबगारीसंबंधानें ते स्वतः साशंक होते. त्यांचे मुख्य सेनापति मार्शल लेबो यांनीं 'विजारीच्या बटणापर्यंत' सर्व तयारी सज्ज आहे, असें उत्तर जरी दिलें होतें, तरी बादशहा स्वतः युद्धकलेंत अनभिज्ञ नसल्यामुळें या उत्तराची खरी किंमत ते समजून होते. उलटपक्षीं राणी युजिनी युद्धासाठीं विलक्षण आतुर झाली होती. युद्धांत यश मिळवून फ्रान्सची गादी आपल्या घराण्यांत कायम राखण्याची तिची इच्छा होती. हें युद्ध घडवून येण्यास आपलीच सारी खटपट कारणीभूत झाली, असें एका चेंबरच्या प्रतिनिधीजवळ तिनें स्पष्ट बोलवून दाखविलें, अशीहि लोकवार्ता आहे. तथापि युद्ध होऊन गेल्यानंतर ही गोष्ट तिनें साफ नाकारली. इतकी गोष्ट खरी कीं, ती युद्धास फार उत्सुक होती व तिच्या पक्षाचे लोक लोकांस चिथवीत होते. अनेक प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्यांनीं हा पक्ष

फ्रेंचलोकांच्या उच्छृंखलपणांत भर घालीत होता, यामुळें फ्रेंच लोकमत इतकें खवळलें कीं, त्यास यत्किंचित आळा घालणें अशक्य होतें. ‘ प्रशियाचा निःपात ’ ‘ बर्लिनला चला ’ असल्या प्रकारच्या आरोळ्यांनीं प्यारीस शहर वेळीं अवेळीं दुमदूमून जाऊं लागलें.

तारीख १५ जुलई रोजीं मुख्य प्रधान ऑलिव्हिअर यांनीं ‘ उत्तर जर्मन संस्थानांचा वकील प्यारीस शहर सोडून गेला असून त्या संस्थानांशीं असलेला राजकीय संबंध तुटला आहे ’ असें विधान केलें. खरी गोष्ट अशी होती कीं, तो वकील या वेळीं रजेवर गेला असून त्याच्या जागीं कौंट सोम्स हे वकिलातीचें सारें काम पहात होते. त्याच प्रमाणें ‘उत्तर जर्मनीनें आपलें सैन्य डेरेदाखल केलें असून बिस्मार्क यांनीं ही सारी हकीकत युरोपांतील सगळ्या प्रधानमंडळास सरकारी खलिते पाठवून कळविली आहे’ असेंहि विधान ऑलिव्हिअर यांनीं प्रधान मंडळातर्फें केलें. अद्यापीहि शांतता रहावी, अशी ज्या प्रतिनिधींची इच्छा होती, त्यांनीं बिस्मार्क यांचा खलिता प्रसिद्ध करा, अशी मागणी केली. वास्तविक बिस्मार्क यांनीं सगळीकडे पाठविलेल्या खलित्यांत एम्सच्या तारेवांचून दुसरा कोणताहि मजकूर नव्हता. बिस्मार्क यांचा खलिता प्रसिद्ध करण्याचें ऑलिव्हिअर यांनीं नाकारलें. थियर्स, जूल्स फेव्हर, गॅम्बेटा वगैरे मंडळी युद्धाला प्रतिकूल होती. युद्ध टाळण्याकरतां त्यांनीं शक्य तितकी खटपट केली; पण फ्रेंच लोकमत या वेळीं अगदीं उल्लू बनून गेलें असल्यामुळें या शांतताप्रिय मंडळीच्या खटपटीस यश आलें नाहीं. युद्धासाठीं लागणाऱ्या खर्चास किंबहुना प्रधानमंडळाच्या प्रत्येक मागणीस सर्व प्रतिनिधींनीं उच्छृंखल उत्साहाच्या भरांत पूर्ण संमति दिली.

तारीख १५ जुलई रोजीं राजे वुइलियम एम्स गांव सोडून बर्लिन शहरीं येण्यास निघाले. वाटेंतल्या प्रत्येक मुक्कामावर प्रजाजनांनीं अपूर्व

उत्साहानें त्यांचें स्वागत केलें. युवराज फ्रेड्रिक वुइलियम, कौंट बिस्मार्क व जनरल फाँ मोल्टके हे राजभेटीसाठीं ब्रँडनबर्ग येथें सामोरे गेले. या ठिकाणीं पुढें काय करावें, याबद्दलहि खलबत झालें. प्रधानमंडळांतील इतर लोक, बर्लिनचा ग्रामाधिकारी व इतर लोकांचे थवेच्याथवे राजाच्या आगमनाची वाट पहात स्टेशनावर व आजुबाजूस जमा झाले होते. इतक्यांत राजरथ स्टेशनांत आल्याची खबर लागतांच सर्वत्र आनंदाचा कोलाहल माजून राहिला. 'फ्रान्सला धुळीस मिळवा' अशा आरोळ्या चोहोंकडून ऐकूं येऊं लागल्या. पॉटस्डयाम स्टेशनच्या विश्रामशाळेंतच ( Waiting Room ) मंत्रिमंडळाची बैठक होऊन सैन्य डेरेदाखल करण्याचा निश्चय राजानें केला. ही महाराजांची आज्ञा लोकांस कळविण्याकरतां युवराज बाहेर आले व हा मजकूर लोकांस त्यांच्याकडून कळतांच कानठाळ्या बसण्यासारखा विजयध्वनि चोहोंकडे उठला. तारीख १६ जुलई रोजीं महाराजांचा हुकुम सर्व जर्मनीभर तारेनें दाखल होऊन लष्करें आपापल्या बराकींतून बाहेर पडूं लागलीं. कोणतीहि गडबड अथवा घोटाळा न होतां, सैन्याची जमवाजमव सुरू झाली. राखून ठेवलेले लष्करी लोक आपल्या नेमलेल्या जागीं हजर होऊं लागले. कोणतींहि नवीं पथकें तयार करावयाचीं राहिलीं नव्हतीं. घाईघाईनें आयत्या वेळीं करावयाचें काम कोणतेंहि शिल्लक पडलेलें नव्हतें. पूर्वीं ठरविलेल्या शिस्तीनें सर्व कामें सुरळित व बिनबोभाट पार पडलीं. सैन्यांतील निरनिराळे सर्व भाग आपापली जबाबदारी शिरावर घेण्यास पूर्ण सज्ज होते.

तारीख १९ जुलई रोजीं म्हणजे राणी लुईसीच्या साठाव्या मृत्युतिथीच्या दिवशीं उतर जर्मन संस्थानांची डायट बर्लिन येथें भरली. सर्व प्रतिनिधींनीं आपापले पक्षभेद विसरून प्रधानमंडळास सर्व प्रका-

रची मदत करण्याचा निश्चय जाहीर केला. राजे वुइलियम यांनीं जातीनीं हजर राहून व प्रास्ताविक भाषण करून सभेच्या कामास सुरुवात केली. राजांचें भाषण सुरू असतां मधून मधून टाळयांचा एवढा प्रचंड कडकडाट होई कीं, त्यांस मधून मधून आपलें भाषण थांबवावें लागे.

नंतर बिस्मार्क उठून म्हणाले, " फ्रेंचांच्या वकिलानें युद्ध पुकारल्याचा खलिता आज माझ्या हातीं दिला आहे, एवढेंच मला सभेला सांगावयाचें आहे. "

एवढे शब्द बिस्मार्क यांच्या तोंडून बाहेर पडतात न पडतात, तोंच सर्व सभासद एकदम उठून उभे राहिले व आनंदाच्या आरोळ्यांनीं त्यांनीं सर्व सभागृह दणाणून सोडलें. या नंतर थोड्या दिवसांनीं सभेचे अध्यक्ष डॉ. सायमन यांस अमेरिकेंतील सेंट लुई येथून पुढील पत्र आलें.

"फ्रान्सच्या सिंहासनावर अधिष्ठित झालेल्या जुगाऱ्यानें क्षुद्र कारणें उपस्थित करून जर्मन राष्ट्राला जिंकून त्याला पारतंत्र्यांत बद्ध करण्याकरतां हें जुलमी युद्ध उपस्थित केलें आहे. पहिल्या नेपोलियनचे दिवस पुन्हां लवकरच येणार असा रंग दिसू लागला आहे. केवळ जर्मन राष्ट्राच्या नव्हे, तर इतर राष्ट्रांच्याहि स्वातंत्र्याकरतां तुह्मीं तरवार उपसली आंहे, असें सेंट लुई येथील जर्मन नागरिक तुह्मास या पत्रानें कळवीत आहेत. "

या पत्राबरोबरच निकामी होणाऱ्या शिपायांकरतां व पोरक्या पोरांकरतां तीस लक्ष रुपयांची रकम सेंट लुई येथून आली.

नेपोलियनच्या काळीं अस्तित्त्वांत असलेल्या आयर्नक्रास या बिल्लयाचें पुनर्जीवन वुइलियम राजानें केलें. बव्हेरियाच्या लुई राजानें आपल्या लष्कराचें अधिपत्त्य प्रशियाच्या राजाला दिलें व प्रशियाच्या राजानें आपल्या तर्फे त्या जागीं वुइलियम फ्रेड्रिक यांची नेमणूक केली. त्याच प्रमाणें बर्टेम्बर्ग व बेडन येथील सैन्येंहि प्रशियाच्या लष्करांत

दाखल झालीं. पितृभूमीच्या रक्षणासाठीं सर्व जर्मन एक होऊन फ्रेंचांस तोंड देण्यास तयार झाले.

तारीख २० जुलई रोजीं लढाईच्या पूर्वींची हकीकत बिस्मार्क यांनीं डायट सभेस निवेदन केली. एवढ्या अवधींत फ्रेंच सरकाराकडून आपणास सरकारी रीत्या एकच खलिता आला, ही गोष्ट त्यांनीं सभेस सांगितली. तो खलिता ह्मणजे फ्रेंचांनीं जर्मनीवर लढाई जाहीर केली हा होय. या पूर्वीं बेनेडेटी व वुइलियमराजे यांजमधील झालेलीं भाषणें खासगी स्वरूपाचीं असून सरकारी रीत्या त्यांचें कांहीं महत्व नाहीं, असेंहि बिस्मार्क ह्मणाले. यानंतर युद्धखर्चाप्रीत्यर्थ लागणाऱ्या सर्व खर्चाची मंजुरी मिळून व राजाच्या नांवानें पुन्हा जयघोष होऊन सभा तहकूब झाली.

आतां बाकीचीं राष्ट्रें कोणतामार्ग स्वीकारतात, या गोष्टीकडे फ्रान्स व जर्मनी या दोन्ही राष्ट्रांचे डोळे लागले. फ्रान्सचा जय होणें किंवा न होणें ही गोष्ट दुसऱ्या एकदोन राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून होती. प्रशियाला दुसऱ्या मदतीची जरूर भासत नव्हती. तथापि फ्रान्सशिवाय आणखी एक दोन राष्ट्रें आपल्याविरुद्ध गेलीं, तर आपला कितपत निभाव लागेल, याबद्दल त्याला शंका होती. इतर राष्ट्रांचीं मनें फ्रान्सकडे वळूं नयेत यासाठीं बिस्मार्क यांनीं एका गुप्त गोष्टीचा स्फोट केला. बेल्जम देशासंबंधीं नेपोलियन बादशहांनीं बिस्मार्क यांजपाशीं जें राजकारण केलें होतें, तें तारीख २६ जुलईच्या टाइम्सच्या अंकांत बिस्मार्क यांनीं उघडकीस आणलें. यासंबंधाचे सर्व सरकारी खलिते कौंट बेनेडेटी यांनीं स्वहस्तें सरकारी कागदावर लिहिले होते. या मूळ अस्सल कागदांचे फोटो बिस्मार्क यांनीं सर्व युरोपीय प्रधानमंडळास पाठविले. फ्रेंच सरकारचें हें दुटप्पीपणाचें वर्तन उघडकीस येतांच, सर्व युरोपभर मोठी खळबळ उडून गेली. तेव्हां बेनेडेटी यांनीं हे खलिते बिस्मार्क यांच्या

सांगण्यावरून आपण लिहिले व यांत नेपोलियन यांचा कांहीं अपराध नसून बिस्मार्क यांचें धाष्टर्यच उघड होत आहे, असें स्पष्टीकरण केलें, पण यामुळें बिस्मार्क यांच्या धाष्टर्यापेक्षां बेनेडेटी यांचा मूर्खपणा मात्र जाहीर झाला.

बेनेडेटी यांचें स्पष्टीकरण प्रसिद्ध झाल्यानंतर तारीख ५ अगष्ट सन १८६६ च्या बेनेडेटी यांच्या अस्सल पत्राचे फोटो बिस्मार्क यांनीं पुन्हां प्रसिद्ध केले. नेपोलियन बादशहाची स्वारी व्हिची येथें असतां खुद्द त्यांच्याच आज्ञेवरून बेल्जमसंबंधीं बोलणें आपण सुरू केलें आहे, असें बेनेडेटी यांनीं या पत्रांत लिहिलें होतें. हा पुरावा प्रसिद्ध झाल्यानंतर बेनेडेटी यांच्या तोंडास पक्केंच कुलुप बसलें.

हॅनोव्हरचे पदच्युत राजे यांनीं कांहीं सैन्य आपल्या पदरीं ठेवलें होतें, ही हकीकत मागें एक वार सांगितलीच आहे. या सैन्यास पगार न मिळाल्यामुळें त्यांतील बहुतेक लोक फ्रान्स आणि स्वित्सर्लंड या देशांत हाल अपेष्टा सोशीत होते. बिस्मार्क यांच्या सल्ल्यानें वुइलियम राजानें या लोकांस स्वदेशीं येण्यास परवानगी दिली व ज्यांस उपजीविकेचीं साधनें नव्हतीं, त्यांस तहहयात वार्षिक पेनशनें करून दिलीं. त्याच प्रमाणें सर्व राजकीय कैद्यांस मुक्त करण्यांत आलें.

अशा रीतीनें वार्धक्यानें पीडलेल्या वुइलियम राजानें आपल्या देशाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं तारीख ३१ जुलई सन १८७० रोजीं रणभेरी वाजविली.

प्रथम खंड संपूर्ण.

# भारत–गौरव–ग्रंथमाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## उद्देश व नियम

सर्व महाराष्ट्रीयांच्या आदरास, अभिमानास व प्रशंसेस पात्र झालेली अशी साऱ्या महाराष्ट्रांत ही एकच ग्रंथमाला असून महाराष्ट्र वाङ्मयाची उत्कृष्ट सेवा ही ग्रंथमाला किती बाणेदार वृत्तीनें बजावीत आहे, हें वाङ्मयभक्तांना माहीतच आहे. इतकी लोकप्रिय ग्रंथमाला महाराष्ट्रांत दुसरी कोणतीहि नसून अन्य कोणत्याहि ग्रंथमालेपेक्षां या ग्रंथमालेचा प्रसार दुपटी तिपटीनें अधिक आहे. आपण या ग्रंथमालेचे आश्रयदाते असालच. नसल्यास ताबडतोब पत्र पाठवून ग्रंथमालेचे आश्रयदाते व्हा. युरोपांतील महायुद्धामुळें छपाईच्या सर्व वस्तु फार महाग झाल्यानें ग्रंथमालेस अधिक लोकाश्रयाची फार आवश्यकता आहे. तरी आपण स्वतः ग्रंथमालेस आश्रय देऊन व आपल्या मित्रवर्गांचाहि जोडून देऊन महाराष्ट्र वाङ्मयाची सेवा अधिक उत्साहानें करण्यास आम्हास कार्यक्षम करा. महाराष्ट्र साहित्याची सर्वांगीं सेवा करून सर्वोत्कृष्ट वाङ्मयाचा शक्य तितक्या कमी किंमतीनें प्रसार करणें, हा या ग्रंथमालेचा उद्देश आहे.

**नियमः**—( १ ) आश्रयदात्यांत केव्हांहि नांव दाखल करतां येतें. पहिली व्ही. पी. नांव नोंदणावळ म्हणून चार आणे अधिक घेऊन पाठविली जाते. या व्ही. पी. चा स्वीकार झाल्यावर आश्रयदात्यांस ग्रंथमालेचें प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक साध्या बांधणीचें दहा आण्यांच्या व्ही. पी. नें व कापडी बांधणीचें पुस्तक एक रुपयाच्या व्ही. पी. नें पाठविण्यांत येतें. ( २ ) आश्रयदात्यांत नांव दाखल करतांना मागील सर्व अथवा कांहीं पुस्तकें आश्रयदात्यांनीं घेतलींच पाहिजेत असें नाहीं; परंतु आश्रयदात्यांत नांव दाखल झाल्यावर प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक आश्रयदात्यांनीं घेतलेंच पाहिजे. जीं पुस्तकें शिल्लक नाहींत तीं देण्याची जबाबदारी ग्रंथमालेवर नाहीं. ( ३ ) साधारण दोन महिन्यांनीं एक पुस्तक प्रसिद्ध होतें. पुस्तक क्राऊन साईजचें, दोनशेंवर पानांचें व बहुतेक सचित्र असतें. ( ४ ) पुस्तकें मागवितांना पुस्तकांचीं नांवें स्पष्ट लिहावींत. तसेंच पत्ता वगैरे स्पष्ट असावा. ( ५ ) मागील पुस्तकांच्या किंमती वाढविल्या आहेत, तिकडे लक्ष्य द्यावें व मागील सर्व नियम रद्द समजावेत.

# पुस्तकांचीं नांवें व किंमती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **समाजकंटक.** प्रथम खंड | किं. | ०)१२ | आश्रयदात्यांस. | ०)६ |
| **समाजकंटक** द्वितीय खंड. | किं. | ०)१२ | आश्रयदात्यांस. | ०)६ |
| **दैवलीला** | ,, | ०)१२ | ,, | ०)६ |
| **समाजरहस्य** | ,, | ०)१२ | ,, | ०)६ |
| **जन्मभूमि** प्रथम खंड | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **जन्मभूमि** द्वितीयखंड. | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **प्रेममंदिर.** | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **शिवाजीचा उजवा हात** | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **रजनी** | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **जर्मनीचें पाताळयंत्र** } **केसरची प्रभावळ** } | ,, | १)४ | ,, | रु.१ |
| **स्वप्नमय आयुष्य** | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **मातृमूर्ति** | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **कर्मफल** | ,, | ०)१२ | ,, | ०)८ |
| **प्रिन्स बिस्मार्क** प्रथम खंड. | ,, | ०)१० | ,, | ०)८ |

**प्रिन्स बिस्मार्क** द्वितीय, तृतीय, व चतुर्थ खंड छापत आहेत.

सूचनाः—सावित्री-सत्यवान, प्रवासिनी, महात्मापरिचय, महात्मागौतम, जहांगीर, जाईचा मंडप प्रथम खंड व जाईचा मंडप द्वितीय खंड हीं पुस्तकें शिलक नाहींत.

**प्रभाकर श्रीपत भसे,**

म्यानेजर, भारत-गौरव-ग्रंथमाला—गिरगांव—मुंबई.

म. ग्रं.
क्र. 290
चौरस २

IRBK-0100210

IRBK-0100210

आदर्श बुक बायंडिंग वर्क्स.
ब्रा. सो नौपाडा—ठाणें.